म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. २५२९.

२५



IRBK-0102521
IRBK-0102521

# सुभाष

प्रा० क्र० २४२१.

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 25429
विभाग बा. वा.
क्रमांक 9083
नों. दि. 3/9/31

# सु भा ष

(जीवन-चरित्र)

लेखक:

भा. कृ. केळकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 25429 नों दि ...........
वि. बा. वा. ... क्र. ...... ...........

IRBK-0102521

IRBK-0102521

१ ऑगस्ट १९४६ किंमत ३॥ रु.

एकमेव विक्रेते
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन
१९६/११ सदाशिव, पुणें २.

चित्रकार श्री. डी. डी. दलाल, मुंबई.

प्रकाशक :
रामचंद्र गोविंद परांजपे
लातूर, हैद्राबाद

मुद्रक :
वि. ह. बर्वे
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

दुसऱ्या भारतीय

सशस्त्र क्रांतियुद्धाचे जनक

*रासबिहारी बोस*

यांच्या उज्ज्वल स्मृतीस—

# प्रस्तावना

नेताजी देशगौरव सुभाषचंद्र बोस यांचें चरित्र श्री. भा. कृ. केळकर यांनीं लिहून अभिप्रायाचे दोन शब्द लिहिण्यासाठीं, आपल्या बंधूंच्या द्वारां तें मजकडे पाठवलें. त्यांच्या बंधूंकडून मीं कांहीं भाग, पहिल्या व शेवटल्या प्रकरणांतील–वाचून घेतला. त्यावरून वाचकांना या चरित्रापासून आजच्या परिस्थितीला योग्य तो संदेश घ्यावयाला मिळेल अशी माझी खात्री झाली. मी कांहीं साहित्यिक नव्हे. तेव्हां साहित्यदृष्टीनें याचें मूल्यमापन करण्याचा अधिकार मला नाहीं. व म्हणून मीं फारसा भाग वाचण्याचाहि त्यांच्या बंधूंना त्रास दिला नाहीं. हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत नेताजी सुभाष यांच्या अद्‌भुत पराक्रमाची कहाणी देशांतील प्रत्येक खेडयापाडयांत, प्रत्येक घरांत पोचणें मला आवश्यक वाटतें. म्हणून ज्या कोणाला थोडीशी लेखनकला साधली आहे त्यानें प्रत्येकानें आपापल्या विशिष्ट दृष्टीचा उपयोग करून नेताजींचें लहानमोठें चरित्र लिहिल्यास तें उपयुक्तच होणार आहे. मोठया पुस्तकांपेक्षां लहान लहान पुस्तकें अगदीं स्वस्त किंमतींत देण्यासारखीं किंवा फुकट वाटण्यासारखीं होणें आज अत्यंत आवश्यक आहे. नेताजींच्या चरित्रांतील कोणत्या गोष्टी या ग्रंथांत आहेत व कोणत्या लिहावयाच्या राहिल्या आहेत हें मीं ग्रंथ संपूर्ण न ऐकल्यानें सांगूं शकत नाहीं. पण ज्या गोष्टी या ग्रंथांत असतील, त्या योग्य ध्येयदृष्टीनें मांडल्या आहेत याबद्दल माझी खात्री असल्यानें हा ग्रंथ वाचकांना योग्य मार्गदर्शन करील असें मी म्हणूं शकतों.

श्री. सुभाषबाबूंचा व माझा संबंध विशेष असा १९३९ व १९४० या सालीं

आला. त्यांचें शेवटचें दर्शन मला रामगड येथें ता. २१, २२, २३ मार्च १९४० या दिवशीं झालें. त्यावेळीं तेथें " पुरोगामी गटाची " मोठी परिषद भरली होती व त्या परिषदेंत युद्धविरोधी प्रचार तावडतोब सुरू करण्याचा महत्त्वाचा आदेश दिला गेला. त्या आदेशानुसार मीं आपलें कार्य सुरू केल्यानें एप्रिल ८ ला मी बंदिवासी झालों व तुरुंगांत असतांनाच सुभाषबाबू अदृश्य झाले अशी बातमी वाचावी लागली. ते अदृश्य होण्याचे सुमारास मी बाहेर असतों तर त्यांचे बरोबर जाण्याचा योग बहुधा मला आला असता. परंतु तेवढें माझें भाग्य नव्हतें.

रामगडला परिषदेच्या वेळीं अतिशय पाऊस पडला व सगळ्या झोंपड्या गळूं लागल्या. आमच्या शेजारच्याच झोंपडींत सुभाषबाबू होते. त्यांना पुष्कळ आग्रह केला शेजारच्या एका मंदिरांत त्यांनीं निवाऱ्यास जावें म्हणून–पण त्यांनीं कोणाचेंहि ऐकिलें नाहीं. 'तुम्ही तेथें मी' असें म्हणून ते आपल्या स्थानीं पावसाचा त्रास सोशीत स्वस्थ राहिले. 'इना'च्या अधिकाऱ्यांवर खटले करण्यांत आल्यानन्तर सुभाषबाबूंसंबंधीं अशा कितीतरी गोष्टी आतां प्रसिद्ध झाल्या आहेत. आपण सर्वांनीं वाचलेंच आहे कीं, आपल्या सैनिकांना गवत खाऊन राहावें लागत आहे असें दिसतांच त्यांनींहि आपला निर्वाह गवतावर करणें सुरू केलें. ज्यांना आपलीं माणसें म्हटलें, त्यांच्याशीं वागतांना सुभाषबाबूंइतकी आपुलकीची दृष्टि ठेवणारा पुढारी विरळाच जन्माला येतो.

त्रिपुरी येथें १९३९ सालीं कॉंग्रेस अधिवेशन भरलें त्यावेळीं सुभाषबाबूंना १०१° ते १०४° पर्यंत ताप होता. तापाच्या अशा स्थितींत दुपारपासून रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत त्यांच्यावर कठोर टीका करणारें कॉंग्रेस पुढाऱ्यांचें वक्तृत्व ते शांतपणें ऐकत होते. त्या कठोर मानहानिकारक टीकेला त्यांनीं शेवटीं अत्यंत विनयपूर्वक उत्तर दिलें व त्या उत्तरांत आपल्या नाराज झालेल्या कॉंग्रेसश्रेष्ठांना उलट टीका करण्यास जागा राहूं नये अशी संतोषकारक भाषा वापरली. तथापि कॉंग्रेसश्रेष्ठांचा रुसवा दूर झाला नाहीं वगैरे हकिगत सर्वांना माहीत आहेच.

सुभाषबाबूंनीं आपल्या उत्तरांत नसता दोष आपल्याकडे घेऊन कॉंग्रेसश्रेष्ठींचें समाधान करण्याचा प्रयत्न केला तरी तो अयशस्वी झाला हें पाहून मला फार

खेद झाला. त्यांच्या संबंधानें जे अभद्र शब्द सज्जन समजल्या जाणाऱ्या माणसां-कडून वापरले गेले, त्यांच्या तापासंबंधानें थोर समजल्या जाणाऱ्या माणसांकडून ज्या क्षुद्र कोटचा केल्या गेल्या, ते शब्द व त्या कोटया सर्व विसरणेंच बरें. तिसऱ्या दिवशीं त्यांचें अध्यक्षत्व नाममात्र ठेवून व्यवहारतः रद्द करण्याचा ठराव पास झाला, तो ऐकून 'त्या ठिकाणीं क्षणभर राहणेंहि पाप आहे' असें समजून मी पुण्यास निघून आलों. त्यांचा राजकीय खून करणारा ठराव झाल्या-नंतरहि सुभाषबाबूंनीं आपलें मन क्षुब्ध न होऊं देतां योग्य अशी वर्किंग कमिटी नेमण्याचा प्रयत्न केला. परंतु महात्माजींनीं तो साधूं दिला नाहीं. त्यांच्यावर प्रथम रुसवा महात्माजींचाच होता. ते महात्माजींच्या नियोजित उमेदवाराविरुद्ध अध्यक्ष निवडून आल्याबरोबर महात्माजींनीं 'हा माझा पराभव आहे' असें जाहीर करून त्यांच्या उच्चाटनाची व्यवस्था करून ठेवली. व अर्थातच अखेर ते यशस्वी झाले. महात्माजींच्या महान् चरित्रांत माझ्या मतें जीं कांहीं मोहस्थळें, दोषस्थळें आहेत त्यांत सुभाषबाबूसंबंधांचें त्यांचें प्रचारकार्य हें एक फार मोठें दोषस्थळ आहे. असो. सुभाषबाबू मनानें किती मोठे आहेत (किंवा होते) हें स्पष्ट करण्याकरितां वरचा जुना पाढा वाचला व पुढील दोन गोष्टी सांगत आहें.

सुभाषबाबूंनीं आपल्याविरुद्ध झालेल्या महात्माजींच्या व इतर कॉंग्रेसश्रेष्ठींच्या अकारण प्रचाराला उपेक्षणीय लेखून महात्माजींचेंच नांव सर्व आशियांत मोठें करण्याचा प्रयत्न केला व आपल्या पलटणींपैकीं एकीचें नांव जवाहरलाल डिव्हिजन असें ठेवून व्यक्तिगत मतभेदाला ध्येयनिष्ठ मनुष्य फारशी किंमत देत नाहीं असें दाखवून दिलें.

त्यांच्या हिंदुस्थानबाहेरील कार्याचें महत्त्वमापन या ग्रंथांत थोडेंफार झालें आहेच; मी त्या संबंधानें कांहीं लिहूं इच्छीत नाहीं. महात्माजी, जवाहरलाल नेहरू व कॉंग्रेसचे इतर बडे लोक यांनीं अलीकडे वेळोवेळीं काढलेल्या उद्गारांवरून व 'इना'च्या संबंधांत चालवलेल्या कार्यावरून असें समजण्यास जागा आहे कीं, सुभाषबाबूंच्या हिंदुस्थानाबाहेरील कार्याचें महत्त्व त्यांस पटून त्यांचें मत सुभाषबाबूं-बद्दल पुष्कळसें निर्मळ झालें आहे. कोणत्याहि देशाचा इतिहास वैभवशाली होण्यास भिन्न भिन्न उदात्त विचारप्रवाहांचा समन्वय व्हावा लागतो. हिंदुस्थानला वैभवाचे

दिवस येण्यास महात्माजींनीं पुरस्कारिलेला विचारप्रवाह व सुभाषबाबूंनीं पुरस्कारिलेला विचारप्रवाह यांचा समन्वय जनतेला करावा लागेल. असा समन्वय हिंदुस्थानांतील जागृत जनता करील असा मला विश्वास वाटतो. जनतेला वर उल्लेखिलेला इष्ट समन्वय करण्यासाठीं महात्माजींची व सुभाषबाबूंची सर्वांगीण ओळख होणें आवश्यक आहे. आणि म्हणून तशी ओळख करून देणारे जनतेची फार मोठी सेवा करीत आहेत. अशी सेवा करणाऱ्यांत श्री. भा. कृ. केळकर यांनीं आपलें नांव समाविष्ट केलें आहे याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों.

पुणें २
१५-२-४६

—पां. म. बापट

# निवेदन

ज्याच्या जयजयकारानें आज सारा भारतवर्ष दुमदुमत आहे अशा एका महापुरुषाची जीवनकथा सादर करीत असतांना अनेक प्रकारच्या भावना निर्माण होत आहेत.

एक तर " क सूर्यप्रभवो वंशः क चाल्पविषया मतिः । " अशी कालिदासानें वर्णन केल्याप्रमाणें मनःस्थिति होते. आणि दुसरें असें कीं नेताजींचें व्यक्तिमत्त्व सागरासारखें विशाल आहे. अशा विशाल व्यक्तिमत्त्वाला पुस्तकाच्या मर्यादेंत कसें वसवितां येणार ? परंतु विशाल गंगानदीचें एक तांब्याभर पाणी आणून आपण त्याचें गंगा समजून पूजन करीत नाहीं का ? तीच स्थिति या पुस्तकाची आहे. तें अपूर्ण आहे हें निःसंशय खरें आहे. सुभाषबाबूंच्यासारख्या क्रांतिकारकांच्या सम्राटाचें चरित्र हें सर्वच्या सर्व माहीत होणें देशाच्या या परवश अवस्थेंत अशक्य आहे. क्रांतिवीरांच्या आयुष्यांतील अनेक गुपितें अज्ञात राहातात. तेव्हां—

नेताजींचें हें चरित्र हा एक माहितीपूर्ण ग्रंथ नव्हे—तसें कोणी समजणारहि नाहीं. तो एक त्यांच्या उज्ज्वल स्मृतीला केलेला प्रणाम आहे. त्यांच्या तेजोमूर्तीला वाहिलेलें तें फूल आहे. तें फूल सुवासिक नसेल, मोहक नसेल, पण त्यामागें भक्ति मात्र निश्चित आहे. हीच एकमेव भूमिका चरित्र लिहितांना घेतलेली आहे. ती भूमिका मार्मिक टीकाकाराची नाहीं, विद्वान् चरित्रकाराची तर नाहींच नाहीं. ती क्रांतितेजाच्या विनयशील पूजकाची आहे. आज ज्यांच्या अंतःकरणांत त्या क्रांतिप्रवण वृत्तींनीं थैमान घातलें आहे अशा तरुणांना या महान् क्रांतिवीराचें त्यांच्या दृष्टींतून दर्शन घडावें म्हणून हा प्रयत्न केला आहे.

नेताजींनीं आपल्या आयुष्याचें वर्णन " ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं चाललेला अविरत झगडा " असें केलें आहे. हें वाक्य पुढें ठेवून ही जीवनकथा लिहिली आहे. आजच्या तरुणांच्या दृष्टीनें ती दृष्टि महत्त्वाची आहे आणि म्हणून त्या पद्धतीनें ही जीवनकथा सांगितली आहे. त्यामुळें त्यांत सर्व घटनांची नोंद ( Chronical of Events ) नाहीं.

सुभाषचंद्रांचे विषयीं अनेक गैरसमज स्वकीयांचे व परकीयांचे झाले आहेत. "फॅसिस्ट राष्ट्रांचा पगारी प्रचारक " यापासून ते " वाट चुकलेला देशभक्त " या विशेषणापर्यंत अनेक विशेषणें त्यांना लोकांनीं लावलीं. विवेकपूर्ण बुद्धीवर आधारलेली स्वतःच्या राष्ट्रावरील नितांत निष्ठा हें सुभाषबाबूंच्या जीवनाचें सूत्र आणि त्या निष्ठेतूनच त्यांची ऊर्जस्वल क्रांतिप्रियता व स्वातंत्र्यप्रीति निर्माण झालेली आहे. सुभाषबाबू म्हणजे कोण हें कळावयास तशाच मनोवृत्तीची आवश्यकता आहे. तुकारामाच्या अभंगाची गोडी भावपूर्ण हृदयालाच कळणार. इतरांना त्यांत काव्यमुद्रा आढळणार नाहीं. रुपये आणे पैंत राष्ट्राचें नि स्वतःचें जीवन मोजणाऱ्यांना किंवा ज्यांची निष्ठा परक्या विचारप्रणालीला वाहिलेली आहे अशांना सुभाषचंद्रांचें चरित्र कसें कळणार ? राष्ट्र अनेक वीरांच्या आत्मयज्ञांतून निर्माण होतें, घटनांतून नाहीं असें ज्यांना वाटतें त्यांना सुभाषबाबूंच्याविषयीं प्रेम वाटेल.

आज सारी भारतीय जनता सुभाषचंद्रांना अत्यंत भक्तीनें वंदन करीत आहे. सुभाषचंद्रांच्या मृत्युवार्तेवर विश्वास न ठेवतां त्यांच्या आगमनाची वाट पाहात आहे. गांधीजींनीं आवर्जून सांगितलें आहे कीं सुभाष जिवंत आहेत !

भवितव्यता हें खरें ठरवील का ?

इतिहासांत असें घडलें आहे. फांशीची शिक्षा झालेला डी व्हॅलेरा आयर्लंडमध्यें परत गेला व तो स्वतंत्र आयरचा अध्यक्ष झाला. आजचा हिंदुस्थान हा एक ज्वालामुखी होऊं पहात आहे. अशावेळीं नेताजींची आवश्यकता फार आहे. कारण ते स्वातंत्र्याचे दूत आहेत.

इतिहास आपली पुनरावृत्ति हिंदुस्थानांत करील का ?

पुणें<br>
१ आगस्ट १९४६

— भा. कृ. केळकर.

# आभार

चरित्र हें अनेकांच्या मदतीनेंच लिहितां येतें. हें चरित्र लिहीत असतांना अनेक गृहस्थांनीं मला साहाय्य केलें. त्या सर्वांचा नामनिर्देश कसा करणार ? त्यांचा मी ऋणी आहें. या चरित्रांतील विवेचन साधार आहे. अनेक पुस्तकांचा, वर्तमानपत्रांचा उपयोग हें चरित्र लिहितांना झाला आहे. त्यांचाहि प्रत्येक ठिकाणीं उल्लेख केलेला नाहीं. केसरी ग्रंथालयाचे व्यवस्थापक, छायाचित्रांचे ठसे देणारे वृत्तपत्रकार, आदि सर्वांचा मी आभारी आहें. श्री. दलाल व माझे मित्र श्री. राजाभाऊ देवधर यांनीं सजावट उत्कृष्ट करण्यास मदत केल्याबद्दल त्यांना धन्यवाद. उत्कृष्ट छपाईचें श्रेय आर्यभूषण छापखान्याच्या व्यवस्थापकांना आहे.

सेनापतींनीं आपली प्रकृति बरी नसतांना माझ्या पुस्तकाला दिलेला प्रस्तावनेचा आशीर्वाद केवळ अमूल्य आहे. त्यांचा मी ऋणी आहें.

श्री. अनंतराव कुळकर्णी ( कॉंटिनेंटल प्रकाशन पुणें ) यांनां माझ्याकडून हें चरित्र लिहवून घेऊन नेताजींची सेवा करण्याची संधि दिली याबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहें.

भा. कृ. केळकर

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६/१९ सदाशिव, पुणें २.

## ★ आमचीं प्रकाशनें ★

### श्री. वि. स. खांडेकर

नवा प्रातःकाल (दु. आ.) २॥
पूजन ” ३
पहिल्या-वहिल्या २।
गोफ आणि गोफण २॥

### श्री. वि. वि. बोकील
### ('वसंताच्या लीला')

बेन्नीचा भाऊ (दु. आ.) ३
साडेतीन शहाणे ३
चिमखडे २॥
वसंत ३
भाऊ–भाऊ २॥

### श्री. द. र. कवठेकर

नादनिनाद १॥
चांदण्यांतील सावल्या ३
शालन् ३
मंदा २

### श्री. ना. धों. ताम्हनकर

आमचे हे ३
मामा (दु. आ.) १॥
विद्यामंदिरांत ०॥।

### श्री. अनंत काणेकर

घरकुल १।
काळी मेहुणी १॥।

### श्री. ना. ह. आपटे

मी वाट पाहीन! २।
एकटी ५

### श्री. चिं. वि. जोशी

संचार २॥
ओसाडवाडीचे देव १॥

### श्री. र. गो. सरदेसाई

स्वाति १॥

### श्री. 'धनंजय'

कलावंतांच्या सहवासांत ३

### सौ. शांताबाई नाशिककर

नीलेचा दिलरुबा २

### श्री. चिरडे

भंगलेली मूर्ति २

### श्री. दत्त उ. वैद्य

मोगरीचा गजरा १॥

### श्री. प्रभाकर पाध्ये

प्रकाशांतील व्यक्ति १॥।

### श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

जीवन–साहित्य २॥

### श्री. काका कालेलकर

जीवन आणि समाज १॥।

### श्री. साने गुरुजी

अमोल गोष्टी २

### श्री. शामराव ओक

धोऱ्याचे कळे २

### श्री. जे. एल. रानडे

गोड ललकाऱ्या १॥

### श्री. जी. एस. पाटणकर

मधुर चिजें १।

### श्री. गोपिनाथ तळवलकर

अनुराधा २

### त्र्यं. र. देवगिरीकर

घटनापरिषद २

### श्री. भा. कृ. केळकर

सुभाष ३॥

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६।१९ सदाशिव, पुणें २.

## ★ आमचीं इतर पुस्तकें ★

**आचार्य अत्रे**

अत्रे उवाच

**श्री. य. गो. जोशी**

साहित्यिकांची सफर

**श्री. भा. रा. भागवत**

वैतागवनांतील वाफारे

**श्री. कालेलकर-चोरघडे**

साहित्याचें मूल धन

**श्री. दिवेकरशास्त्री**

हिंदुधर्मशास्त्र

**संपादित**

फडक्यांच्या शब्दांत फडके

## ★ आमचीं आगामी प्रकाशनें ★

**श्री. द. र. कवठेकर**

हा आमचा संसार

विनंति विशेष

गुन्हा

श्री

**श्री. वि. वि. बोकील**

'वसंताच्या लीला'

अरविंद शेख महंमद

**श्री. ना. धों. ताम्हनकर**

कोळ्याची भट्टी

'तो'

**प्रद्युम्न**

मायबोलीची कहाणी

**कुसुमाग्रज**

कल्पनेच्या तीरावर

**श्री. य. गो. जोशी**

हात ग काऊ !

**श्री. ना. ह. आपटे**

कोणी एक प्राध्यापक !

**श्री. अरविंद गोखले**

शाल

**सौ. शांता शेळके**

वर्षा

**श्री. वि. स. खांडेकर**

'??'. (कादंबरी)

**श्री. ग. त्र्यं. माडखोलकर**

'??' (कादंबरी)

**श्री. गोपीनाथ तळवलकर**

आनंदभुवन

शांतिनिकेतन

**रामतनय**

प्रमिला बेन

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | आवाहन | १५ |
| १. | स्वातंत्र्याची तपोभूमि | १७ |
| २. | विद्यार्जन | २५ |
| ३. | त्यागमय जीवनाचा उन्मेष | ३२ |
| ४. | लोकमान्यांच्या तपोभूमींत | ३९ |
| ५. | भारतीय राजकारणाच्या आघाडीवर | ४४ |
| ६. | युरोपांत भारताचा जयजयकार | ५५ |
| ७. | भारतीय नेतृत्वाच्या सिंहासनावर | ७० |
| ८. | पुरोगामी सुभाष | ८३ |
| ९. | तो अद्भुत प्रसंग | ९२ |
| १०. | स्वतंत्र भारताचे सरसेनापति | १०१ |
| ११. | चलो दिल्ली | ११६ |
| १२. | मृत्यूचें गूढ | १२८ |
| १३. | व्यक्तिमत्त्वाचा चंद्रमा | १३६ |
| १४. | जीवनकार्य | १५१ |
| १५. | विचारधारा | १५५ |
| १६. | जीवनसंदेश | १८२ |

“आपली सर्वांची मातृभूमि आज स्वातंत्र्यासाठीं झगडत आहे. कारण स्वातंत्र्याशिवाय जगणेंच यापुढें तिला अशक्य आहे. परंतु स्वातंत्र्य हें आत्मयज्ञानें मिळतें. शक्तीचा, संपत्तीचा नव्हे तुमच्या सारसर्वस्वाचाहि होम स्वातंत्र्यासाठीं करावा लागतो. पूर्वीच्या सर्व क्रांतिकारकांप्रमाणें तुम्हींहि आपल्या सौख्याचा, चैनीचा, पैशाचा, मालमत्तेचा त्याग केला पाहिजे. तुम्हीं काय दिलेंत म्हणजे स्वतंत्रता-देवीचें समाधान होईल तें मीं सांगतों.

आज तिला नुसते शूर सैनिक नकोत. तर स्वतःचें रक्त देणारे, आत्मयज्ञास सदैव सिद्ध असलेले असे बंडखोर स्त्रीपुरुष तिला पाहिजे आहेत. मात्र त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं त्यांना मृत्यूस मिठी मारावी लागणार आहे. आणि एवढेंच नव्हे तर स्वतःच्या शरीरांतून निघालेल्या रक्ताच्या सागरांत शत्रूला खेंचून बुडवाव-याचें आहे. म्हणून मी तुम्हांला एवढेंच सांगतों—

तुम हमको खून दो
मैं तुमको आझादी दूंगा !”

— सुभाषचंद्र बोस



ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २८८०९
वि भाग ३१.०१.
क्रमांक १०४३
नों. दि. ३।९।३।६१

# स्वातंत्र्याची तपोभूमि



Oh Liberty,

...Some gave up home and love of friends
And went in quest of thee, self banished
Through dreary oceans, through primeval forests
Each step a struggle for their life or death !

—SWAMI VIVEKANAND.

पारतंत्र्याच्या खोल गर्तेत पडलेलें राष्ट्र उत्थानासाठीं प्रयत्न करीत असतांना अनंत दुःखें, असंख्य संकटें त्याला सोसावीं लागतात. स्वातंत्र्याचा लढा हें एक असिधारा व्रत असतें. आमच्या या भारताचा स्वातंत्र्य-संग्राम गेलीं दीडशें वर्षे अव्याहतपणें चालू आहे. आम्हीं गुलामगिरीपुढें मुकाटयानें कधींच मान तुकविली नाहीं. अवश्य तेवढा त्याग, योग्य तेवढी किंमत आम्हीं अजून दिलेली नाहीं हें खरें आहे. तरी पण स्वातंत्र्ययज्ञांत आमची आहुति आतांपर्यंत सतत पडत आली आहे.

भारतवर्ष हा जगांतील अद्वितीय असा देश आहे. सौंदर्यानें, पराक्रमानें, बुद्धीनें, संपत्तीनें आपलें निवासस्थान म्हणून याच देशाची निवड केली आहे. सर्व जगानें ज्यांच्यापुढें नम्र व्हावें असे महापुरुष आमच्याच देशांत जन्मले. सर्व जगानें ज्या संस्कृतीचें अनुकरण करावें अशी थोर संस्कृति आमच्याच देशांत आहे. आमचा एक एक प्रांत म्हणजे भारतीय श्रेष्ठत्वाचा एक एक पैलू. पंजाब म्हणजे वीरांची

भूमि, महाराष्ट्र म्हणजे बुद्धीचें, स्वातंत्र्यनिष्ठेचें निवासस्थान आणि बंगाल म्हणजे त्यागभूमि, कालीची पूजा करणारा प्रांत ! ' दुर्लभं भारते जन्म मानुषं तत्र दुर्लभम् " हे व्यासांनीं काढलेले उद्गार सार्थ आहेत ते याच दृष्टीनें !

## उज्ज्वल इतिहास

बंगालचा गेल्या ७५ वर्षांचा इतिहास स्फूर्तिदायक आहे यांत शंका नाहीं. १९०५ सालानंतर बंगालच्या इतिहासास निराळें वळण लागलें आहे. त्यापूर्वीच्या कालांत राजा राममोहन राय, पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आदि महापुरुषांनीं सामाजिक व आध्यात्मिक अशी दोन प्रकारची कामगिरी केली. बंगाली मनावर त्यामुळें अध्यात्माची छाप पडलेली दिसून येते. हिंदु संस्कृतीचा अभिमान जागृत करावयास हेच महापुरुष कारणीभूत झाले. नाहींतर बंगाल हा संपूर्णपणें पाश्चात्य संस्कृतीच्या आहारीं गेला असता. तें संकट यांनीं टाळलें आणि भारतीय अध्यात्माचा डंका पुनश्च वाजवला.

## १९०५ नंतर

१९०५ सालानंतर बंगालच्या राजकीय जीवनास नवीन वळण लागलें. यानंतरच बंगाल प्रांत प्रकर्षानें पुढें आला. ज्या घटनेमुळें बंगालचें तेज जगाला दिसलें ती घटना म्हणजे लॉर्ड कर्झननें दिलेली बंगालच्या फाळणीची आज्ञा.

बंगालच्या आत्म्यावर घाव या फाळणीनें पडेल या कल्पनेनें सर्व बंगाल प्रांतांत असंतोष निर्माण झाला. एका लेखणीच्या फटकाऱ्याबरोबर करण्यासारखी अत्यंत सोपी गोष्ट ही असेल असें कर्झनला वाटलें असावें. पण सहनशक्तीलाहि मर्यादा असतेच. २९ सप्टेंबर १९०५ ला वंगभंगाचा कायदा पास झाला मात्र. हुकूम जाहीर झाल्यानंतर लगेच प्रतिक्रियेला सुरुवात झाली. परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू झाली. १६ ऑक्टोबर १९०५ या रक्षाबंधनाच्या दिवशीं सर्व बंगालनें या जुलमी हुकुमाचा निषेध करून त्याच्या प्रतिकारार्थ लढण्याचा निश्चय जाहीर केला. तो असा—

" ..... We hereby pledge and proclaim that we as a people shall do everything in power to counteract the evil effects of the dismemberment of our province and to maintain the integrity of our race. So God help us ! "

बंगालमध्यें असें एक खेडेगांव राहिलें नाहीं कीं ज्या ठिकाणीं हा निषेध झाला नाहीं, प्रतिकाराची भाषा बोलली गेली नाहीं. स्वाभिमानालाच धक्का पोहोंचल्यावर राष्ट्र खवळून उठतें. जर तें उठलें नाहीं तर तें जिवंत राष्ट्रच नव्हे. कर्झनचे उपकार बंगालवर फार झाले आहेत हें मान्य केलें पाहिजे. कारण त्याच्या बंगभंगाच्या हुकमामुळेंच एवढी अभूतपूर्व जागृति झाली. एका पावसानंतर सर्व रानच्या रान हिरवेंगार व्हावें तशीच ही जागृति वेगानें झाली. लोकमान्यांनीं हिला पाठिंबा दिला, बंगाली जनतेची प्रतिकारशक्ति वाढूं लागली आणि त्या शक्तींतूनच पुढें दहशतवादाचा जन्म झाला. बंगालमध्यें झालेल्या जागृतीचें सुंदर वर्णन दे. भ. शिवरामपंत परांजपे यांनीं केलें आहे. ते म्हणतात--" तरुण सूर्य केव्हांतरी आपल्या डोक्यावर येणारच. त्याचप्रमाणें आपलें राष्ट्र आज तरुण झालें आहे. उगवणाऱ्या सूर्याच्या व चंद्राच्या प्रभेप्रमाणें आपल्या राष्ट्राची प्रभा अद्याप क्षितिजावर फारशी दिसत नसली तरी आपल्या राष्ट्राची प्रभा पूर्वेकडे दिसत आहे. व पूर्वेकडे दिसणारी प्रत्येक प्रभा दिवसेंदिवस वाढत जाणार. आज नाहीं उद्यां ती सर्व जगाला उजेड देईल. व सर्व जगाला दिपवून सोडील. यासाठीं तरुण लोकांनीं व तरुण राष्ट्रांनीं निराश होण्याचें कारण केव्हांहि नाहीं. पूर्वेकडे उदय पावणारे चंद्र, सूर्य व तारे आपणांला हेंच शिकवीत आहेत ! "

यावरून कल्पना करतां येईल कीं केवढी अपूर्व संवेदना राष्ट्रांत बंगभंगानें निर्माण केली. तरुण रक्त तापलें. अपमान असह्य झाल्यावर तापणें हा तरुण रक्ताचा गुणधर्मच आहे. बंगाली तरुण त्याला अपवाद कसे ठरणार ? त्यांनीं प्रतिकाराचा प्रयत्न करण्याचा एक भयंकर मार्ग काढला आणि त्याचें नांव दहशतवाद.

## दहशतवादाची पार्श्वभूमि

बंगालच्या दहशतवादी क्रांतिकारकांच्या कार्याचें समालोचन करण्यापूर्वीं त्या-मागची पार्श्वभूमि पाहाणें अवश्य आहे. हा पंथ हिंदुस्थानांतच निर्माण झाला होता असें नाहीं तर प्रत्येक देशाच्या इतिहासांत असा पंथ असल्याचें दृष्टीस पडेल. परतंत्र राष्ट्र स्वातंत्र्यासाठीं लढत असतांना ज्या पायऱ्या लागतात त्यांतील ही एक अत्यंत महत्त्वाची आणि अपरिहार्य अशी पायरी आहे. ज्या वेळेला अन्याय हाच न्याय झालेला असतो, तरवारीच्या जोरावर राज्य केलें जातें तेव्हांच त्या

जुलमाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला जातो. जुलमामुळें निर्माण होणाऱ्या पवित्र क्रोधांतून दहशतवादाचा जन्म होतो. जेथें सर्व देश नीचतेंत लोळत असतो, अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य वा इच्छा त्यांत राहिलेली नसते, तेव्हांच असे कांहीं लोक पुढें येतात आणि ते आपली सर्व शक्ति पणाला लावून प्रतिकार करतात. लोकहिताच्या पवित्र भावनेनें प्रेरित होऊनच ते दहशतवादी कृत्यें करतात, वेडेपणा म्हणून नव्हे. तीं माणसें रानटी नसतात, तर रानटी लोकांचा समाचार घेण्यासाठीं तीं रानटी बनतात. मांजरसुद्धां अपमान असह्य झाल्यावर त्यांचा प्रतिकार करते, तर तसाच प्रतिकार माणसानें केला तर त्यांत अनैसर्गिक काय आहे ?

हा प्रतिकार नैसर्गिक आहे. कारण तो प्रतिक्रियात्मक आहे. बंगालचे पुढारी देशबंधु दास यांनीं बंगाल सरकारनें केलेल्या कायद्याचा निषेध करतांना पुढील उद्गार काढले. ते सूचक आहेत. ते म्हणतात—

"This is lawless law. Laws such as these were enacted in England in the days of the Stuart Tyranny. And I am sorry to say that the Govt. of India to-day is not able to govern this land except by the use of violence. I really don't think that when a revolutionary, in the enthusiasm of his heart, fires a pistol or throws a bomb, he is guilty of more violence than the Government. Violence begets violence. It is because of these acts of violence from the year 1907, down to the present day, acts of legislative violence, that I say and I repeat it again, that revolutionary crimes have increased......"
(हा बेकायदेशीर कायदा आहे. असे कायदे इंग्लंडमध्यें स्टुअर्ट राजांच्या जुलमी कारकीर्दींत चालू होते. आणि मोठ्या खेदानें मी असें म्हणतों कीं, आजच्या सरकारला अत्याचाराचा अवलंब केल्याविना राज्य करतां येत नाहीं. जेव्हां एकादा क्रांतिवीर पिस्तूल झाडतो किंवा बाँब फेकतो तेव्हां तें त्याचें कृत्य सरकारच्या अत्याचारापेक्षां खास मोठें नसतें. अत्याचाराला उत्तर अत्याचारानेंच मिळणार. १९०७ पासून आतांपर्यंत झालेल्या अत्याचारी कायद्यांमुळेंच क्रांतिकारक कृत्यें वाढत्या प्रमाणावर होत आहेत.) या दासबाबूंच्या उद्गारांत या विधानाचें स्पष्टीकरण आलें आहे कीं दहशतवाद ही जुलमाची प्रतिक्रिया आहे.

दहशतवादानें स्वराज्य मिळेल ही कल्पना ज्यांनीं तसलीं कृत्यें केलीं त्यांचीहि नव्हती. या गोष्टीची सत्यता आतांपर्यंतच्या क्रांतिकारकांनीं केलेल्या बचावाच्या भाषणांतून येईल. मदनलाल धिंग्रा यांच्या आव्हानांतील (challenge) पहिलेंच वाक्य पहा —

"मीं एका इंग्रजाचें रक्त सांडण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट मला मान्य आहे. देशाभिमानी हिंदी तरुणांना निर्दयपणानें फांसावर लटकविण्यांत आलें व निर्वासित करण्यांत आलें याबद्दलचा अल्पसा सूड म्हणून मीं हें कृत्य केलें." अभिमानाला डिवचल्यामुळें हीं कृत्यें घडतात. सर्व देशाच्या इतिहासांत ही गोष्ट दिसून येईल. इंग्लंडच्या इतिहासांतहि Gun Powder Plot झाला नव्हताच काय? त्यागाच्या मानानें त्याचें फल अल्प असतें हें खरें; पण राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीनें तो त्याग अवश्य असतो. राजसत्तेवरहि त्याचा परिणाम होत नाहीं असें नाहीं. बंगालची फाळणी पुढें स्थगित झाली ती अर्जविनंत्यांनीं नव्हे, तर शेंकडों अंदमानांत गेले म्हणून. आजवर जे अधिकार मिळत आले ते शिष्टमंडळांनीं आणि परिषदांनीं नव्हे, तर याच "मारो कांटो का पंथा"च्या चुकलेल्या देशवीरांनीं बलिदान केलें म्हणून!

एतदर्थ, दहशतवादाचें अनुकरण करणाऱ्या सर्व वीरांचें ऋण मान्य केलें पाहिजे. त्यांचें तें अमर बलिदान समुद्रांतील दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शक आहे. आज तो मार्ग अनुकरणीय नसेल, पण त्या हुतात्म्यांच्या प्राणज्योतींनीं देशभक्तीचा प्रकाश टाकला आहे हें मान्य केलेंच पाहिजे.

## ओझरतें समालोचन

बंगालमधील दहशतवादी कृत्यांना वंगभंगानंतर सुरुवात झाली. आपल्या प्रांताचें विच्छेदन होणार या अभद्र कल्पनेनें ज्यांचें रक्त तापलें असे तरुण शक्य त्या मार्गांनीं प्रतिकार करूं लागले. "The partition of Bengal set the Ganges on fire" असें वर्णन तत्कालीन बंगालचें केलें आहे. लॉर्ड कर्झननें भारताचा उपमर्द करणारें कुप्रसिद्ध असें भाषण विश्वविद्यालयांत केलें. आणि वॉरन् हेस्टिंग्जची परंपरा चालविणाऱ्या कर्झननें सत्याचा उपदेश केला. त्याचीही भर पडली. ७ ऑगस्ट १९०५ हा दिवस सुतकाचा दिवस म्हणून पाळला गेला. रक्षाबंधनाचे दिवशीं जगाला बंगाली जनतेनें गर्जून सांगितलें "आमचा प्रांत अभेद्य आहे!"

स्वदेशी चळवळीचा प्रसार वेगानें झाला. कालीमातेनें आपलें संहारक रूप प्रकट करण्यास सुरुवात केली.

बंगालमध्यें बारींद्रकुमार घोष आणि पुलनबिहारी दास आदि तरुणांनीं तरुण मंडळीची समिति काढली. शस्त्रांची जमवाजमव करण्याची खटपट सुरू झाली. तरुण रक्त शस्त्रांकडे ओढ घेत होतें. अकस्मात् ३० एप्रिल १९०८ या दिवशीं किंग्ज फोर्ड यांच्या गाडीवर दोन तरुणांनी बाँब फेकला. त्यांत खुदीराम बोस या तेजस्वी तरुणाला फांशी जावें लागलें. बंगालनें चेतविलेल्या यज्ञांत पहिली आहुति पडली ! कोटि कोटि लोकांनीं अश्रूंची अंजलि दिली. त्यांत दुःख नव्हतें, संतापाचा अग्नि होता.

या पहिल्या प्रकारानंतर बंगालमध्यें ही परंपरा सुरू झाली. सरकारनें आपलीं अस्त्रें बाहेर काढलीं. शेंकडों लोकांना नुसत्या संशयावरून तुरुंगांत पाठविण्यांत आलें. जुने जुने कायदे काढून त्या कायद्यांखालीं दडपशाही करण्यास सुरुवात झाली. हजारों तरुणांना या दडपशाहीची झळ लागली. पण याचा परिणाम असा झाला कीं अत्याचार वाढत गेले. अरविंद घोषांच्यासारख्या साधुपुरुषालाहि सरकारनें तुरुंगांत टाकलें. या सर्व गोष्टींचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. " यदवध्यवधात्पापं वधत्यागात्तदेवहि । " या न्यायानें प्रतिकार झाला. १९२० सालापर्यंत हें चाललें. १९१९ मध्यें बादशहांच्या जाहिरनाम्यामुळें चौकशीविना डांबून ठेवलेल्या क्रांतिकारकांची सुटका करणें सरकारला भाग पडलें.

१९२० नंतर गांधीजींचें असहकाराचें धोरण अंमलांत येऊन चळवळ सुरू झाली. सुटलेल्या लोकांपैकीं कांहीं लोक विधायक कार्यक्रमाकडे गेले हें खरें आहे. परंतु त्यांतील कांहीं ज्वलन्त वृत्तीच्या तरुणांनीं १९२३ पासून पुन्हां कार्याला सुरुवात केली. याचा सरकारला संशय आला होता. १९२४ च्या आरंभीं गोपीनाथ साहा नांवाच्या तरुण क्रांतिकारकानें मि. डे नांवाच्या इंग्रज व्यापाऱ्याला तो टेगार्ट असावा या समजुतीनें गोळ्या घालून ठार मारलें. त्याचा निषेध न होतां त्याच्याविषयीं आदर प्रकट केला गेला. यानंतर सरकारनेंहि भयंकर दडपशाही सुरू केली. यांतच सुभाषबाबू सांपडले आणि त्यांना मंडालेची वाट चालावी लागली.

१९२५ ते १९३० पर्यंत कुठलेंहि दहशतवादी कृत्य फारसें महत्त्वाचें झालें नाहीं. ती कदाचित् वादळापूर्वीची शांतता होती. असेल. पुढें १८ एप्रिल

१९३० या दिवशीं बंगाली क्रांतिकारकांनीं चित्तागांगचें शस्त्रागार लुटण्याचें अभूतपूर्व कृत्य केलें. यामुळें चिडून जाऊन सरकारनें बेभानपणें जरब बसविण्यास सुरुवात केली. क्रांतिकारकांचीं तापलेलीं मस्तकें स्वस्थ बसलेलीं नव्हतीं. त्यांनीं त्यांना योग्य वाटलेला प्रतिकार केला. मिदनापूर जिल्ह्यांत फार भयंकर हत्याकांड सुरू झालें. १९३३–३४ पर्यंत हे सर्व प्रकार चालले होते.

## तपोभूमि

असें हें बंगालच्या क्रांतिकारक चळवळीचें अत्यल्प दर्शन आहे. आजहि २०।२० वर्षें तुरुंगांत खितपत पडलेले लोक बंगालच्या तुरुंगांत आहेत. भयंकर दुर्धर रोगांनीं ग्रस्त झालेले हे देशभक्त आपल्या मातृभूमीवर असलेल्या प्रेमाचें प्रायश्चित्त भोगीत आहेत. त्याची क्षिति असावी तितकी राष्ट्राला नाहीं हें दुर्दैव आहे. असा हा बंगालचा इतिहास आहे. बंगालनें स्वातंत्र्याकरतां केलेली तपश्चर्या फार मोठी आहे. अलीकडच्या हिंदुस्थानच्या इतिहासांत त्यागाचे बाबतींत बंगालनें उच्चांक गांठला आहे. सर्वांचे आधीं बंगालला पारतंत्र्याची बेडी ठोकली गेल्यानें त्यानें इतका त्याग केला असेल. त्यांचे मार्ग कसेहि असले तरी गुलामगिरी हा नरक आहे व त्यांतील स्थिति––त्यांतील जीवन हें किडचासारखें आहे याच समजुतीनें त्यांनीं पारतंत्र्य नष्ट करण्याचे प्रयत्न केले. एका हातांत गीता घेऊन फांसावर जाणारे देशभक्त दिले ते बंगालनेंच. स्वातंत्र्यप्रीतीनें भारावून जाऊन शूर कृत्यें करणाऱ्या वीरांगना जन्मल्या त्या बंगाल्यांतच. अशा अनेक माता बंगालमध्यें असतील कीं ज्यांचे कोंवळे सुपुत्र त्यांच्या कुशींतून ओढले,जाऊन तुरुंगाच्या दारांत फेंकले गेले. दडपशाहीच्या वरवंट्याखालीं चिरडून नामशेष झालेलीं शेंकडों कुटुंबें बंगालमध्यें आहेत ! बंगालमध्यें कोठेंहि जा, तेथील वायु तुमच्या कानांत गुणगुणेल कीं " स्वातंत्र्य लक्ष्मी की जय ! " तेथील प्रत्येक हुतात्म्याच्या समाधींतून एकच ध्वनि बाहेर येत असेल—
'मामनुस्मर युध्य च ! " म्हणूनच—

बंगालला स्वातंत्र्याची तपोभूमि यथार्थतेनें म्हणतां येईल. अशा या तपोभूमींत आमच्या देशगौरव सुभाषचंद्रांचा जन्म झाला आहे. जन्मकालाला जर कांहीं महत्त्व असेल, जन्मकालाच्या वातावरणाला जर कांहीं अर्थ असेल, मनुष्य परिस्थितीनें घडविला जातो (Man is made by circumstances) हें जर खरें असेल तर अशा परिस्थितींत जन्मलेला पुरुष भारतीय स्वातंत्र्यासाठीं प्रचंड सैन्य उभार-

णारा रणधुरंधर सेनानी व्हावा यांत आश्चर्य नाहीं. एवढ्याचसाठीं सुभाषबाबूंचें चरित्र पाहाण्यापूर्वी ज्या परंपरेंतील प्रांतांत त्यांचा जन्म झाला ती परंपरा पाहाणें अवश्य आहे. कारण सुभाषचंद्रांचे जवळ बंगाली माणसाचे अंगीं असणारे सर्व गुण होते. सुभाष म्हणजे बंगाल !

स्वातंत्र्याच्या या तपोभूमींत जन्मलेल्या या वीर पुरुषाचें आयुष्य ही सुद्धां एक महान् तपश्चर्या आहे.

# विद्यार्जन

## २

दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. नगरपालिकेच्या कचेरीच्या दाराशीं एक बाई बसली होती. वृद्ध असल्यानें माध्यान्हीच्या सूर्याची उष्णता तिला सहन होत नव्हती. तिच्या चेहऱ्यावर कसली तरी आतुरता दिसत होती. तिची दृष्टि एकाच दिशेला केंद्रित झाली होती.

अकस्मात् त्या कचेरीच्या दाराशीं एक मोटार थांबली. तिच्यांतून एक तेजस्वी पुरुष उतरला. गौरवर्ण, गोल आरक्त चेहेरा, एखाद्या राजपुरुषासारखी भव्य शरीरयष्टि, चर्येवर लोकांना वेडे करणारें सुहास्य! ते नेताजी सुभाषचंद्र होते!

त्या म्हाताऱ्या बाईच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा दिसली ती उठली आणि सुभाषबाबूंच्या पायांवर डोकें ठेवण्यासाठीं धावली! पण—

सुभाषबाबूंनीं तिला पादस्पर्श करूं दिला नाहीं. ते स्वतः वांकले आणि त्यांनीं त्या म्हाताऱ्या बाईच्या पायांवर डोकें ठेवलें. तिचा आशीर्वाद मागितला—"आई! भारतीय स्वातंत्र्यासाठीं मी लढत आहें, तुझा आशीर्वाद मला दे!" सुभाषबाबूंच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांसमोर कलकत्त्यांत असणाऱ्या आपल्या मातेची मूर्ति उभी राहिली! भारतीय स्वातंत्र्यासाठीं लढत असतांना तिचे यशदायक आशीर्वाद मिळणार नाहींत असें वाटल्यावरूनच जणूं-कांहीं सुभाषनीं त्या वृद्ध बाईचे आशीर्वाद मागितले. त्या बाईच्या अंतःकरणांत निर्माण झालेल्या भावनांचें कोण वर्णन करील?

किती भावपूर्ण प्रसंग आहे हा !

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं शत्रूचें रक्त सांडण्यास सिद्ध झालेल्या या सेनापतीच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले! सुभाषच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचें प्रतिबिंब या प्रसंगांत पडलें आहे. त्यांची मातृभक्ति, भावनाशीलता, हृदयाची मृदुता, थोर नीति, उज्ज्वल स्वातंत्र्यनिष्ठा या सर्व गुणांचें दर्शन या प्रसंगांत होतें.

या सर्वांचें मूळ कोठें असेल तर तें ज्या वातावरणांत सुभाष जन्मले व वाढले, त्या वातावरणांत, व ज्या प्रेमळ मातेनें असली आदर्श शिकवण दिली त्या मातेच्या थोरवींत आहे. सुभाषबाबूंच्या आयुष्यांत त्यांच्या प्रेमाचे आणि आदराचे विषय फक्त दोन होते. जननी आणि जन्मभूमि !

## थोर कुलपरंपरा

महाकवि कालिदासानें रघुवंशाच्या प्रस्तावनेंत त्या वंशाची महति गाइली आहे. "सूर्यप्रभवो वंशः" असें त्या रघुवंशाचें वर्णन केलें आहे. महापुरुष आपल्या माहात्म्याच्या जोरावर आपल्या कुलाला कीर्ति मिळवून देतात. "दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्" असें म्हणणारा कर्णच आपल्या वंशाचा यशोदुंदुभि जगभर गाजवितो. पण सुभाषबाबूंचा ज्या कुलांत जन्म झाला त्या कुलाची परंपराच फार मोठी आहे. त्या मोठेपणांत, त्या कीर्तींत सुभाषबाबूंच्या महान् कर्तृत्वानें, पराक्रमानें भर पडली, नि बोस कुटुंबाचा कीर्तिध्वज उचलून धरला गेला. हिंदुस्थानांत ज्या कांहीं कुटुंबांना आपल्या सर्वस्वाची आहुति स्वातंत्र्ययज्ञांत द्यावी लागली त्यांत बोस कुटुंबाचें नांव प्रामुख्यानें उच्चारलें जाईल हें निःसंशय. राष्ट्राचें प्रचंड मंदिर उभारीत असतांना त्याच्या पायांत अनेक कुटुंबांना गाडून घ्यावें लागतें, तेव्हांच तें राष्ट्रमंदिर उभें राहतें. विशेषतः अलीकडच्या पांचसहा वर्षांत बोस कुटुंबानें सत्तेच्या अवकृपेमुळें सोसलेले हाल अतुलनीय आहेत. एका दाहक व्रताची सेवा त्या कुटुंबानें केली हें निश्चित ! आणि त्या कुलांतील लोकांना असें म्हणण्याचा निश्चित अधिकार आहे कीं—

"धन्य धन्य अपुला वंश
सुनिश्चयें ईश्वरी अंश !"

सुभाषबाबूंचा जन्म ओरिसा प्रांतांतील कटक येथें दि. २३ जानेवारी १८९७ या दिवशीं झाला. त्यांची आई म्हणजे एक आदर्श हिंदु स्त्री होती. धर्मा-

विषयीं नितांत प्रेम, परमेश्वरावरील अढळ निष्ठा, सत्त्वशील मनोवृत्ति आणि साधी राहणी या सर्वांचें अनुकरण सुभाषनीं केलें. मातेची थोरवी अनेक कवींनीं आपल्या प्रतिभा खर्च करून केली आहे. आई हें मोठें दैवत आहे अशी आमची शिकवणूक आहे. सुभाषच्या बाबतींत तरी तें खरें होतें. शकुंतलेच्या शिकवणीनें सर्व भारताच्या आदरास पात्र झालेला 'भरत' निर्माण झाला. जिजामातेच्या प्रेमळ शिकवणींतून शिवरायासारखा अद्वितीय राष्ट्रपुरुष निर्माण झाला. जगांतील मोठ्या पुरुषांच्या महत्तमत्त्वाचें बीज त्यांना बालपणीं आईकडून मिळणाऱ्या शिक्षणांत असतें. नेपोलियनसुद्धां असेंच म्हणत असे. सुभाषच्या आईनें धर्मशील आचाराचे धडे त्यांना दिले, तेजस्वी विचार दिले, त्यांचे वडील जानकीनाथ बोस हेहि बुद्धिमान् वकील होते. त्यांची कीर्तीहि फार मोठी होती. या थोर मातापित्यांच्या थोर चारित्र्यांतून नि आचारांतून सुभाषचें विशुद्ध सोन्यासारखें दीप्तिमान् व्यक्तिमत्त्व जन्मलें आहे.

## शिक्षण

कटक येथेंच प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर सुभाष हायस्कूलमध्यें गेले. १९१३ मध्यें सर्व विश्वविद्यालयांत दुसरा क्रमांक मिळवून ते मॅट्रिक झाले. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची प्रचीति यावेळीं आली. सुभाषबाबूंच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक वेणीबाबू यांनीं देशभक्तीनें प्रेरित झालेले विचार सुभाषना दिले. या विचारांच्या प्रेरणेनेंच कॉलेजमध्यें गेल्यानंतर सुभाषचंद्रांचें मन शहरी विलासांत रममाण न होतां निराळ्याच दिशेनें धांवू लागलें. रामकृष्ण परमहंस आदि साधुपुरुषांच्या तत्त्वज्ञानाची छाप सुभाषबाबूंच्या विचारावर पडली असल्यानें त्यांच्या अंतःकरणांत आध्यात्मिक विचार थैमान घालूं लागले.

## "गुरू" च्या शोधार्थ

सुभाषनीं प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें नांव घातलें. पहिल्या वर्षी अभ्यासापेक्षां त्यांनीं इतरच बाबींकडे लक्ष दिलें. त्यांच्या मनांतील अस्वस्थता वाढत होती.

सुभाषबाबूंचें सर्व जीवनच इतकें वैचित्र्यपूर्ण आहे. त्यांची मनोरचनाच सर्वापेक्षां निराळी आहे. ज्या वयांत कॉलेज तरुण "जीवनाचा वसंतऋतु" उपभोगीत असतात त्या वयांत सुभाषनीं "शिशिर ऋतूचे" हाल सोसावेत हें

विचित्रच नाहीं का? "या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।" ही जी स्थिति आहे तीच सुभाषबाबूंच्या आयुष्याची होती.

इंटरमध्यें असतांना सुभाषच्या अंतःकरणांत मोक्ष प्राप्त करून घेण्याची इच्छा तीव्र झाली. म्हणून त्यांनीं पारमार्थिक सुखाच्या शोधार्थ घर सोडलें आणि अरण्यांत ते गुरूच्या शोधासाठीं निघून गेले. ज्या हिमालयांत वसून मोठमोठ्या ऋषींनीं ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं घोर तपस्या केली तेथें त्यांच्या भेटीसाठीं सुभाष गेले. हिमालयांतील थंडी! परंतु तीसुद्धां एवढ्याशा सुभाषनें सहन केली. अरण्यें-च्या अरण्यें तुडवीत, हिंस्र श्वापदांना न भितां आपली तपश्चर्या सतत सहा महिने चालू ठेविली. बनारस, गया आदि क्षेत्रांतील अनेक महंतांच्या आयुष्यांचें जवळून निरीक्षण केलें. परंतु तेथें त्यांना निराळेंच दिसलें. लहान मुलानें खडीसाखरेचा खडा समजून गारगोटीकडे धांव घ्यावी तशीच स्थिति सुभाषची झाली. खऱ्या "साधूंचें" दर्शन त्यांना झालें नाहीं. सुभाषबाबूंच्या अंतःकरणांत उद्वेग निर्माण झाला आणि त्यांनीं घरचा रस्ता धरला. सुभाषचें त्याच्या आईनें सहर्ष स्वागत केलें.

## तेजोदर्शन

घरीं परतल्यावर सुभाषबाबूंनीं पुन्हां कॉलेजांत प्रवेश केला. एक वर्ष संथ-पणानें गेलें. पण तो संथपणा कायम कसा टिकणार? सुभाषबाबूंचें आयुष्य म्हणजे अनेक मोठमोठ्या दगडांना टक्कर देत वायुवेगानें वाहणारा जलप्रवाह! सुभाषबाबूंच्या कॉलेजमध्यें ओएटन नांवाचे एक युरोपियन प्राध्यापक होते. ते युरोपियन असल्यामुळेंच कीं काय त्यांना हिंदी लोकांबद्दल तीव्र तिरस्कार वाटत असे. हिंदी लोक म्हणजे मेंढर, रस्त्यावरची खडी कुणीहि लाथाडावी. कॉलेजमध्यें एका बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थ्याच्या श्रीमुखांत त्यांनीं लगावली!

सुभाषबाबूंचा स्वाभिमान दुखावला गेला. खरा स्वाभिमानी मनुष्य हें कृत्य कसें सहन करणार? जसें डोळ्यांत लहानसा कण जरी गेला तरी त्याचा प्रतिकार होतो तशीच स्थिति जिवंत राष्ट्राचा स्वाभिमान दुखविल्यानंतर व्हावयास हवी. सुभाषबाबूंनीं त्या प्राध्यापकांच्या त्या नादान कृत्याचा निषेध करण्याचें ठरविलें. कॉलेजमध्यें संपूर्णपणें हरताळ पाडावा यासाठीं त्यांनीं प्रयत्न सुरू केले. त्यांचा स्वाभिमान त्यांना स्वस्थ बसूं देईना. हें सारें चालू असतांना एक दिवस त्या प्राध्यापकानें हिंदी विद्यार्थ्यांचा उपमर्द करणारें भाषण केलें.

वर्गांत खळबळ उडाली. बंगाली विद्यार्थ्यांची प्रतिकारवृत्ति जागृत झाली कांहीं विद्यार्थी त्या प्राध्यापकाच्या अंगावर त्याला मारण्याच्या हेतूनें धांवले. त्यांच्या अंतःकरणांतील पवित्र क्रोध अनावर झाला. सुभाषबाबूहि त्यांत होतेच. ज्या तेजस्वी वृत्तीनें त्यांनीं सारें आयुष्य घालविलें, अन्यायापुढें मान तुकविली नाहीं–त्या वृत्तीचें दर्शन याच प्रसंगीं झालें. प्रसंग तसा लहान परंतु त्यांतून होणारें तेजोदर्शन मोठें आहे.

या घटनेमुळें सुभाषना कॉलेज सोडावें लागलें. कलकत्ता विश्वविद्यालयांतून दोन वर्षांपुरती त्यांची हकालपट्टी झाली. जगांत स्वाभिमानानें जगावयास किंमत द्यावी लागते ती त्यांनीं दिली. अर्थात् त्याला ते डगमगले नाहींत. आशुतोष मुकर्जींच्या प्रशस्तीनें सुभाष पुन्हां कॉलेजमध्यें प्रविष्ट झाले. १९१९ सालीं "तत्त्वज्ञान" हा विषय घेऊन पहिल्या वर्गांत बी. ए. झाले. त्याचबरोबर त्यांनीं लष्करी शिक्षणहि थोडेंफार घेतलें. अशा विचित्र रीतीनें सुभाषचें कॉलेज-शिक्षण पूर्ण झालें.

## धगधगतें वातावरण

तो काल हिंदुस्थानच्या इतिहासांत अपूर्व होता. पंजाब प्रांतांत झालेल्या हत्याकांडानें, त्या ठिकाणीं झालेल्या माणुसकीला लाजविणाऱ्या अत्याचारांनीं सारा देश हादरला होता. तरुण अंतःकरणावर त्याचे साद-पडसाद उठत होते. त्या दीन देशबांधवांच्या किंकाळ्या सुभाषच्या कानांवर येत होत्या. ते जुलमाच्या टांचेखालीं चिरडलेले निष्पाप जीव त्यांना कर्तव्याची जाणीव करून देत होते आणि इकडे—

सुभाषचे आईवडील त्यांना आय. सी. एस. च्या परीक्षेसाठीं विलायतला पाठविण्यास तयार झाले होते. मातृभूमीच्या सेवेचें व्रत स्वीकारण्यास अधीर झालेला सुभाष त्या मोहक वातावरणांत सांपडून तें परमोच्च ध्येय विसरेल ही त्यांची कल्पना. अर्थात् सुभाषच्या अंतःकरणांत दोन परस्परविरोधी विचारांचा झगडा सुरू झाला. आय. सी. एस. ला गेल्यानें आपल्या ध्येयापासून दूर जाऊं कीं काय अशी शंका त्यांच्या मनांत येऊं लागली. हेमंतकुमार नांवाच्या त्यांच्या मित्रानें आग्रह धरल्यावरून त्यांनीं इंग्लंडला जावयाचें कबूल केलें.

आपली ध्येयावरील दृष्टि न सोडण्याचा निश्चय करून सुभाष इंग्लंडमध्यें गेले. इंग्लंड म्हणजे सामान्य लोकांच्या दृष्टीनें विलासभूमि. तेथील सर्व कांहीं स्वर्गीय

आहे अशी सर्वांची कल्पना. तेव्हां मनसोक्त विलास करणें हेंच इंग्लंडमध्यें गेल्यानंतर विद्यार्थ्याचें कर्तव्य असें समजलें जातें. सुभाषबाबूंनीं आपल्या ध्येयवादी दृष्टिकोनांतून इंग्लिश लोकांच्या राहणीची, त्यांच्या विचारांची पाहाणी केली, आपल्या देशाच्या स्थितीशीं तुलना करून पाहिली आणि जेव्हां त्यांतील महदंतर कळून आलें तेव्हां त्यांना वाईट वाटलें.

ऑगस्ट १९२० मध्यें कांहीं विशेष अभ्यास न करतां ते आय. सी. एस. चौथ्या क्रमांकानें झाले. त्यांना मिळालेलें हें यश त्यांच्या बुद्धिमत्तेला गौरवास्पद निश्चित होतें. नंतर त्यांनीं केंब्रिज युनिव्हर्सिटीची " मानसशास्त्र व नीतिशास्त्र " या विषयाची डिग्री मिळविली. सुभाष आय. सी. एस्. झाले खरे पण त्यांच्या मनांत अस्वस्थता निर्माण झाली. आपण आय. सी. एस्. उगीचच झालों, दुर्दैवानें झालों असें त्यांना वाटलें. त्यांच्या अंतःकरणांत आंदोलन सुरू झालें.

## मानसिक आंदोलन

सुभाषबाबूंना आपण एका विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठीं जन्मलों आहोंत असें पूर्वीपासून वाटत असे. १९१५ सालीं एका मित्राला पाठविलेल्या पत्रांत ते म्हणतात--" मला दिवसेंदिवस असें वाटूं लागलें आहे कीं, माझ्या आयुष्याला एक निश्चित असें ध्येय आहे. लोकांच्या चालू मतप्रवाहांत वाहून जाणारा मी नाहीं. लोक मला चांगला म्हणतील वा वाईट म्हणतील. तो जगाचा न्यायच आहे. पण माझ्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणें मी चालणारा असल्यानें त्यामुळें मी विचलित होणार नाहीं." वयाच्या १८ व्या वर्षीच ज्यांचा निश्चय इतका ठाम झाला होता ते सुभाष आय. सी. एस्. झाल्यानें विचलित कसे होतील !

प्रत्येक देशभक्ताच्या आयुष्याचा हा काल म्हणजे त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचें प्रवेशद्वार असतें.

## मातृभूमीच्या दास्यविमोचनार्थ

सुभाषबाबूंच्या डोळ्यासमोर त्यांच्या दीन, हीन देशाचें चित्र उभें राहिलें. एके काळीं ज्याच्या वैभवानें सारें जग नम्र होत होतें, त्या देशाची आज काय स्थिति आहे ? कोणींहि कितीहि जुलूम करावा, नि त्याला प्रतिकार न व्हावा, क्षणाक्षणाला अवहेलना, मानहानि ! जिकडे तिकडे दुःख, दौर्बल्य, दैन्य यांचें साम्राज्य !

इतक्या आपत्ति असून सुद्धां सुप्त लोक दुःखानें पिचत होते, क्रौर्याचा दाह असह्य होत होता म्हणून किंकाळ्या फोडीत होते! तरीसुद्धां प्रतिकारार्थ त्यांनीं हात उगारला नाहीं! जिकडे तिकडे मूक आक्रंदन ऐकूं येऊं लागलें.

आणि असें असतांना—

ज्या राजसत्तेनें या कष्टदशेप्रत आम्हांला आणलें तिची सेवा करावयाची? ज्यांनीं आमचें रक्त शोषलें त्यांना मदत करावयाची? हा कृतघ्नपणा आहे अशी सुभाषबाबूंची खात्री झाली. देश पारतंत्र्यांत असतांना चैन करणें, पैसा मिळविणें हें अमानुष आहे. परतंत्र राष्ट्रांतील तरुणांचें कर्तव्य एकच असूं शकतें तें म्हणजे आपल्या राष्ट्राचें दास्यविमोचन!

तो आमचा प्राणवायु आहे. त्याखेरीज आम्ही जगूंच शकणार नाहीं. देशासाठीं आत्मसमर्पण करणें म्हणजे मरण नव्हे, तर तें चिरंजीवन आहे. त्यांतच आयुष्याचें सार्थक आहे.

नाहींतर कुत्रींसुद्धां जगत नाहींत का?

तर त्या घाणेरड्या जीवनापेक्षां अधिक भव्य, उत्कट, उदात्त असें ध्येयवादी जीवन कंठणें हें जीविताचें खरे सार्थक आहे.

सुभाषचंद्रांनीं दीर्घ विचार करून हें सतीचें वाण पत्करावयाचा निश्चय केला. आयुष्य हा एक महान् संग्राम आहे. तेथें सहानुभूतीचा ओलावा नाहीं, क्रौर्याचा दाह आहे. याच विचारांनीं प्रेरित होऊन त्यावेळचे भारतमंत्री मॉंटेग्यू यांचेकडे त्यांनी आय. सी. एस्. चें त्यागपत्र पाठविलें. ते म्हणतात—"मी १९२० सालीं इंग्लंडमध्यें आय. सी. एस्. झालों. परंतु माझ्या देशाची आणि ब्रिटिश सरकारची दोघांचीहि सेवा करतां येणें अशक्य असल्यानें मीं माझा राजीनामा सादर केला आहें. म्हणजे मला माझ्या देशांत चाललेल्या राष्ट्रीय लढ्यांत भाग घेतां येईल!"

त्यांनीं कर्तव्यासाठीं आय. सी. एस्. सारखी मोठी पदवी सोडली! ज्यामुळें संपत्तीचा, कीर्तीचा पाऊस त्यांचेवर पडला असतां तिचा त्याग करणें ही काय सामान्य गोष्ट आहे? सुभाषसारखें अलौकिक जीवन जगणाऱ्या माणसालाच तें शक्य आहे, सामान्य लोकांना नाहीं.

राज्य ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक २८८०१
विभाग का।०।।
क्रमांक १०८३
नों. दि. ३।३।४९

# त्यागमय जीवनाचा उन्मेष ३

आसेतु पर्वत उचंबळला स्वदेश
वीराकृति धरित टाकुनि दीन वेष।

—वि. सावरकर

जनरल डायरनें हिंदुस्थानवर फार मोठे उपकार केले असें म्हणणें क्रमप्राप्त आहे. कारण त्याच्या त्या कृत्यांतूनच १९२०–२१ सालच्या प्रक्षोभाचा जन्म झाला. त्या जागृतीचें सारें श्रेय डायर आणि त्याचे सहकारी यांनाच दिलें पाहिजे. गांधीजींचा असहकार याचवेळीं पुढें आला. सर्व देशभर ब्रिटिश विरोधी वातावरणाची एक लाट उसळली. असहकाराचें तत्त्व नाविन्यानें आणि कृतिशीलतेनें प्रभावी ठरलें. शेंकडों तरुण आपलें सर्वस्व राष्ट्रासाठी देण्यास सिद्ध झाले. नुसत्या ठरावांत तो असहकार राहिला नाहीं. तर त्याचे परिणाम प्रत्येक घरांत दिसूं लागले. जी चीड, जो संताप धुमसत होता त्याला गांधीजींनीं चेतविलें आणि त्याच्या जोरावर साऱ्या देशांत वणवा पेटविला.

तरुण अंतःकरणावर त्याचे पडसाद उमटत होते. सुभाष इंग्लंडहून १६ जुलै १९२१ रोजीं परतले. त्यांनीं मुंबईला गांधीजींची एक तास मुलाखत घेतली. त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं अपेक्षित उत्तरें मिळालीं नाहींत म्हणून ते निराश झाले. ते कलकत्त्यास गेले आणि देशबंधु दास यांची भेट घेतली. आपले विचार त्यांना समजावून दिले. देशबंधु हे तरुणांचे आवडते पुढारी असल्यानें

तरुणांच्या मनांतील भावनांची जाणीव त्यांना होती. त्यांच्याशीं ते समरस होत. सुभाषबाबूंना विश्वासांत घेऊन त्यांनीं कांहीं विचार सांगितले. सुभाषचंद्रांचें समाधान झालें नि त्यांनीं दासांचें नेतृत्व स्वीकारलें. ज्यांनीं आपलें सर्वस्व देशासाठीं दिलें होतें अशा देशबंधूंचें नेतृत्व सुभाषचंद्रांसारख्या त्यागमूर्तीनें स्वीकारावें हें उचितच होतें. कारण आपली शिकवणच अशी आहे कीं--' शिवो भूत्वा शिवं यजेत्। " सुभाषबाबूंची तीक्ष्ण बुद्धिमत्ता, त्यांचें संघटनकौशल्य यांनीं ते दासबाबूंचे पट्टशिष्य झाले.

गांधीजींच्या असहकाराच्या चळवळींत देशांतील अनेक तरुणांनीं आपलीं आयुष्यें देशकार्यार्थ दिलीं. नागपूरच्या काँग्रेसमध्यें, "दासबाबू बोलतो तसें करतो" अशी सिंहगर्जना करून आपला हजारों रुपये मिळवून देणारा बॅरिस्टरीचा धंदा त्यांनीं सोडला. गांधीजींच्या असहकारितेचें वर्णन पुढील योग्य शब्दांत केलें आहे-- " सर्वच्या सर्व समाज तळापासून हादरला गेला. आजवर कैक लोकांनीं धुळीचे कण म्हणून पायाखालीं तुडविलेले लाखों--क्रोडों हिंदी लोक वायुवेगानें धांवत आलेल्या असहकारितेच्या वावटळींत सांपडले व त्या धूळिकणांचा गगनभेदक असा एकच एक स्तंभ फिरत राहिला. असहकारिता ही केवळ राजकीय सभेंतील एक शाब्दिक घोषणा नव्हती, तर देशांतील घराघराला व्यापून टाकणारी व तेथें स्थिर राहाणारी ती एक भरीव घटना होती. "

साऱ्या भारतवर्षाला कोठल्या जादूच्या कांडीनें वश करून घेतलें असेल तर ती ही असहकारिता. त्यांत नाविन्य होतें, तेज होतें, कृत्तिशीलता होती. हिंदुस्थानांतील अतिबुद्धिमान् पुढाऱ्यांनामुद्धां महात्माजींच्या या कार्यक्रमाला मान्यता देणें त्या क्षणाला भाग पडलें. कारण " असहकार म्हणजे भारतीय अस्मितेची उच्च भरारी होती."

असहकारितेचा उदय देशांत झाल्यानंतर अनेक लोकांनीं वकिली सोडली, शाळा-कॉलेजें कांही काळ ओस पडलीं. राष्ट्रकार्यासाठीं अनेक तरुणांनीं आपले व्यवसाय सोडले. तेव्हां गांधीजींनीं राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजांच्याकडून मिळणारें शिक्षण हें गुलाम करणारें शिक्षण आहे. याची खात्री पटल्यानें राष्ट्रीय विद्यालयांची स्थापना अनेक ठिकाणीं झाली. पारतंत्र्याचे होणारे संस्कार नाहींसे करून त्यांच्यांत स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करण्याच्या उद्देशानें राष्ट्रीय

शिक्षणाचें महत्त्व मोठें होतें. (बंगालमध्यें देशबंधू दास यांनीं याच उद्देशानें " नॅशनल कॉलेज " ची स्थापना कलकत्त्यांत केली.

## प्रिन्सिपॉल सुभाष

सुभाषबाबू नुकतेच परदेशांतून उच्च शिक्षण पुरें करून आले होते. स्वतंत्र देशांत त्यांनीं शिक्षण घेतलें असल्यानें त्यांना मिळालेला अनुभव ताजाच होता. सुभाषबाबूंच्यासारखा उच्च ध्येयाचा, स्वातंत्र्यनिष्ठ मनुष्य राष्ट्रीय कॉलेजला योग्य होता म्हणून दासबाबूंनीं सुभाषबाबूंना त्या कॉलेजचे प्रिन्सिपाल केलें. ' गुणी गुणं वेत्ति ' असें म्हणतात तें खरेंच ठरलें. सुभाषबाबूंनीं आपलें कर्तृत्व दाखविण्यास सुरुवात केली. त्यांच्या स्वभावाचा जो विशेष आहे तो हा कीं जें कार्य करावयाचें तें अंतःकरण ओतून करावयाचें. कॉलेजच्या प्रिन्सिपालचें काम त्यांनीं केलें तेंहि असेंच. त्यांना ज्ञानापेक्षां देशभक्ति विद्यार्थ्यांना शिकवावयाची होती. देशासाठीं त्याग करावयास शिकवावयाचें होतें. तेंसुद्धां व्याख्यानांनीं नव्हे, तर स्वतःच्या उदाहरणानें. कारण ते स्वतः देशासाठीं फकीर बनले होते.

सूर्य उगवल्यावर सर्व फुलें फुलतात. तशा या स्वातंत्र्यतेजाच्या मूर्त प्रतीकामुळें अनेक विद्यार्थी, इंग्रजी शिक्षणानें जसे कारकून होतात, तसे कारकून न होतां देशभक्त बनले. बंगाल सरकारचें सुभाषबाबूंच्या हालचालींवर लक्ष होतेंच. कारण सुभाषबाबूंच्या या प्रयत्नांनीं एक नवीन पिढी तयार होत होती. कदाचित् ब्रिटिश साम्राज्य हलवून सोडणारे वीर निर्माण व्हावयाचे या भीतीनें सरकार अस्वस्थ झालें होतें. तें या तरुण प्रिन्सिपॉलला कधीं ' उचलतां ' येईल याची वाट पहात होतें.

## देशभक्तीचा पहिला हप्ता

लोकक्षोभाचा अतिरेक झाल्यावर त्यावर तो शमविण्यासाठीं कांहींतरी करणें हें ब्रिटिश राज्यकर्त्यांचें धोरणच आहे. १९२१ सालीं लोकक्षोभ वाढत आहे असें पाहून प्रिन्स ऑफ वेल्सना हिंदुस्थानांत पाठवावयाचें ठरलें. त्यांची कल्पना ही कीं हिंदी जनता मोठ्या उत्साहानें युवराजाचें स्वागत करील. परंतु त्या वेळीं देशावर विषण्णतेची—विषण्णतेची म्हणण्यापेक्षां सुप्त संतापाची छाया पडली होती. पंजाबचे अत्याचार जनता विसरली नव्हती. त्या जखमेनें विव्हळणारी

जनता युवराजांचें स्वागत करील ? गांधीजींनीं युवराजांच्या आगमनावर बहिष्कार घालण्याची देशाला आज्ञा केली. तो बहिष्कार युवराजांवर नव्हता—तर ज्या राजसत्तेचे ते प्रतिनिधि होते त्या राजसत्तेवर होता.

गांधीजीच्या या आज्ञेला सर्व राष्ट्रानें मान्यता दिली. कांहीं देशद्रोही लोक त्या सत्कारांत सामील झाले होते हें हिंदुस्थानच्या देशद्रोही लोकांच्या परंपरेला साजेसेंच होतें. कलकत्त्याला युवराज २५ डिसेंबर १९२१ ला येणार होते. (सुभाषबाबूंच्या-कडे कलकत्त्यांतील हरताळाचें नेतृत्व होतें. कॉलेजचें काम करीत असतांनाच सुभाषबाबूंनीं स्वयंसेवकदल निर्माण केलें होतें. सरकारनें तें दल बेकायदा ठरविलें. बंगालमध्यें सर्वत्र अस्वस्थता निर्माण झाली. देशबंधू दासांनीं सरकारचा कडक शब्दांत निषेध केला. ज्या क्षणाची सरकार वाट पहात होतें तो क्षण आला आणि सुभाषबाबूंना सरकारनें अटक केली. देशभक्तीचा पहिला हप्ता त्यांनीं भरला आणि ते तुरुंगाची वाट चालूं लागले.)

देशबंधू दास आदि सर्व पुढाऱ्यांना सरकारनें पकडलेंच होतें. देशबंधूंनीं पुढील ओजस्वी संदेश बंगालला पाठविला—

" I feel the handcuffs on my wrists and the weight of iron chains on my body. It is the agony of bondage. The whole of India is a vast prison. The work of the Congress must be carried on. What matters whether I am taken or left? What matters whether I am dead or alive? "

युवराज कलकत्त्यांत आले. त्यांचें स्वागत झालें पण तें " काळें " होतें.

" राजद्रोही " सुभाष सहा महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षेनंतर सुटले. सुभाष सुटले त्यावेळीं उत्तर बंगाल्यांत महापुरानें कहर उडविला होता. " बुडत हें जग, न देखवे डोळां। " अशी सुभाषच्या मनाची धारणा होती. महर्षि प्रफुल्लचंद्र रे यांच्या नेतृत्वाखालीं सुभाषचंद्रांनीं अतोनात कष्ट केले. सर्व निराश्रितांची सेवा केली. त्या सेवेला प्रशस्तिपत्र त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड लिटन यांनीं आपण होऊन दिलें.

## " स्वराज्य पक्षा "ची स्थापना

१९२२ सालीं गया येथें देशबंधू दास यांच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेसचें अधिवेशन भरलें. काँग्रेसच्या इतिहासांत हें अधिवेशन महत्त्वाचें झालें. याच वेळीं

देशबंधू दासांनीं ("स्वराज्य पक्ष" काढला. त्या पक्षाचें नेतृत्व त्यांच्याकडेच होतें. बंगालमधील सर्व निवडणुकी लढविण्याचा निर्धार त्यांनीं केला.

याच पक्षाचा प्रचार करण्यासाठीं 'फॉर्वर्ड" नांवाचें साप्ताहिक देशबंधूंनीं काढलें व त्यांच्या आवडत्या अनुयायाला—सुभाषबाबूंना त्याचें संपादकत्व दिलें.) त्यांनीं आपल्या तर्कशुद्ध विचारसरणीनें थोड्याच कालांत लोकांवर मोहिनी घातली.

## चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर

स्वराज्य पक्षानें निवडणुकींत भाग घेण्याचें ठरविल्यानें कॉर्पोरेशनच्या निवडणुकीहि देशबंधूंनीं लढविल्या. देशबंधूंची मेयर म्हणून निवडणूक झाली. मोठ्या पुरुषांच्या स्पर्शानें लहान गोष्टीसुद्धां मोठ्या होतात. तीच गोष्ट सुभाषबाबूंनीं चीफ ऑफिसरची जागा स्वीकारल्यावर झाली. त्यांच्या कामगिरीचें वर्णन पुढील-प्रमाणें केलें आहे—" कॉर्पोरेशनच्या कारभाराची सर्व व्यवस्था बदलली. हुकुम-शाही पद्धत जाऊन लोकप्रिय पद्धत त्या ठिकाणीं आली...खादीचा पोषाख सर्वांना देण्यांत आला. व्हाइसरॉय, गव्हर्नर आदि सरकारी अधिकाऱ्यांचा सन्मान करण्याची पद्धत बंद झाली आणि देशभक्तांचा सन्मान होऊं लागला. प्राथमिक शिक्षण फुकट केलें." यासारखीं अनेक लोकोपयोगी कामें सुभाषनीं केलीं. मग ते जनतेचे आवडते पुढारी झाले असल्यास नवल नाहीं. सेवेनें जनता आपलीशी करतां येते, भाषणांनीं नाहीं हें महान् तत्त्व त्यांनीं प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविलें.

याहीपेक्षां सरकारचा रोष त्यांच्यावर होण्यास कोठलें कारण झालें असेल तर तें त्यांनीं दिलेल्या जाहिरातीनें! "स्वदेशासाठीं ज्यांना यातना भोगाव्या लागल्या आहेत अशा लोकांनीं नोकरीसाठीं आपणांकडे अर्ज करावेत" अशी जाहिरात चीफ ऑफिसर म्हणून त्यांनीं दिली. या जाहिरातीच्या मुळाशीं उद्देश काय होता हें सांगतां येणें कठिण आहे. परंतु सरकारचा संशय वाढत होता. संशया-सारखा वाढणारा दुसरा विषवृक्ष नाहीं असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. सरकारच्या बाबतींत तर नाहींच नाहीं.

## गोपीनाथ सहाला प्रणाम

१९२३–२४ च्या सुमारास बंगालमध्यें क्रांतिकारकांनीं आपल्या चळवळीला सुरवात केली. गोपीनाथ सहा नांवाच्या एका तरुणानें डे नांवाच्या एका इंग्रज

ज्यापाऱ्यावर त्याला टेगार्ट समजून हल्ला केला. या कृत्याबद्दल त्याला फांशीं जावें लागलें. बंगालमध्यें वातावरण थोडेसें प्रक्षुब्ध झालें. सेराजगंज येथें भरलेल्या बंगाल प्रांतिक परिषदेंत गोपीनाथच्या त्यागाविषयीं आदर प्रकट करणारा ठराव पास झाला. या उघडउघड सहानुभूतीनें सरकारलाहि विचार करणें भाग पडलें. या ठरावाचा परिणाम विद्युत्‌वेगानें तरुणांवर झाला असा अभिप्राय सरकारनें व्यक्त केला. भारत संरक्षण कायद्याखालीं अटक करण्यास सुरुवात होण्याचा दाट संभव दिसूं लागला.

सुभाषबाबूंच्यावर सरकारचा रोष होताच. या सर्व दहशतवादी क्रांतिकारकांचे प्रवर्तक (Brain of the revolutionary conspiracy) सुभाषच असावेत असा ओरडा अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांनीं सुरू केला. याच सुमारास सरकारनें अशी समजूत करून घेतली कीं क्रांतिकारकांचा फारच मोठा कट घडत आहे. तेव्हां पोलिसांना जादा अधिकार सरकारनें दिले. त्याचा उपयोग पोलिस केल्याशिवाय कसे राहतील ?

## अटक

२४ ऑक्टोबर १९२४ रोजीं रात्रीं बंगाल सरकारनें वटहुकूम काढला. दुसऱ्याचे दिवशीं सकाळीं पोलिसांनीं त्या वटहुकमाचा फायदा घेऊन अनेक कार्यकर्त्यांना अटक केली. देशबंधू दास यांच्या स्वराज्य पक्षांतील अनेक लोक यांत सांपडले. सुभाषचंद्रांनासुद्धां अटक करण्यांत आली. देशबंधूंना सरकारच्या या कृत्याचा तीव्र संताप आला. ते मेयर होते आणि सुभाष चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर होते. याहीपेक्षां ते गुरुशिष्य होते. देशबंधूंनीं एक निषेधाचें भाषण करून सरकारला बजावलें कीं—" देशभक्ति हा जर गुन्हा असेल तर मींहि तो केला आहे. तेव्हां मलाहि सरकारनें पकडावें."

## मंडालेच्या मार्गावर

सुभाषना अलिपूर जेलमधून २५ जानेवारी १९२६ ला अकस्मात् हलवून मंडालेच्या तुरुंगांत नेलें. सुभाषबाबूंच्या देशभक्तीला, त्यांच्या कष्टमय आयुष्याला येथून सुरुवात झाली. "आम्हांला सुभाषचा अभिमान वाटतो" असे उद्गार त्यांच्या वडिलांनीं हें वृत्त ऐकल्यावर काढले ?

मंडाले ! हिंदुस्थानच्या अलीकडच्या राजकारणाशींहि या तीन अक्षरांचा निकटचा संबंध आहे. सर्व जगाला शिरोधार्य होणारा " गीतारहस्य " हा ग्रंथ याच मंडालेंत लिहिला गेला ! त्या भारताच्या अनभिषिक्त सम्राटाला—लोकमान्यांना—सरकारनें सतत सहा वर्षं येथेंच डांबून ठेवलें होतें ! लोकमान्यांच्या पवित्र सहवासानें पवित्रतम झालेला मंडालेचा तुरुंग ! याच तुरुंगांत पंजाबच्या सिंहानेंहि—लाला लजपतरायांनींहि—वास्तव्य केलें होतें.

आणि काय योगायोग पहा !

भारताचे हे सर्वश्रेष्ठ क्रांतिवीर सुभाषचंद्र हेहि मंडालेलाच पाठविले गेले. सुभाषबाबूंना या मंडालेच्या गतेतिहासची जाणीव झाली आणि त्यांनीं म्हटलें—" पण मला आठवण झाली कीं लोकमान्य टिळकांना सुद्धां सहा वर्षं याच तुरुंगांत डांबलें होतें. आणि नंतर लाला लजपतरायांनीं सुद्धां एक वर्ष येथें वास्तव्य केलें होतें. याच एका गोष्टीनें मला समाधान प्राप्त झालें आणि अभिमान वाटला कीं आम्हीहि याच महान् देशभक्तांच्या पावलावर पाऊल ठेवून जात आहोंत ! "

सुभाषबाबूंना मंडालेला घेऊन जातांना त्यांच्या अंतःकरणांत केवढें काहूर माजलें होतें. देशभक्ताच्या आयुष्यांत असे क्षण येतातच. त्यांनीं आपल्या मनाला बजावलें "वेडया मना, आतां कुठें तुझ्या कष्टांना, तुझ्या हालअपेष्टांना सुरुवात झाली आहे. अजून प्रतिकूल परिस्थितीला, अनेक संकटांना तोंड द्यावयाचेंच आहे. प्रतिकूल परिस्थितीशीं झुंज करून ध्येयसिद्धीचा मंगल आनंद मिळवणें हें तुझ्या आयुष्याचें कर्तव्य आहे ! तुझ्या यौवनाच्या, जीवनाच्या राखेंतून तुला पाहिजे आहे तें मंगल प्राप्त होणार आहे. तुझ्या सर्वस्वाचा बळी या यज्ञवेदीवर ठेवला पाहिजे. तुझ्या आयुष्याचा उद्देश तोच आहे ! "

# लोकमान्यांच्या तपोभूमींत ४

तुरुंगवास हा देशभक्तांच्या आयुष्यांतील प्रमुख भाग असतो. सुभाष मंडालेच्या कोठडींत कोंडले गेले. परंतु त्यांचें अंतःकरण कोंडलें गेलें नाहीं. आजपर्यंतच्या अनेक देशभक्तांचा हाच अनुभव आहे. तुरुंग हें स्वातंत्र्यमंदिर आहे. आज तेथें अंधःकार असेल, पण उद्यां तेथें दीपमाला लावल्या जाणार आहेत.

सुभाषचंद्रांना मंडालेचा एकांतवास जाणवलाच. एकांतवास ही फार मोठी शिक्षा असते. सदासर्वदा ज्याच्याभोंवतीं ५।५० माणसें असतात त्या माणसाला एकांतांत ठेवणें ही केवढी मोठी शिक्षा आहे. विचारांचें तुफान एकांतांत उठतें. पहिला क्रांतीचा प्रयत्न फसल्यानंतर मॅझिनीला तुरुंगाच्या कोठडींत डांबलें तेव्हां त्याच्या अंतःकरणांत संशयी विचारांचें तुफान उठलें! गांधीजींनींसुद्धां आत्मकथेंत आपला एकांतवासाचा अनुभव नोंदून ठेवला आहे. सुभाषबाबूंच्या अंतःकरणांतहि वादळ निर्माण झालें. मंडाले म्हणजे उष्णतेचा भयंकर त्रास. सुभाषबाबूंच्यासारख्या माणसाला दुसरें तिथें काय करतां येणार होतें? त्यांना देशबंधू दास "वृद्धयुवक" म्हणत. त्याच पदवीला अनुरूप असें त्यांनीं कार्य सुरू केलें. तें म्हणजे—

विचार! विचार!! विचार!!! जणूं देशभक्तांची ध्येयनिष्ठा कणखर करण्याकरितांच सरकार त्यांना तुरुंगांत डांबतें. सुभाषबाबूंनीं आपल्या भावी आयुष्याचा विचार केला. त्यांच्या अंतःकरणांत उठणाऱ्या विचारांचें प्रकटीकरण त्यांच्या पत्रांतून होई. ते एका पत्रांत म्हणतात—

"तुरुंगांत जों जों दिवस जात आहेत तों तों माझी अशी खात्री होत आहे कीं जगांतील सर्व झगडयांच्या मुळाशीं एकच झगडा आहे. व तो म्हणजे कल्पनांचा. हा

झगडा खऱ्या कल्पना व खोटया कल्पना यांजमधील असतो. अथवा उलटपक्षीं कल्पना खोट्या न म्हटल्या तरी कमी अधिक प्रमाणांतील खऱ्या कल्पनांमधील असतो.

कल्पना हा मानवी चळवळींचा प्राण आहे. या कल्पना चैतन्ययुक्त व लढाऊ असतात. कल्पना आपला मार्ग आपणच शोधतात. आपण त्यांच्या हातचीं खेळणीं आहोंत. आपण गोळ्यासारखे आहोंत व कल्पना दैवी अग्नीसारख्या आहेत. त्या अग्नीपासून आपण आपले गोळे पेटवून घ्यावयाचे असतात. अशा कल्पनांच्या सिद्धयर्थ जो देह वाहिला गेला तो पावन झाला, मग त्याचे ऐहिक दृष्टया कांहींहि होवो. आपल्या कल्पनांचा शेवटीं विजय होणारच असा माझा दृढ विश्वास आहे. विचारांच्या तंद्रींत मला माझ्या प्रकृतीचें कांहींच वाटत नाहीं."

थोर पुरुष अन्नावर जगत नाहींत हेंच खरें. सुभाषबाबूंचें मन खंबीर होत चाललें होतें. परिस्थितीच्या, अडचणीच्या डोंगरावर चढून आपल्या ध्येयाची उषा पाहण्याची ते तयारी करीत होते. आयुष्याच्या भावी संग्रामांत सोसावे लागणारे कष्ट, सोसावे लागणारे निराशेचे आघात हे सहज सहन करतां यावे ह्यासाठीं ते वज्रभेदी अंतःकरण तयार करीत होते. पण त्यांचें शरीर मात्र खंगत चाललें होतें. दुर्गापूजा प्रकरणांत झालेल्या अन्नत्यागामुळें त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होताच. मंडालेच्या उष्ण हवेचा परिणाम शरिरावर वाईट होऊं लागला.

सरकार सुटकेची भाषाच काढीत नव्हतें.

सुभाषबाबूंची मनःस्थिति उल्हसित होती. मंडालेचा तुरुंग हा त्यांना स्वर्गच वाटूं लागला. त्यांनीं सुविख्यात बंगाली साहित्यिक श्री. शरत्चंद्र चतर्जी यांना एक पत्र लिहिलें आहे. तें अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. त्यांत त्यांनीं आपली मनःस्थिति सुंदर रीतीनें वर्णन केली आहे.

"आतां फार दिवस मंडाले येथें वास्तव्य होणार नाहीं असें मला वाटूं लागलें आहे; परंतु माझा हा कारागृहवास लवकर संपावा असें मात्र मला वाटत नाहीं. तुरुंगाबाहेर आलों तरी काय? देशभर पसरलेली ती स्मशानशून्यता मला पुन्हां घेरल्याशिवाय राहणार नाहीं! या कल्पनेनेंहि माझें हृदय कंपित होत असतें. येथें सुखांत, दुःखांत, नाना प्रकारच्या आठवणींत व स्वप्नसृष्टींत, अनुभव घेत आमचे कसेबसे दिवस जात असतात. तुरुंगाच्या गजांतून जो काहीं बाहेरचा वारा आंत येऊन आमच्या देहाला स्पर्श करतो त्यामुळें आमच्या मनाला केवढें सुख वाटत असतें हें शब्दांनीं सांगतां येणार नाहीं. ज्यांच्यावर आमचें आत्यंतिक

प्रेम आहे, जिच्यावर निरतिशय प्रेम केल्यामुळें आमच्या वांटयास हें फळ आलें, तिचीच भेट झाल्याचें सौख्य त्या झरोक्यांतून येऊन आमच्या देहाला स्पर्श करून जाणाऱ्या वाऱ्यामुळें आम्हांला अनुभविण्यास मिळत असतें! त्यामुळें आम्हीं कारावासांत असलों, आमच्या हृदयाचे तुकडे होऊन जात असले, तरीहि त्या स्थितींत एक प्रकारचा सौख्यानुभव, एक प्रकारची शांति व एक प्रकारची तृप्ति आमच्या वांटयास येत असते. बाहेर पसरलेली निराशा, बाहेरचा शुकशुकाट, व मनाला विपण्ण करून सोडणारे असंख्य प्रकार येथें आम्हांला त्रास द्यायला येत नाहींत.

या ठिकाणीं येण्याचें भाग्य माझ्या वांटयाला आलें नसतें तर माझ्या सोन्या-सारख्या बंगालवरील माझें प्रेम इतकें वृद्धिंगत झालें नसतें. कारागृहवासाची केवळ कल्पना करून रविबाबूंनीं रचलेल्या एका काव्याचे पुढील चरण एकसारखे माझ्या मनांत घोळत असतात. रविबाबू म्हणतात—

"सोनार बांगला! आमि तोमाय भालबासि चिरदिन तोमार वातास आमार प्राणे बाजाय बांशी"

अशा वेळीं माझ्या बंगालचें सुंदर चित्र माझ्या मनश्चक्षूंपुढें चटकन् उभें राहातें; आणि मग वाटूं लागतें कीं, हा एवढा गोड अनुभव मला येथें आल्या-मुळें घेतां आला; निदान तेवढ्यामुळें तरी मी मंडालेस आल्याचें सार्थक झालें!"

देशभक्तीची उदात्त भावना या पत्रांत दिसून येते. हें पत्र वाचल्यावर "—आतां आमच्या श्वासोच्छ्वासाकरितां इटलीमधून पूत होऊन येणारा तो प्रिय वाराहि आमच्यापासून हिसकावून घ्या. मार्सेलिसच्या किनाऱ्यावर उभें राहून जेथें समुद्र व आकाश मिळून जाऊन आमच्या मातृभूमीला लपवूं पहात होते तिकडे आम्हीं बोट करावें व दृष्टीला शक्य तितकी पुढें ढकलून स्वतःशीं म्हणावें—"तेथें प्रिय इटली आहे!' असें म्हणण्याचा हक्कहि आमच्यापासून हिसकावून घ्या" या मॅझिनीनें पाठविलेल्या पत्राची आठवण होते. देशभक्तांचीं अंतःकरणें हीं सर्वत्र एकच असतात का? त्यांच्या प्रीतीचा विषय एकच असतो. तो म्हणजे त्यांची प्रिय मातृभूमि. तिचा विरह त्यांना दुःसह होतो.

## मरणोन्मुख शय्येवर

१९२७ च्या एप्रिलमध्यें सुभाषबाबूंची प्रकृति फारच ढांसळली. ब्रॉंको न्यूमोनिआची भयंकर व्यथा त्यांना जडली. त्यांचें वजन २० पौंडांनीं कमी झालें. अंथरुणावरून हलतां येईना. बंगालमध्यें सर्वत्र वातावरण चिंताग्रस्त

झालें. मातृभूसाठीं तपश्चर्या करणाऱ्या या योगींद्राकडे सर्व बंगाली जनतेचे डोळे लागले होते. जनता अत्यंत अधीर अंत:करणानें सरकार कांहीं तरी "कृपा" करील याची वाट पहात होती. पण सुभाषबाबूंना सरकार एक "भयंकर माणूस" समजत होतें. सुभाषबाबू म्हणजे अग्निच होता. अगोदरच दारूच्या कोठारा-सारखा बनलेला बंगाल प्रांत सुभाषबाबूंना सोडल्यानंतर पेटेल अशी भीति सरकारला वाटत होती कीं काय कळत नाहीं. असा कोणता भयंकर कट सुभाष-बाबूंनीं केला होता ? स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न हा जर गुप्त कट असेल तर तो सुभाषबाबूंनीं केला होता--नव्हे त्यांच्या आयुष्याचें तें ध्येयच होतें !

सरकारनें दयाळू होऊन डॉ. सुनीलचंद्र बोस यांना भेटण्याची परवानगी दिली. ते भेटून आले. त्यांनींहि अभिप्राय दिला, "सुभाषबाबूंची प्रकृति चिंताजनक आहे." सरकारनें सुभाषना स्वित्झर्लंडमध्यें जाण्यास सशर्त परवानगी दिली व हिंदुस्थानांत कोठेंहि न उतरण्याची अट लादली ! सुभाषना घर सोडून ३–४ वर्षे झालेलीं. त्यांच्या हृदयाची तगमग होत होती. त्यांनीं आपले बंधु शरच्चंद्र यांना एक प्रदीर्घ पत्र लिहिलें. त्यांत सरकारनें केलेल्या आरोपांना उत्तरें दिलीं, आणि असें निश्चयपूर्वक कळविलें कीं--"परक्या देशांत हद्दपार होण्यापेक्षां स्वदेशभूमींत तुरुंगांत कुजून मरणें अधिक इष्ट आहे, असें पूर्ण विचारांतीं मीं ठरविलें आहे. कारण खडतर तपश्चर्या केल्याशिवाय श्रेयाची प्राप्ति होत नाहीं असें माझें निश्चित मत झालें आहे !"

एकाद्या सिंहाला पिंजऱ्यांत कोंडून त्याला तीक्ष्ण भाल्यानें टोंचावें तशी सुभाषांची स्थिति झाली होती. मृत्यूची भेसूर छाया त्या तुरुंगाभोंवतीं पडलेली होती. सैतानाचा आणि देवाचा झगडा चालू होता. सुभाषांचीं "सुखदुःखे समेकृत्वा" अशी शांत मनोवृत्ति होती. ती सैतानाला ओरडून सांगत होती—

"अग्नि जाळि मजसि ना खड्ग छेदितो
भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो"

सुभाषनीं कोठल्याहि अटी स्वीकारण्याचें नाकारलें. हें शौर्य निश्चित् मोठें आहे. कारण त्या शौर्यामागें त्यांचें मोठें आत्मबल उभें होतें. नाहीं तर त्यांना नसती कां प्रकृतीच्या कारणास्तव माघार घेतां आली ? पण ती कला त्यांना अवगत नव्हती. उलट त्यांनीं उद्वेगानें लिहिलें,

"मी दुकानदार नव्हे, मला देवघेवीचा व्यवहार कळत नाहीं. राजकीय डावपेंचाच्या निसरड्या मार्गाचा मला तिटकारा आहे. माझी भिस्त तत्त्वांवर

आहे. मला माझ्या देहाची मुळींच क्षिति वाटत नाहीं व त्याच्या रक्षणार्थ मी तत्त्वांवर पाणी सोडण्यास मुळींच तयार नाहीं. बाजारांत ठरणारी वस्तूची किंमत व मी ठरवीन ती किंमत यांत अंतर आहे. यश ही हातानें चांचपण्याची वस्तू नव्हे. आमचा झगडा शरीराशरीरांतील नव्हे व आर्थिक लाभासाठींहि नव्हे. सेंट पॉल यानें म्हटल्याप्रमाणें आमचा झगडा माणसांशीं नसून तत्त्वांशीं आहे, सत्तेशीं आहे, सैतानाशीं आहे व दुष्टांशीं आहे. आमचा पंथ स्वातंत्र्याचा, सत्याचा आहे. आमचा देह पडो वा नष्ट होवो, आमची निष्ठा अढळ असेल तर विजय आम्हांस ठेवलेलाच आहे. मात्र तो विजय पाहण्यास आमच्यापैकीं कोण जगणार हें ईश्वर ठरविणार ! ”

## मायभूचें दर्शन

अखेर सुभाषबाबूंचा विजय झाला. सरकारनें सुभाषचंद्रांची लोकप्रियता अजमावली होती. त्यांच्या सुटकेसाठीं बंगाल ‘ अवघाचि उठलेला ’ होता. लोकशक्तीचा प्रभाव मान्य करणें जरूर होतें. कारण सुभाष जर तुरुंगांत.........? ही कल्पनाच असह्य वाटली. कारण तें घडलें असतें तर लोकक्षोभाचा भयंकर आविष्कार सहन करावा लागला असता. आणि नुसता सभामिरवणुकीचा नव्हे, तर उग्र तेजाचा ! तेव्हां सरकारनें पत्रक काढून १६ मे १९२७ या दिवशीं सुभाषांची विनशर्त मुक्तता केली.

मातृभूच्या गतपातकांचें प्रायश्चित्त म्हणून तपश्चर्या करणारा हा तपस्वी पुनश्च जनतेस दर्शन देत होता. सहास्रावधि कंठांतून सुभाषबाबूंचा जयजयकार झाला. “ न कळे तव दर्शन फिरून व्हायचें ” अशी भीति शेंकडों लोकांना वाटली होती. पण नियतीची इच्छा शुभ होती. सुभाषबाबूंच्या तेजःपुंज मूर्तीचें दर्शन हजारों लोकांनीं घेतलें.

आणि सुभाषबाबू ?

त्यांना त्यांच्या डोळ्यांआड केल्या गेलेल्या प्राणप्रिय देशजननीचें दर्शन झाल्याचा स्वर्गीय आनंद झाला होता. त्यांनीं मनांत म्हटलें,

“ आई, मृत्यूशीं झुंज देऊन तुझ्या सेवेसाठीं पुन्हां आलों आहे. एक लढाई तर जिंकली, आतां पुढचें पुढें ! ”

# हिंदी राजकारणाच्या आघाडीवर ५

बंगालनें आपल्या नेत्याचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. सर्व देशांत सुभाषबाबूंच्या मुक्ततेनें आनंदीआनंद झाला. सुभाषबाबूंची प्रकृति नाजुक झाली असल्यामुळें त्यांना विश्रांतीची जरूर होती. पण कित्येक दिवस देशाची सेवा करण्यास न मिळाल्यामुळें ते अधीर झाले होते. त्याची कल्पना सुटकेनंतर सुभाषबाबूंनीं जे उद्गार काढले त्यावरून येईल. "माझी प्रकृति लवकर सुधारो अशी माझ्या देशबांधवांची इच्छा असल्यामुळें मी पूर्ववत् होऊन देशकार्य करण्याकरितां त्यांच्यांत कधीं मिसळतों आहे असें मला झालें आहे !"

## देशबंधूंचे वारसदार

सुभाषबाबूंचे गुरु देशबंधु दास यांना सुभाष तुरुंगांत गेल्यानंतर देवाज्ञा झाली. सर्व बंगाली जनतेला आपला पिता गेल्यासारखें दुःख झालें. बंगालला राजकीय दृष्ट्या जर कोणीं पुढें आणलें असेल तर तें दासांनींच. बंगालशीं समरस झालेले दास जनतेच्या गळ्यांतील ताईत बनले असल्यास नवल नाहीं. आतां देशबंधु गेलेले होते. सुभाषबाबू सुटून आल्यानंतर त्यांच्याकडे आशापूर्ण नेत्रांनीं बंगाली जनता पाहात होती. सुभाषचंद्र म्हणजे दासबाबूंचे उजवे हात. दासबाबूंच्यावर सुभाषांची अनन्यभक्ति होती. 'अंतर्यामीं मेरा स्वामी तूहि है' इतक्या तऱ्हेनें ते देशबंधूंशीं तादात्म्य पावलेले होते. सर्व जीवनाचा आदर्श म्हणून दासबाबू असल्यानें सहाजिकच दासबाबूंचे ते राजकीय वारस बनले. बंगाली जनतेनें त्यांना दासबाबूंच्यानंतर नेतृत्वाच्या सिंहासनावर बसविलें. १९२८ ते ३० पर्यंत ते बंगाल प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष होते.

## संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार

सुभाषबाबू तुरुंगांतून सुटल्यानंतर त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली होती. पहिली मोठी जबाबदारी म्हणजे बंगालच्या नेतृत्वाची. स्वराज्य पक्षाचा प्रभाव बंगालमध्यें मोठ्या प्रमाणांत होता. निवडणुका लढविण्याखेरीज दुसरें कुठलेंच कार्य स्वराज्य पक्षानें केलें नसल्यानें आणि " निवडणुकीचें राजकारण " हें सुभाषबाबूंच्या क्रांतिप्रवण वृत्तीला मानवणारें नसल्यामुळें त्यांनीं मंडालेच्या कारागृहांत दीर्घ चिंतनांतून ठरविलेला कार्यक्रम जनतेपुढें मांडण्याचें ठरविलें.

मद्रासला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. सुभाष या अधिवेशनापासून कॉंग्रेसचे सर-चिटणीस म्हणून निवडले गेले. त्यांच्या उच्च कर्तृत्वाला राष्ट्रसभेनें मान्यता या वेळेपासून दिली असें म्हणावयास हरकत नाहीं. ' पूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य हें हिंदी लोकांचें ध्येय आहे ' अशा प्रकारचा ठराव या अधिवेशनांत मांडण्यांत आला. आतांपर्यंत अनेक वेळां हा ठराव मांडण्यांत आला होता. परंतु यावेळीं जोराचा पाठिंबा या ठरावाला मिळाला. हा एक राष्ट्रसभेच्या आयुष्यांतील महत्त्वाचा क्रांतिबिंदु आहे. या संपूर्ण स्वातंत्र्याच्या पुरस्कारामागें सुभाष–जवाहर या दोन तरुणांचें प्रभावी सामर्थ्य होतें.

यावेळीं इंग्रजांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांतील परिस्थिति पाहण्या-साठीं एक कमिशन पाठविण्याचें ठरलें होतें. जसें कांहीं येथील अधिकारी निद्रि-स्तच होते. मद्रासच्या राष्ट्रसभेनें त्या सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें होतें. परंतु इंग्रजांच्या राजकीय आश्वासनांवर विश्वास ठेवण्याच्या प्रवृत्तीनें कांहीं लोकांना एक घटना तयार करण्याचा मोह झाला. पं. मोतीलाल नेहरू आदि पुढाऱ्यांनीं एकत्र बसून असा निर्णय घेतला कीं वसाहतीचें स्वराज्य ( Dominion Status ) यावर भावी घटना आधारलेली असावी.

सुभाषबाबूंनीं या गुलामी प्रवृत्तीचा धिक्कार केला. कॉंग्रेसला संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय मान्य करण्यास भाग पाडण्यासाठीं पंडित जवाहरलाल, सुभाषचंद्र आणि श्रीनिवास अय्यंगार यांनीं ' स्वातंत्र्यसंघा'ची स्थापना केली.

## युवक चळवळीचा प्रचार

महाराष्ट्रानें सुभाषबाबूंच्याबद्दल वाटणारा आदर मे १९२८ मध्यें भरलेल्या प्रांतिक परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन प्रकट केला. त्याचे अगोदर महाराष्ट्रांत

मांडणें चालू होतीं. या प्रांतिक परिषदेंत ऐक्याचा पाया सुभाषांनीं घातला. सुभाषबाबूंच्यासारखा खंबीर वृत्तीचा, निर्भीड, समतोल वृत्तीचा अध्यक्ष लाभला त्यामुळें या परिषदेच्या अधिवेशनाच्या यशांत भर पडली. महाराष्ट्र नि बंगाल हे स्वातंत्र्याच्या लढ्यांतील अग्रेसर प्रांत पुनः जोडले गेले. या परिषदेंतील अध्यक्षीय भाषण अतिशय विचारपूर्ण नि ओजस्वी झालें. संपूर्ण स्वातंत्र्याचा उद्‌घोष करतांना त्यांनीं सांगितलें—" संपूर्ण स्वातंत्र्यांत जो स्वर्गतुल्य आनंद व अभिमान सांठविलेला असतो त्याचा ठेवा हिंदुस्थानच्या हातीं लागून हिंदुस्थाननें जगाच्या कल्याणासाठीं व स्वतःच्या अभ्युदयाकरितां महत्कृत्यें करावीं, अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. स्वातंत्र्यासाठीं स्वातंत्र्य हें माझें ब्रीदवाक्य आहे." या भाषणांत आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण, समाजसत्तावाद, मजूर संघटन इत्यादि अनेक गोष्टींचा ऊहापोह त्यांनीं केला. टाइम्सकारांनीं या भाषणावर टीका करतांना "सुभाषबाबूंचा सल्ला वेडेपणाचा आहे. तो तुम्ही ऐकूं नका" असा सोज्वल उपदेश महाराष्ट्राला केला. या टाइम्सकारांच्या उद्गारांतच सुभाषचंद्रांच्या भाषणाचें यश सांठविलेलें आहे !

सुभाष ' चंद्रां 'ची लोकप्रियता चंद्राच्या कलेसारखी वाढत होती. आपल्याच भावना बोलणारा, आपल्या अंतःकरणांतले विचार निर्भयपणानें जगापुढें मांडणारा, नुसता बोलघेवडा नव्हे तर त्यासाठीं हाल अपेष्टा सहन करणारा जर कोणी नेता असेल तर सुभाष, असें युवकांना वाटत होतें. १९२८–२९ मध्यें अनेक प्रांतांतील युवक परिषदांचें त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. त्यांनीं कलकत्त्याच्या युवक परिषदेंत १९२८ च्या अखेरीस गांधीवादाविरुद्ध आपलें मत मांडलें. त्या दृष्टीनें त्यांनीं केलेल्या भाषणाला महत्त्व आहे. गांधीवादी आध्यात्मिक राजकारणाविरुद्ध प्रकट रीतीनें व्यक्त केलेलें असें हें पहिलेंच मत होतें. ते म्हणाले—" आज आपणांला आश्रमवासीय साधुसंतांच्या पुढारीपणाची यत्किंचित्‌हि आवश्यकता नाहीं. आपणाला जर आपला देश बंधमुक्त व स्वायत्त करावयाचा असेल तर आपण या दोन्ही आश्रमांपासून दूर राहिलें पाहिजे." अशा रीतीनें सुभाषबाबूंची वैचारिक भूमिका निर्माण होत होती. सर्व आयुष्यभर त्यांनीं ज्या तत्त्वाचा पुरस्कार केला त्या क्रांतितत्त्वावरील अढळ निष्ठेमुळें त्यांचा गांधीजींच्या विचारसरणीशीं मतभेद निर्माण झाला.

## कलकत्ता कॉंग्रेस

नको असलेलें सायमन कमिशन शेवटीं हिंदुस्थानांत आलेंच. त्याचें स्वागत गो बॅक सायमन ' या आरोळ्यांनीं केलें. या कमिशनची आठवण हिंदुस्थान कधींहि विसरणार नाहीं. ती एका कारणास्तव. ती आठवण म्हणजे हिंदुस्थानची वाहती जखम ठरली. या कमिशनच्या निषेधार्थ निघालेल्या मिरवणुकींत पंजाब-केसरी लाला लजपतराय यांना मिळालेला मार आणि त्यामुळें त्यांना आलेला मृत्यु !

यानंतर कलकत्ता येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें. सुभाषचंद्र घोस हे या अधिवेशनाचे प्रमुख कार्यकर्ते होते असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण त्यांच्याच प्रांतांत हें अधिवेशन भरलें होतें. सुभाषबाबूंच्या संघटनकौशल्याची स्तुति सर्व भारतीयांनीं केली असल्यास नवल नाहीं.

पुन्हां जुन्यानव्या पिढीचा झगडा सुरू झाला. गांधीजींनीं मांडलेल्या ठरावास पं. जवाहरलाल यांची उपसूचना पुढीलप्रमाणें होती--"पूर्ण स्वातंत्र्य हें हिंदुस्थानचें ध्येय आहे, या मद्रास कॉंग्रेसमध्यें झालेल्या निर्णयाच्या बाबतींत ही कॉंग्रेस एकनिष्ठ असून, ब्रिटिशांशीं असलेला संबंध तोडल्याशिवाय हिंदुस्थानला खरें स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं." गांधीजींचा या उपसूचनेला विरोध होता. सुभाषबाबूंनीं एक उत्तेजक भाषण करून संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचा पुरस्कार केला. पंडित जवाहरलालनींसुद्धां आपली बाजू उत्कृष्टपणें मांडली.

१९२९ साल हें राष्ट्रसभेच्या इतिहासांत महत्त्वाचें साल आहे. कलकत्त्याच्या अधिवेशनापासून सुभाषबाबूंचा संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रचार जोरानें सुरू झाला होता. सुभाषबाबू जेथें जात तेथें एकच गोष्ट सांगत कीं--" चालू वर्ष हें पूर्वतयारीचें वर्ष आहे. जर आपण अखंडपणें व उत्साहानें आपलें कार्य चालविलें तर पुढच्या वर्षी सत्याग्रह व करबंदी या दोन अत्यंत महत्त्वाच्या चळवळी आपल्याला हातीं घेतां येतील. जरूरी उत्पन्न झाली म्हणजे सिनफेनसंप्रमाणें राजनिष्ठेची शपथ न घेतां आपण एकदिलानें कौन्सिलांतून बाहेर पडूं व कौन्सिलच्या बाहेर राष्ट्रीय प्रतिनिधिमंडळाची स्थापना करूं !" सुभाषचंद्रांच्या डोक्यांत कुठले विचार घोळत होते याची कल्पना त्यांच्या त्या एका युवक परिषदेंत केलेल्या भाषणावरून येईल.

आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास त्यांच्या डोळ्यापुढें होता. त्यामुळें त्या धर्तीवर आपलें राजकारण चालावें, आपलें राष्ट्र युद्धोन्मुख व्हावें अशी खटपट त्यांनीं चालविली होती. याच त्यांच्या मनःस्थितींतून पुढें प्रतिस्पर्धी सरकारची कल्पना उदयास आली. कांहीं लोकांनी तिला 'आपलें नांव गाजविण्यासाठीं केलेली क्लृप्ति,' असें म्हटलें. त्यांच्या बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होईल !

## राष्ट्रसभेची स्वातंत्र्यघोषणा

लाहोर येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें. कलकत्ता कॉंग्रेसमध्यें डाव्या गटाचें प्राबल्य झालें होतें. या अधिवेशनांत कॉंग्रेसवर संपूर्ण विजय डाव्या गटानें मिळविला. अध्यक्ष तरुणांचे आवडते पुढारी पंडित जवाहरलाल होते. देशांत सर्वत्र अस्वस्थतेचें वातावरण होतें. त्याचें प्रतिबिंब लाहोर कॉंग्रेसमध्यें पडलें.

सुभाषबाबूंनीं विषयनियामक समितींत एक अभिनव सूचना मांडली. कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करून वहिष्कार जास्त कडक करावा व नंतर 'प्रतिस्पर्धी सरकार' ची स्थापना करावी. ही उपसूचना मांडतांना ते म्हणाले– "देशाला माझ्या उपसूचनेचा विचार करण्यास अजून बारा महिने अवधि आहे. माझी सूचना पुढील अधिवेशनापर्यंत या ना त्या स्वरूपांत स्वीकारली जाईल हें निःसंशय. परंतु मधला काल फुकट जाऊं नये असें मला वाटतें." भावना आणि व्यवहार यामध्यें फरक असतो तोच सुभाषबाबूंच्या आणि इतर कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या विचारसरणींत फरक आहे. सुभाषबाबू म्हणजे स्वातंत्र्याचे प्रेषित. त्यांच्या राजकीय आयुष्यांत त्यांनीं बाळगलेलें एकमेव महान् स्वप्न भारतीय स्वातंत्र्याचें होतें. तें सिद्ध झालेलें पाहण्यासाठीं त्यांनीं आजीव धडपड केली. लाहोर कॉंग्रेसमध्यें त्यांनीं प्रथम या तत्त्वाचा उद्घोष केला.

सुभाषांची ही उपसूचना अर्थातच नापास झाली. नाशिकच्या क्रांतिकारकांना लोकमान्यांनीं जो उपदेश केला--"आज स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय म्हणतां, येथेंच थांबा. पुढची वेळ यावयाची आहे !" तोच उपदेश, तेंच उत्तर गांधीजींनीं या उपसूचनेवर दिलें. नंतर ३१ डिसेंबरला हिंदुस्थानच्या राष्ट्रसभेनें संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाची घोषणा केली.

## सुभाष-सेनगुप्ता

देशबंधु दास वारल्यानंतर सुभाषबाबू हेच बंगालचे नेते मानले जाऊं लागले. परंतु जे. एम्. सेनगुप्ता नांवाचे दासबाबूंच्या निकटच्या सहवासांतले पुढारी बंगालमध्यें होते. सुभाषबाबू जेव्हां आतां राजकारणांत पुढें येऊं लागले होते, तेव्हां इतके दिवस आपणाकडे असलेलें नेतृत्व आतां तरुणांचे नवोदित पुढारी सुभाषचंद्र यांचेकडे जाणार, या भावनेनें त्यांनीं सुभाषबाबूंना विरोध केला.

विरोधी पक्षाचे सुभाष हेहि देशबंधूंचे राजकीय वारसदार. त्यांचा अलौकिक त्याग, प्रखर स्वातंत्र्यप्रीति, तीक्ष्ण बुद्धि, पुरोगामी विचार यामुळें ते बंगालचे आवडते पुढारी बनले. सेनगुप्तांसारख्या प्रतिगामी विचाराच्या माणसामागें बंगालचे तरुण कसे जाणार ? शेवटीं हा वाद विकोपास गेला आणि दोन प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या स्थापन झाल्या.

या वादाची जोराची झुंज लाहोर अधिवेशनांत दिसली. पं. मोतीलाल नेहरू आणि सुभाष यांचे खटके उडाले. पं. मोतीलाल यांच्या तडजोडीच्या प्रयत्नास प्रथम यश आलें नाहीं. सुभाषबाबूंनीं या भांडणाचा उल्लेख करून शेवटीं ते म्हणाले—" पं. मोतीलाल हे मला वडिलांच्या ठिकाणीं आहेत. त्यांच्या निःपक्षपातीपणावर माझा विश्वास आहे. ते निकाल देतील त्याप्रमाणें आम्ही वागूं ! " यापेक्षां जास्त सौजन्यपूर्ण भाषण असूं शकेल असें वाटत नाहीं. बोस-गुप्ता हा वाद तात्त्विक मतभिन्नतेंतून निर्माण झालेला होता. तत्त्वांच्या बाबतींत सौजन्य धारण करून विरोध करणें यांत कुठला स्वार्थ, अहंकार आहे ? तेव्हां सुभाषबाबूंच्यावर करण्यांत आलेला स्वार्थीपणाचा आरोप फोल होता.

## देशाच्या सख्यत्वासाठीं

१९३० सालीं हिंदुस्थानच्या इतिहासांत एक अभिनव असा लढा सुरू झाला. त्यांत अध्यात्माला स्थान होतें. कावेबाजपणाला नव्हतें. आजपर्यंत जगाच्या इतिहासांत कोठेंहि न झालेला असा एक अहिंसात्मक लोकक्षोभ या काळांत निर्माण झाला.

२६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जावा अशी आज्ञा राष्ट्रसभेनें दिली होती. संपूर्ण स्वातंत्र्याचा अखिल भारतीय जयजयकार २६ जानेवारी

१९३० या दिवशीं व्हावयाचा होता. सरकार आपलीं अस्त्रें पाजळीत होतें. सुभाषबाबूंच्यावर त्या दडपशाहीच्या अस्त्राचा प्रथम प्रयोग झाला. विस्तवाच्या सान्निध्यानेंसुद्धां पेट्रोल पेटतें तसें सुभाषबाबूंचें अस्तित्व अशा धगधगीत वातावरणांत सरकारला घातक वाटत होतें. किंवा नुकत्याच मांडलेल्या " प्रतिस्पर्धी सरकार"च्या कल्पनेनें सरकार घाबरलें असावें अशी शंका लोक घेऊं लागले. तेव्हां २३ जानेवारी १९३० ला 'स्वातंत्र्यदिनाच्या अगोदर सुभाषबाबूंना सरकारनें पकडलें व एक वर्षाची शिक्षा ठोठावून अलिपूरच्या तुरुंगांत त्यांची रवानगी झाली.

या खेपेच्या तुरुंगवासांत एक चीड आणणारा प्रकार घडला. अलिपूर जेलच्या अधिकाऱ्यानें त्यांच्या बदलीचा हुकूम काढला. तेथें जाण्याचें नाकारल्यामुळें अर्थात् जबरदस्ती करण्यांत आली. सुभाषबाबूंच्या अंगावर एक पठाण वॉर्डर लाठी घेऊन धांवला. एका निःशस्त्र बंद्यावर एक सशस्त्र मनुष्य हल्ला करतो यांत केवढें शौर्य आहे! शौर्याचा मूर्तिमंत पुतळाच तो! सुभाषबाबू बेशुद्ध पडले आणि जखमहि झाली. जेलरच्या हृदयांत चर्र झालें. विचारा पश्चात्तापाखेरीज दुसरें काय करणार? त्याला माहीत नसावें महापुरुषाच्या रक्ताच्या एका थेंबांत अनेक साम्राज्यें उध्वस्त करण्याचें सामर्थ्य असतें. सर्व देशांत या दुर्दैवी घटनेचा निषेध झाला.

सुभाषबाबूंचा गौरव सरकारनें लाठीच्या मारानें केला तर कलकत्त्यांतील जनतेनें त्यांचा गौरव त्यांना कलकत्ता शहराचे " मेयर " म्हणून २२ ऑगस्ट १९३० रोजीं निवडून केला. कलकत्ता कॉर्पोरेशनचे ते चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर होते. त्यावेळीं केलेली अविस्मरणीय कामगिरी लक्षांत घेऊन जनतेनें त्यांची निवड केली. दासबाबूंच्या पावलावर पाऊल टाकूनच जणूं कांहीं सुभाष जात होते.

## सुटका, अटक, सुटका

एक वर्षाच्या सक्त मजुरींतून सुभाषबाबूंची सुटका सप्टेंबरमध्यें झाली. यावेळीं ते मेयर म्हणून बाहेर आले होते. त्यांचा कलकत्ता कॉर्पोरेशननें अपूर्व सत्कार केला. यानंतर मेयरच्या कामगिरीला सुरवात त्यांनीं केली. स्वतःच्या आचर-

णानें जनतेचा सेवक ( Public servant ) या शब्दाचा अर्थ लोकांना समजावून दिला.

१९३१ च्या जानेवारींत मध्यप्रांतांत दौरा काढला होता. त्या वेळीं माल्दा जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटनें त्यांना त्या जिल्ह्यांत प्रवेश करण्यास बंदी केली. अर्थात् सुभाषचंद्रांच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें ती बंदी त्यांनीं जुमानली नाहीं आणि त्या त्यांच्या "अन्याय्य" वर्तनाबद्दल मिळालेली सात दिवसांची शिक्षा त्यांनीं भोगली.

## शरिरावर झललेले प्रहार

१९३० सालची अहिंसक क्रांतीची लाट देशभर पसरली होती. अशा वेळीं, अशा क्रांतिकालांत, जनतेच्या अंतःकरणांत उचंबळणाऱ्या भावना अनेक मार्गांनीं प्रकट होत असतात.

१९३१ सालच्या २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं कलकत्त्यांतील जनतेनें एक प्रचंड मिरवणूक काढण्याचें ठरविलें. त्या सहस्रावधि नागरिकांचें नेतृत्व सुभाषबाबूंच्याकडे होतें. एका कॉर्पोरेशनचा मेयर हा स्वातंत्र्याच्या लढ्यांतील अग्रणी असतो हें अपूर्व दृश्य कलकत्त्यांत दिसलें. सरकारला हें दृश्य कसें पाहवणार ? ती मिरवणूक आडवली आणि ती हटविण्यासाठीं लाठीमार केला. सुभाष त्या मिरवणुकीचे 'नेताजी' होते. त्यांच्या शरीरावर लाठ्यांचे प्रहार बसले! अंगाला जखमा झाल्या. सुभाषचंद्रांनीं तें सहन केलें. त्यांच्या अंगावरील जखमा म्हणजे सुवर्णपदकें होतीं. लाला लजपतरायांना नव्हताच कां लाठीमार खावा लागला !) त्यांनीं चिडून उद्गार काढले होते—" ... The blow that was hurled at us this afternoon was a nail in the coffin of the British Empire !" हे खरे झाले नाहींत. कां ? राष्ट्र सुप्त होतें म्हणून. आतां सुभाषबाबूंची पाळी होती ! त्या माराची चौकशी केल्यानंतर सरकारनें उत्तर दिलें—" त्या दिवशीं झालेलें सर्व कांहीं सरकारच्या परवानगीनें होतें."

यानंतर सुभाष बोसांना पकडण्यांत येऊन ६ महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. परतंत्र देशांत जन्म घेणें म्हणजे सक्तमजुरीची शिक्षा असते आणि ती सुभाषबाबू भोगीत होते.

## समेटाचा यत्न

सत्याग्रहाची चळवळ चालू असतां गांधीजींनीं समेटाचा प्रयत्न सुरू केला. त्याला यश येऊन शेवटीं व्हाइसरॉय आयर्विन यांच्याशीं करार केला. स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पणास सिद्ध असलेल्या असंख्य तरुणांच्या अंतःकरणांत गांधीजींच्या या समेटानें कल्लोळ माजला. युद्धोत्सुक तरुणांच्या भावना पंडित जवाहरलालनीं मांडल्या—" ... या कलमानें आमच्या स्वातंत्र्याच्या ध्येयावर बोळा फिरविला नाहीं काय ? येवढ्याच सिद्धीसाठीं आमचे हजारों देशबांधव व देशभगिनी गेलें सबंध वर्ष झुंजारपणें झगडत आले काय ? माझ्या अंतःकरणांतील एकादी मौल्यवान् वस्तूच कोणी हिरावून नेतो असें मला वाटलें ! माझें हृदय रितें रितें झालें ! "

सुभाषबाबूंचें मत याहून निराळें नव्हतें. समेट, साम्राज्यशाहीशीं समेट हे शब्दच त्यांच्या विचारप्रणालींत नव्हते. सर्व आयुष्यांत एकदांहि त्यांनीं समेटाचा प्रयत्न केला नाही. त्यांना एकच शब्द माहीत होता. तो म्हणजे "जंग"—"झुंज !"

## भगतसिंगाच्या क्रांतिज्योतीला प्रणाम

या समेटाचा प्रयत्न चालू असतांना एक प्रचंड लाट हिंदुस्थानांत उसळली—नव्हे ती असंतोषाची ज्वालाच होती ! लाला लजपतरायांच्या मृत्यूनें ज्यांच्या अंतःकरणांत सुरी खुपसल्यासारख्या वेदना झाल्या त्या भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांच्या एका कृत्याबद्दल त्यांना २३ मार्च १९३१ ला रात्रीं आठ वाजतां फांसावर चढविण्यांत आलें. संपूर्ण देश या तीन वीरांनीं हलविला. दुःखाची छाया साऱ्या देशावर पसरली. भारतीयांच्या जिवंतपणाची खूण पटविण्यासाठीं जणूं कांहीं त्या तीन वीरांनीं बलिदान केलें ! सुभाषनीं आपल्या तेजस्वी वृत्तीला अनुरूप असे पुढील उद्गार भगतसिंगाबद्दल काढले—" भगतसिंग हा क्रांतितत्त्वाचा प्रतीक होता. त्यानें सर्व देश आकर्षून घेतला. हें तत्त्व सदैव अजिंक्य आहे. व त्यानें जी ज्योत उत्पन्न केली आहे ती अविनाशी आहे. भारतवर्ष स्वतंत्र होण्यापूर्वीं अशा कित्येक सुपुत्रांना आपले प्राण वेंचावे लागतील ! "

## कराची कॉंग्रेस

आधींच गांधी-आयर्विन करारानें अस्वस्थ झालेला तरुणवर्ग भगतसिंग आदि तरुणांच्या फांशीनें जास्त अस्वस्थ झाला. गांधीजींनीं त्यांचे प्राण वांचवावयाचा

आटोकाट प्रयत्न करावा, किंबहुना त्याशिवाय समेटच करूं नये अशी मागणी सर्वत्र केली जात होती. पण दुर्दैवानें सर्व प्रयत्न अयशस्वी झाले.

त्याच दिवशीं---२३ मार्चला--कराची कॉंग्रेसचें अधिवेशन सुरू व्हावयाचें होतें. कांहीं अत्यंत असंतुष्ट तरुणांनीं गांधीजींना स्टेशनवर काळीं निशाणें दाखविलीं आणि गांधीजींनीं " त्यांचा तो हक्क आहे " असें समजून त्या निशाणांचें स्वागत केलें. भगतसिंगाच्या फांशीची छाया साऱ्या अधिवेशनावर पडली होती आणि त्याचें तें निदर्शन होतें. सुभाषबाबूंना या सर्व असंतुष्ट तरुणांनीं आपला नेता म्हणून निवडलें. नवजवान भारतसभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.

या नवजवान भारतसभेपुढें केलेलें भाषण अत्यंत समतोल बुद्धीनें केलें होतें. कॉंग्रेसशीं शक्यतों जुळतें घेण्याची त्यांची बुद्धि होती. त्या भाषणांत तरुणांच्यासाठीं एक कार्यक्रम मांडला आणि त्याचें समर्थन करतांना ते म्हणाले---" भगतसिंगाच्या फांशीवरून अशी खात्री झाली आहे कीं सरकारच्या अंतःकरणांत किंचित्‌ही बदल झालेला नाहीं व सन्माननीय वाटाघाटींचा काल फार दूर आहे. गांधी-आयर्विन करार अत्यंत असमाधानकारक व फार निराशाजनक आहे. परंतु तो होऊन चुकला आहे. आतां पुढें काय इतकाच प्रश्न आहे. ज्यांनीं हा तह घडवून आणला त्यांच्या देशभक्तीबद्दल मला यत्किंचित्‌हि संशय नाहीं. तेव्हां आतां राष्ट्राच्या मागण्यांना जास्त जोर येईल अशी कामगिरी करणें हेंच उचित आहे. म्हणून मीं कार्यक्रम आंखला आहे. तो माझ्या मताच्या लोकांना मान्य होऊन ते त्याचा प्रचार करतील अशी मला उमेद आहे. कॉंग्रेसशीं तंटा नसावा म्हणून हा मार्ग काढला आहे. कारण आज आपण आपसांत भांडणें केल्यास सरकारचें बळ वाढेल. दुसऱ्यावर टीका करण्याचा प्रसंग आला तरी विवेक सोडतां कामा नये. "

कराचीच्या कॉंग्रेस अधिवेशनांतील प्रमुख ठराव गांधींनी केलेल्या समेटाला मान्यता देण्याचा होता. भगतसिंगाच्या फांशीबद्दलहि एक ठराव करण्यांत आला. त्यांत विशेष एवढाच कीं भगतसिंगाचे वडील या अधिवेशनास आले होते. श्री. राजगुरु यांच्या मातोश्रीहि तेथें आल्या होत्या. आपल्या पुत्राचा झालेला जयजयकार ऐकून त्या मातेच्या अंतःकरणांत समाधान निर्माण झालें

असेल. समेटाच्या ठरावावर बोलतांना सुभाषबाबूंनीं अत्यंत मार्मिक रीतीनें आपलें म्हणणें मांडलें. त्यांचें म्हणणें असें— " कॉंग्रेसमधील विरोधी पक्षाचें तहाच्या बाबतींत काय धोरण आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे. तहांतील अटी असमाधानकारक व निराशाजनक आहेत. परंतु या मुद्यावर कॉंग्रेसमध्यें यावेळीं वाद करून भेद वाढविणें इष्ट नाहीं. लोकांचा सर्वतोपरी विरोध असतांहि कराची कॉंग्रेसच्या सुरुवातीस भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना सरकारनें फांशी लटकावून आपली खरी मनोवृत्ति व्यक्त केली आहे. अशा वेळीं आम्हीं कॉंग्रेसमध्यें दुफळी उत्पन्न केली तर नोकरशाहीनें मोठया कुशलतेनें जो सांपळा लावून ठेवला आहे त्यांत आम्ही सांपडल्यावांचून राहणार नाहीं. लोकांची मागणी असतांहि जें सरकार थोडचा फार फांशीच्या शिक्षा रद्द करीत नाहीं तें सरकार आपल्या हातून सहजासहजीं सत्ता सोडील ही गोष्ट आम्हांला कठिण दिसते. म्हणून पुन्हां लवकरच कॉंग्रेसला आपला झगडा चालवावा लागेल. अशा वेळीं दुफळी होऊं न देतां एकजुटीनें आगामी युद्धाला सज्ज होणें हेंच श्रेयस्कर आहे, व महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं आम्ही पूर्ण स्वातंत्र्य संपादण्यास एक झालों आहोंत ही गोष्ट आम्ही नोकरशाहीला आणि अखिल जगाला जाहीर करीत आहोंत." या तर्कशुद्ध आणि मार्मिक विचारसरणीचा परिणाम तेथील उपसूचना मांडणारांच्या मनावर झाला आणि अनेक उपसूचना मागें घेतल्या गेल्या.. या एकाच भाषणावरून सुभाषबाबूंची कॉंग्रेसमध्यें एकजूट राखण्याची तळमळ दिसून येते. परक्या सत्तेला आपसांतील मतभेदांचा फायदा घेतां येऊं नये हाच त्यांचा उद्देश होता.

१९३१ च्या डिसेंबरमध्यें सुभाषबाबूंनीं सर्व महाराष्ट्रांत दौरा काढला. वांई, सातारा, सोलापूर, पनवेल आदि अनेक गांवांना त्यांनीं भेटी दिल्या. एक प्रकारचा उत्साह संपूर्ण महाराष्ट्रांत त्यांना दिसून आला. पुण्याच्या युवक परिषदेचें अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणांत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा ऊहापोह केला. आणि शेवटीं असें बजावलें कीं " स्वतंत्र हिंदुस्थानजवळ जगाला देण्यासाठीं संदेश आहे! "

## पुनश्च बंदिशाळेंत

१९३२ चा जानेवारी महिना उजाडला. सरकारी दडपशाहीचे दूत म्हणजे सरकारचे वटहुकूम. त्यांचा प्रादुर्भाव देशांत होऊं लागला. त्याला पहिला

वळी पंडित जवाहरलाल यांचा पडलेला होता. त्यांच्यानंतर सरकारचा सदैव पाहुणचार घेणारे सुभाषचंद्र यांचा क्रम होता. पुण्याहून महाराष्ट्रांतील दौरा संपवून ते मुंबईस आले. या दडपशाहीनें त्यांना आनंदच होत होता. कारण दडपशाही जागृतीची जननी आहे, असेंच त्यांना वाटत असावें. मुंबईस गांधीजींना ते भेटले व त्यांनीं बंगालची सर्व परिस्थिति निवेदन केली. त्यांनीं महात्माजींना बहिष्कार सुरू करण्याची विनंति केली. निदान बंगाल प्रांताला तरी तशी परवानगी द्यावी अशी विनंति सुभाषनीं केली. आणि 'त्याबरोबरच त्यांनीं परवानगी दिली नाहीं तर बंगालला आपला मार्ग स्वतंत्रपणें आंखावा लागेल' असें सांगितलें! युद्धासाठीं सदैव तयार असणाऱ्या या तरुण देश-भक्ताची ही गर्जना सरकारनें ऐकली आणि कलकत्त्याच्या वाटेवर असतांना कल्याण येथेंच २ जानेवारी १९३२ रोजीं त्यांना अटक झाली. बंगालच्या स्वतंत्र मार्गाचा हा वाटाडयाच पकडल्यावर बंगाल काय करील अशा कल्पनेनें सरकारनें त्वरा केली. पण ज्वालामुखीचा जर स्फोट व्हायचाच असेल तर तो काय झांकण घालून टळेल?

सुभाषबाबूंना घेऊन आगगाडी वेगानें धांवत होती. कुठें? तें कुणालाच माहीत नव्हतें. शेवटीं शिवणी येथील तुरुंगांत त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. तेथील हवामान त्यांच्या प्रकृतीला झेंपलें नाहीं. तुरुंगांत दररोज ताप येत असे. इतरहि अनेक व्यथा चालूच होत्या. अनेक वेळां सारखा तुरुंगवास भोगावा लागल्यानें त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला होता. ही त्यांची खालावत चाललेली प्रकृति पाहून सर्व जनतेनें सर्व मार्गांनीं सुभाषांच्या सुटकेचे प्रयत्न केले. सरकारचें उत्तर एकच होतें. "सरकार या प्रश्नाची मुळींच उपेक्षा करीत नसून त्यांच्या उत्कृष्ट औषधोपचाराची व्यवस्था सरकारनें ठेवली आहे! आणि इतकी उत्कृष्ट व्यवस्था ठेवूनसुद्धां त्यांची प्रकृति बिघडली तर सरकारला काय दोष?"

त्या सरकारी औषधोपचाराला तोंड देऊन प्रकृति खालावतच होती. क्षयाच्या भयंकर रोगानें त्यांना ग्रासलें.

आतां सरकारला या प्रकरणाचा विचार करणें भागच होतें. शेवटीं सरकारनें सुभाषबाबूंच्यावर निर्बंध घालून त्यांना युरोपला जाण्याची परवानगी दिली. सुभाष-

अनुक्रम

बाबूंच्या मनांत पुन्हां वादळ माजलें. या अटी मान्य कराव्यात? ज्या जीवनाचा उद्देश भारताचें स्वातंत्र्य हा होता त्या जीवनाचा अंत असल्या क्षुल्लक स्वाभिमानानें व्हावा हें मुळींच श्रेयस्कर नाहीं असें अनेक मित्रांनीं त्यांना सांगितलें. शेवटीं त्यांनीं स्नेह्यांच्या या सूचनेला मान्यता दिली. ते म्हणाले—
" युरोपांतील हा माझा प्रवास म्हणजे देशांतून हकालपट्टी केलेल्या गृहस्थाच्या प्रवासाप्रमाणें मला वाटत आहे. मी परदेशीं जाण्यापूर्वी सरकारनें माझी मुक्तता केली नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटतें. कारण ज्या स्नेह्यांना व आप्तेष्टांना मला भेटण्याची उत्सुकता आहे त्यांनाहि मला भेटतां येत नाहीं. मला कपडे-लत्तेहि घेण्यास अवकाश नसल्यानें मला आहे याच वस्त्रानिशीं जाणें भाग पडत आहे! सरकारनें परदेशी जाण्याची मला दिलेली परवानगी एकवार नाकारावी असें मला वाटत होतें. पण मृत्यूच्या भक्ष्यस्थानीं हटकून पडण्यापेक्षां राष्ट्रा-करितां जिवंत राहणें मला बरें वाटेल."

सुभाषबाबूंच्या केलेल्या छळाची माहिती, त्यांना मिळालेल्या वागणुकीचें वृत्त खचित माणुसकीला लाजविणारें आहे. त्यांच्या भावजयीलासुद्धां भेटण्याची परवानगी सरकारनें नाकारली यापेक्षां दयार्द्र वागणुकीचें कुठलें उदाहरण सांपडेल? शेवटीं स्ट्रेचरवरून सुभाषना बोटीवर चढविण्यांत आलें. राष्ट्रासाठीं राख फांसून तयार झालेला हा योगी परदेशांत आपल्या देशाची करुणाजनक स्थिति सांगण्या-साठीं चालला होता. जातांना देशबांधवांच्यासाठीं त्यांनीं पुढील संदेश दिला—
" मातृभूमींतून हद्दपार झालेला व रुग्णशय्येवर असलेला असा मी आहें तरीहि आज स्वतंत्र झालों आहे. व म्हणून आतां हिंदुस्थानांतील तुरुंगांत अगर तुरुंगाबाहेर असलेल्या देशबांधवांच्या खडतर त्यागाला व तपश्चर्येला पूज्यबुद्धीनें मी प्रेमपूर्वक वंदन करीत आहें!

माझ्या सहकारी मित्रांना मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या सत्कार्याला लागा व या कार्याची ध्वजा फडकत ठेवा. सर्व जगाची आपल्या कार्याला सहानुभूति आहे. हें लक्षांत ठेवा कीं शेवटीं सत्का-र्याचाच विजय होतो. माझी अशी श्रद्धा आहे कीं, राष्ट्राच्या संकटाची मध्यरात्र उलटून गेली असून स्वातंत्र्याची प्रत्यक्ष पहाट दिसूं लागली आहे!"

म. ग्रं. सं. ठाणे,
नों दि.
क्र.
दि.

# युरोपांत भारताचा जयजयकार

६

सुभाषबाबूंचें आयुष्य गूढ (Mystic) आहे. त्यांच्या आयुष्यांतील अनेक घटनांचा अन्वयार्थ अद्यापि लागावयाचा आहे. क्रांतिकारक प्रवृत्तीच्या पुरुषाचें आयुष्य असें चमत्कृतिपूर्ण असतें. बाहेरून हिरवळीनें सुंदर दिसणाऱ्या पर्वताच्या अंतरंगांत अग्नि धुमसत असतो हा जसा निसर्गाचा नियम तसाच नियम सुभाषबाबूंसारख्या महापुरुषाच्या आयुष्याला आहे. ज्यांचें स्वातंत्र्य हें एकच जीवनध्येय असतें, ज्यांना स्वप्नें पडतात तींसुद्धां ध्येयसिद्धीचींच पडतात. त्यांच्या आयुष्यांतील प्रत्येक घटना, त्यांनीं केलेलें प्रत्येक कृत्य त्याच एकमेव ध्येयाच्या सिद्धीसाठीं असणार हें काय निराळें सांगण्याची जरूर आहे? म्हणूनच सुभाषबाबूंनीं १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपांत केलेलें वास्तव्य हें जरी आजपर्यंत "विश्रांतीसाठीं" म्हणून समजलें जात होतें तरी आतां त्याच्यावर प्रकाश पडला आहे. त्यांनीं युरोपांत वास्तव्य केलें; परंतु त्यांत त्यांनीं सृष्टिसौंदर्य पाहिलें नाहीं; विहार केला नाहीं; विलास केला नाहीं. एकच गोष्ट सातत्यानें अहर्निशपणें केली. भविष्याचा वेध घेऊन त्यांनीं एकाद्या महान् द्रष्ट्याप्रमाणें भारतीय क्रांतीचीं बीजें त्याच कालांत पेरून ठेवलीं. तीं कालक्रमानंतर फोंफावलीं, त्यांतून एक महान् झंझावात निर्माण झाला! त्याचें नांव "आझाद हिंद फौज!" आयुष्याचें त्यांचें प्रथमश्रेणीचें स्वप्न सिद्ध झालें. तेव्हां लोकांनीं विचार करण्यास सुरुवात केली कीं हें असें कसें झालें? या त्यांच्या प्रश्नाचें उत्तर सुभाषबाबूंनीं एका लेखांत—आझाद हिंद फौजेची स्थापना केल्यानंतर लिहिलेल्या लेखांत दिलें आहे. ते म्हणतात—"युरोपांत जाण्याचा माझा उद्देश तेथील परिस्थितीचा अभ्यास करावा आणि जवळच्या काळांत काय

घटना घडून येऊं पहात आहेत त्या जाणून घ्याव्यात हाच होता. या माझ्या मुक्कामांत मीं बर्लिनला भेट दिली आणि कांहीं सरकारी अधिकारी व फ्युरर हिटलर यांचीहि गांठ घेण्याचा मोका साधला आणि त्यांना सरळच प्रश्न विचारला कीं, तुम्ही युद्ध कधीं करणार आहां ? ”

या एकाच वाक्यासाठीं युरोपांत त्यांचें वास्तव्य होतें. सरकारला सुभाषबाबू हिंदुस्थानांत नको होते. म्हणून त्यांना परदेशांत पाठविलें. अनेक बंधनें घातलीं. पण काय आश्चर्य ? या सर्वांना तोंड देऊन सुभाषबाबूंनीं आंतरराष्ट्रीय संबंधांचें एक जाळें विणलें आणि तेंही मोठ्या कौशल्यानें. भर्तृहरीनें म्हटलें आहे कीं, “ ब्रह्मदेव हंसावर अत्यंत कोपला तरी त्याचें तो काय करणार ! फार झालें तर तो त्याचें कमलिनीच्या वनांतील विलास नाहींसे करील. परंतु दूध व पाणी यांतील निवड करण्याविषयींच्या चातुर्याची त्याची सार्वत्रिक कीर्ति हरण करण्यास तो समर्थ नाहीं ! ” तीच स्थिति सरकारची झाली. सुभाषबाबूंवर शारीरिक बंधनें घातलीं, पण त्यांच्या ईश्वरदत्त महान् कर्तृत्वाला कोणीहि बंधन घालूं शकला नाहीं.

## वैचारिक आंदोलन

हिंदुस्थान सोडल्यानंतर प्रथम सुभाषबाबू व्हिएन्ना येथें गेले. त्यांना सरकारनें प्रवास करण्याची पूर्ण मुभा दिली नसल्याकारणानें कांहीं दिवस त्यांनीं विश्रांति घेतली. सुविख्यात हिंदी पुढारी विठ्ठलभाई पटेल हे त्याठिकाणीं प्रकृति-स्वास्थ्यासाठीं गेले होते. त्यांची नि सुभाषचंद्रांची गांठ पडली.

सुभाष हिंदुस्थानांतून गेल्यानंतर १९३३ सालीं हिंदुस्थानांत महत्त्वाच्या घटना घडत होत्या. गांधीजी सरकारशीं वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करीत आहेत असें वृत्त युरोपमध्यें त्यांना कळलें. कधींहि तडजोड न करण्याची वृत्ति असलेल्या सुभाषना या बातमीनें चैन कसें पडणार ? त्यांना असें वाटूं लागलें कीं कँग्रेसमधील वृद्ध नेते आतां लढा पुढें चालविण्यास टाळाटाळी करत आहेत.

त्यावेळीं ते ऑस्ट्रियांत होते. त्यांनीं तेथील परिस्थितीचें अवलोकन सुरू केलें आणि त्यांना असें आढळून आलें कीं, “ आर्थिक व राजकीय दृष्ट्या पाहिलें तर आजचा युरोप अस्थिरावस्थेंत आहे.” युरोपांत त्यावेळीं अनेक युवकसंघटनांच्या चळवळी चालू होत्या. सुभाषना अत्यंत प्रिय असलेलें कार्य म्हणजे युवकसंघट-नेचें होतें. त्यांचा असा विश्वास होता कीं स्वातंत्र्याचें निशाण तरुणांनीं हातांत

घेतल्याविना देश स्वतंत्र होणार नाहीं. "तरुणांची शक्ति ही सुप्त ज्वालामुखीसारखी असते. ती जोंपर्यंत सुप्त असते तोंपर्यंत परकीयांचें जीवन सुरक्षित असतें." सुभाषबाबूंच्या डोळ्यांसमोर पाश्चात्य देशांतील राष्ट्रांच्या संरक्षणासाठीं सज्ज झालेलीं सशस्त्र युवकांचीं पथकें होतीं. या सर्व दृश्यांमुळें त्यांच्या मनांत गांधीजींच्या नेतृत्वासंबंधीं विरोधी विचार निर्माण होत चालले. याचा स्फोट गांधीजींनीं चळवळ थांबवल्यानंतर सुभाषनीं जें पत्रक काढलें त्यांत झालेला दिसून येतो. गांधीजींच्या धोरणाविषयीं विरोधी भूमिका मांडणारें हें त्यांचें पहिलेंच पत्रक असें म्हणण्यास हरकत नाहीं.—"गांधीजींनीं नुकतीच केलेली सत्याग्रहाची तहकुबी म्हणजे स्वतःच्या पराभवाची कबुली आहे. आमचें असें स्पष्ट मत झालें आहे कीं राजकीय पुढारी या दृष्टीनें गांधीजी अयशस्वी झाले आहेत. तेव्हां आतां अशी वेळ आली आहे, कीं नव्या पद्धतीनें, नव्या तत्त्वांवर काँग्रेसची पुनर्घटना करणें अवश्य आहे. त्यासाठीं नवें नेतृत्व शोधलें पाहिजे. कारण गांधीजींच्या तत्त्वाविरुद्ध असलेला कार्यक्रम ते पार पाडतील हें शक्य नाहीं. सर्वच काँग्रेसची जर या नवीन दृष्टिकोनांतून पुनर्घटना झाली तर तें अत्युत्तम. परंतु तें शक्य न झाल्यास काँग्रेसमध्येंच राहून क्रांतिकारक तत्त्वावर अधिष्ठित झालेला नवा पक्ष काढणें जरूर पडेल."

हा एक महत्त्वाचा वैचारिक बदल व्हिएन्ना येथील त्यांच्या वास्तव्यांत झाला. किंबहुना यानंतर ते गांधीजींच्या विचारसरणीशीं एकरूप होऊं शकले नाहींत. नवा पक्ष काढण्याचा त्यांचा विचार दृढ होत चालला होता. जुनें यंत्र निकामी होत असेल तर नवीन निर्माण केलें पाहिजे म्हणून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठीं तयार होणाऱ्या जहाल मतवादी लोकांचा एक प्रभावी गट निर्माण झाल्याखेरीज स्वातंत्र्याचा लढा जोरदार होणार नाहीं.

## परराष्ट्रीय प्रचाराचा निश्चय

विठ्ठलभाई पटेल यांच्यासारख्या महनीय देशभक्ताचा सहवास सुभाषबाबूंना मिळाला. विठ्ठलभाईंच्या मनांत परदेशांत राहून तेथें हिंदुस्थानचा प्रचार करावयाचा असें आलें. आजच्या काळांत परतंत्र राष्ट्राचें इतर स्वतंत्र राष्ट्रांशीं संबंध दृढ झाले पाहिजेत. परतंत्र राष्ट्राच्या लढ्याला एक उदात्त भूमिका असते आणि म्हणूनच परराष्ट्रांची सहानुभूति त्या लढ्याला मिळावी या दृष्टीनें सुभाषबाबू आणि विठ्ठलभाई यांनीं प्रयत्न करण्याचें ठरविलें. विठ्ठलभाईंनीं आपले हजारों

रुपये या प्रचारकार्यासाठीं देण्याचें ठरविलें आणि सुभापना त्याचे प्रमुख नेमले. ते युरोपांत असेपर्यंत भारताचें नांव चांगलेंच गाजलें. सुभाषबाबूंच्यासारखा उच्च कर्तृत्वाचा, तीक्ष्ण बुद्धीचा परराष्ट्रीय प्रचारक मिळाल्यावर तें तसें होणें साहजिकच होतें.

सुभाषबाबूंना इंग्लंडला जाण्याची परवानगी नव्हती. परंतु लंडन येथें भरणाऱ्या हिंदी लोकांच्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची त्यांना विनंति करण्यांत आली. ब्रिटिश सरकारनें अर्थातच असा ' भयंकर मनुष्य ' चार पावलें दूरच असावा या हेतूनेंच कीं काय त्यांना इंग्लंडमध्यें येण्यास बंदी केली. तरीसुद्धां सुभाषबाबूंनीं आपलें अध्यक्षीय भाषण पाठविलें. तें पुढें जप्त करण्यांत आलें. त्यांत ते म्हणतात--" राजकीय संग्राम या दृष्टीनें कॉंग्रेसच्या कामाकडे पाहिलें तर असें म्हणावें लागतें कीं कॉंग्रेसनें धड चढाईचें धोरण चालविलें नाहीं व धड मुत्सद्देगिरीचें धोरणहि स्वीकारलें नाहीं. दीड महिना कायदेभंग थांबविल्यानें गेल्या तेरा वर्षांतील कामावर व त्यागावर बोळा फिरविण्यासारखें झालें आहे. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यांत तडजोड होणें अशक्य आहे." मधून मधून तडजोड करण्याची वृत्ति सोडून द्या. असा उपदेश करून पुढील स्वातंत्र्ययुद्धास सज्ज राहाण्याचा इषारा त्यांनीं दिला व असें बजावलें कीं--" या युद्धाची बौद्धिक व व्यावहारिक तयारी शास्त्रशुद्ध झाली पाहिजे. तो आधार आध्यात्मिक नसून भौतिक पाहिजे."

## साम्यवादी संघाचा पुरस्कार

सुभाषबाबूंच्या मनांत नवा पक्ष काढण्याचें घोळत होतें. तेव्हां त्या पक्षाची विचारप्रणालि त्यांनीं निश्चित केली आणि त्या विचारप्रणालीचा पुरस्कार त्यांनीं लंडन येथील परिषदेच्या भाषणांतच केला. युरोपमध्यें त्यावेळीं दोन मतप्रवाह प्रामुख्यानें होते : कम्युनिझम आणि फॅसिझम. सुभाषबाबूंच्या मनावर फॅसिस्टांच्या उत्कृष्ट संघटनेचा परिणाम झाला होता आणि कम्युनिझमनें मान्य केलेलीं समाजरचनेचीं मूलतत्त्वें त्यांना मान्य होतीं. त्यामुळें कुठल्याहि एका विचारसरणीला संपूर्णपणें मान्यता त्यांना द्यावयाची नव्हती. फॅसिझम आणि कम्युनिझम या दोन विचारप्रवाहांतील चांगलीं तत्त्वें एकत्र करून त्यांतील साम्य शोधून त्यांनीं एक योजना, मतप्रणालि तयार केली.

हिंदुस्थान हा एक पुरातन संस्कृति असलेला देश आहे. उच्च तत्त्वज्ञान आणि उदात्त विचार हा हिंदुस्थानचा प्रमुख गुण आहे, हें सुभाषबाबूंनीं ओळखलें होतें. किंबहुना भारतीय श्रेष्ठत्वाची महति त्यांना पटली होती. म्हणून जगांत प्रचलित असलेलें कुठलेंहि तत्त्वज्ञान स्वीकारतांना हिंदुस्थाननें विसरतां कामा नये कीं त्याच्याजवळ अशी उच्च विचारसरणी आहे कीं जी सर्व जगानें मान्य करावी. या मुद्याचें स्पष्टीकरण करतांना सुभाष म्हणतात—“ साम्यवाद हा भारतीय संस्कृती-इतकाच पुरातन आहे; आणि साम्यवादी संघाची कल्पना निदान बौद्धधर्माच्या वेळेपासून चालत आली आहे. या संघानें असा विश्वास बाळगला पाहिजे कीं, आर्थिक व सामाजिक बाबतींत आपला आर्यावर्त अखिल जगाला नवे पाठ देणार आहे. सतराव्या शतकांत इंग्लंडनें पार्लमेन्टरी राजसत्तेची कल्पना जगाला दिली. अठराव्या शतकांत फ्रान्सनें स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचें दान केलें. एकोणिसाव्या शतकांत अमेरिकेनें लोकशाहीचें ध्येय पुढें ठेविलें आणि विसाव्या शतकांत रशियानें सामान्य जनतेला नवीन संदेश दिला. आतां हिंदुस्थानची पाळी आली आहे. त्यानें मानवी प्रगतीचा रथ पुढें नेला पाहिजे. या नव्या संघानें सर्व राष्ट्र संघटित केलें पाहिजे, स्वातंत्र्यप्राप्ति होईपर्यंत लढा चालविला पाहिजे. आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची घडी बसविली पाहिजे. अशा संघासाठीं तरुण पिढी उत्सुक झाली आहे. आणि असा संघ हिंदुस्थानला स्वातंत्र्य-संपन्न आणि वैभवसंपन्न केल्याखेरीज राहाणार नाहीं ! ” संपूर्णतया राष्ट्रीय दृष्टि-कोनांतून हे विचार सुभाषनीं पुरस्कारले. हिंदुस्थान हें त्यांचें दैवत होतें. कम्युनिझम आणि फॅसिझम यांत समन्वय करून त्यांनीं दहा कलमी कार्यक्रम तयार केला. या त्यांच्या विचारसरणीवर अनेकांनीं टीका केली. कम्युनिझम व फॅसिझम यांत साम्य असूं शकत नाहीं, ह्या दोन परस्परविरोधी मतप्रणालि आहेत, असें टीकाकारांचें मत होतें. सुभाषबाबूंनीं जिनिव्हाहून एक पत्रक काढून पुन्हां आपल्या मतांचें स्पष्टीकरण केलें—“ युरोपांत आल्यापासून माझी अशी खात्री झाली आहे कीं, परदेशांत चाललेल्या अनेक चळवळींचा हिंदुस्थाननें अभ्यास केला पाहिजे. आणि आपल्या भूतकालीन परंपरेला नि इतिहासाला अनुरूप असा आपल्या प्रगतीचा मार्ग भविष्यकालाच्या व वर्तमानकालाच्या गरजांसाठीं शोधून काढला पाहिजे. हिंदुस्थान हा बुद्धीच्या दृष्टीनें पुढारलेला असा एकटाच देश शतकानुशतकें होता. तेव्हां आतां त्यानें इतर देशांशीं सहानुभूतीनें परंतु काटेकोरपणानें वागलें पाहिजे.

हिंदुस्थाननें हें आपलें अंतर्गत आणि परदेशीय धोरण स्पष्टपणें आतांच ठरविलें पाहिजे. अंतर्गत धोरण ठरवितांना हिंदुस्थानला कम्युनिझम किंवा फॅसिझम यांपैकीं कोणत्या तरी एकाचा स्वीकार केला पाहिजे असें म्हणणें म्हणजे ती एक गंभीर चूक आहे. मानवी बुद्धीच्या दृष्टीनें कोठलीच तत्त्वप्रणालि वा धोरण हें अंतिम होऊं शकत नाहीं. आज निर्माण झालेलें आधुनिक राष्ट्रांचें सामाजिक नि राजकीय तत्त्वज्ञान हें त्यांच्या गतेतिहासाचें, त्यांच्या गरजांचें नि तेथील वातावरणाचें फल आहे. मानवी आयुष्याप्रमाणें त्यांतहि स्थित्यंतरें होण्याचा संभव आहे. आणि त्याहिपेक्षां हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, त्यांतील अनेक संस्था आज प्रयोगावस्थेंत आहेत. त्या संपूर्णपणें यशस्वी होण्यास अद्यापि अवकाश आहे नि तोंपर्यंत आपण आपली बुद्धि गहाण ठेवतां कामा नये. मला नेहमीं असें वाटतें कीं, आज जगांत चाललेल्या अनेक चळवळींपासून हिंदुस्थाननें आपल्याला उपयुक्त असलेलीं अशीं चांगलीं तत्त्वें आचरणासाठीं निवडावींत. म्हणूनच युरोप–अमेरिकेंतील सर्व चळवळींचा टीकात्मक अभ्यास आज अवश्य आहे!"

## विठ्ठलभाईंचा मृत्यु

सुभाष युरोपमध्यें गेल्यानंतरच विठ्ठलभाईंचा सहवास त्यांना मिळाला. दोघेहि ज्वलन्त देशभक्त आणि सर्वसाधारण एका मताचे होते. विठ्ठलभाईंचा विश्वास सुभाषनीं इतका संपादन केला कीं परराष्ट्रीय प्रचारासाठीं दिलेल्या रकमेचे विश्वस्त म्हणून सुभाषबाबूंना त्यांनीं नेमलें. परंतु सुभाषबाबूंच्याच सहकाऱ्यांचा त्यांच्यावर याबद्दल पुढें विश्वास बसला नाहीं हें निराळें! सुभाषनीं विठ्ठलभाईंची खूप शुश्रूषा केली. ती इतकी की त्यांची स्वतःची प्रकृति त्यामुळें बिघडली. १९३४ मध्यें शरपंजरीं पडलेला देशभक्त आपल्या दृष्टीआड असलेल्या थोर देशाचें चिंतन करीत मरण पावला. सुभाष त्यांचा मृत देह घेऊन मार्सेलिसपर्यंत गेले.

## मुसोलिनीशीं हितगूज

लष्करी पद्धतीनें उभारलेली ध्येयनिष्ठ तरुणांची संघटना हें परतंत्र देशाच्या उद्धाराचें एक साधन आहे हें तत्त्व सुभाषबाबूंच्या अंतःकरणांत ठाम केव्हां झालें असेल तर तें त्यांनीं रोम येथें केलेल्या वास्तव्यांत. साम्यवादी संघाची जी

त्यांची कल्पना होती आणि त्यांत जो फॅसिझमला अनुकूल असा भाग आला होता त्यावरून त्यांना फॅसिझममध्यें असणाऱ्या कांहीं गुणांबद्दल आदर होता हें स्पष्ट आहे. मुसोलिनीची त्यांनीं भेट घेतली. शेंकडों तरुणांची अभेद्य संघटना त्यांनीं निर्माण केली असल्यानें सुभाषबाबूंनीं त्याच्याशीं बरीच चर्चा केली. त्यानंतर त्यांच्या मनाची अशी खात्री झाली कीं शिस्तबद्ध युवकांची संघटना करण्याचें तंत्र फॅसिझमपासून शिकण्यासारखें आहे. या गोष्टीचा त्यांनीं निःशंकपणें पुरस्कार केला. पुढें हरिपुरा कॉंग्रेसच्या भाषणांत त्यांनीं याचा उल्लेख केला आहेच.

याचवेळीं आशियांतील विद्यार्थ्यांच्या संमेलनाला ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यांना उत्कृष्ट विद्यार्थी होण्याचा संदेश सुभाषनीं दिला.

## बाल्कन राष्ट्रांना भेटी

सुभाषबाबूंनीं ज्यावेळीं या राष्ट्रांना भेटी दिल्या तेव्हां तेथील जनतेनें त्यांचें अपूर्व स्वागत केलें आणि सुभाषनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न त्यांचेपुढें मांडला. याहीपेक्षां सुभाषनीं काय केलें असेल तर तें म्हणजे तेथील परिस्थितीचें निरीक्षण. कुठल्याहि राष्ट्राचा स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास हा परतंत्र देशाला मार्ग दाखविणारा असतो. झेकोस्लाव्हाकियांतील झेक पुढाऱ्यांनीं देशाबाहेर पडून, ज्या ऑस्ट्रिया व हंगेरीच्या टाचेखालीं ते चिरडले जात होते त्यांच्या शत्रूंचें सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. जे झेक लोक देशाबाहेर होते त्यांच्यांत झेक राष्ट्राविषयीं निष्ठा उत्पन्न करून त्यांचें एक प्रचंड, प्रबल सैन्य निर्माण केलें नि परकीयांच्या सहाय्यानें ऑस्ट्रियाच्या जुलमी सत्तेशीं सामना दिला. त्या झेक राष्ट्राच्या सुदैवानें या त्यांच्या प्रयत्नाला यश मिळालें आणि तें राष्ट्र स्वायत्त झालें. सुभाषबाबूंनीं केलेला "आझाद हिंद फौजे"चा प्रयोग याच धर्तीवर नव्हता काय ? याच दृष्टीनें झेक राष्ट्रांनीं जो स्वातंत्र्याचा एक मार्ग शोधून काढला तो मार्ग त्यांना अनुकरणीय वाटला. याला म्हणतात द्रष्टा नि स्थिरबुद्धीचा पुरुष !

## परदेशांतील हिडीस प्रचार

सुभाषबाबूंनीं युरोपांतील वास्तव्यांतहि कुठलें महत्त्वाचें कार्य केलें असेल तर तें म्हणजे परदेशांत होणाऱ्या अपप्रचाराला उत्तर देण्याचें. गुलाम राष्ट्र म्हटलें कीं

त्याचा अवमान, अवहेलना कोणीहि करावी. मानेवर पारतंत्र्याचें जूं आणि पाठीवर निंदेचे, अपमानाचे चाबूक अशा दुहेरी दुःखांत तें राष्ट्र असतें. सुभाषनीं मोठ्या धैर्यानें या प्रचाराला तोंड देण्याचें ठरविलें.

" जेणेंकरून हिंदुस्थान देश हा एक दरिद्री, असंस्कृत लोकांचा देश आहे असें सिद्ध होईल असे सर्व प्रयत्न केले जात. मग कोणी लिहीत असे कीं हिंदुस्थानांत विधवा स्त्रियांना जाळतात, तेथील लोकांना कपडे घालण्याचीमुद्धां माहिती नाहीं, तेथील अर्धनग्न व घाणेरड्या स्त्रियांचीं छायाचित्रें द्यावींत असे निर्लज्जपणाचे प्रचाराचे प्रकार युरोपमध्यें सुरू होते. आजपर्यंत एकाहि देशभक्ताला ही देशाची बदनामी बंद करण्याचें सुचलें नाहीं. सुभाषबाबूंनीं त्यांत जातीनें लक्ष घातलें आणि हा घाणेरडा प्रकार थांबविला. ही त्यांची अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे. राष्ट्रीय स्वाभिमान दुखविणारी कुठलीहि गोष्ट सहन केली जातां कामा नये तर तें राष्ट्र जिवंत आहे असें समजलें जातें.

## वडिलांच्या भेटीसाठीं

सुभाषबाबूंचा युरोपसंचार चालू असतांनाच त्यांना अकस्मात् त्यांच्या आईची तार आली कीं, जानकीनाथ फार आजारी आहेत. ती तार आल्याबरोबर विमानानें सुभाष हिंदुस्थानांत येण्यासाठीं निघाले आणि अर्थात्‌च सरकारची " कृपा " सुभाषवर झालीच. विमानांतून उतरल्यावर थेट आपल्या घरीं जावें, घरांतून बाहेर जाऊं नये, घरांत राहणाऱ्या माणसांशींच बोलावें इत्यादि अपमानकारक अटी त्यांच्यावर लादण्यांत आल्या. हिंदुस्थानांत पाऊल टाकतांच त्यांच्या वृद्ध वडिलांच्या मृत्यूची क्रूर बातमी त्यांनीं ऐकली. हृदयाचा लचकाच तोडावा अशी त्यांची स्थिति झाली. पण पुन्हां एकदां ती लहानपणीं मनावर बिंबविलेली संथा मनाला दिली—" दुःखेषु अनुद्विग्नमनः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीः मुनिरुच्यते ॥

सरकारच्या आज्ञेप्रमाणें नव्हे तरी निदान प्रकृति जास्त सुधारण्यासाठीं तरी जाणें आवश्यक होतें म्हणून दि. १० जानेवारी १९३५ या दिवशीं पुन्हां युरोपच्या बोटीवर पाय ठेवला. जातांना हिंदुस्थानसाठीं पुढील तेजस्वी संदेश दिला : " सध्यां हिंदुस्थानवर राजकीय शैथिल्याची छाया पडली आहे. ती घालवून देशभर चैतन्य पसरविणें हें महत्त्वाचें कर्तव्य होय......काँग्रेसनें घटना समितीची कल्पना पुढें

मांडली आहे, पण तिच्यापासून कांहीं फलप्राप्ति होईल असें वाटत नाहीं. हिंदुस्थानची राज्यघटना तयार करण्याचा खरा अधिकार फक्त स्वातंत्र्यवीरांनाच आहे. काँग्रेसनें आपला मार्ग एकाकी स्थितींत आक्रमण केला तरी तो मला चालेल. मला ऐक्य हवें आहे, पण तें राष्ट्रीय बुद्धीवर आधारलेलें असें पाहिजे. आपल्या चळवळीला कितीहि ओहोटी लागलेली असली तरी शेवटीं जय आपलाच होईल अशी खात्री वाटते. मी पूर्ण आशावादी आहें !"

सुभाषबाबूंची ही दुसरी सफर पहिल्यापेक्षां जास्त उपयोगी झाली.

## डी व्हॅलेरा आणि सुभाष

सुभाषबाबूंनीं युरोपांत गेल्यावर प्रथम पोटाचें ऑपरेशन करून घेतलें आणि प्रकृतिस्वास्थ्यासाठीं कांहीं दिवस विश्रांति घेतली. ती विश्रांति काम करूनच होती. अपप्रचाराचा समाचार घेण्यासाठीं फ्रान्समध्यें जहाल व सोशॅलिस्ट लोकांची एक संस्था स्थापन करण्यांत आली होती. या संस्थेनें वर्तमानपत्रांतून हिंदुस्थानची खरी माहिती प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. त्याचें नेतृत्व मारो नॉक्स व अँड्रे गाइड या दोन युरोपियन विद्वानांवर सुभाषनीं सोंपविलें ही विशेष आश्चर्याची गोष्ट आहे.

याहीपेक्षां महत्त्वाची घटना म्हणजे सुभाषनीं आयर्लंडचे स्वातंत्र्यवीर डी व्हॅलेरा यांची घेतलेली भेट. आयर्लंड नि हिंदुस्थान हीं ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं असलेलीं स्वातंत्र्योत्सुक राष्ट्रें असल्यानें एका दृष्टीनें दोघांना परस्परांबद्दल सहानुभूति वाटणें साहजिकच आहे. त्याच दृष्टीनें सुभाषनीं डी व्हॅलेरांचे जवळ अनेक गोष्टींची चर्चा केली. हिंदुस्थानला आयर्लंडच्या स्वातंत्र्ययुद्धांतून पुष्कळ शिकण्यासारखें आहे अशी सुभाषांची खात्री होती. म्हणून त्या दृष्टीनें हा संबंध त्यांनीं या वेळीं जोडला. सुभाषबाबूंनीं आपलें " इंडियन स्ट्रगल " हें पुस्तक भेट म्हणून डी व्हॅलेरा यांना पाठविलें होतें, त्याबद्दल आभार मानतांना डी व्हॅलेरांनीं पुढील सदिच्छा व्यक्त केली—" तुमच्या आजाराबद्दल वाईट वाटतें. हिंदुस्थान स्वतंत्र व सुखी व्हावा अशी माझी इच्छा आहे ! "

या वेळीं संपादन केलेल्या सहानुभूतीचा उपयोग सुभाषबाबूंना " आझाद हिंद फौजे "च्या प्रयत्नांतहि झाला. आर्थिक मदत डी व्हॅलेरांनीं सुभाषबाबूंना दिली. सुभाषनीं आयर्लंडमधील भेटींत इतर अनेक प्रश्नांची माहिती करून घेतली.

सिनफेन पक्षाची प्रखर संघटना, तेथील शिक्षण व्यवस्था आदींची पाहाणी करून घेतली. सुभाषबाबूंच्या विचारप्रणालीवर आयर्लंडच्या विचारसरणीची दृढ छाप पडली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## सरकारी आरोप

सुभाषबाबूंच्यावर सरकारचे फार गंभीर आरोप होते. सुभाष म्हणजे एक भयंकर इसम आहेत असा सरकारचा समज होता. वरून जरी ते कांहीं विशेष करीत नसतांना दिसत असले तरी त्यांचा संबंध गुप्त क्रांतिकारकांशीं आहे. १९३३ च्या मार्चमध्यें असेंब्लींत जीं प्रश्नोत्तरें सुभाषबाबूंच्या सुटकेविषयीं झालीं त्यावेळीं गृहमंत्र्यांनीं अनेक आरोप सुभाषबाबूंच्यावर केले. १९३१-३२ च्या सुमारास आणि त्यानंतर जीं कृत्यें क्रांतिकारकांनीं केलीं त्या सर्वांचा संबंध सुभाषबाबूंशीं आहे असें सरकारचें म्हणणें होतें. अनुशीलन समिति, युगांतर समिति इत्यादि क्रांतिकारकांच्या ज्या संघटना होत्या त्यांचे प्रमुख सुभाषबाबूच होते. किंवा ते क्रांतिकारक सुभाषबाबूंचे अनुयायी होते, असें सरकारचें म्हणणें! इतकेंच नव्हे तर सरकारनें सुभाषचंद्रांच्या युरोपांतील वास्तव्याविषयीं संशय व्यक्त करतांना असें म्हटलें होतें,—" We know that the person concerned, Mr. Subhas Chandra Bose, has been writing letters, sending messages and giving directions from Europe every week" [ आम्हांला हें माहीत आहे कीं, सुभाषबाबू हे दर आठवड्याला युरोपमधून पत्रें पाठवून, निरोप पाठवून ( क्रांतिकारकांना ) सूचना देतात.* ] असे लागोपाठ अनेक आरोप सरकारी अधिकाऱ्यांनीं केल्यामुळें सुभाषबाबूंना हिंदुस्थानांत येण्यास परवानगी मिळेना.

सरकारी अधिकाऱ्यांनीं सुभाषबाबूंच्याविषयी संशय घ्यावा यांत आश्चर्य कांहीं नाहीं. परंतु श्री. कृष्णदास नांवाच्या एका इसमानें गांधीजींना पत्र लिहून सुभाषबाबू हे अनुशीलन समितीचे हस्तक आहेत असा शोध कळविला! त्यानें कळविलें नसतें तर केवढा भयंकर उत्पात झाला असता! सरकारलाहि हेंच पाहिजे होतें—कारण आतां " तुमचाच मनुष्य पहा काय म्हणतो आहे!" असें सरकारला विचारतां आलें.

शेवटीं सुभाषबाबूंच्या हिंदुस्थानांत येण्याबद्दल विधिमंडळांत सारखे प्रश्न विचारले गेल्यावर मि. क्रेक यांनीं जें उत्तर दिलें तें फार महत्त्वाचें आहे. ते म्हणाले,

* लढाऊ राजकारण पृ. ७२.

" सुभाषबाबू हिंदुस्थानांत आले तर राज्याला धोका पोहोंचेल अशाबद्दल आमचे-जवळ पुरावा आहे ! " यावर भाष्य करतांना असे उद्गार काढले गेले कीं, सुभाषबाबू हे बुद्धिवान् व संघटनाकुशल आहेत ! ते असहकारितेच्या चळवळींत पडले तेहि क्रांतिकारक चळवळ करण्यासाठींच !

तेव्हां हें आतां निश्चित झालें होतें कीं, सुभाषबाबूंना हिंदुस्थानांत येण्यास सरकार परवानगी देणार नाहीं. कुठलें चांगलें सरकार अशा भयंकर ( ? ) माण-साला स्वदेशीं येण्यास परवानगी देईल ?

## ने मजसी ने परत मातृभूमीला

लखनौ कॉंग्रेसचें अधिवेशन जवळ येत होतें. त्या अधिवेशनाला सुभाषचंद्रांनीं यावें अशी सर्व भारतीयांची इच्छा होती. सुभाषबाबूंच्या अंतःकरणांत आतां पुन्हां मातृभूमीच्या दर्शनाची इच्छा निर्माण झाली होती. सरकारनें परवानगी नाकारल्यावर सुभाषबाबूंनीं आपण निश्चितपणें हिंदुस्थानांत परत जाणार आहोंत असा निर्धार सरकारला कळविला. हिंदुस्थानांतील एका मित्राला पत्र लिहून आपले विचार त्यांनीं स्पष्ट केले—" माझ्या वैयक्तिक सुखसोयीच्या दृष्टीनें मी या प्रश्नाकडे पाहात नाहीं. माझें काय व्हायचें असेल तें होईल. युरोपांत राहून यापुढें माझें कार्य चालवितां येईल असें वाटत नाहीं. येथें कार्य करण्यास भरपूर पैसा पाहिजे व राष्ट्रसभेसारख्या संस्थेचा पाठिंबा पाहिजे. पटेल यांच्या ट्रस्टींनीं विनाकारण अडविल्यानें तो पैसा मिळत नाहीं व राष्ट्रसभेच्या वर्किंग कमिटीनें मला प्रतिनिधित्व देण्याचें नाकारलें. अशा परिस्थितींत माझें कार्य संपलें असें मी समजतों—

...सध्यांचा सरकारचा हुकूम विलक्षण आहे. मी पुढें अमूक अमूक करीन म्हणून ते मला अटक करणार. अशा स्थितींत मला होणाऱ्या शिक्षेची मला पर्वा नाहीं. जर मी आज भ्यालों तर गेल्या पंधरा वर्षांत मी जें कार्य करीत आहें त्या कार्याला खो बसेल. मीं पुष्कळ हालअपेष्टा सोसल्या आहेत. पोलिसांनीं माझ्या-वर हल्लेहि केले आहेत. त्याची मला पर्वा नाहीं. हा सर्व विचार करूनच मीं मातृभूमीच्या दर्शनार्थ हिंदुस्थानांत परत येण्याचें ठरविलें आहे ! "

भावनेची तीव्रता वाढल्यानें—" जगणें मुशाफिराचें हा चाललों घराला ! " असा निर्धार करून सुभाष परत हिंदुस्थानांत येत होते !

सुभाषबाबूंनीं युरोपचा किनारा सोडला. एका इटालियन बोटींतून त्यांनीं प्रवास केल्यामुळें वाटेंतच अटक करण्याचा सरकारचा प्रयत्न अयशस्वी झाला. आणि ता. ८-३-३६ ला हिंदुस्थानांत सुभाष आले. सर्व पक्षांनीं सुभाषबाबूंचा प्रचंड सत्कार केला. आंग्ल सरकारनें त्यांना अटक केली आणि तुरुंगांत रवानगी केली. त्यांनीं निराश झालेल्या देशबांधवांना पुढील संदेश दिला—

"स्वातंत्र्याचा ध्वज फडकत ठेवा, नुसतें दुःख करीत बसूं नका!"

सुभाषचंद्रांची ही अटक जरी सरकारच्या दृष्टीनें बेकायदेशीर नसली तरी ती अन्याय्य नव्हती असें कोण म्हणेल? पंडित जवाहरलालनीं या अटकेचा तीव्र निषेध कॉंग्रेस वर्किंग कमिटींत ठराव आणून केला. सर्व देशभर निषेध करण्यांत आला! परंतु या सर्वाला न जुमानतां सुभाषचंद्रांची रवानगी येरवड्याच्या जेल-मध्यें झाली.

## सुटकेची सार्वत्रिक मागणी

या अन्याय्य अटकेच्या वार्तेचा प्रतिध्वनि पार्लमेंटांतसुद्धां उमटला. क्रांतिकारकांशीं संबंध असल्याच्या काल्पनिक आरोपाची जाहीर चौकशी व्हावी किंवा सुभाषबाबूंवर खटला भरला जावा अशी मागणी होऊं लागली. पण जाहीर चौकशीचें धाडस करवेना म्हणून सरकारनें मुग्धताच स्वीकारली. परंतु सुभाषबाबूंच्या आजारीपणानें त्यांना हात दिला. त्यांना १७ मार्च १९३७ या दिवशीं सोडण्यांत आलें.

डॉक्टरांच्या सल्ल्यावरून ते युरोपमध्यें पुन्हां नोव्हेंबर महिन्यांत जाण्यास निघाले.

## ब्रिटिशांच्या राजधानींत

सुभाषबाबू युरोपमध्यें गेले ते केवळ प्रकृतीसाठीं नव्हे. इतरहि अनेक दौरे आपल्या कार्यासाठीं त्यांनीं काढले. १९३७–३८ सालांत युरोपांत अनेक महत्त्वाच्या घटना घडत होत्या. सुभाषचंद्रांनीं म्हटलें आहे कीं—"मी १९३८ मध्यें पुन्हां युरोपला गेलों. त्यावेळीं कांहीं फेरबदल माझ्या ध्यानांत आले. आपल्या मागण्या ब्रिटिशांकडून पूर्णपणें मान्य केल्या जाणार नाहींत हें जर्मनी ओळखूं लागला होता. ....पण ब्रिटनचे मुख्य प्रधानच आपला देश सोडून जर्मनीला गेले तेव्हां तावड-तोब माझ्या लक्षांत येऊन चुकलें कीं, ब्रिटन दुर्बल होत चाललें असून जर्मनीचा

जोम वाढूं लागला आहे! तेव्हांपासूनच मीं प्रचाराला सुरुवात केली. युरोपांतलें महायुद्ध आतां अटळ आहे!"

चवथ्या युरोपयात्रेचें फलित या त्यांच्या निष्कर्षांत आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा इंग्लंडमधील दौरा. या दौऱ्यांत त्यांनीं अनेक व्याख्यानें दिलीं आणि सर्वांना हें बजावलें कीं संपूर्ण स्वातंत्र्य नि लोकांनीं बनविलेली घटना ही हिंदुस्थानची मागणी आहे. ब्रिटननें देऊं केलेल्या फेडरेशनला काँग्रेस विरोध करील. या मुक्कामांत मेजर ॲटली आदि मजूरपक्षीयांची त्यांनीं भेट घेतली. एकंदरींत त्यांचा इंग्लंडमधील दौरा कल्पनेबाहेर यशस्वी झाला.

याच वेळीं त्यांनीं आयर्लंडचे डी व्हॅलेरा यांची भेट घेतली. भेटींत काय झालें हें कळलें नाहीं. पण देशाच्या स्वातंत्र्यवीरांचें हितगुज काय असणार?

हिंदुस्थानांत राष्ट्रसभेच्या अधिवेशनाची तयारी चालू होती. राष्ट्रसभेला ५० वर्षें पुरीं झाल्यानें या वर्षीच्या अधिवेशनास फार महत्त्व होतें. सर्व प्रांतांनीं सुभाषचंद्रांना बिनविरोध निवडून दिलें आणि सुभाषचंद्र बोस हे राष्ट्रसभाध्यक्ष झाले.

## स्वदेशांत

सर्व भारतीयांची शुभेच्छा सुभाषचंद्रांच्या मागें होती. तिनेंच सुभाषचंद्रांना नेतृत्वाच्या सिंहासनावर बसविलें. परतंत्र देशांत मिळणारे सिंहासन रत्नजडित नसतें, तें शेंकडों अंतःकरणांचें असतें. सुभाषचंद्रांच्या जीवनांतील एका महान् पर्वाला येथून सुरुवात झाली. सर्व युवकांचे आवडते असलेले सुभाष आतां भारताचे आवडते झाले. वयाच्या ४१ व्या वर्षी मिळणारा हा मान अपूर्वच नाहीं का? युरोपांत असतांनाच त्यांना ही बातमी कळली होती.

युरोपांतील आपली चौथी यात्रा संपवून सुभाष जानेवारी १९३८ त हिंदुस्थानांत परत आले, त्यावेळीं कराचींत झालेलें प्रचंड स्वागत पाहून राजानेंहि त्यांचा हेवा केला असता!

# भारतीय नेतृत्वाच्या सिंहासनावर ७

सुभाषचंद्र राष्ट्रसभेचे अध्यक्ष झाल्यामुळें सर्वांत जास्त आनंद कोणाला झाला असेल तर तो तरुणांना, आणि जे पुरोगामी किंवा जहाल विचारांचे होते अशा कार्यकर्त्यांना. सुभाषचंद्रांचें त्यागपूर्ण पूर्वचरित्र, त्यांची चतुरस्र बुद्धिमत्ता, त्यांचें संघटनकौशल्य या सर्व गुणांमुळें राष्ट्रानें त्यांच्याकडून उत्कृष्ट नेतृत्वाची अपेक्षा केली असेल यांत नवल नाहीं सौ. सरोजिनी नायडूंनीं साऱ्या राष्ट्राच्या सुभाषचंद्रांबद्दलच्या भावना बोलून दाखविल्या. "...He is to-day the leader of the Indian Nation. But he must bring to his leadership those qualities of that militant & mystic Bengal, that Bengal of victories, that Bengal of heroic sons, that Bengal of sacrifice and heroism, that Bengal which had the history of India reverberate with epic agonies of hero & heroic youth. To him, who is the symbol of the youth of Bengal, the symbol of wreckless & arrogant courage, heroism & sacrifice of Bengal, I bring the homage of the assembled representatives of the united nation. I would remind him that, he, who, for so many years had been a young soldier, is to-day the chosen hero of and a general in the battle to come and I would remind him that his courage, his wisdom, his initiative, his enterprise, his resourcefulness and soldiery during the coming years await a test."

## हरिपुरा अधिवेशन

हरिपुरा येथील सात आठ लाख रुपये खर्च करून वसविलेल्या विठ्ठलनगरांत हें अधिवेशन झालें. सुभाषचंद्रांचें अपूर्व स्वागत कुठल्याहि अध्यक्षाचें झालें नसेल इतकें झालें. सहस्रावधि कंठांतून एकच निनाद येत होता : " सुभाषबाबू की जय ! "

सुभाषबाबूंनीं आपल्या भाषणांत अनेक मुद्यांचा विचार केला. त्यांचा देशाच्या राजकारणाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन ठरलेला आहे. तो संपूर्ण राष्ट्राच्या हिताचा आहे. त्याच दृष्टिकोनांतून त्यांनीं मार्गदर्शन केलें. इंग्लंडची चाललेली कुतरओढ वर्णन करून ब्रिटिश साम्राज्य आतां नष्ट होण्याच्या पंथाला लागलें आहे असें त्यांनीं सांगितलें. त्यानंतर या भाषणांत कॉं. वर्किंग कमिटीला आयर्लंडचा आदर्श पुढें ठेवण्यास सांगून त्यांनीं एक अभिनव कल्पना वर्किंग कमिटीपुढें मांडली. ते म्हणाले, " ... व. क. हें स्वतंत्र हिंदुस्थानचें गुप्त मंत्रिमंडळ आहे. राज्यकारभाराचें आंतरिंद्रिय आहे. या भूमिकेवरूनच त्या कमिटीचें काम चाललें पाहिजे. स्वतंत्र भारताच्या दृष्टीनें विचार करणाऱ्यांपैकीं मी आहें.

येणाऱ्या कालांत जर आपल्याला परिणामकारक लढा द्यावयाचा असेल तर आपलें घर व्यवस्थित पाहिजे. परंतु आपणांजवळ यासाठीं शिस्तबद्ध संघटना आहे का ? आपणाजवळ पुष्कळ नवीन कार्यकर्ते तयार होत आहेत. त्या उद्योन्मुख कार्यकर्त्यांना शिक्षण देणें जरूर आहे. तेव्हां शिस्तबद्ध स्वयंसेवकांची एक सेना तयार करणेंहि अवश्य आहे. " यानंतर समाजवाद हा स्वातंत्र्यानंतर येणार आहे असें सांगून आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा संबंध कसा ठेवावा याचें त्यांनीं मार्गदर्शन केलें. "... परराष्ट्राशीं संबंध जोडतांना आपण त्या राष्ट्राचें अंतर्गत राजकारण किंवा तेथील सरकारचें स्वरूप यांकडे लक्ष देऊं नये. प्रत्येक राष्ट्रांत आपल्या स्वातंत्र्ययुद्धाशीं सहानुभूति दाखविणारीं माणसें आहेत. त्यांचीं राजकीय मतें कांहींहि असलीं तरी त्यांच्याशीं आपण संबंध ठेवला पाहिजे."

नुकतेच सुभाषबाबू युरोपांतून परत आले असल्याकारणानें परराष्ट्रीय धोरणासंबंधींचे त्यांचे विचार कायम झाले होते. युरोपीय राजकारणाचा जवळून

अभ्यास केल्यानंतर त्यांची अशी खात्री झाली होती कीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या-बद्दल सहानुभूति दाखविणारे अनेक लोक परदेशांत आहेत. युद्ध जवळ येत आहे हा अंदाज त्यांनीं पक्का केला होता. आपल्या राष्ट्रानें त्या संधीचा फायदा घ्यावा. परतंत्र राष्ट्राच्या दृष्टीनें युद्धकाल हा पर्वणीचा काल असतो. इंग्लंडचें संकट तो हिंदुस्थानचा संधिकाल असतो असें लोकमान्य म्हणत, त्याचाहि अर्थ हाच होता. लोखंड तापलेलें असतांनाच त्यावर घण घालून आपणांला हवा असणारा आकार द्यावयाचा असतो. जर तें तापविण्याचें सामर्थ्य नसेल तर याच एकमेव दृष्टिकोनांतून भारतानें येणाऱ्या संधिकालाकडे पहावें. जगांत कोणाचें तत्त्वज्ञान चांगलें आहे कीं वाईट आहे याचा काथ्याकूट करत बसूं नये हीच त्यांची एकमात्र इच्छा होती. म्हणून त्यांनीं अधिवेशनाचा समारोप करतांना पुन्हां एकदां बजावलें—" माझ्या मुखवार्ताच्या भाषणांत मी जागतिक परिस्थितीचा उल्लेख केला आहे. यासंबंधीं आणखी दोन शब्द मी सांगूं इच्छितों. माझा असा विश्वास आहे कीं, भावी कालांत ज्या कांहीं घटना घडतील त्याचा मोठा परिणाम हिंदुस्थानच्या प्रगतीवर होऊं शकेल. आपणाला हें कळतें कीं, हिंदुस्थानचा संधिकाल जवळ येत आहे. आज एक अशी जागतिक परिस्थिति निर्माण होत आहे कीं, जिच्या योगानें स्वतःच्या संघटित सामर्थ्याच्या जोरावर हिंदुस्थान आपलें स्वातंत्र्य तें देण्यास नाखूष असलेल्यापासून हिसकावून घेऊं शकेल ! ही माझी नुसती भोळी आशा नाहीं. मीं केलेल्या आंतरराष्ट्रीय राज-कारणाच्या अभ्यासाचा तो निष्कर्ष आहे. तेव्हां आपले सर्व मतभेद विसरून साम्राज्यविरोधी लढ्यासाठीं एकत्र होऊं या ! " याच त्यांच्या भाषणांत, येणाऱ्या युद्धाचा कशा दृष्टीनें फायदा त्यांना घ्यावयाचा होता हें स्पष्ट केलेलें होतें. राष्ट्राचा फायदा ज्यानें होईल ती आपली संधि, ज्यानें राष्ट्र दुःखांत पडेल तें संकट ही त्यांच्या परराष्ट्रीय राजकारणाची कसोटी होती. संपूर्ण राष्ट्रीय दृष्टिकोनांतून ते पाहात. त्यांनीं आंतरराष्ट्रीयतेचा पोकळ पुरस्कार कधींच केला नाहीं. गुलाम राष्ट्रानें भलत्या तत्त्वज्ञानाचे मागें न लागतां ज्यानें देश स्वतंत्र होईल तें तत्त्वज्ञान आचरावें. एकूण पुढें अचूक ठरलेल्या युद्धविषयक भूमिकेचा पाया त्यांनीं या अधिवेशनांत घातला असें म्हणावयास हरकत नाहीं.

## हरिपुरा ते त्रिपुरी

हरिपुऱ्याच्या अधिवेशनांत सर्व मतांच्या लोकांची एकजूट दिसली. संयुक्त-



शांति-दूत    क्रांति-दूत

प्रांत व बिहार येथील मंत्र्यांनीं दिलेल्या राजीनाम्यांनीं कांहींहि वादळ निर्माण न होतां एकजुटीनें त्यासंबंधीं निर्णय घेतला गेला. गांधीजींच्या सल्ल्यानें अर्थात् हें सर्व होत होतें. तेव्हां लोकांना गांधी–सुभाष ऐक्यानें बरें वाटलें. किंबहुना तें एक राष्ट्राच्या प्रगतीचें गमक मानण्यांत आलें.

सुभाषचंद्र राष्ट्राध्यक्ष झाल्यानें त्यांचें सर्वत्र अभूतपूर्व स्वागत करण्यांत येत होतें. शरीरप्रकृतीची तमा न बाळगतां सर्वत्र दौऱ्यांचा धूमधडाका सुभाषचंद्रांनीं उडविला होता. आज त्यांच्या पाठीमागें सारें राष्ट्र उभें होतें म्हणून त्यांनीं आपल्या विचारांचा प्रचार सुरू केला. त्यांनीं लोकांना आग्रहपूर्वक सांगितलें कीं—"आज तीन गोष्टीची आवश्यकता आहे. एक तर कॉंग्रेसच्या बाहेर असलेल्या लोकांना वळवून कॉंग्रेसचे सभासद केलें पाहिजे. दुसरे सेवा नि त्याग यांचा योग्य उपयोग करणारे स्वयंसैनिक निर्माण केले पाहिजेत आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीकडे नजर ठेवून प्रसंग पडल्यास इंग्रजांशीं टक्कर देण्याचीहि सिद्धता आम्हीं ठेविली पाहिजे. सलोख्याचें वातावरण निर्माण करण्याकरितां त्यांनीं अनेक पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. मे १९३८ मध्यें जिनांशीं वाटाघाटी करण्यास सुरुवात केली, पण नेहमींप्रमाणें त्या फिसकटल्या. फिसकटण्याचा मुद्दा एकच कीं मुस्लिम लीगचें आत्यंतिक जातीय धोरण कॉंग्रेस कधींच मान्य करणार नाहीं. यानंतर डॉ. खरे प्रकरण उपस्थित झालें. त्यालाहि सुभाषनें कॉंग्रेसच्या म्हणण्याप्रमाणें मान्यता दिली.

अध्यक्ष झाल्यापासून सुभाषचंद्रांनीं आपल्या मताचा प्रचार खूप केला. फेडरेशनला कडकडीत विरोध हें त्यांचें प्रमुख अंग होतें. त्याच्याच जोरावर जनमताचा कौल त्यांना मिळत होता.

## अध्यक्षीय निवडणुकीची लढाई

१९३९ साल उजाडलें आणि कॉंग्रेसचा पुढील वर्षाचा अध्यक्ष कोण असावा हा वाद निर्माण झाला. सुभाषचंद्रांनीं यंदा पुन्हां अध्यक्षीय निवडणूक लढविण्याचें ठरविलें होतें. आजपर्यंतच्या कॉंग्रेसच्या इतिहासांत अभूतपूर्व अशी ही निवडणूक होती.

सुभाषबाबूंची भूमिका स्पष्ट होती. साम्राज्यशाहीशीं कधींहि तडजोड न करण्याची त्यांची प्रवृत्ति होती. देशाच्या इतिहासांत स्मरणीय असा एक काल

जवळ येत होता. ब्रिटिशविरोधी लढा लवकरच द्यावा लागणार हें सुभाषना उघड दिसत होतें. अशा वेळीं काँग्रेसमध्यें जर तडजोडवादी मनोवृत्ति निर्माण झाली तर राष्ट्राचा एक मोठा तोटा होणार होता. म्हणून सुभाषचंद्रांनीं ही निवडणूक लढविण्याचें ठरविलें. त्यांनीं निःस्वार्थीपणानें अगोदर स्पष्ट केलें होतें कीं—" भावी अध्यक्षीय निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून माझें नांव सुचविलें गेलें आहे ही दुःखाची गोष्ट होय. मीं माझ्या अनेक मित्रांना सुचविलें कीं एका नवीन कार्यकर्त्याचें नांव सुचवा. परंतु दुर्दैवानें तें न होतां, माझेंच नांव पुन्हां सुचविलें गेलें आहे ! " कांहीं लोकांनीं सुभाषचंद्रांच्यावर ते महत्त्वाकांक्षी आहेत, वैयक्तिक मोठेपणासाठीं हपापलेले आहेत असे आरोप केले. पण सुभाषबाबूंचें सर्व जीवनचरित्र ज्याला माहीत आहे त्याला हें पटणार नाहीं. सुभाषचंद्रांना आपल्या कार्यशक्तीबद्दल अपूर्व आत्मविश्वास होता. त्यांनीं राष्ट्राचें नेतृत्व आपल्याकडे असावें म्हणून प्रयत्न केला त्याला कारण त्यांचा दुर्दम्य आत्मविश्वासच होता. राष्ट्र संकटांत सांपडलें असतां " मी त्याचें संरक्षण करीन ! " असें म्हणणारा पुढारी अहंकारी नि स्वार्थी होऊंच शकणार नाहीं. नेपोलियनच्या कारकीर्दींत इंग्लंडवर संकट आलें असतां " मीच या वेळीं राष्ट्राचें संरक्षण करूं शकेन ! " असे उद्गार काढणारा आणि तसें करून दाखविणारा नेल्सन हा स्वार्थीच होता काय ? तीच स्थिति सुभाषचंद्रांची आहे. त्यांच्या अपूर्व कर्तृत्वाची प्रचीति त्या वेळीं देशाला आली नाहीं हें केवढें दुर्दैव ?

## सुरुवात

त्रिपुरी काँग्रेसच्या अगोदर जितकीं पत्रकें निघालीं असतील तितकीं अजूनपर्यंत कधींच निघालीं नाहींत. त्यांत दोन पक्ष होते. त्यांचे प्रमुख वल्लभभाई पटेल व सुभाष बोस. मौ. आझाद, सुभाषबाबू आणि डॉ. पट्टाभि असे तीन पुढारी या निवडणुकीसाठीं उभे राहिले होते. त्यांपैकीं मौ. आझादांनीं डॉ. पट्टाभींसाठीं आपलें नांव मागें घेतलें आणि त्यांनीं सर्वांनीं डॉ. पट्टाभींना निवडून द्यावें असें पत्रक काढलें. येथूनच भांडणाला सुरुवात झाली. हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर पट्टाभि–सुभाष अशी चुरस लागली. डॉ. पट्टाभींच्या मागें सरदार वल्लभभाईंच्या नेतृत्वाखालीं गांधीवादी गट होता आणि सुभाषचंद्रांच्या मागें देशांतील सर्व गांधीविरोधी गट होते.

सरदार वल्लभभाई, डॉ. राजेन्द्रप्रसाद वगैरे व. क. च्या सात सभासदांनीं एक प्रदीर्घ पत्रक काढून डॉ. पट्टाभींच्या उमेदवारीला पाठिंबा दिला नि त्यांनाच

सर्वांनीं निवडून यावें अशी विनंति केली. सुभाषनीं आपलें नांव मागें घ्यावें अशी विनंति करण्यांत आली. वल्लभभाईंनीं तर—" Mr. Bose's re-election would be harmful to the cause of the country." (श्री. बोस यांना पुन्हां निवडून देणें राष्ट्राला धोक्याचें आहे ! ) असे उद्गार काढले. राष्ट्राचा घात काय आहे हें मात्र वल्लभभाईंनीं कधींच स्पष्ट केलें नाहीं. एकंदरींत सुभाषबाबूंच्या विरुद्ध खूप गहजब झाला. परंतु त्याचा परिणाम सुभाषबाबूंच्यावर कांहीं झाला नाहीं. उलट 'कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तिर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् । (धैर्यवान् पुरुष कितीहि पीडिला गेला तरी त्याचा धैर्यगुण कधींहि नाहींसा होणार नाहीं ! )' या सत्याची प्रचीति लोकांना आली. हा लढा तत्त्वांचा आहे हें पुन्हां सुभाषबाबूंनीं जाहीर केलें. एक पत्रक काढून सात पुढाऱ्यांच्या पत्रकाला उत्तर दिलें. त्यांत ते म्हणतात–" All sense of false modesty will have to be put aside, for the issue is not a personal one. As in other free countries, the presidential election in India should be fought on the basis of definite problems & programmes. ... I, therefore, place myself unreservedly in the hands of the fellow delegates & shall abide by their verdict." (खोट्या विनयाचा त्याग या वेळीं केला पाहिजे, कारण हा मुद्दा व्यक्तीचा नाहीं. इतर स्वतंत्र देशांतील निवडणुकांप्रमाणें येथील निवडणूकहि निश्चित योजना नि कार्यक्रम यांवर लढविली पाहिजे. म्हणून मी प्रतिनिधींच्या निर्णयाप्रमाणें वागेन.)

पत्रकांवर पत्रकें निघत होतीं. सुभाषबाबूंच्या विरुद्ध काहूर उठविण्यांत येत होतें. डॉ. पट्टाभींनीं एक पत्रक काढून मलाच कां निवडून यावें हें स्पष्ट केलें. देशांतील फेडरेशनविरोधी सर्व गट सुभाषबाबूंच्या बाजूनें होते. समाजसत्तावादी रॉयवादी आदींनीं सुभाषचंद्रांना निवडून यावें असें जाहीर केलें होतें. सुभाषबाबूंनीं कॉंग्रेसमधील उजव्या गटाच्या लोकांचा आपल्या उमेदवारीला कां विरोध आहे हें ता. २३ जानेवारीला पत्रक काढून जाहीर केलें. त्या पत्रकानें खूपच खळबळ उडाली. त्यांत ते म्हणतात—" फेडरेशनबाबत कॉंग्रेस आणि सरकार यांच्यांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न उजवे गटवाले पुढारी करणार आहेत असें सर्वत्र बोललें जात आहे. अर्थातच त्या गटाला कुठलाहि डाव्या

गटाचा अध्यक्ष निवडून आला तर तो तडजोडीला व वाटाघाटींना विरोध करील असें वाटतें म्हणून त्यांना असा अध्यक्ष नको असावा."

शेवटीं डाव्या व उजव्या गटांत कुठलीहि तडजोड होऊं शकली नाहीं. सुभाषचंद्रांची लोकप्रियता फार मोठी होती. लोकांचा त्यांच्या कर्तृत्वावरील विश्वासहि फार मोठा होता. म्हणून सुभाषचंद्रच शेवटीं २१३ अधिक मतांनीं निवडून आले. हा निर्णय म्हणजे सुभाषबाबूंचा महान् विजय होता. डॉ. पट्टाभींच्या मागें महात्माजींची सहानुभूति असूनहि सुभाषनीं विजय मिळविला. हा विजय म्हणजे त्यांच्या मताची, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप जनमतावर किती होती याचें गमक होतें. गांधीजींच्याविरुद्ध सुभाषचंद्रांनीं मिळविलेला हा विजय पाहिल्यानंतर अनेकांनीं, अनेक वृत्तपत्रांनीं गांधीयुग संपल्याच्या घोषणा केल्या. तें जरी सर्वांशानें खरें नसलें तरी एक गोष्ट निश्चित झाली. गांधीजींना विरोध करून यशस्वी होणारा एकच पुढारी झाला आणि तो म्हणजे सुभाषबाबू!

सुभाषबाबूंनीं पत्रक काढून सर्व प्रतिनिधींचे आभार मानले. "हा विजय व्यक्तीचा नव्हे. आज राष्ट्राच्या इतिहासांत आणीबाणीचा काल येत आहे. माझ्या डोक्यांत एकच विचार आहे तो म्हणजे उद्यां काय होईल याचा. ब्रिटिश विरोधी शक्तींच्या एकत्रीकरणाची आज पूर्वीपेक्षां जास्त आवश्यकता निर्माण झाली आहे. या ऐक्याला बाध येईल असें आपण बोलतां कामा नये आणि वागतां कामा नये."

गांधीजींनीं या विजयानंतर एक पत्रक काढून ही गोष्ट मान्य केली कीं—"Therefore it is plain to me that the delegates do not approve of the principles and policy for which I, stand. I rejoice in this defeat. (आजच्या या विजयानें हें सिद्ध केलें आहे कीं माझें ध्येय नि धोरण प्रतिनिधींना मान्य नाहीं. मला या पराभवानें आनंद होत आहे.)" नंतर उजव्या गटाचे लोकांनीं काय करावें याचा सल्ला देतांना त्यांनीं लिहिलें, "मताधिक्य नसलेल्यांना जर बहुमतवाल्यांशीं सहकार्य करतां आलें तर अवश्य करावें. परंतु तें न आलें तर अल्पमतवाल्यांनीं अडथळा निर्माण करतां कामा नये...ज्यांना असें करतां येणार नाहीं असें वाटतें त्यांनीं काँग्रेसमधून बाहेर पडावें..."

उजव्या गटाची मनोभूमिका गांधीजींनीं ह्या पत्रकांत मांडली आहे असें म्हटलें... तर तें चुकीचें होणार नाहीं.

## पंच प्रसंग

कॉंग्रेसमध्यें अशा महत्त्वाच्या काळांत दुफळी होऊं नये अशी सुभाषबाबूंची तीव्र इच्छा होती म्हणून त्यांनी ता. १५ फेब्रुवारीला महात्माजींची वर्धा येथें भेट घेतली. व तेथून आल्यानंतर महात्माजींचा सल्ला आपणाला मिळणार आहे असें जाहीर केलें.

यानंतर सुभाष कलकत्त्याला गेले ते आजारी पडूनच. आयत्या वेळीं त्यांना हा आजार आलेला पाहून वाईट वाटलें. त्रिपुरी कॉंग्रेसचें अधिवेशन जवळ येत असल्यानें त्या अधिवेशनासाठीं ठराव तयार करणें जरूर होतें. त्यासाठीं बोलावलेली वर्किंग कमिटीची सभा पार पडते की नाहीं याची त्यांना भीति वाटूं लागली. कारण सुभाष आजारी होते आणि डॉक्टरांनीं त्यांना कुठल्याहि प्रकारची हालचाल करण्यास परवानगी दिली नव्हती. म्हणून सरदार वल्लभभाईंना सुभाषबाबूंनीं व. क. च्या सभेचा दिवस पुढें ढकलण्यासंबंधीं तार केली व त्यांचें मत मागविलें. परंतु त्यांच्या तारेला उत्तर आलें तें बारा व. क. च्या सभासदांचीं त्यागपत्रें. त्या त्यागपत्रां-बरोबर जें पत्र पाठविलें होतें त्यांत डाव्या गटाला आपलें कार्य करण्यास मुभा असावी म्हणून आपण हें करीत आहोंत असें समर्थन केलें होतें. सुभाषबाबूंचा ताप कमी नव्हताच. त्यांना मानसिक विश्रांतीहि मिळत नव्हती. बारा सभा-सदांच्या त्यागपत्रांनीं ते एकटे पडले होते. त्यांत भर म्हणून कॉंग्रेसच्या सर-चिटणीसांनी सुद्धां सुभाषना आपलें त्यागपत्र पाठविलें, त्यामुळें पत्रव्यवहाराचीं वगैरे सर्व कामें तशा त्या प्रकृतीच्या अवस्थेंत त्यांना स्वतः पहावीं लागलीं. पत्रकामागून पत्रकें काढावीं लागत आणि त्यांचा प्रकृतीवर ताण पडे. पण ते खचले नाहींत.

## त्रिपुरीच्या मार्गावर

त्रिपुरी अधिवेशनाचा दिवस जवळ आला तरी सुभाषांच्या प्रकृतींत सुधारणा झाली नाहीं. अखिल भारतीय समितीच्या सभासदांनीं दिलेली त्यागपत्रांची धमकी, त्यांच्या आजाराविषयीं उठविल्या जाणाऱ्या अफवा या सर्वांनीं सुभाषना त्रास होत होता. सरकारी गुप्तचर जसे इतरांना छळतात त्याच पद्धतीनें उघड उघड हा सामाजिक छळ सुरू झाला होता. परंतु त्याहि परिस्थितीला तोंड

देण्याचें आत्मबल त्यांच्यांत होतें. त्याच्याच जोरावर त्यांनीं त्रिपुरीला जाण्याचा निश्चय केला. अंगांत १०३° ताप असतांना सुभाष अधिवेशनासाठीं निघाले.

ते त्रिपुरीला पोहोंचले तेव्हांहि ताप होताच. स्वागतसमितीला विनंति करण्यांत आली कीं अधिवेशन पुढें ढकलावें. तेव्हां "तें सर्वस्वीं अशक्य आहे नि सुभाषनीं तसा निर्णय घेतला तर आम्ही अधिवेशन भरवावयासच तयार नाहीं" असें उत्तर दिलें गेलें !

त्रिपुरीला निघालेली अध्यक्षीय प्रतिमेची मिरवणूक अति भव्य होती. सुभाषबाबू आजारी असल्यानें कुठल्याच मोठ्या कार्यक्रमांत त्यांना भाग घेतां आला नाहीं. दुर्दैव हें कीं तो राजकीय स्वरूपाचा (Political illness) आहे असा दुष्ट आरोप अनेकांनीं घेण्यास सुरुवात केली होती. तापानें फणफणत असतां, डॉक्टरांनीं पत्रक काढलेलें असतांना तो आजार राजकीय म्हणणाऱ्यांना 'ते के न जानीमहे !' सदरांत ढकललें तर त्यांत काय आश्चर्य ! त्या बातमीनें वातावरण किती तप्त झालें होतें याची कल्पना श्री. शरद् बोसनीं एका वृत्तपत्र-प्रतिनिधींशीं बोलतांना काढलेल्या उद्गारांवरून दिसून येईल—"अहो हे सत्य अहिंसेचे पुतळे भूतदयेनें प्रेरित आहेत असं कां तुम्हांला वाटतं ? राजाजी मला म्हणाले, बापू इथं असते तर केलें असतें आम्हीं अधिवेशन तहकूब; पण त्यांच्या गैरहजेरींत तें करणें आम्हांला शक्य नाहीं. पाहू काय होईल तें ! ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या गोळ्यांना सुभाषबाबू भ्याले नाहींत ते या सत्य अहिंसेच्या मक्तेदारांच्या भेडसावणीला भितील होय ?" सुभाषबाबूंना तेथून हलण्यासंबंधीं विचारलें. परंतु तेहि हट्टास पेटले होते. त्यांनीं उत्तर दिलें, "त्रिपुरीहून निघून जाऊन जबलपूरच्या एखाद्या इस्पितळांतील रोग्याच्या खाटेवर पडून राहण्यासाठीं मी त्रिपुरीला आलों नाहीं. राष्ट्रसभेचें अधिवेशन संपण्यापूर्वी येथून जाऊन जिवन्त राहण्यापेक्षां मी येथेंच मरण पत्करीन !"

योगी पुरुषाच्या या निर्धारापुढें कुणाचें चालणार ? सुभाष आजाराला कंटाळून त्यागपत्र देतील अशी लोकांची अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरली.

## पंतांचा ठराव

या अधिवेशनांत माजलेलें रण प्रामुख्यानें या ठरावावरच होतें. विषयनियामक समितींत साडेसात तासांचे वर याच्यावर चर्चा झाली. पंडित पंत यांचा ठराव पुढील

आशयाचा होता—“ अध्यक्षांच्या निवडणुकीबाबत देशांत जे गैरसमज पसरले आहेत ते दूर करण्यासाठीं ही कमिटी असें जाहीर करीत आहे कीं म. गांधींच्या नेतृत्वाखालीं आंखलेलें धोरण व चालविलेला कार्यक्रम यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. यापुढें त्यांत खंड पडणार नसून त्याचाच अंमल चालू राहील! वर्किंग कमिटीच्या सभासदांवर शिंतोडे उडविण्यांत आले याबद्दल कमिटीस खेद वाटत आहे. पुढील वर्षी जे बिकट प्रश्न येणार आहेत त्यांतून राष्ट्रसभेला व राष्ट्राला मार्ग दाखविण्यास म. गांधी हे समर्थ आहेत म्हणून त्यांच्या इच्छेनुसार अध्यक्षांनीं वर्किंग कमिटी नेमावी.'' हा ठराव म्हणजे तेजोवध होता असें कांहीचें म्हणणें होतें. कोणी याला हुकूमशाहीची पूजा असेंहि नांव दिलें. श्री. अणे, शरच्चंद्र बोस, आदि पुढाऱ्यांनीं विरोध केला. विचारांचीं वादळें उठलीं.

“ विभूतिपूजेच्या नांवाखालीं आपले घाणेरडे हेतु साध्य करण्याचे दिवस आतां गेले आहेत. कोणाचेंहि देवपण मान्य करण्यास आजची तरुण पिढी तयार नाहीं. ती एका मानवी व्यक्तीला देव मानावयास कशी तयार होणार? व्यक्तिपूजा करावयास काँग्रेस हा काय कोणा महंताचा मठ आहे कीं काय? बोलून चालून काँग्रेस ही क्रांतिवादी संस्था आहे! म्हणून मोठ्या माणसांच्या आडून असले हल्ले करूं नका!” अशा प्रकारचे विचार निहरेंदु मुजुमदार यांनीं मांडले, तर याच्या अगदीं उलट विचार राजाजींनीं मांडले. आजच्या बिकट प्रसंगीं गांधीजींना शरण जाण्यांतच राष्ट्राचें हित आहे असें त्यांनीं सांगितलें. शेवटीं हा ठराव पास होऊन गांधीजींवरील विश्वास राष्ट्रसभेनें व्यक्त केला.

## ब्रिटनला अंतिम सवाल

सुभाषबाबूंचें अध्यक्षीय भाषण श्री. शरद् बोस यांनीं वाचलें. हें भाषण अत्यंत लहान होतें. परंतु त्यांत एक दोन महत्त्वाचे मुद्दे होते. अत्यंत त्रास झाला असतांनासुद्धां कुणालाहि न दुखवितां अत्यंत समतोल बुद्धीनें हें भाषण लिहिलें गेलें आहे हें त्याचें वैशिष्टय आहे. यांतील महत्त्वाचा मुद्दा ब्रिटिशांना अंतिम खलिता पाठविण्याचा होता. त्यासंबंधीं विवेचन करतांना सुभाष म्हणतात—“ मला बरेच दिवसांपासून जें वाटत आहे तें मी आज सांगतों. तें हें कीं, आज ब्रिटिश सरकारला आपली स्वराज्याची मागणी अंतिम निर्णय घेण्यासाठीं मांडण्याची वेळ निर्माण झाली आहे....आणि म्हणून माझ्या

मतें आपली स्वराज्याची निर्वाणीची मागणी आतां ब्रिटिश सरकारपुढें मांडावी व त्याला एक विवक्षित कालावधि द्यावा. तेवढ्या कालावधींत जर सरकारनें ती मागणी मान्य केली नाहीं किंवा नकारार्थी उत्तर आलें तर आपण आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ती मान्य करावयास लावली पाहिजे. कॉंग्रेसमध्यें अद्याप असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांना ब्रिटिशांविरुद्ध आघाडी उघडण्याची वेळ आलेली नाहीं असें वाटतें. हें दुर्दैव आहे. परंतु संपूर्ण व्यवहार्य दृष्टिकोनांतून जागतिक परिस्थितीकडे पाहिलें तर मला निराशा कुठेंहि दिसत नाहीं. आठ प्रांतांत आपलीं मंत्रिमंडळें आल्यामुळें आपली राष्ट्रीय दौलत वाढली आहे. आपले सर्व मतभेद बाजूला ठेवून सर्व सामर्थ्य एकवटून जर आपण ब्रिटिश राजसत्तेवर हल्ला चढविला तर त्याला प्रतिकार करण्याचें सामर्थ्य कोणांत आहे? आपणांला आजच्या अनुकूल परिस्थितीचा फायदा करून घेण्याइतकी राजकीय दूरदृष्टि आहे का? कां राष्ट्राच्या आयुष्यांत क्वचित्‌च येणारी ही सुवर्णसंधि आपण फुकट घालविणार आहांत?"

देशाचें दुर्दैव आहे कीं या द्रष्ट्या पुरुषानें दिलेल्या या सूचनेचा फायदा देशानें घेतला नाहीं. गंगा समोरून वाहात होती, पण आम्ही पवित्र होऊं शकलों नाहीं! राष्ट्राच्या आयुष्यांत आलेला अपूर्व संधीचा उपयोग करून घेण्याची बुद्धि होऊं नये यापेक्षां जास्त दुर्दैव कुठलें?

## मानसिक अवस्था

त्रिपुरीचें अधिवेशन अशा रीतीनें संपलें. तें अधिवेशन सर्व दृष्टींनीं अपूर्व गणलें जाईल. सुभाषचंद्रांच्या आयुष्यांतहि त्याचें स्थान मोठें आहे. त्यांनीं गांधीजींवर मिळविलेला विजय, त्यांनीं दर्शविलेली कणखर ध्येयनिष्ठा आणि तडफ यांनीं त्यांच्या चारित्र्यावर प्रकाश टाकला. सुभाषबाबूंचें राष्ट्रावर केवढें वजन आहे याची प्रचीति आली. चांगल्याबरोबर अनेक वाईट गोष्टीहि बाहेर आल्या. मात्र सुभाषांच्या अंतःकरणावर या अधिवेशनाचे खोल परिणाम झाले. राष्ट्राच्या राजकारणासंबंधीं एक प्रकारची घृणा त्यांच्या मनांत निर्माण झाली असें त्यांनीं मॉडर्न रिव्ह्यूंतून लिहिलेल्या एका लेखावरून My Strange Illness दिसून येतें. आपल्या मनःस्थितीचें वर्णन त्यांनीं पुढील हृदयस्पर्शी शब्दांत केलें आहे. " त्रिपुरी येथील निराश वातावरणामुळें गेल्या



१९ वर्षांत कधींहि निर्माण झाला नाहीं असा राजकारणाविषयींचा एक प्रकारचा तिरस्कार माझ्या अंतःकरणांत निर्माण झाला. येथें अंथरुणांत पडल्या पडल्या माझ्या मनांत असा विचार येतो कीं उच्च दर्जाच्या लोकांत जर इतका मनाचा क्षुद्रपणा आणि खुनशीपणा असेल तर आपल्या सार्वजनिक जीवनांतून काय निर्माण होऊं शकणार आहे ? तेव्हां मग माझ्या पूर्वीपासून प्रिय असलेल्या हिमालयांतील हांकेकडे माझें लक्ष लागलें. मी असा मनाशीं विचार करूं लागलों कीं हीच जर आमच्या राजकारणाची परिपूर्णता असेल तर ज्याला अरविंदबाबू घोष दैवी आयुष्य म्हणत असत त्यापासून मी कां बाजूला सरलों ? मायेचें पटल दूर सारून प्रेमाचें उगमस्थान–प्रेमाचा झरा शोधण्याची वेळ आली आहे का ? असा मी विचार करूं लागलों. अशा माझ्या बुद्धीच्या संभ्रमांत, अस्थिरतेंत मीं अनेक रात्री घालविल्या. हिमालयाची हांक मला पुनः पुनः ऐकूं येत होती. मी माझ्या प्रकाशाच्या किरणाची वाट पाहात होतों. परंतु सुदैवानें हळू हळू माझा मनावरील आणि देशबांधवांवरील विश्वास पुन्हां निर्माण झाला आणि एक नवीन दृष्टि प्राप्त होऊं लागली.''

आजपर्यंत अनेक देशभक्तांच्या आयुष्यांत वेळोवेळीं अशी मनःस्थिति निर्माण झाली आहे. पण ती परक्यांच्या छळामुळें. मॅझिनीला त्याचें पहिलें सशस्त्र बंड फसल्यानंतर त्याच्या शत्रूंनीं इतकें छळलें कीं त्याला वेड लागण्याची वेळ आली ! पण सुभाषचंद्रांना स्वकीयांच्यामुळें ही मनःस्थिति प्राप्त झाली. हिंदुस्थानांतील लोक अलौकिक आहेत हेंच खरें !

## अध्यक्षपदाचें त्यागपत्र

राष्ट्रसभेची कार्यकारिणी तयार करावयाची होती नि ती गांधीजींच्या सल्लयानें करावयाची असल्यानें तें कार्य लांबणीवर पडत होतें. सुभाष आजारी होते त्यामुळें वर्ध्याला जाण्याची शक्यता त्यांना नव्हती. गांधीजींना त्यांनीं कलकत्त्यास बोलाविलें होतें. परंतु तेहि येऊं शकले नाहींत. पत्रव्यवहारानें त्यांनीं चर्चा करण्यास सुरुवात केली. तो पत्रव्यवहार पुढें प्रसिद्ध झाला. तो सर्व वाचणाऱ्याच्या एक गोष्ट लक्षांत येईल कीं सुभाषबाबूंची काँग्रेस अभंग ठेवण्याची प्रामाणिक इच्छा होती. त्यांचा आग्रह एकच कीं लढा ! यापेक्षां कुठलीहि दुसरी महत्त्वाकांक्षा त्यांचेजवळ नव्हती. अंतःकलह टाळण्याची विनंति गांधीजींना त्यांनीं

अनेक वेळां केली आहे. त्यांचा दुसरा मुद्दा लढ्याचा! त्यासंबंधीं त्यांनीं दि. ३१-३-३९ च्या पत्रांत आपले विचार मांडले आहेत. ते म्हणतात— " तुम्ही जर लढा सुरू करीत असाल तर मी माझें सर्वतोपरी सहाय्य तुम्हांला करण्यास तयार आहें. तुम्हांला जर असें वाटत असेल कीं कॉंग्रेस दुसऱ्या एकाद्या अध्यक्षाच्या नेतृत्वाखालीं प्रभावी लढा देऊं शकेल, तर मी आनंदानें बाजूला होईन. मला जें कांहीं पाहिजे आहे तें हें कीं तुम्हीं नि राष्ट्रसभेनें या आणीबाणीच्या क्षणाला उठावें आणि स्वराज्याच्या लढ्याला सुरुवात करावी!" या त्यांच्या मागणीला कोणी स्वार्थ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा म्हणेल काय?

दि. २९ एप्रिलला कलकत्त्याला अखिल भारतीय राष्ट्रसभेची बैठक भरली. सुभाषबाबूंनीं विचारपूर्वक आपलें त्यागपत्र सभेपुढें ठेविलें. " आज कार्यकारिणीची नेमणूक सर्वांना नि गांधीजींना पसंत पडेल अशी करतां येणार नाहीं म्हणून मी त्यागपत्र देत आहें. कदाचित् मीहि त्या कमिटींत येण्यास अयोग्य असेन!" असें स्पष्टीकरण सुभाषबाबूंनीं केलें. सौ. सरोजिनी नायडू, पं. जवाहरलाल आणि इतर कांहींनीं त्यांना हें न करण्याची विनंति केली. ती केवळ तांत्रिक होती. त्यांत हृदय नव्हतें!

सुभाषबाबू त्या नेतृत्वाच्या सिंहासनावरून स्वेच्छेनें खालीं उतरले.

कारण त्यांच्यांत स्वतंत्र सिंहासन निर्माण करण्याचें सामर्थ्य होतें!

# पुरोगामी सुभाष

८

त्रिपुरी कॉंग्रेसची दुःखद घटना कालाच्या उदरांत विलीन होत होती. सुभाषबाबूंच्या सत्त्वाची जणू कांहीं ती परीक्षाच होती. चोहोंकडून तुफान उठलें असतां आपलें सुकाणूं व्यवस्थित ठेवून त्या तुफानांतून सुरक्षित निघणारा प्रवासी हा दैवाच्या कसोटीस उतरत असतो. सुभाषबाबूंची बरोबर तीच स्थिति होती. प्रचलित चाकोरींतून ते बाहेर पडले. त्यांना जें योग्य वाटलें, त्याचा पुरस्कार त्यांनीं केला. याबद्दल सुभाषबाबूंना मानहानि सहन करावी लागली. त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा नीच प्रयत्न केला गेला. कारण अेकच! ते बुद्धिवादाला प्राधान्य देऊन देशाला युद्धोन्मुख करण्याचा प्रयत्न करीत होते.

## कॉंग्रेसमधून ‘ चले जाव ’

या सर्व असंतोषाचा स्फोट त्यांना कॉंग्रेसमधून बाहेर काढण्यांत झाला. अखिल भारतीय राष्ट्रसभेनें एक ठराव संमत केला होता. तो ठराव सुभाषबाबूंना पसंत नसल्यामुळें त्यांनीं विरोध केला. त्याचा परिणाम त्यांना कॉंग्रेसमधून बाहेर काढण्याचा ठराव पास झाला. तो असा—

“ मोठ्या खेदानें कॉंग्रेस कमिटीला असा निर्णय घ्यावा लागत आहे कीं, जर सुभाषचंद्र बोस यांनीं हेतुपुरस्सर केलेल्या शिस्तभंगावर तिनें उपाय सुचविला नाहीं तर तिची ती मोठी चूक ठरेल. म्हणून वर्किंग कमिटी सुभाषबाबूंच्या गंभीर शिस्तभंगाबद्दल असा निर्णय घेत आहे कीं बंगाल प्रांतिक कॉं. चे अध्यक्ष राहण्यास व सभासद होण्यासहि ते अपात्र आहेत. ”

सुभाषबाबूंना हें कळलें त्या वेळीं त्यांना कांहींहि आश्चर्य वाटलें नाहीं. सुभाषबाबूंनीं रूढ कॉंग्रेसविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. त्यांची कॉंग्रेसवर निष्ठा होती, पण ती डोळस होती.

## पुरोगामी गटाची स्थापना

सुभाषबाबूंना कॉंग्रेसमधून काढल्यानंतर त्यांच्यापुढील मार्ग आतां स्पष्ट होता. भविष्यकालच्या येत्या पावलांची चाहूल त्यांना ऐकूं येत होती. आपला मार्ग, आपले विचार जनतेपुढें स्पष्टपणें मांडण्याची वेळ आली आहे हें त्यांनीं ओळखलें नि कलकत्ता येथें ३ मे १९३९ या दिवशीं पुरोगामी गट (Forward Bloc) या पक्षाची स्थापना केली. त्या गटाचें ध्येय साम्राज्यविरोधी व जहालमतवाद्यांचें एकीकरण करणें असें होतें. हा गट अंतर्गतच राहील असें त्यांनीं जाहीर करून पुरोगामी गटाच्या प्रचाराला सुरुवात केली.

## भूमिका

मुंबईला पुरोगामी गटाची परिषद सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या परिषदेंत सुभाषबाबूंनीं पुरोगामी गटाची भूमिका सांगितली. ते म्हणाले, "पुरोगामी गट कॉंग्रेसच्या अंतर्गतच राहील. कॉंग्रेसची घटना व कार्यक्रम या गटास मान्य करावा लागेल. परंतु वेळोवेळीं त्यांत तो दुरुस्त्या सुचवील व बहुमत आपल्या बाजूला आणण्याचा प्रयत्न करील. कॉंग्रेसमध्यें सुधारणावादी वृत्ति शिरली आहे व जनतेच्या क्रांतिप्रवण वृत्तीचा छेद करण्यांत येत आहे. जनतेची क्रांतिकारक वृत्ति जागृत ठेवून आगामी लढयाची तयारी करण्याचें कार्य हा गट करील. आमच्या कार्यक्रमास कॉंग्रेस सभासदांचें बहुमत मिळविण्याचा प्रयत्न आम्ही सतत करीत राहूं. सध्यांचा अधिकारारूढ पक्ष डाव्या गटाकडे तुच्छतेनें पाहातो. याचें कारण डाव्या गटांत ऐक्याचा अभाव आहे म्हणून आम्ही या सर्व डाव्या गटांची संघटना करणार आहोंत. मग कॉंग्रेसमधील सध्यांच्या अधिकारारूढ पक्षाला डाव्यांचें महत्त्व मान्य करावेंच लागेल. व त्यापुढें कॉंग्रेसमुळें दोन्ही पक्षांत खरी व टिकाऊ एकी घडून येईल. आज अशी एकी अशक्य आहे. एकी झाल्यावर आम्ही पूर्ण स्वराज्याची मागणी करूं. तिला सत्याग्रहाचा पाठिंबा असेलच. अशी एकी झाल्यापासून ब्रि. सरकारला आपली मागणी मान्य करावी लागेल. याचा अर्थ असा कीं आमचा कार्यक्रम प्रथम सर्व डाव्या गटांची संघटना स्थापन करणें, मग कॉंग्रेसमध्यें



सरसेनापति सुभाष      सेनापति बापट

एकी घडवून आणणें, व त्यानंतर पूर्ण स्वराज्याच्या मागणीची घोषणा करणें असा आहे ! ”

## तुफानी प्रचार

सुभाषबाबूंचा कॉंग्रेसशीं मतभेद आतां स्पष्ट झाला होता. पुरोगामी गट म्हणजे एका युद्धोत्सुक, साम्राज्यविरोधी लोकांचा गट तयार करण्याच्या मार्गाला ते लागले होते. मुंबईची पुरोगामी गटाची परिषद संपल्यानंतर त्यांनीं महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, मध्यप्रांत वगैरे प्रांतांत प्रचारास सुरुवात केली. सुभाषचंद्रांच्या या पुरोगामी गटांत कॉंग्रेसमधील अनुभवी कार्यकर्ते येत होते. सरदार शार्दूलसिंग कवीश्वर, कॉ. रुईकर, मुकुंदीलाल सरकार, सेनापति बापट, श्री. कामत, यांसारखीं उत्साही, ज्वलन्त हृदयाचीं माणसें त्यांनीं आपल्या बाजूचीं केलीं. त्यांच्या संघटनकौशल्यानें अनेक माणसें त्यांनीं जोडलीं. एक प्रभावी गट म्हणून सुभाषबाबूंच्या पुरोगामी गटाचें नांव रूढ होऊं लागलें. भारताला एकच संदेश त्यांना द्यावयाचा होता. तो म्हणजे— “ स्वातंत्र्याचा मार्ग रणमैदानांतून जातो, असेंब्लींतून नाहीं. कौन्सिलांत रचनात्मक कार्यक्रम करून स्वराज्य मिळेल अशी भावना आजच्या राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांत उत्पन्न झाली आहे. स्वातंत्र्य-युद्धांत सर्वांत मोठें हत्यार, सर्वांत महत्त्वाची गोष्ट असेल तर ती म्हणजे क्रांतीची मनोवृत्ति ज्वलंत असणें ही होय. हेंच कारण पुरोगामी गटाच्या स्थापनेचें आहे ! ”

## महायुद्धास सुरुवात

हिटलरनें १ सप्टेंबर १९३९ या दिवशीं रणशिंग फुंकलें. म्युनिक कराराच्या चिंधडया उडवून आपल्या राष्ट्राला झालेली जखम भरून काढण्याचा निर्धार त्यानें जाहीर केला. सुभाषबाबूंनीं तर स्वतः हिटलरला भेटूनच युरोपमध्यें असतांना विचारलें होतें कीं ‘ तुम्ही युद्ध केव्हां सुरू करणार ? ” कारण राष्ट्राच्या दृष्टीनें युद्धकाल हा एक पर्वणीचा काल असतो.

एकाद्या नैसर्गिक उत्पातानें जसें मानवी जीवन अस्थिर होतें तसेंच जगाच्या एका भागांत रणकुंड पेटलें कीं त्याची झळ दुसऱ्या भागाला लागते. गुलाम राष्ट्राच्या दृष्टीनें ही संवेदना अत्यवश्यक असते. कारण युद्धकाल गुलाम राष्ट्राच्या दृष्टीनें मोलाचा, महत्त्वाचा काल असतो. “ कालः सुप्तेषु जागर्ति । कालोहि दुरतिक्रमः । ” असें जें महाभारतकारांनीं वर्णन केलें तें युद्धकालाचेंच असेल.

सुभाषबाबूंनीं हें ओळखून युद्ध सुरू होण्यापूर्वींच हरिपुरा कॉंग्रेसमध्यें भारताला इषारा दिलेला होता.

हें युद्ध सुरू होणार म्हणूनच ब्रिटिशांना आतां अंतिम खलिता पाठवावा असा आग्रह त्यांनीं त्रिपुरी कॉंग्रेसमध्यें धरला होता.

युद्ध सुरू झाल्यानंतर दिलेल्या एका मुलाखतींत सुभाषबाबूंनीं सांगितलें— "आमच्या म्हणण्याप्रमाणें त्रिपुरी कॉंग्रेसमध्यें ब्रिटिश सरकारला सूचना दिली असती व लढयाची सिद्धता केली असती तर आजच्या सुवर्णसंधीचा उपयोग करून घेतां आला असता. सर्वांनीं एक होऊन चढाईचा कार्यक्रम आंखून हिंदुस्थानांतील मनुष्यबळ व द्रव्यबळ ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या रक्षणासाठीं द्यावयाचें नाहीं असा निर्धार करूं या!"

सुभाषबाबूंच्या अगदीं विरुद्ध गांधीजींचें मत होतें. त्यांची सहानुभूति इंग्लंडच्या बाजूनें होती. त्यांनीं म्हटलें—

"I was very sorry to find myself alone in thinking that whatever support to be given to the British should be given unconditionally."

युद्धविषयक धोरणाचा विचार करण्यासाठीं वर्किंग कमिटीची सभा भरली. तिला सुभाषबाबूंना ते हद्दपार असूनमुद्धां बोलाविण्यांत आलें होतें. त्यांचीं मतें स्पष्ट होतीं. नव्हे ते युद्धकालाची वाटच पाहात होते.

त्यांनीं पुढाऱ्यांना सांगितलें कीं—" ब्रिटन या युद्धांत थोडयाच वेळांत दुर्बल बनेल नि मग हिंदुस्थानचें सहाय्य मिळविण्यासाठीं तें कॉंग्रेसशीं तडजोड करायला तयार होईल हें चूक आहे. युद्ध प्रत्यक्ष चालू असतांना ब्रिटन कितीहि दुर्बल झालें तरी, हिंदुस्थानांतील आपली सत्ता सोडण्यास तें कधींच तयार होणार नाहीं."

पण कॉंग्रेस पुढाऱ्यांना तें पसंत पडलें नाहीं. त्यांना तडजोडीची आशा वाटत होती. पुरोगामी गटाच्या कार्यकारिणीनें आपला युद्धविषयक ठराव केला. चालू युद्ध हें ब्रिटननें साम्राज्यशाही टिकविण्यासाठींच आरंभिलें असून त्यामुळें युद्ध-सहकार्य अशक्य आहे असें जाहीर केलें. कॉंग्रेस व. क. नें मात्र युद्धहेतूंची विचारणा केली.

ऑक्टोबर १९३९ मध्यें व्हाईसरायनें जुनेंच गाणें पुन्हां म्हटलें. युद्धोत्तर वसाहतीच्या स्वराज्याची घोषणा केली. सुभाषबाबूंचा अंदाज खरा ठरला. या

घोषणेवर मत देतांना त्यांनीं सांगितलें— " व्हाइसरायांची घोषणा आमच्या अंदाजाप्रमाणेंच आली. त्यामुळें आम्हीं आतांपर्यंत जी भूमिका स्वीकारली आहे तिचें समर्थन होत आहे. ज्यांना नव्या युगाचा अवतार होणार अशी अपेक्षा होती त्यांना आतां तरी आमचा दृष्टिकोन पटेल व ते आमच्याशीं एकजूट करतील अशी आशा आहे."

## तडजोडीची आशा

कॉंग्रेसचें युद्धविषयक धोरण असें हेलकावे खात होतें. सुभाषबाबूंनीं लढ्याचा नेट धरला होता. संधि फुकट चालली असें त्यांना क्षणाक्षणाला वाटत होतें. गांधीजींना तर तडजोडीची आशा वाटत होती. सुभाषबाबूंच्या तडजोडविरोधी मतावर गांधीजींनीं आपले विचार प्रकट करतांना लिहिलें:—

" I am not toiling for a fight. I am trying to avoid it. I wholly endorse Mr. Subhash Chandra Bose's charge that I am eager to have a compromise with Britain if it can be had with honour. But I have not lost faith in Britain. I like the latest pronouncement of Lord Linlithgow. I believe in his sincerity."

भावार्थ हा कीं, " मी लढा टाळण्याचा प्रयत्न करीत आहें. सुभाषचंद्र बोस यांचा मी ब्रिटनशीं तडजोड करण्यास उत्सुक आहें हा आरोप बरोबर आहे. माझा ब्रिटनवरील विश्वास अजून ढळला नाहीं. व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगो यांची अलीकडची घोषणा मला आवडली. मला त्यांच्या कळकळीविषयीं विश्वास वाटतो !" गांधीजींच्या धोरणाची छाप कॉंग्रेसवर पडली असल्यास नवल नाहीं. सुभाषबाबूंची मतप्रणालि याच्या अगदीं सर्वस्वीं विरुद्ध होती. शत्रूला— " अवचित गांठुनि, ठकवुनि, भुलवुनि कसाहि ठेंचावा !" हें त्यांचें सूत्र होतें. काळानें पुढें तेंच योग्य ठरविलें.

## समेटविरोधी परिषद

रामगडचें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. डावे–उजवे हा भेद तीव्र होत चालला होता. कॉंग्रेसच्या युद्धविषयक धोरणासंबंधीं असंतोष अनेक ठिकाणीं प्रदर्शित केला जात होता. रामगडला राष्ट्रसभेचें अधिवेशन चालू असतांनाच सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालीं अखिल भारतीय समेटविरोधी परिषद भरली. सुभाषबाबूंनीं

अध्यक्षीय भाषण फार दूरदर्शीपणानें केलें. राष्ट्रापुढें जो एक पेंचप्रसंग उभा होता तो सोडवावा कसा याचें मार्गदर्शन त्यांनीं केलें.—" आज हिंदुस्थानांत निर्माण झालेला प्रसंग हिंदुस्थानच्या इतिहासांत अभूतपूर्व आहे. परंतु जगाच्या इतिहासांत नवीन नाहीं. संक्रमणाच्या अवस्थेंत असा पेंचप्रसंग निर्माण होतच असतो. एका नव्या युगाचा उदय आज भारतांत होत आहे नि आपण सर्व त्या नवयुगाचा उषःकाल पहात आहोंत. साम्राज्यशाहीच्या युगाचा अंत होत असून स्वातंत्र्य, लोकशाही नि समाजवाद यांचें युग येत आहे. हिंदुस्थान आज इतिहासाच्या ह्या दोन रस्त्यांच्या वाटेवर उभा आहे. त्या नव्या संक्रमणाचा वारसा आपण प्रयत्न केला तर आपणांसहि मिळेल. पुरातन गोष्टींचा नाश होत असतांना माणसांचीं मनें गोंधळून जावींत यांत आश्चर्य नाहीं. जुन्या गोष्टींच्या राखेंतून नवीन गोष्टी जन्माला येतात म्हणून आजच्या अनिश्चित कालांत आपण आपला स्वतःवरील, देशबांधवांवरील वा मानवतेवरील विश्वास कायम ठेवूं या. कारण अविश्वास ठेवणें म्हणजे महान् आपत्ति ओढवून घेणें आहे. अशा पेंचप्रसंगांतून राष्ट्रीय पुढाऱ्यांची कसोटी लागते आज आपल्या देशांतील नेतृत्व कसोटीला लागत आहे नि दुर्दैवानें त्यांत कांहींतरी कमीपणा आढळून येत आहे. आपण त्याचें कारण शोधलें पाहिजे नि इतिहासाच्या ज्ञानाच्या जोरावर, आपण आपला उज्ज्वल भविष्यकाल घडविला पाहिजे.

आजच्या सुवर्णसंधीचा फायदा आपण घेऊं आणि शक्य तेवढ्या लवकर कार्यास लागूं."

## स्वातंत्र्यमार्गाचें चिंतन

१९४० च्या जूनमध्यें पुरोगामी गटाची परिषद नागपूरला भरली होती. यानंतरच सुभाषबाबूंच्या मनांत हिंदुस्थानच्या आगामी संग्रामासंबंधीं प्रश्न उपस्थित झाला. पुरोगामी गटानें देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठीं एक कार्यक्रम ठेवावयाचा असें ठरलें होतें. कॉंग्रेसला लढा सुरू करणें भाग पडावें या हेतूनें निरनिराळ्या स्थानिक कारणांनीं लढे सुरू करावेत असा आदेश दिला गेला. या आदेशाप्रमाणें बंगाल हॉलवेल स्मारकाचें प्रकरण उद्भवलें नि पुढें जनतेचा विजय झाला. तें स्मारक हलविलें गेलें. प्रयागमध्यें १९४२ च्या धर्तीवर एक लढा चालला होता.

सुभाषबाबूंच्या मनांत हिंदुस्थानांतील भावी संग्रामासंबंधीं काय कल्पना होती हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून कळेल.

क्रांतिदेवतेचे सुपुत्र



सुभाषचंद्र सावरकर

" या युद्धाचे जगावर काय परिणाम होतील? युद्धाचा शेवट कसा होईल? हिंदुस्थानबाहेर जे हिंदी लोक आहेत त्यांच्या कल्पना काय आहेत? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल त्यांच्या डोक्यांत काय चाललें आहे? हिंदुस्थानला स्वराज्य मिळावें यासाठीं त्यांचें साहाय्य कसें मिळवितां येईल? ब्रिटनच्या शत्रूंकडून कांहीं भरीव साहाय्य त्यांच्या वतीनें मिळविणें शक्य आहे का? हे प्रश्न आम्हांला सतावीत होते. म्हणून हिंदुस्थानबाहेर कोणाला तरी पाठविणें आवश्यक आहे असें आमच्या मनांत आलें."

नुकतीच अशी माहिती बाहेर आली आहे कीं, सुभाषबाबूंच्या सांगण्यावरून लाला शंकरलाल नांवाचे एक कार्यकर्ते जपानमध्यें जाऊन तेथील परिस्थिति पाहून आले होते. एक गोष्ट निश्चित आहे कीं जून १९४० नंतरचे ६ महिने सुभाषबाबूंच्या पुढील कार्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे होते. त्यांची पूर्ण माहिती मिळणें अशक्य आहे.

याच वेळीं सुभाषबाबूंना हॉलवेल स्मारकानिमित्त भारतसंरक्षण कायद्याखालीं अटक झाली. सुभाषबाबूंच्या एका भाषणाबद्दल व "The Day of reckoning" या लेखाबद्दल अटक करण्यांत आली असें सांगण्यांत आलें.

## अन्नत्याग

सुभाषबाबूंची तुरुंगांत रवानगी झाली. त्यांना झालेली अटक अनपेक्षित नव्हती तरी त्यांच्या कार्यांत अडचण निर्माण करणारी होती. तेव्हां सुभाषबाबूंनीं त्या अडचणींतून बाहेर पडण्यास एक उपाय योजला. त्यांनीं अन्नसत्याग्रह करण्याचें ठरविलें. पेडॉंग येथें भाषण करतांना सुभाषबाबूंनीं म्हटलें होतें,

" माझें कर्तव्य पार पाडीत असतांना मरण आलें तरी तें पत्करण्यास पुरेसें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं प्रार्थना व चिंतन करीत मीं पुरे तीन महिने घालविले. हिंदुस्थानांतून निसटावयाचें तर त्यापूर्वीं आधीं तुरुंगांतून निसटलें पाहिजे. तरच हिंदुस्थानांतून निसटणें शक्य होतें. म्हणून माझ्या सुटकेच्या मागणीसाठीं मीं अन्नसत्याग्रह सुरू केला. हिंदुस्थानांत वा आयर्लंडमध्यें अशा रीतीनें आपली सुटका करून घेण्याची युक्ति कोणाहि बंद्याला साधली नाहीं हें मला ठाऊक होतें; सरकारला नमविण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांत टेरेन्स मॅक्स्विनी व जतीन दास यांना मृत्यु पत्करावा लागला आहे हेंहि मला ठाऊक होतें; परंतु

हातून एक प्रचंड ऐतिहासिक कार्य व्हावयाचें आहे अशी माझी खात्री झाली म्हणून मीं त्या प्रयत्नांत उडी घेतली. सात दिवसांच्या अन्नत्यागानंतर सरकारचा अनपेक्षितपणें धीर सुटला नि पुन्हां एकदोन महिन्यांनीं मला परत आणण्याचें योजून त्यांनीं मला मोकळें केलें. पण त्यांनीं मला पुनः पकडण्यापूर्वींच मी स्वतंत्र झालों!"

यावरून सुभाषबाबूंनीं कुठल्या उद्देशानें अन्नत्याग सुरू केला हें स्पष्ट होईल. सुभाषबाबूंनीं साम्राज्यशाहीला एक इशारा देणारें पत्र दि. २६ नोव्हेंबर १९४० ला बंगालच्या गव्हर्नरला लिहिलें. तें पत्र म्हणजे सुभाषबाबूंच्या जीविताचें तत्त्वज्ञान आहे. राष्ट्रभक्तीची उदात्त भावना, त्यागाची परिसीमा नि आत्मयज्ञाची तयारी या सर्व गोष्टी त्या पत्रांत आढळतात. त्यांनीं लिहिलें आहे,

" गेले दोन महिने, किंबहुना त्याहूनहि अधिक काल एकच प्रश्न माझ्या विवेकबुद्धीला एकसारखा धक्का देत आहे आणि तो हाच कीं, अशा खडतर अवस्थेंत माझें कर्तव्य काय ? प्राप्त परिस्थितीच्या दडपणाखालीं लाचारी पतकरून जें येईल त्याला मान तुकवावयाची किंवा मला वाटणाऱ्या पक्षपाती, अन्याय्य आणि बेकायदा गोष्टींचा प्रतिकार करण्याकरितां ठाण मांडून उभें राहावयाचें ? पूर्ण विचारानंतर माझ्या बुद्धीनें परिस्थितीला शरण जाणाऱ्या कार्पण्य वृत्तीला हृदयांतून पार हांकलून दिलें आहे. कारण स्वतः अन्यायी आचरण करण्यापेक्षांहि आपणांवर लादल्या गेलेल्या अन्यायी कृत्यापुढें मान तुकविणें हें निंद्यतम पाप आहे. अर्थात् अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे.

चालू घडींतील प्राप्त जीवन मला अगदीं असह्य झालें आहे. अन्याय नि बेकायदेशीरपणा यांच्याशीं तडजोड करून निरर्थक चैतन्याभास निर्माण करणारे केवळ भात्यासारखे श्वास त्याच्या मोलांत विकत घेणें माझ्या रक्तांतच नाहीं. अशा प्रकारें जीविताचा विक्रय करण्यापेक्षां मी प्राणहि झुगारून देईन. पाशवी शक्तीनें मला बंदिशाळेंत डांबून टाकण्याचा सरकारनें निर्धार केलेला दिसतो. नि त्याला माझें प्रत्युत्तर हेंच. —' एक मला मुक्त तरी करा किंवा मला मरूं द्या ! जिवंत राहाणें वा मरणें माझ्याच स्वाधीन आहे ! '

प्रस्तुत कालीं आपल्या कृतींत कोणताहि दृश्य व लगेच दुसऱ्याक्षणीं दाखविण्याजोगा लाभ दिसत नसला तरी आत्मयज्ञ हा कधींच निष्फळ होत नाहीं. सर्व कालीं सर्व राष्ट्रांत एकच शाश्वत नियम विजयी झालेला दिसतो. तो म्हणजे हुतात्म्यांच्या रक्तमांसानेंच यशोमंदिरें उभारलीं जातात !

या नश्वर जगांत प्रत्येक गोष्ट नष्ट होणारी आहे. फक्त विचार आणि ध्येयें नष्ट होत नाहींत. एका विचाराच्या मागें लागून एखादी व्यक्ति मृत्यु पावेल, पण त्याच्या मृत्यूनंतर तोच विचार हजारों लोकांमध्यें अवतरेल. असें हें विश्वचक्र आहे. एका पिढीचे विचार दुसरी पिढी आत्मसात् करून यशस्वी ठरते.

म्हणून एखाद्या तत्त्वाकरितां आयुष्यभर धडपड केली व त्यांतच मृत्यु पत्करला तर वरील विचाराच्या जाणीवेनें केवढें तरी समाधान मिळणार आहे. आपल्या तत्त्वांचा पुनर्जन्म होणार यापेक्षां अधिक समाधान तें कशानें होणार? आपल्या तत्त्वाच्या वेदीवर आहुति देतांना यापेक्षां अधिक काय मिळणार? म्हणून त्यागांत आपण कोणतीहि गोष्ट गमावून बसत नाहीं. कारण त्याचें फल दुप्पट मिळतें. व्यक्तीनें मृत्यूला कवटाळल्यामुळें जर राष्ट्र जगत असेल तर तो अवश्य स्वीकारावा. हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून मी आज मृत्युमुखांत उडी टाकत आहें!"

चिता हेंच सिंहासन मानणाऱ्या या महान् देशभक्ताचे विचार किती उदात्त आहेत! हे विचार म्हणजे राष्ट्राच्या उत्थानाचा मंत्र आहे कीं हंसत हंसत यज्ञकुंडांत उडी घेणाऱ्या ऐखाद्या योग्याची स्थितप्रज्ञ वृत्ति सुभाषबाबूंच्या अंतःकरणांत उभी होती. हुतात्म्याचें तेज त्यांच्या मुखावर झळकत होतें आणि मृत्यूला आवाहन करीत ते म्हणत होते—

शरिराचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार! मरणा, सुखेनैव संहार!

## मुक्तता

परंतु सुभाषबाबूंच्या या अदम्य आत्मबलापुढें सरकार नमलें. सुभाषबाबूंची युक्ति यशस्वी झाली. सुभाषबाबूंना तुरुंगांत मरूं देणें म्हणजे ज्वालामुखीवरील झांकण उडवून भडका उडविण्यासारखें आहे याची कल्पना सरकारला होतीच.

सुभाषबाबूंची ५ डिसेंबर १९४० ला मुक्तता झाली. यानंतर सुभाषबाबूंनीं बंगाल प्रांतिक कॉंग्रेस कमिटीसंबंधीं मौ. आझादांशीं पत्रव्यवहार केला. बाकी कुठलीहि हालचाल केली नाहीं.

एका महाप्रयाणाची ते सिद्धता करीत होते. वादळापूर्वीची ती शांतता होती. देशासाठीं जी उग्र तपश्चर्या पुढें ते करणार होते त्याची ती तयारी होती. शिवाजी महाराजांनीं आग्र्याला जाण्यापूर्वीं महाराष्ट्रांत जी निरवानिरव केली त्याच प्रकारची निरवानिरव सुभाष करीत होते.

हिंदुस्थानला एक आश्चर्याचा धक्का बसणार होता!

# तो अद्भुत प्रसंग १

अकस्मात् एक दिवस हिंदुस्थानला एका बातमीनें आश्चर्याचा धक्का दिला ! " सुभाषचंद्र बोस आपल्या घरांतून अदृश्य झाले ! " सर्व भारतीय जनतेसमोर एकच मोठें चिन्ह उभें राहिलें—सुभाषबाबू कोठें गेले ?

दि. २६ जानेवारी १९४१ ला हें वृत्त प्रकट झालें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-दिनाचे दिवशीं अदृश्य होणारा हा महान् पुढारी कोठें गेला असेल ? अनेक प्रकारचे अंदाज प्रसिद्ध होऊं लागले. जणूं कांहीं साऱ्या हिंदुस्थानच्या वतीनें गांधीजींनीं शरद् बोसना तार केली नि विचारलें—सुभाष कोठें आहेत ?

इंग्रज सरकारच्या गोटांत कसलें वातावरण पसरलें असणार ? कंसाच्या कारागृहांतून श्रीकृष्णाची सुटका झाल्यानंतर कंसाच्या छातींत धडकी भरली—त्याला वाटलें कीं, आपला वध करण्यासाठीं जन्मलेला श्रीकृष्ण आपल्या तावडींतून सुटला, आतां काय ? तशीच स्थिति सरकारची झाली असल्यास नवल नाहीं. ब्रिटिश सरकारचें गुप्त हेरखातें म्हणे मोठें चतुर, परंतु त्यांच्या हातावर तुरी देऊन सुभाष गेले. साम्राज्यसरकारचा तो मोठा पराभव होता.

सुभाष कां गेले ?

सुभाष कोठें गेले ?

सुभाष कसे गेले ?

हे तीन प्रश्न सर्वांच्या डोळ्यांसमोर होते.

सुभाषचंद्रांचें सर्व आयुष्यच अनेकविध घटनांनीं भरलेलें आहे, त्यांची वृत्ति आध्यात्मिक आहे म्हणून कांहींनीं अंदाज केला कीं त्यांनीं संन्यास घेतला. त्रिपुरी काँग्रेसनंतर त्यांनीं एका लेखांत तशा प्रकारचा विचार प्रकट केला होता. खुद्द सरदार शार्दूलसिंग कवीश्वर यांनीं वार्ताहारांना असेंच सांगितलें.

अर्थात् हें राजकीय सत्य ( ? ) होतें हें सांगण्याची जरूरीच नव्हती. कारण सुभाषचंद्रांचें अंतःकरण जनतेला माहीत होतें. ज्या स्वातंत्र्याचा ध्यास सुभाषबाबूंना लहानपणापासून लागला होता त्याच महान् ध्येयाच्या सिद्धीसाठीं सुभाष गेले असणार अशी जनतेच्या अंतर्मनानें ग्वाही दिली.

## बेचैन मनःस्थिति

आपली प्रिय मातृभूमि सोडतांना सुभाषचंद्रांच्या अंतःकरणाची स्थिति काय झाली असेल ? युद्ध सुरू झाल्यापासून सुभाषबाबूंच्या मनांत एकच एक विचार थैमान घालीत होता. स्वातंत्र्ययुद्ध ! त्यांनीं ओळखलें होतें कीं हिंदुस्थानचें गतस्वातंत्र्य मिळविण्याचा काल जवळ येत आहे. कारण ब्रिटिशांचें संकट ती हिंदुस्थानची सुसंधि हें त्यांचें तत्त्व होतें. म्हणून ते तळमळून हिंदुस्थानांतील समाजाला सांगत होते.

नका संधि दवडूं वाया अशी अमृताची
पर्वणी ही मांगल्याची आली या क्षणाला !

पण दुर्दैव ! जनतेला तें पटलें नाहीं. भारतीयांना कल्पना आली नाहीं कीं एका महान् राष्ट्रवीराच्या नेतृत्वाला मुकावें लागणार आहे. एकच विचार सुभाषबाबूंचें अंतःकरण जणूं कांहीं जाळीत सुटला होता—

" सुवर्णसंधि चालली ! "

परंतु निराशेला वाव न देतां त्यांनीं एक कठोर निश्चय मनांत केला नि जणूं कांहीं भारतमातेला विचारलें—" जाऊं ? " दुसऱ्या कोणावरहि न विसंबतां केवळ स्वतःच दास्यमुक्तीच्या श्वासानें बेचैन होऊन सशस्त्र क्रांतीचें स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून त्यांनीं हिंदुस्थान सोडला. तें स्वप्न त्यांनीं खरें करून दाखविलें, नि भारतीय क्रांतियुद्धाचा प्रणेता असा इतिहासाचा मानाचा मुजरा मिळविला.

## अनेक तर्क

१९४२ सालीं मे महिन्यांत बर्लिन नभोवाणीवर सुभाषबाबूंनीं हिंदुस्थानला उद्देशून एक भाषण केलें. त्या वेळीं कळलें कीं सुभाष जर्मनींत आहेत. तें भाषण म्हणजे युद्धार्थ आवाहन होतें. १९४२ सालींच हिंदुस्थान सरकारनें सुभाषबाबू शत्रुराष्ट्रांना मिळाल्याचें घोषित केलें. कोणीं त्यांना "क्विस्लिंग" या नीच विशेषणानें संबोधलें. पण हें सारें हिंदुस्थानांत म्हणूनच सहन केलें गेलें?

इतकें जरी झालें तरी सुभाष कसे गेले हा एक गूढ प्रश्नच होता. त्याविषयीं लोकांनीं आपल्या कल्पनाशक्तींतून अनेक कल्पना निर्माण केल्या. ते जपानी बोटींतून गेले, जपानी पाणबुडींतून जपानी माणसाचा वेष करून गेले इतकेंच काय स्त्रीचा वेष करून गेले असाहि तर्क लढविण्यास लोकांनी कमी केलें नाहीं.

हिंदुस्थानांतील कम्युनिस्ट पक्षानें सुभाषबाबूंना मदत करण्याचें आश्वासन दिलें होतें अशीहि एक बातमी मधें प्रसिद्ध झाली होती. रशियानें हिंदुस्थानला १९४० मध्यें मदत देऊं केली होती नि ती कॉंग्रेसनें नाकारली असेंहि त्यांत होतें. सुभाष हे फॅसिस्ट समजले जात असल्यानें कम्युनिस्टांनीं त्यांना मदत करावी कीं नाहीं याचा विचार केला. ते फॅसिस्ट नाहींत अशी खात्री पटल्यावर असें ठरविलें कीं सुभाष बोसना मदत करण्यास हरकत नाहीं. त्यांच्याबरोबर मॉस्कोपर्यंत जाण्यासाठीं कम्युनिस्ट कार्यकर्ता जाणार होता. कम्युनिस्टांनीं पुढें दगा दिला, असें म्हणतात. परंतु या वृत्तानंतर दुसरें कुठलेंच वृत्त प्रसिद्ध झालें नाहीं. एक गोष्ट निश्चित दिसून येते कीं रशियाच्या मदतीची अपेक्षा सुभाषबाबूंना होती नि त्यासाठीं त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न चालविले होते.

## झियाउद्दिन पठाण

लाला उत्तमचंद नांवाच्या काबूलच्या गृहस्थांनीं सुभाषबाबूंना ४८ दिवस आपल्या घरांत आश्रय दिला होता. त्यांनीं जी पलायनाची हकीकत सांगितली आहे ती साधार व खरी समजण्यास हरकत नाहीं.

*सुभाषबाबूंनीं अदृश्य होण्याची तयारी सुरू केली होती. आजारी असल्याचें प्रकट करून कोणालाहि भेटण्यास परवानगी दिली नाहीं. इतकेंच काय नातेवाईकांनासुद्धां खोलींत येण्यास बंदी केली. जणूं कांहीं अध्यात्मसाधना चालू आहे अशा परिस्थितींत ४० दिवस काढले.

* ही सर्व माहिती "नेताजींचें सीमोल्लंघन" या पुस्तकांतून घेतली आहे

१५ जानेवारी १९४१ ला प्रयाणाची व्यवस्था पूर्ण झाली. ती व्यवस्था कोणीं केली हें अद्याप अज्ञात आहे. मात्र सुभाषबाबूंनीं आपल्या पुरोगामी अनुयायांजवळ परदेशांत कोणी तरी जाऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करणें जरूर आहे असें सांगितलें होतें. परंतु त्या कार्याला लायक–सर्व दृष्टींनीं–असे सुभाषच होते. म्हणून सुभाषबाबू स्वतः जाण्यास निघाले.

चुडीदार पायजमा, शेरवानी, डोक्यावर फेज, दाढी वाढविलेली अशा थाटांत सुभाष घराबाहेर पडले, १५ किंवा १६ जानेवारीला सुभाषबाबूंनीं घर सोडलें असावें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां हा झियाउद्दिन मौलवी घराबाहेर पडला. रात्रीं आठ वाजतां एका मोटारींतून चाळीस मैल लांब असलेल्या एक बिनमहत्त्वाच्या स्टेशनवर सुभाष गेले नि तेथें पेशावरला जाणाऱ्या आगगाडींत बसले. त्यांच्याबरोबर कोणीतरी तरुण होता.

दि. १७ जानेवारीला रात्रीं ९ वाजतां सुभाषबाबू पेशावरला पोहोंचले. तेथें त्यांनीं दोन दिवस मुक्काम केला. तेथून त्यांच्याबरोबर काबूलला जाण्यासाठीं एक पंजाबी तरुण–भगतराम–नांवाचा गेला होता. त्या दोघांनीं पठाणी वेष चढविला. सुभाषबाबूंना पुश्तु भाषा येत नसल्यानें त्यांनीं बहिऱ्या मुक्याचें सोंग घेण्याचें ठरविलें.

सुभाषबाबू व भगतराम यांनीं पेशावर सोडलें व काबूलला जाण्यासाठीं निघाले. मोटारनें जमरुद किल्ल्याजवळ गडी या गांवीं पोहोंचले. तेथून काबूलला पायीं जाण्यास ते निघाले. तो आडरस्ता असल्याकारणानें त्यांचे खूप हाल झाले. त्यांनीं आपल्याबरोबर दोन हत्यारबंद पठाण आपल्या संरक्षणासाठीं घेतले. वाटेंत लालपुऱ्याला पोहोंचल्यानंतर सुभाषबाबूंनीं तेथील एका खानाकडून परिचयपत्र घेतलें. त्याचा पुढें एका गुप्त पोलिसाची खात्री पटविण्यास उपयोग झाला.

## तो थंडींतला प्रवास

सुभाषबाबू नि भगतराम शेवटीं चालत चालत काबूल नदीपर्यंत येऊन पोहोंचले. काबूल नदी ओलांडून त्यांनीं अफगाण हद्दींत प्रवेश केला. चालून प्रवासाचा शीण आलेला होता. त्या त्रासांत भर म्हणून थंडी होतीच. एका मालाच्या लॉरींतून सुभाषबाबू काबूलकडे जात होते. वरून बर्फ पडत होतें. डोकेंच काय तें गारठायाचें राहिलें होतें. बाकी सर्व शरीर बधिर झालेलें.

वाटेंत पासपोर्टाची तपासणी करण्यांत आली. त्यांना सांगण्यांत आलें कीं झिया-उद्दिन हा बहिरा मुका आहे व तो साखीसाहेबाच्या यात्रेला चालला आहे.

अशा रीतीनें झियाउद्दिन साहेब काबूलला येऊन पोहोंचले. पण तेथें उतरणार कोठें ही पंचाईतच होती.

२१ जानेवारीला सुभाषबाबू नि त्यांचा सहकारी काबूलला येऊन पोहोंचले. एका खानावळींत १०।१२ दिवस मुक्काम केल्यानंतर भगतरामनें त्याच्या ओळखीचे काबूलचे व्यापारी लाला उत्तमचंद यांचा तपास केला. काबूलच्या सराईची आठवण जन्मभर राहील इतकी ती गलिच्छ होती. थंडीनें तर सूडच उगवावयाचें ठरविलें होतें. अन्नाची टंचाई, अंग गारठलेलें अशा हालांत सराईत दिवस काढले. दुसरी एक आपत्ति सुभाषबाबू नि त्यांचा सहकारी यांच्यावर कोसळत होती. अफगाणी गुप्त हेरांनीं सुभाषबाबूंना त्रास देण्यास सुरुवात केली. लांच देऊन सुभाषबाबूंनीं त्याला टाळण्याचा प्रयत्न केला. पण त्याची भूक सारखी वाढतच होती.

शेवटीं लाला उत्तमचंद या हिंदी व्यापाऱ्यानें सुभाषबाबूंना आपल्या घरीं नेलें. लाला उत्तमचंद यांचेकडे सुभाषबाबूंची उत्तम व्यवस्था झाली.

## परराष्ट्रीय वकिलातीशीं संधान

ज्या हेतूनें सुभाषबाबूंनीं देशत्याग केला होता तो पूर्ण करण्याची खटपट त्यांनीं सुरू केली. काबूलमध्यें अनेक युरोपियन राष्ट्रांच्या वकिलाती होत्या. सुभाषबाबूंची इच्छा रशियाची मदत घेण्याची होती. परंतु भाषेच्या अडचणीमुळें त्यांना तें जमविण्यास प्रथम खूपच त्रास पडला. रशियाला जाण्याचा हेतू सांगतांना सुभाषबाबू म्हणाले होते,

" मी रशियाची मदत मागणार आहें. त्यासाठीं मी चिकाटीचा प्रयत्न करीन. त्यांत मला यश न आलें तर मी सतत ब्रिटिशविरोधी प्रचार करीन. "

## रशियाची दिरंगाई

सुभाषबाबू रशियाच्या मदतीची अपेक्षा करीत होते. परंतु त्या रशियन वकिलानें काबूलला आलेले गृहस्थ सुभाषचंद्र बोसच आहेत अशी खात्री पटल्याशिवाय आम्हांला मदत करतां येणार नाहीं अशी सबब सांगून सुभाषबाबूंच्या सहकाऱ्याला वाटेला लावलें. पेशावरला सुभाषबाबूंच्या परिचयाचा कोणी

कार्यकर्ता होता त्याच्याकडे निरोप पाठविला. परंतु दिवस तर जातच होते, आणि आशा तर कोठेंच नव्हती. अशा आशा-निराशा यांच्या वावटळींत सुभाष सांपडले होते.

## इटालियन वकिलाची मदत

रशियनांनीं सहाय्य नाकारल्यासारखें वाटून सुभाषबाबूंच्या मनांत दुसरेच एक द्वंद्व निर्माण झालें. सुभाषबाबूंनीं आपल्या रहमतखानला इटालियन वकिलाकडे पाठविलें. अगदीं शेवटचा उपाय म्हणून सुभाषबाबूंनीं अक्षराष्ट्रांची मदत घेण्याचें ठरविलें. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें आशादायी वृत्त त्यांना कांहीं दिवसांनीं मिळालें— इटालियन वकील कॅरोनीकडून खालील आशयाचें पत्र आलें—

" आपलें पत्र मिळालें. त्याच दिवशीं मीं रोम व बर्लिनकडे आपल्या आगमनाची वार्ता कळविली. ही वार्ता ऐकून उभय राजधानींतील जबाबदार अधिकाऱ्यांनीं आनंद व्यक्त केला असून आपण अत्यंत चातुर्यानें शत्रूच्या हातावर तुरी दिल्या-बद्दल ते आपलें अभिनंदन करीत आहेत. आपणांस सर्वतोपरी सहाय्य करण्याबद्दल मला फर्माविण्यांत आलें आहे. थोड्याच दिवसांत आपल्या प्रयाणाची तयारी पूर्ण होईल—"

सुभाषबाबूंना या आश्वासनामुळें आनंद झाला. तरी रशियाच्या मदतीची अपेक्षा पूर्ण होत नाहीं याच्याबद्दल त्यांना खंत वाटत होती.

फेब्रुवारी महिना सुरू झाला. इटालियन वकिलाकडून निरोप आला नाहीं. पुन्हां काळजी वाटूं लागली.

## सशस्त्र क्रांतीनेंच भारत स्वतंत्र होईल

सुभाषबाबूंनीं हिंदुस्थान सोडल्यापासून त्यांच्या मनांत कुठले विचार घोळत होते याची कल्पना सुभाषबाबूंची जी चर्चा लाला उत्तमचंद यांचेशीं होई त्यावरून दिसून येते. सशस्त्र क्रांति हें सुभाषबाबूंचें ध्येय होतें. तें परराष्ट्राच्या सहाय्यानें साध्य करण्यासाठीं ते निघाले होते.

" सशस्त्र क्रांति करून ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकलून दिल्याशिवाय ते हिंदुस्थान सोडून जाणार नाहींत याबद्दल माझी खात्री आहे. आतांपर्यंत शांततेनें एकाहि राष्ट्राला त्यांनीं स्वातंत्र्य दिलेलें नाहीं. "

## आज्ञांकित शक्तींनेंच भारताचा उद्धार

" जोंपर्यंत हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता आहे तोंपर्यंत हे भेद नष्ट होणार नाहींत. ते सारखे वाढतच राहतील. एकाद्या खंबीर नेत्यानेंच वीस वर्षें हिंदुस्थानवर हुकमत गाजविली तर हे धर्मभेद आपोआप नष्ट होतील—ब्रिटिश राजवटीचा निःपात झाल्यानंतर कांहीं वर्षें तरी हिंदुस्थानांत हुकूमशाही राजवट राहिली पाहिजे. दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या राजवटीनें हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाहीं. भारताला आज केमालपाशासारख्या व्यक्तींची आवश्यकता आहे. "

असें विचारांचें आंदोलन चालू होतें. गट्टी राष्ट्रांच्या बाजूला जावें कीं नाहीं हें एकच या आंदोलनाचें कारण होतें. परंतु रोमहून वा बर्लिनहून बरेच दिवस कोणाचाच निरोप न आल्यानें सुभाषबाबूंना काळजी वाटूं लागली. तेव्हां रशियन सरहद्दींत जाण्यासाठीं दुसरा मार्ग स्वीकारण्याचें ठरलें. रशियन सरहद्दीपर्यंत नेऊं शकणारा कोणी वाटाड्या माणूस मिळविण्याची खटपट सुरू केली. बरेचसे पैसे देऊन त्यांनीं एक मनुष्य मिळविला अफगाणिस्थानांतून रशियाच्या हद्दींत नेणारा एक रस्ता त्याला माहीत होता. त्याची माहिती करून घेतली. आणि अगदीं नाइलाज म्हणून—अनिश्चिततेच्या अंधारांत चांचपडत जाण्यास ते तयार झाले. कारण ते अगोदरच पकडले जाण्याचा संभव होता. परंतु " अंतरींची इच्छा " स्वस्थ बसूं देईना. अफगाणिस्थानच्या नकाशाची पहाणी केली व २-३ दिवसांत रशियाला जाण्यासाठीं निघावयाचें असा निश्चय केला.

## आशेचा किरण

असा जरी थोडासा निराशेचा अंधार पसरला होता तरी त्यांत प्रकाश देणारा एक आशेचा किरण सुभाषबाबूंना दिसला. इटालियन वकिलाकडून ' इटालियन दूत निघाले आहेत व एका आठवड्यांत येतील ' असा निरोप आला. परंतु एक एक दिवस काढणें मोठें धोक्याचें होत चाललं. सुभाषबाबू काबूलमध्यें आहेत हें ४-५ लोकांना कळलेंच होतें. न जाणों ज्या दुर्दैवानें हिंदुस्थानचा पाठपुरावा केला आहे तेंच दुर्दैव आपला घात करावयाचें नि मग........? साऱ्या मनोरथांचा चक्काचूर होऊन जावयाचा.

परंतु सुभाषबाबूंच्या मागें जणूं कांहीं परमेश्वराचा आशीर्वादच होता. हें त्यांचें मानसिक आंदोलन चालूं असतांनाच कॅरोनीकडून एक आनंददायी पत्र आलें—ती

ग्रंथ संग्रहालय

वार्ता सुभाषबाबूंना उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाण्यास आली होती. तें पत्र असें होतें—" आपला परवाना तयार आहे. ३-४ दिवसांत दूत तेथें पोहोंचतील. आपण निघण्याच्या तयारींत राहा ! "

## प्रयाणाची तयारी

१८ मार्च १९४१ ला काबूल सोडावयाचें ठरलें. त्यांना इटालियन वकिलाती-तर्फे मेजवानी देण्यांत आली. जर्मन वेष तयार करण्यांत आला. सुभाषबाबूंचा काबूलला ४८ दिवस मुक्काम होता. त्यांच्या या मुक्कामांत लाला उत्तमचंद यांनीं त्यांना अमोल मदत केली होती.

सुभाषबाबूंनीं उत्तमचंदांचा, त्यांच्या छोट्या मुलीचा निरोप घेतला. त्यांच्या स्वभावांतील गोडवेपणानें त्या मुलीलाहि वेड लावलें होतें. उत्तमचंदाचे आभार शब्दांनीं सुभाषबाबूंनीं मानले. पण त्याहीपेक्षां त्यांच्या डोळ्यांत कृतज्ञता उभी होती. त्या प्रसंगाचें वर्णन कोण करील ?

१८ मार्चला रात्रीं ९ वाजतां सुभाषबाबू निघाले. त्यांचें नांव कॅराटाइन असें ठेवलें होतें. त्यांच्याबरोबर दोन जर्मन व एक इटालियन इसम होता. मोटारनें ते रशियन सरहद्दीपर्यंत गेले व ते तेथून दि. २० मार्चला रेल्वेनें मास्कोला गेले.

मॉस्कोला ते ८ दिवस असावे. या ८ दिवसांत त्यांनीं रशियाची मदत घेण्याची काय खटपट केली हें बाहेर आलेलें नाहीं. परंतु ती यशस्वी न झाल्या-नेंच ते बर्लिनला गेले असावे. एका जर्मन वृत्तपत्रांत सुभाषबाबूंच्या आगमनाची वार्ता पुढीलप्रमाणें प्रसिद्ध केली होती—

"कांहीं दिवसांपूर्वीं हिंदुस्थानांतून आकस्मिक रीत्या अंतर्धान पावलेले हिंदुस्थानचे महान् नेते आणि हिंदी राष्ट्रीय सभेचे माजी अध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस ता. २८ मार्च रोजीं बर्लिन येथें सुखरूप येऊन पोहोंचले ! "

सुभाषबाबूंनींहि काबूल येथील जर्मन वकिलाला पत्र पाठविलें होतें त्यांत उत्तम चंदांना धन्यवाद होते नि कधींहि न विसरण्याइतके उपकार केल्याबद्दल त्यांचा गौरव केला होता.

सुभाषबाबू अशा रीतीनें एका महान् दिव्यांतून पार पडले. ज्या साहसाला जगाच्या इतिहासांत अग्रस्थान द्यावें लागेल असें तें साहस आहे. औरंगजेबाच्या

छातीवर पाय ठेवून पळून जाणारे शिवराय नि या प्रबल ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या चतुर हेरांना सहज चकवून देशत्याग करणारे सुभाष हे एकाच राष्ट्राच्या इतिहासाचे ताईत आहेत. सुभाषबाबूंचें नुसतें बुद्धिकौशल्यच नव्हे तर त्यांच्या प्रत्येक गुणांचा निकष या प्रसंगावर लागला. शारीरिक यातना, मानसिक चिंता, वारंवार येणारीं संकटें यांनीं या त्यांच्या आयुष्यांतील २–३ महिन्यांचा काल भरला आहे. त्यांतील कित्येक रोमांचकारी अज्ञात प्रसंग असे आहेत कीं जे प्रसंग ऐकतांच शाहिरानें आपल्या डफावर थाप मारावी. त्यांतील अनेक युक्त्याप्रयुक्त्या अज्ञात आहेत कीं ज्यांचा भावी क्रांतिकारकांनीं अभ्यास करावा.

शत्रूच्या डोळ्यांदेखत आपला ध्येयध्वज हातांत घेऊन सुभाष देशांतून बाहेर गेले. तो अद्‌भुत प्रसंग जशाच्या तसा कोणाकडून कळेल ?

या अद्वितीय सहसाला—भावी इतिहासकार स्वतंत्र भारताचा शाहीर आपला मानाचा मुजरा दिल्याशिवाय राहणार नाहीं ?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. २५७ ता. दि.
वि. ९१:५१

# स्वतंत्र भारताचे सरसेनापति १०

गाझियोंमें बू रहेगी
जब तलक ईमान की
तब तो लंदन तक चलेगी
तेग हिंदुस्थान की !

— बहादुर शाह.

"जोंपर्यंत भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या अंतःकरणांत श्रद्धेचा किंचित्‌हि अंश राहील, तोंवर हिंदुस्थानची तलवार लंडनच्या हृदयांत खोल खोल रुततच राहील !"

गुलाम राष्ट्र सदैव युध्यमान् असतें. त्याच्यांत शांतता स्वातंत्र्याच्या संस्थापनेखेरीज स्थापन होऊंच शकत नाहीं. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं संग्राम सुरू होतो तेव्हां त्याचा शेवट स्वातंत्र्यानेंच झाला पाहिजे. अन्य कुठलाहि शेवट संभवतच नाहीं. आणि म्हणून एकादेवेळेस कांहीं काल देशांत शांतता दिसली तरी ती खरी शांतता नव्हे. असलीच तर ती स्मशानांतील शांतता असते. स्वातंत्र्याच्या महायुद्धांत ज्या हुतात्म्याचें पहिलें बलिदान होतें त्या बलिदानांतून, त्या आत्मार्पणांतून एक तेजस्वी स्फुलिंग बाहेर पडतो. क्षणमात्र वाटतें कीं, तो विझेल. पण तो विझत नाहीं. त्या एका लहानशा स्फुलिंगांतून एका भयंकर मोठ्या अग्निरूपाचें दर्शन घडतें आणि त्यांतून तावून सुलाखून निघालेलें, त्यांतून शुद्ध झालेलें दीप्तिमान्, तेजःपुंज राष्ट्र निर्माण होतें.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला १८५७ च्या युद्धानें सुरुवात झाली. एकाच महान् उद्देशानें, एकाच पवित्र स्फूर्तीनें त्या युद्धांत असंख्य वीर लढले. सारा भारतवर्ष जणूं कांहीं अग्निदिव्यांतून बाहेर पडला. पण तो भीषण स्वातंत्र्यसंग्राम अयशस्वी झाला. परंतु स्वातंत्र्याचें तत्त्व अमर होतें. त्या युद्धांत ज्या शेंकडों स्वातंत्र्य-योद्धयांना फांसावर चढविलें गेलें त्या फांसावरचें रक्त वाळतें न वाळतें आहे तोंच दुसरी एक ज्वाला उफाळली. वासुदेव बळवंतांनीं एकाकी प्रयत्न केला. त्यानंतर १९०७ ते १९१४ या कालांत १८५७ च्या सुवर्णमहोत्सवाची स्मृति म्हणून सशस्त्र प्रतिकाराचा प्रयत्न " अभिनव भारता "नें केला आणि भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामाच्या इतिहासाचें एक तेजस्वी प्रकरण लिहिलें गेलें. त्यानंतर अत्यंत नवीन पद्धतीनें १९२०, १९३०, १९४२ या वर्षांत स्वातंत्र्यलक्ष्मीच्या स्वागतार्थ लढे झाले. आणि भारताच्या सीमेबाहेर भारताच्याच स्वातंत्र्यार्थ एक महान् युद्ध १९४२–४५ या तीन वर्षांत लढलें गेलें. सशस्त्र क्रांतीचा, एक विराट प्रयत्न झाला. त्या स्वातंत्र्ययुद्धाचे प्रणेते म्हणजे सुभाषचंद्र बोस ! या एकट्या वीरानें बलशाली साम्राज्यशाहीविरुद्ध युद्धाची घोषणा केली. या पुढचें सुभाषचंद्रांचें आयुष्य म्हणजे खरोखर रणांगणावरील आयुष्य आहे. तें इतकें रोमांचकारी आहे, तें इतकें दीप्तिमान् आहे कीं ज्याच्या तेजाकडे पाहून दृष्टि अंध व्हावी !

## स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा

सुभाषबाबूंच्या तेजस्वी जीवनास प्रारंभ जर्मनीमध्यें झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९४२ मध्यें यूरोपांतील बराचसा प्रदेश हिटलरच्या ताब्यांत होता. १९४२ च्या मे महिन्यांत सुभाषचंद्रांनीं प्रथम आपल्या देशबांधवांना उद्देशून बर्लिन रेडिओवर भाषण केलें. तें खरोखर अत्यंत हृदयस्पर्शी आहे. ब्रिटिशांनीं त्यांना शत्रूचा प्रचारक म्हटल्याबद्दल संताप व्यक्त करून त्यांनीं सांगि-तलें—" माझें सर्व जीवन हें ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध तडजोड न करतां चाललेलें प्रदीर्घ युद्ध आहे. माझ्या प्रामाणिकपणाची हीच उत्कृष्ट हमी आहे. मरेपर्यंत मी असाच राहीन. जगाच्या कुठल्याहि कानाकोपऱ्यांत असलों तरी माझी निष्ठा आजवर ज्याप्रमाणें भारताशींच राहिली त्याप्रमाणें जीवांत जीव असेपर्यंत ती राहील !

देशबांधवहो ! ब्रिटिश साम्राज्याचा नाश आतां जवळ आला आहे; हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा दिवस जवळ येत आहे. १८५७ सालीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्याचें

पहिलें युद्ध झालें आणि आतां १९४२ च्या मे महिन्यांत हिंदुस्थानचें अखेरचें स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें आहे. तेव्हां आपल्या कमरा बांधा. भारताच्या स्वातंत्र्याचा काल अगदीं जवळ आला आहे...

आझाद हिंद ! हिंदुस्थानसाठीं लढूं आणि त्याचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊं ! ”

१८५७ च्या क्रांतियुद्धानंतर सर्व जगाला एका भारतीय क्रांतिवीरानें जाहीर केलें कीं आज हा भारतवर्ष आपल्या गुलामीच्या शृंखला तोडून टाकण्यासाठीं ब्रिटिशांच्याबरोवर युद्ध करण्याची घोषणा करीत आहे। आजपर्यंत स्वातंत्र्यासाठीं लढलेल्या हजारों वीरांच्या आत्म्यांनीं या स्वातंत्र्यवीराला शुभाशीर्वाद दिले—“ विजयी हो ! आम्ही अजूनहि स्वातंत्र्यासाठीं तळमळत आहोंत ! ”

## जर्मनींतील स्वातंत्र्यसेना

जर्मनींतील सुभाषबाबूंनीं स्थापन केलेल्या आझाद हिंद फौजेविषयीं अद्याप फारशी माहिती उपलब्ध नसली तरी त्या आझाद फौजेंत असलेल्या सैनिकांनीं दिलेल्या मुलाखतीवरून थोडीशी प्रकट झाली आहे. सुभाषचंद्रांच्याइतका आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अभ्यास राष्ट्रीय दृष्टिकोनांतून कोणीं केलेला नाहीं. “ आझाद हिंद सेने”ची कल्पना अनेक स्वातंत्र्याच्या लढयांच्या इतिहासाच्या अभ्यासांतून निर्माण झाली आहे. सशस्त्र क्रांतिकारकांची सेना त्यांच्यांतून निर्माण होऊं शकेल कीं ज्यांच्या हातांत आज शस्त्रें आहेत; सैनिकी क्रांति ही स्वातंत्र्ययुद्धांतील अटळ स्थिति आहे म्हणून सुभाषबाबूंनीं इंग्रजांच्या बाजूनें जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या सैनिकांना फितूर करण्यास सुरुवात केली. विमानांतून पुढील आशयाचीं पत्रकें टाकलीं.

“ मी जर्मनीला आलों आहें. माझ्या हिंदी देशबंधूंनो, मला तुमच्याशीं खूप गोष्टी बोलावयाच्या आहेत. हें युद्ध इंग्रज आणि जर्मन यांच्यांतील आहे. तें आपलें युद्ध नव्हे. आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. म्हणून लढूं नका—सुभाषचंद्र बोस. ” या पत्रकांनीं अपेक्षित परिणाम होऊं लागला. हिंदुस्थानच्या या महान् सुपुत्राच्या हांकेला ओ द्यावी कां नाहीं याबद्दल चलविचल निर्माण झाली. त्यांच्या अंतःकरणांत असलेली देशप्रीति त्यांना सांगूं लागली कीं भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचे सैनिक व्हा. अनेक सैनिकांनीं ब्रिटिशांची फौज सोडली आणि जवळ जवळ ४५,००० सैनिक जर्मनांना शरण गेले. हिंदुस्थानचें स्वातंत्र्ययुद्ध लढण्याच्या पवित्र इच्छेनें त्यांनीं ब्रिटिशांची नोकरी सोडली.

## संस्थापना

असे मायभूच्या उद्धारासाठीं बद्धपरिकर झालेले शेंकडों वीर सुभाषचंद्रांनी एकत्र केले. सुभाषचंद्र जवळ जवळ १ वर्षभर स्वतः लष्करी शिक्षण घेत होते. त्यांना मिळालेल्या सैनिकांची "आझाद हिंद सेना" त्यांनीं २६ जानेवारी १९४२ रोजीं ड्रेस्डन येथें निर्माण केली. ड्रेस्डन हें त्यांचें मुख्य केंद्र होतें. त्यांनीं या फौजेची संस्थापना करतांना एक हृदयस्पर्शी भाषण केलें. "मी तुम्हांला आझाद हिंद फौजेंत सामील होण्याची सक्ती करणार नाहीं. तुमचें जर तुमच्या देशावर प्रेम असेल आणि तुमच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत असेल तरच तुम्ही फौजेंत सामील व्हा. ही हिंदुस्थानचें विगत स्वातंत्र्य मिळविण्याची सुवर्णसंधि आज आली आहे. ती गेली कीं हजार वर्षे येणार नाहीं. जर्मन लोक हे आपले मित्र आहेत आणि आपणांला एका समान शत्रूशीं युद्ध करावयाचें आहे. तेव्हां स्वातंत्र्याच्या अंतिम युद्धासाठीं तयार रहा नि आज जर्मन लोक जी मदत देत आहेत ती निःशंकपणें स्वीकारा."

या सैन्यानें सर्व प्रकारचें युद्धाचें शिक्षण घेतलें. जर्मन लोकांच्याइतकाच मान या सैनिकांना दिला जात असे. सुभाषचंद्रांच्यासाठीं एक भव्य बंगला ड्रेस्डन येथें हिटलरनें दिला होता. तेथेंच ते नेहमीं राहात असत. तेथून विमानानें त्यांच्या सर्व हालचाली चालत. या फौजेच्या सर्व हालचालीचे चित्रपट घेण्यांत आले होते. सुभाषबाबूंनीं या सेनेची संघटना चांगली होण्यासाठीं रात्रंदिवस कष्ट केले. त्यांनीं स्वतः आघाड्यांवर मोर्चे बांधण्याचें, टँकदलांच्या हालचालींचें वगैरे शिक्षण घेतलें होतें. कारण पुढें जें महान् कार्य करावयाचें होतें त्याची ही पूर्वतयारी होती. जर्मनांच्या अद्यावत् युद्धशास्त्राचा सखोल अभ्यास त्यांनीं केला म्हणूनच यशस्वी सरसेनापति त्यांना होतां आलें.

## हिज एक्सलन्सी हर सुभाष बोस

आझाद हिंद फौजेचें सर्व शिक्षण पूर्ण झाल्यावर हिटलरनें या सेनेची पाहाणी केली. त्यावेळीं आझाद सैनिकांनीं त्याला मानाची सलामी दिली. त्या वेळीं सुभाषबाबूंचा गौरव हर हिटलरनें "स्वतंत्र हिंदुस्थानचे अध्यक्ष हिज एक्सलन्सी सुभाष" या अभिधानानें केला. सुभाषबाबूंच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची छाप हिटलरवर किती पडली होती हें त्यांनीं त्यावेळीं केलेल्या भाषणावरून दिसून येईल—



"स्वतंत्र हिंदुस्थानच्या सैनिकांनो, स्वतंत्र हिंदुस्थानचे अध्यक्ष हर सुभाषचंद्र बोस यांचें मी स्वागत करतों.

अतिशय उच्च संस्कृति असलेल्या नि लोकसंख्येनें श्रीमंत असलेल्या अशा देशांत तुमचा जन्म झाला आहे म्हणून तुम्ही भाग्यवान् आहांत. तुम्हांला आणि तुमच्या नेताजींना देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या उज्ज्वल भावनेनें प्रदीप्त झालेलें पाहून मला आनंद होत आहे. तुमचे नेताजी माझ्यापेक्षां मोठे आहेत. मी आठ कोटि जर्मन जनतेचा नेता आहे परंतु तुमचे नेताजी हे ४० कोटी हिंदी जनतेचे नेते आहेत. सर्व दृष्टींनीं ते माझ्यापेक्षां थोर नेते आणि सेनानी आहेत. म्हणून त्यांना मी प्रणाम करतों. जर्मन जनता त्यांना प्रणाम करीत आहे. प्रत्येक हिंदी माणसाचें या थोर पुढाऱ्याच्या मागें जाणें हें कर्तव्य आहे. आणि तसें तुम्ही केलेंत कीं माझी अशी खात्री आहे कीं हिंदुस्थान नेताजींच्या नेतृत्वाखालीं आपलें स्वातंत्र्य परत मिळवील!"

ज्याला राष्ट्रीय स्वाभिमानानें भरलेलें हृदय आहे असा कोणता भारतीय समर्थ जर्मन राष्ट्राच्या नेत्यानें केलेल्या नेताजी सुभाषांच्या गौरवानें हर्षोत्फुल्ल होणार नाहीं?

## जपानकडे प्रयाण

नेताजींचें शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनीं आपण जर्मनी सोडणार आहोंत असें आझाद सैनिकांना सांगितलें. जर्मनीची युद्धाची बाजू ढांसळूं लागल्यानंतर सुभाषचंद्रांनीं यूरोप सोडला असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या सैनिकांचा निरोप घेतांना ते म्हणाले—"तुम्ही आपलें कार्य पुढें चालू ठेवा. मी युरोप सोडून कोठेंतरी जात आहें. जर मला सर्व वाहतुकीचीं साधनें मिळूं शकलीं तर मी जेथें जात आहें तेथें तुम्हांलासुद्धां नेईन. तुम्ही गलितधैर्य होऊं नका. माझें एकमेव जीवितकार्य भारताचें स्वातंत्र्य हें आहे आणि माझ्या कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं मी दुसरीकडे जात आहें!" सैनिकांच्या भावना उचंबळून आल्या. ज्यानें आपणांला जन्म दिला त्या प्रत्यक्ष पित्यापेक्षांहि जास्त आपण ज्याच्यावर प्रेम केलें, आणि ज्यानें आपल्याला पुत्राप्रमाणें वागविलें असा हा थोर नेता सोडून जात असतांना त्यांचें हृदयच कोणी चोरून नेत आहे असें त्यांना वाटलें.

नेताजींनीं जर्मनी सोडला आणि हॉलंडमध्यें आले. नंतर तेथून एका पाणबुडींतून एका जर्मन अधिकाऱ्यासह टोकियोला गेले.

सुभाषचंद्रांनीं जर्मनींत जाऊन केलेला इतिहास जेव्हां समग्र कळेल तेव्हां अनेक रोमांचकारी घटना बाहेर येतील. तेथील सैनिकांत निर्माण झालेली स्वातंत्र्यप्रीति खरोखरच अलौकिक आहे. नेतृत्वाला व सेनापतीला लागणारे सर्व गुण त्यांच्याजवळ होते. सैनिकांना ते पित्यासारखे वाटत, मित्रासारखे, भावासारखे वाटत. आम्ही त्यांना मान देत होतों. जर्मन लोकहि त्यांचा गौरव करीत. जर्मन वरिष्ठ अधिकारी व हिटलरसुद्धां नेताजींना मान देत असे.

## झंझावातापूर्वी

जपाननें युद्ध सुरू केल्यापासून पूर्व आशियांत अस्थिर वातावरण निर्माण झालें. पूर्वीच्या कालांतील राजांच्या दिग्विजयासारखे विजय मिळवीत जपानची फौज चालली होती. जानेवारी १९४२ अखेर मलायाची मोहीम संपली नि १५ फेब्रुवारीला तर अजिंक्य समजलें जाणारें सिंगापूर पडलें !–ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा सगळाच कोलमडतो कीं काय अशी भीति वाटूं लागली होती.

सिंगापूरला ३५,००० हिंदी सैन्य जपान्यांच्या स्वाधीन करण्यांत आलें. जपानचे सेनापति फुजीवरा यांनीं जाहीर केलें कीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांच्या विरुद्ध लढण्याची ही उत्कृष्ट संधि आहे. तेव्हां हिंदी जनतेनें त्याचा फायदा घ्यावा. जपान त्याला मदत करील. ही कल्पना अर्थातच चांगली होती. कमकुवत होत चाललेल्या ब्रिटिश साम्राज्याला टोला देण्यासाठीं यापेक्षां दुसरी कोठली सुसंधि असणार ! हिंदी लोकांच्या मनांतहि हे विचार येत होतेच. हिंदुस्थानचे निर्वासित क्रांतिकारक श्री. रासबिहारी बोस यांचे प्रयत्न चालू होतेच, परंतु जपान्यांनीं आपण होऊन केलेल्या सूचनेमुळें संशयाला जागा होती. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठीं २८ मार्च १९४२ ला एक परिषद भरली. जपान्यांना विनाअट जाऊन मिळण्यास कोणीच तयार नव्हतें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धाची रणभेरी जर फुंकतां येत असेल तरच पुढच्या सर्व गोष्टी करण्याची हिंदी लोकांची तयारी होती.

## स्वातंत्र्यसंघाची स्थापना

भारतीय स्वातंत्र्याचा प्रचार करण्यासाठीं या परिषदेनें एक लीग स्थापन करण्याचें ठरविलें. ‘ कोणत्याहि प्रकारच्या परकीय नियंत्रणापासून, हस्तक्षेपापासून अथवा सत्तेपासून मुक्त असें पूर्ण स्वातंत्र्य प्रस्थापित करणें ” हें त्या संघाचें ध्येय

ठरविण्यांत आलें. या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ एक "आझाद हिंद सेना" निर्माण करण्याचा ठरावहि करण्यांत आला.

यानंतर १५ जून १९४२ ला बॅंकॉक येथें पूर्व आशियांतील सर्व हिंदी लोकांची परिषद भरली. सर्व भागांतील प्रतिनिधि आले होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं "एकता, विश्वास, त्याग" या तीन तत्त्वांच्या जोरावर प्रस्थापना करावयाची असा ठराव करण्यांत आला. श्री. रासबिहारी बोस यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. राखेंतून वाऱ्याच्या एकाद्या झुळुकीनें अग्निज्वाला बाहेर यावी त्याप्रमाणें सर्वत्र असलेल्या निराशेंतून स्वातंत्र्याच्या घोषणेचा पुनरुच्चार करण्यांत आला.

## जपानचा हस्तक्षेप

पूर्व आशियांतील जनतेच्या स्वातंत्र्यभावनेचा उच्चार इंडियन इंडिपेन्डन्स लीगनें केला. ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा कोसळणार असें वाटूं लागल्यानें तेथील हिंदी जनतेचा उत्साह अपूर्व होता. हिंदुस्थानांत १९४२ सालीं उडालेला भडका तेथील हिंदी जनतेला आशा देत होता.

पूर्वी ब्रिटिश सैन्यांत असलेले हजारों सैनिक आतां लीगनें स्थापन केलेल्या "आझाद हिंद सेनेंत" सामील झाले होते. कॅ. सेहगल, शहानवाझखान आदि सेनापतींनीं तुफानी प्रचारास सुरुवात केली. लीगनें नेमलेलें युद्धमंडळ ( Council of Action ) हिंदी नागरिकांना सेनेंत सामील व्हावयास सांगत होतें.

डिसेंबर १९४२ पासून "आझाद हिंद फौजेच्या" अधिकाऱ्यांचे आणि जपान्यांच्या अधिकाऱ्यांचे खटके उडूं लागले. जपानी सैन्याच्या परकीय संबंध ठेवणाऱ्या खात्यानें लीगच्या युद्धमंडळांत हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली जपान्यांच्या अपेक्षेबाहेर लीगला नि आझाद सेनेला यश प्राप्त होत होतें. जपानशीं मतभेदाचा मुद्दा स्पष्ट होता. आझाद सेनेचा उपयोग जपान हिंदुस्थानवरील स्वारीसाठीं करणार असा संशय कॅ. मोहनसिंग यांना आला. बॅंकॉक परिषदेनें पाठविलेले स्वातंत्र्याचे ठराव अजून जपानी अधिकाऱ्यांनीं पाहिलेच नव्हते.

जपानी आपणांला फसवितील का ?

अशी शंका मनांत येऊं लागली आणि त्याच वेळीं सुभाषबाबूंना बोलाविण्यांत यावें अशी मागणी करण्यांत आली. कारण हिंदी जनतेला असा विश्वास वाटत होता कीं सुभाषबाबू हें सगळें बदलून टाकतील.

आझाद हिंद सेनेला लष्करी शिक्षण दिलें जात नव्हतें. जपानी लोक शस्त्रें देईनात. कॅ. मोहनसिंग आदि सेनापतींनीं जपानकडे त्यांचे हेतू स्पष्ट करण्याबद्दल मागणी केली. कारण जपानच्यापुढें मान तुकविणें, जपानच्या तंत्रानें वागणें त्यांना अशक्य होतें. ते लढावयास तयार झाले होते ते जपान्यांच्यासाठीं नव्हे, तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं—निर्भेळ स्वातंत्र्यासाठीं.

जपानी एवढें करून थांबले नाहींत तर त्यांनीं तरुणांची एक गुप्त संघटना हिंदी स्वातंत्र्यसंघाची चळवळ हाणून पाडण्यासाठीं म्हणून सुरू केली. कॅ. मोहनसिंग व लीगचें युद्धमंडळ यांच्यांत मतभेद निर्माण झाले म्हणून कॅ. मोहनसिंग यांनीं 'आझाद सेना' बरखास्त करण्याची आज्ञा दिली. जपान्यांनीं कॅ. मोहनसिंगांना अटक केल्यामुळें पहिली आझाद सेना जवळजवळ नामशेषच झाली. कारण मोहनसिंगांनीं 'मला अटक होतांच आझाद फौज बरखास्त करा व कागदपत्र नष्ट करा' अशी आज्ञा दिली होती.

## नवें पर्व

एक प्रयत्न फसल्यानंतर जिकडे तिकडे निराशा पसरते कीं काय असें वाटूं लागलें. सुभाषबाबूंच्या आगमनाची जनता आतुरतेनें वाट पहात होती. जून १९४३ मध्यें सुभाषबाबू टोकियोमध्यें आले. त्यांचें टोलेजंग स्वागत हिंदी व जपानी जनतेनें केलें. सुभाषचंद्रांचेकडे या स्वातंत्र्याच्या लढ्याचें नेतृत्व जाणार असल्यानें त्यांच्या एकंदर धोरणासंबंधीं उत्सुकता निर्माण झालेली होती. सुभाषबाबूंनी वृत्तपत्रकारांना मुलाखत देऊन आगामी कार्यक्रमासंबंधीं कांहीं विचार मांडले. ते म्हणाले—"गेल्या महायुद्धांत ब्रिटिश मुत्सद्यांनीं आपल्या शक्तीचा बागुलबोवा आमच्यापुढें उभा करून आमच्या पुढाऱ्यांना ठकविलें. माझ्या पिढीनें वीस वर्षांहून अधिक काळ ज्या घडीची वाट उत्सुकतेनें पाहिली ती ही घडी आज आली आहे. हिंदी जनतेच्या स्वातंत्र्याची ही सुप्रभात होय.

आम्हांला आतां पूर्णपणें कळत आहे कीं, अशी संधि आणखी शंभर वर्षें येणार नाहीं. म्हणून तिचा जास्तींत जास्त उपयोग आम्ही करून घेणार आहोंत. आमच्या रक्ताची किंमत देऊनहि स्वातंत्र्य संपादन करणें हें आतां आमचें कर्तव्य आहे. यापुढें आम्ही आमच्या स्वार्थत्यागानें आणि परिश्रमानें जें स्वातंत्र्य जिंकून घेऊं तें संभाळण्याची ताकदहि आमच्या ठिकाणीं आली असेल. ज्या शत्रूनें तरवार उप-

सली आहे त्या शत्रूला तरवारीनेंच तोंड दिलें पाहिजे. निःशस्त्र प्रतिकारांतून सशस्त्र लढाच उत्पन्न झाला पाहिजे. ज्यावेळीं हिंदी लोकांवर या अग्निदिव्याचे संस्कार फार मोठ्या प्रमाणावर होतील त्या वेळींच स्वातंत्र्य मिळविण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येईल. ”

सुभाषबाबूंनीं आल्यापासून एकाच गोष्टीचा प्रचार सतत चालविला होता. एकाच ध्येयाकडे सर्वांची दृष्टि लागावी म्हणून सतत प्रयत्न केला. ब्रिटिश साम्राज्यशाही आज कुठल्या अवस्थेंत आहे याचें स्पष्टीकरण करून ते आग्रहानें प्रतिपादन करीत कीं, “ स्वातंत्र्यप्रेमी हिंदी लोकांचें रक्त जेव्हां वाहूं लागेल तेव्हांच भारत स्वतंत्र होईल ! ” अशा रीतीनें एखाद्या विजेच्या लोळानें सार्‍या दशदिशा उजळून जाव्यात तसें विद्युत्मय वातावरण सुभाषचंद्रांनीं निर्माण केलें. जिकडे तिकडे चैतन्य निर्माण झालें. ते म्हणत, “ प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी भारतीयानें पूर्णपणें शिस्तींत वागून प्रत्येक प्रकारच्या त्यागाला आपली तयारी ठेविली पाहिजे. प्रत्येकानें आपलें कार्य उचलण्यास सज्ज व्हावें. मी तुम्हांला भरपूर काम पुरवितों. काम--काम--एकसारखें काम हाच तुमचा व माझा घोष असला पाहिजे. ”

सुभाषचंद्रांनीं आपल्या संघटनकौशल्यानें अनेक लोकांस कामास लावलें. कारण अनेक हृदयांच्या एकीकरणांतूनच एक प्रचंड सामर्थ्य निर्माण होतें हें सुभाषचंद्रांना माहीत होतें. म्हणून रात्रंदिवस जो महान् यज्ञ सुरू होणार होता त्यासाठीं इंधन मिळविण्यास सुरुवात केली ! आणि एकेक अंतःकरण असें बनवण्याचा प्रयत्न केला कीं जें कधींहि शरण जाणार नाहीं. आत्मबलाचा प्रभाव त्यांना माहीत होता. त्यांनीं सैनिकांना सांगितलें--“ कोणत्याहि सैन्याच्या प्रभावीपणाला नि यशाला फक्त लष्करी शिक्षणच उपयोगी पडत नाहीं. जर्मन लोकांमध्यें ‘ सूड सूड ’ असा अंतर्नाद सारखा प्रतिध्वनित होत होता. सूड कसा उगवावा याच विचारांत ते मग्न होते. त्यामुळेंच ते फ्रान्सचा पराभव करूं शकले........असें हें आत्मबल आमच्या लोकांत आम्हीं निर्माण केलें पाहिजे ! ”

सुभाषबाबूंनीं आल्याबरोबर आझाद फौजेच्या जुन्या अधिकार्‍यांच्या भेटी घेतल्या. त्यांच्याशीं भावी कार्यक्रमाबद्दल चर्चा केली. पूर्व आशियाची सर्व भौगोलिक माहिती आणि युद्धतंत्राची माहिती त्यांना होती त्यामुळें भावी कालांत लवकरच सुरू करावयाच्या स्वातंत्र्यसंग्रामाची योजना त्यांनीं आंखण्यास सुरुवात

केली. त्याबरोबरच सैनिकांत आणि हिंदी जनतेंत शिस्त व कधींहि न दबणारी अशी विजयी मनोवृत्ति निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला.

तुफानी प्रचार सुभाषबाबूंनीं चालविला होता. त्यांच्या अलौकिक वक्तृत्वाच्या व व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावानें शेंकडों लोक सैन्यांत सामील होत होते. आपल्या राष्ट्रासाठीं रक्ताचा बिंदू नि बिंदू खर्च करण्यास अनेक लोक तयार झाले. अंधार जाऊन-ग्लानी जाऊन तेज आलें. शौर्याचा-अभिमानाचा संचार सैनिकांत झाला.

## ५ जुलै १९४३

नेताजींच्या आयुष्यांतील एक मोठ्या अभिमानाचा नि गौरवाचा हा दिवस आहे. जें स्वप्न व्यवहारांत आलेलें दिसावें म्हणून सतत परिश्रम त्यांनीं केले होते, तें स्वप्न आज सिद्ध झालेलें समोर दिसत होतें. हातांत शस्त्र घेतलेले, मातृभूच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शीर घेऊन रणांगणावर निघालेले, राष्ट्रीय स्वाभिमानानें ज्यांची मान ताठ आहे असे हजारों सैनिक आज त्यांच्यापुढें उभे होते. हिंदुस्थानला परतंत्र ठेवूं शकणारी कोणतीहि शक्ति आतां जिवंत राहूं शकणार नाहीं याची ग्वाही ती सेना देत होती. नेताजींनीं अत्यंत आनंदानें आणि प्रेमानें या हजारों सैनिकांचें स्वागत केलें आणि ते म्हणाले--

" हिंदुस्थान स्वतंत्र करणारें हिंदुस्थानचें सैन्य निर्माण झालें आहे असें जगाला जाहीर करण्याचा अद्वितीय मान मला देण्याची ईश्वराची इच्छा आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडापासून हिंदुस्थानची सुटका करणारे हें सैन्य आहे...जेव्हां तो स्वातंत्र्ययुद्धाचा रोमांचकारी क्षण येईल त्या वेळीं भारतीय नेत्यांच्या आज्ञेप्रमाणें तें रणांगणावर जाईल--

ब्रिटिश साम्राज्याच्या थडग्यावर आपण जेव्हां उभें राहूं तेव्हां सर्वसमर्थ ब्रिटिश साम्राज्यहि आतां भूतकालांतील घटना आहे हें एकाद्या लहान मुलालासुद्धां खात्री-पूर्वक सांगतां येईल.

हिंदुस्थानच्या राष्ट्रीय स्वाभिमानाचे तुम्ही संरक्षक आहांत नि त्याच्या आशा-आकांक्षा साकार झालेल्या आज जगाला दिसत आहेत. हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहाण्यास आपल्यांपैकीं कोण जिवंत राहाणार याला महत्त्व नाहीं. तो स्वतंत्र होणारच आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही सर्वस्वाचा होम करणारच एवढा आत्मविश्वास असला म्हणजे पुरें ! "

१८५७ च्या क्रांतियुद्धानंतर भारताच्या स्वातंत्र्यासाठीं उभारलेली पहिली सेना हिंदुस्थानच्या अमर स्वातंत्र्यभावनेचा पुनरुच्चार करीत होती.

आझाद सेनेची अधिकृत स्थापना झाल्यावर ठिकठिकाणीं शिक्षण सुरू झालें. सुभाषबाबू २५ ऑगस्ट १९४३ रोजीं अधिकृत सर सेनापति झाले. आपल्या नेहमींच्या निरहंकार प्रवृत्तीप्रमाणें ३८ कोटी बांधवांचा सेवक म्हणून त्या जागेचा त्यांनीं स्वीकार केला.

" मला याबद्दल आनंद नि अभिमान वाटतो, हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या सैन्याचा सेनापति होण्याहून दुसरा कोणताच अधिक मोठा मान हिंदी माणसाला मिळूं शकणार नाहीं. माझ्या ३८ कोटी बांधवांचा मी एक सेवक आहें. "

## तो अविस्मरणीय दिवस

आपल्या सर्व प्रयत्नाला स्थैर्य प्राप्त करण्याच्या दृष्टीनें त्यांनीं " आझाद हिंद सरकार " स्थापन करण्याचें ठरविलें. हें कायदेशीर दृष्टीनें बरें होतें म्हणून त्यांनीं ही स्थापना केली. पूर्व आशियांतील भारतीय स्वातंत्र्यसंघाचे अनेक प्रतिनिधि या परिषदेस आले होते. स्वतंत्र हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-मंदिरांत जणूं-कांहीं स्वतंत्रता देवीची संस्थापना करण्यासाठींच हजारों लोक जमले होते.

तो प्रसंग नेताजींच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचा होता. त्यांच्या आजवरच्या तपस्येचें फल त्यांना मिळत होतें. अतीव आनंदाचा, निःसंशय धन्यतेचा तो दिवस होता !

भारताचे निर्वासित क्रांतिकारक श्री. रासबिहारी बोस यांनीं आपले विचार अत्यंत मार्मिक रीतीनें मांडले—" मीं गेलीं वीस वर्षे माझ्या प्रिय मायभूच्या अंकापासून दूर आहे. माता जशी आपल्या बालकाला मांडीवर घेण्यासाठीं बोलावते तसें माझ्या भारतमातेनें अनेक वेळां मला बोलाविलें पण तिचे हात शृंखलांनीं बांधलेले आहेत.

आज माझा भाऊ, माझ्यापेक्षां वयानें लहान परंतु कर्तृत्वानें मोठा सुभाष आज स्वातंत्र्याचा अग्रदूत म्हणून आला आहे. या भारतीय स्वातंत्र्याच्या प्रेषिताचें आम्ही २० लाख भुकेकंगाल परदेशीय लोक स्वागत करीत आहों."

मायभूच्या विरहाची तळमळ, दुःख या प्रत्येक शब्दांत प्रतीत होत नाहीं का ?

नेताजींनीं भारताशीं स्वामिनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. अंतःकरण भरून आलें होतें.

"मी हिंदुस्थानचा नेहेमीं सेवकच राहीन आणि भारतांतील माझ्या बंधुभगिनींची काळजी घेईन. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावरहि रक्ताचा शेवटचा बिंदु माझ्या शरीरांत असेपर्यंत मी लढण्यास तयार राहीन!"

हजारों हृदयांतल्या उचंबळलेल्या भावना सुभाषचंद्रांच्या मुखांतून बाहेर पडत होत्या. त्यांनीं आझाद हिंद सरकारचा जाहीरनामा वाचून दाखविला.

१८५७ पासून भारतानें चालविलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा आढावा घेऊन स्वातंत्र्याचा लढा चालविण्याचा निर्धार त्यांत प्रकट केला आहे—"ईश्वरास साक्षी ठेवून, हिंदुस्थानांतील जनतेला, एक राष्ट्र बनविणाऱ्या मागील पिढ्यांना साक्षी ठेवून आणि वीरत्व व स्वार्थत्याग यांच्या परंपरेचा वारसा ज्या हुतात्म्यांनीं आम्हांस दिला त्यांना साक्षी ठेवून हिंदी लोकांना आम्ही आवाहन करतों, कीं हिंदी स्वातंत्र्याच्या झगड्यांत शस्त्राघात करण्यासाठीं आमच्या निशाणाखालीं एकत्र या. शत्रु हिंदुस्थानांतून बाहेर हांकलला जाऊन हिंदुस्थान देश पुन्हां स्वतंत्र होईपर्यंत हा झगडा आपण चालवूं या!"

स्वतंत्र भारताचें तात्पुरतें मंत्रिमंडळ नेमलें गेलें. नेताजींशीं एकनिष्ठ राहण्याच्या शपथा घेतल्या गेल्या.

स्वतंत्र भारताच्या या संस्थापनेचें भाग्य सुभाषचंद्रांना लाभलें म्हणून अनेक वीर त्यांच्या भाग्याचा हेवा करतील!

## आत्मयज्ञास सिद्ध व्हा!

आझाद हिंद सरकारची स्थापना करण्यांत आल्यानंतर त्याच्या मान्यतेच्या तारा जर्मनी, इटली, आयर्लंड, चीन इत्यादि राष्ट्रांनीं पाठविल्या. आझाद हिंद सरकार हें आतां खरेंखुरें स्वतंत्र सरकार म्हणून ओळखलें जाऊं लागलें. ही मान्यता म्हणजे उगवत्या स्वातंत्र्यसूर्याला प्रणाम होता.

सर्व साधारण जनतेचा उत्साह अपूर्व होता. आझाद हिंद सेनेला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठीं पैशाची जरूरी होती. सुभाषबाबूंनीं मलाया, ब्रह्मदेश येथील जनतेच्या त्यागबुद्धीला आवाहन केलें. गरीब लोक आपल्याजवळ असलेलें सर्वस्व नेताजींच्या चरणाशीं सुपूर्त करीत होते. स्त्रिया आपल्या अंगावरील दागिने, मूल्यवान् जवाहर



सुभाष रासबिहारी

नेताजींना अर्पण करीत होत्या. जणूं कांहीं नेताजींच्या हुकमांत लक्ष्मी वागत होती. परंतु नेताजींनीं लोकांत निर्माण केलेली त्यागवुद्धि ही कर्तव्यनिष्ठेवर आधारलेली होती. नेताजींनीं श्रीमंत लोकांना विचारलें होतें—

" या राष्ट्रीय सैन्यांत स्वयंस्फूर्तीनें जे सामील झाले आहेत व आवश्यक असें शिक्षण घेत आहेत त्यांच्याकडे एकवार नजर टाका. हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहाण्यास आपणांपैकीं कोण जिवंत राहील हें त्यांना माहीत नाहीं, आपल्या रक्तांतील शेवटचा थेंब संपेपर्यंत रक्तदान करीत राहावयाचें एवढाच निश्चय त्यांनीं केला आहे !

गरीब जनता स्वेच्छेनें आणि उत्साहानें आत्मार्पण करण्यास पुढें येत आहे. आपल्या साऱ्या आयुष्यांत त्यांनीं ज्यांत शिल्लक टाकली होती तीं सेव्हिंग बँकबुकेंहि मला त्यांना दिलीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं हें माझें बँकबुक तुम्ही घ्या ! असें या गरीबांप्रमाणें म्हणणारे श्रीमान् हिंदी लोक येथें नाहींत काय ? "

अशा हृदयस्पर्शी आवाहनानें नेताजींनीं अनेकांना आत्मयज्ञासाठीं तयार केलें. कारण ते एका राष्ट्राचा मोठा संसार उभा करीत होते. अनेक संसारांची होळी होते तेव्हां राष्ट्राचा संसार उभा राहातो हा तर जगाचा नियमच आहे. मलाया, ब्रह्मदेशांतील जनतेनें नेताजींच्या चरणीं कोटयवधि रुपयांचा पाऊस पाडला !

नेताजींनीं आतां यापुढची मागणी केली !

## स्वातंत्र्य युद्धाची रणभेरी !

नेताजींनीं आपली भूमिका स्पष्ट करणारी एक मुलाखत दिली आणि त्यांत हिंदुस्थाननें ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारण्याची आवश्यकता कां आहे हें प्रतिपादन केलें. " राष्ट्रवादी हिंदुस्थानचें फार दिवसांपासून ब्रिटनशीं युद्ध सुरूच आहे हें साऱ्या जगाला ठाऊक आहे. तथापि स्वतंत्र हिंदुस्थानचें तात्पुरतें सरकार आतां प्रथमच स्थापन होत असल्यामुळें ब्रिटन व अमेरिका यांच्यासंबंधानें आमचें धोरण काय हें जगाला कळविणें इष्ट आहे. म्हणून या आझाद हिंद सरकारतर्फे इंग्लंड व अमेरिका यांचेविरुद्ध आम्हीं अधिकृतपणें युद्ध पुकारणें अवश्य झालें आहे. हा युद्धाचा पुकार म्हणजे केवळ मतप्रचारांतील दणकेबाजी नव्हे. आमच्या हातांनीं आमचे हेतु खरें असल्याचें आम्ही सिद्ध करूं. हा निर्णय कृतींत आणणें

मला शक्य वाटलें नसतें, तर असा निर्णय पुकारण्याची जबाबदारी मीं अंगावर घेतली नसती ! ”

२४ आक्टोबर १९४३ या दिवशीं रात्रीं बारा वाजतां आझाद हिंद सरकार च्या मंत्रिमंडळानें इंग्लंड व अमेरिका यांचें विरुद्ध युद्ध पुकारण्याचा ठराव पास केला.

स्वतंत्र हिंदुस्थानची युद्धघोषणा! पारतंत्र्याविरुद्ध ठोकलेली ती आरोळी होती. जें खड्ग प्रभु रामचंद्रांनीं रावणासाठीं काढलें होतें, कृष्णानें कंसाच्या विरुद्ध काढलें होतें, श्रीशिवरायांनीं मोगल राजसत्तेविरुद्ध उपसलें होतें तें आज पुनश्च म्यानांतून बाहेर पडत होतें. १० मे १८५७! आणि २४ ऑक्टोबर १९४३! इतकीं वर्षें लागलीं.

नेताजींनीं स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा जेव्हां ५०।६० हजार सैनिकांच्या समोर केली, तेव्हां गगनभेरी जयघोष झाला. हजारों सैनिकांनीं एकमुखानें गर्जना केली “ चलो दिल्ली ! चलो दिल्ली ! ! ” रक्ताच्या नाड्या थाड् थाड् उडूं लागल्या आणि त्यांनीं अलोट रणावेशानें गर्जना केली ! त्या आरोळीनें त्या गर्जनेनें स्वर्गाचीं दारें धाडकन् उघडलीं असतील—

आणि १८५७ च्या क्रांतियुद्धांत पतन पावलेल्या शेंकडों वीर पुरुषांनीं ती घोषणा–ती प्रचंड गर्जना ऐकली असेल. जणूं कांहीं सूडच सहस्रमुखांनीं ओरडत होता “ चलो दिल्ली ! ” त्या क्रांतिवीरांनीं मनोमय आशीर्वाद दिले असतील आणि म्हटलें असेल, “ वीर हो, शाबास, भारताचे खरे सुपुत्र तुम्ही आहांत ! आम्हीं चेतविलेला अग्नि विझला नाहीं. तर ज्या अनिवार्य रणावेशानें आम्ही लढलों, जो ‘ मारो फिरंगी को ’ हा रणनाद आम्हीं अखंड भारतांत घुमविला, त्याचाच हा ध्वनि परावर्तित होऊन आम्ही ऐकत आहोंत, ‘ चलो दिल्ली ! ’ राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं आम्ही अद्याप तळमळत आहोंत, आम्हांला तुम्ही मुक्त करणार ना ? ”

नेताजींचें एक अपूर्व उत्तेजक भाषण त्या सभेंत झालें. शौर्याचा सागर जणूं कांहीं उसळत होता. पर्वतप्राय लाटा त्यावर उडत होत्या. त्यांतून एकच आवाज बाहेर पडत होता, “ आझाद होगा हिंदुस्थान ! ”

नेताजींनीं त्या आझादीचा मार्ग दाखविला आणि त्या सैनिकांना सांगितलें—

“ या क्षितिजावर, नद्यांच्या पलीकडे, त्या वनराजीच्या मागें, त्या डोंगराच्या आड आपली जन्मभूमि आहे. त्या भूमीवर आपणांस पुन्हा जावयाचें आहे. ऐका !

ऐका ! आपला हिंदुस्थान आपणांस हांक मारीत आहे ! आपली राजधानी दिल्ली आपणांस बोलावीत आहे. आपले अडतीस कोट बांधव आपणांस हांका मारीत आहेत !

रक्त रक्ताकडे ओढ घेत आहे. तयार राहा. आपण वेळ गमावतां कामा नये. तुमचीं शस्त्रें तयार ठेवा ! पहा हा डोंगरी रस्ता तुमच्यासमोर दिसत आहे. आपल्याच बांधवांनीं तो बांधला. या रस्त्यानें आपण पुढें जाऊं. ईश्वराची कृपा असेल तर शत्रूच्या मधूनहि आपण आपला मार्ग काढूं. नाहींतर हुतात्म्यांचें मरण मरूं. आणि आपल्या त्या अंतिम निद्रेंत, आपली सेना दिल्लीस घेऊन जाणाऱ्या त्या रस्त्याच्या धूलीचें चुंबन घेऊं !

दिल्लीचा मार्ग म्हणजे स्वातंत्र्याचा मार्ग ! चलो दिल्ली !

# चलो दिल्ली ! ११

दुंदुभी स्वदेशाच्या त्या
गर्जल्या रणींच्या
आणि खड्ग घेउनि वेगें
धांवले रणाला— !

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाची तुतारी सुभाषचंद्रांनीं फुंकली होती. "चलो दिल्ली!" हा त्यांचा घोष होता आणि गुलामगिरीचा नाश करण्यासाठीं हजारों स्वातंत्र्य-सैनिक रणांगणावर चालले होते. एकच रमणीय चित्र त्यांच्या डोळ्यासमोर होतें. सुभाषचंद्रांनीं तें रंगविलें होतें. तें चित्र स्वतंत्र हिंदुस्थानचें होतें. लाल-किल्ल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानचा ध्वज फडकविणें हें त्यांचें ध्येय होतें आणि त्यासाठीं ते प्राण देण्यास चालले होते. त्यांना देश स्वतंत्र झालेला पाहावयाचा होता.

## आघाडीवरील स्त्री-सैनिक

नेताजींनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धासाठीं मारलेली—अंतःकरणाच्या तळ-मळींतून उत्पन्न झालेली—ती हांक अनेक भारतीयांनीं ऐकली. त्यांचीं तीं प्रज्वलित अग्नीसारखीं भासणारीं भाषणें ऐकून जसें एखाद्या ठिणगीनें दारूचें कोठार पेटावें तसा सारा पूर्व आशिया पेटला होता. भारतमातेची हांक सर्वांना ऐकूं येत होती. ती हांक सर्वांच्या हृदयाचें पाणी पाणी करीत होती. भारतीय



स्त्रियांचीं हृदयें अस्वस्थ झालीं अन् त्या अवस्थेंतून हजारों स्त्रिया देशासाठीं मरण पत्करण्यास तयार झाल्या.

हातांत बंदुका घेऊन भारतीय स्वातंत्र्याच्या स्त्रीसैनिक म्हणून हजारों स्त्रिया रणांगणावर उभ्या राहिल्या. नेताजींच्या पुढें स्वतःच्या रक्तानें लिहिलेला अर्ज त्यांनीं ठेवला. "भारतमातेला स्वतंत्र करण्याच्या कार्यांत प्राणत्यागासाठीं आम्ही तयार आहोंत. हा आमचा दृढनिश्चय तुम्हांस कळविण्यासाठीं आम्हीं आमच्या रक्तानें सह्या केल्या आहेत !" नेताजींच्याकडे त्यांनीं मरणाची मागणी केली होती—पण तें मरण अमर मरण होतें. नेताजींनीं ती मागणी मान्य केली आणि हजारों स्त्रिया भयंकर कष्ट आणि हाल यांनीं भरलेलें जीवन जगण्यासाठीं रणांगणावर गेल्या.

१८५७ च्या क्रांतियुद्धांत एकच झांशीची राणी लढली नि इंग्रजांशीं लढतां लढतां तिनें देह ठेवला. आणि या दुसऱ्या क्रांतियुद्धांत हजारों स्त्रिया त्याच इंग्रजांच्या विरुद्ध लढत होत्या. जणूं कांहीं महाराणी लक्ष्मीबाईच्या एका एका रक्ताच्या थेंबांतून या असंख्य स्त्रिया निर्माण झाल्या होत्या. जगाचा इतिहासकार या घटनेची नोंद एक अलौकिक घटना म्हणून करील—! तिचें सर्व श्रेय सुभाषचंद्रांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाला आहे !

## बालसैनिक

स्वतंत्रता देवीला कळ्यांचा हार आवडतो म्हणूनच कीं काय नेताजींनीं कोंवळ्या वयाच्या मुलांचा अंतर्भाव आपल्या सेनेंत केला होता.

एका हातांत पुस्तक नि दुसऱ्या हातांत तलवार हें त्या बालसैनिकांचें ब्रीद होतें, कारण तें परतंत्र राष्ट्राचें बाल होतें. परतंत्र राष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेणें यासारखें दुसरें कुठलें भाग्य आहे ? असें वाटूनच जणूं कांहीं शेंकडों बालसैनिक या आझाद फौजेंत सामील झाले होते. त्यांच्या पथकाला "कनकलता" असें नांव होतें. आत्मस्फूर्तीनें ते युद्धास सज्ज झाले होते. त्यांना जेव्हां विचारण्यांत येई कीं "तुम्ही कशाला सैन्यांत जातां ? शिक्षण पुरें करा !" तेव्हां उत्तर मिळे—"आम्हीं शिक्षण सोडून दिलेलें नाहीं. आम्ही स्वातंत्र्ययुद्धाचें शिक्षण घेत आहोंत. इतर देशांत नाहीं का राष्ट्रावर आपत्ति कोसळल्यावर शाळा बंद ठेवीत ?"

नेताजींच्या अलौकिक प्रभावामुळें बालसैनिकांना आकर्षण वाटलें. कल्पनाहि नव्हती एवढ्या मोठ्या प्रमाणांत बालसेना तयार झाली. त्या कोंवळ्या बालकांनीं मातृभूच्या चरणांला जणूं कांहीं आपलें रक्त अर्पण करण्याच्या इच्छेनें आपलीं नांवें आत्मनाशास तयार असलेल्या पथकांत ( Suicide Squads ) नोंदलीं. अक्षरशः पाठीला सुरुंग बांधून शत्रूच्या रणगाड्यांखालीं पडावें आणि शत्रूचा रणगाडा जाऊं लागला कीं त्या सुरुंगाचा स्फोट होऊन त्या बालकांच्या शरिराच्या ठिकऱ्या उडाव्यात ! गुलामगिरीच्या ठिकऱ्या उडविण्यासाठीं स्वतःच्या शरिराच्या ठिकऱ्या उडविणारे हे बालसैनिक ! भावी पिढ्यांतील माता आपल्या बालकांपुढें हा आदर्श ठेवतील का ?

नेताजींनीं या मुलांवर मातृवत् प्रेम केलें. त्यांना हीं मुलें करीत असलेला थोर त्याग पाहून आनंद होत असे. म्हणून ते आईप्रमाणें प्रेम करीत--आपल्या शिध्यांतील लोणीं, केळीं त्यांना देत--त्यांनीं एका पत्रांत लिहिलें आहे—"मला स्वतःला मुलगा नाहीं. परंतु माझ्या मुलापेक्षांहि तुम्ही मला जास्त प्रिय आहांत. कारण भारतमातेच्या मुक्तीसाठीं तुम्ही लढत आहांत."

सुभाषचंद्रांच्या प्रेमळ नेतृत्वाची पांखर त्यांच्यावर होती म्हणून ते निर्धास्त होते. बालसैनिकांनीं हिंदुस्थानच्या या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धांत केलेल्या कामगिरीची नोंद करावयास इतिहास विसरणार नाहीं !

## कदम कदम बढाये जा—!

अशा रीतीनें देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ही भारतीय सेना अनेक भावी पिढ्यांचे व मृत देशवीरांचे आशीर्वाद घेत रणांगणाकडे दौडत होती--एकंदर चार पथकें त्यांचीं होतीं. ४ फेब्रुवारी १९४४ या दिवशीं या सेनेनें प्रचलनास सुरुवात केली. नेताजींचे वीररसप्रधान शब्द त्यांच्या कानांत घुमत होते--

"आपली दीर्घवांच्छित दिल्लीवरील मोहीम सुरू झाली आहे. आज आराकान पर्वतावर फडकणारा झेंडा व्हाइसरॉय भवनावर फडकवीपर्यंत, दिल्लीच्या प्राचीन लाल किल्ल्यांत आपली विजयोत्सवाची कवाईत होईपर्यंत, ही आपली मोहीम अढळ निश्चयानें आपण चालविली पाहिजे. आपली घोषणा आहे—'चलो दिल्ली!'

शहानवाझखान यांच्या नेतृत्वाखालीं त्यांचें एक पथक प्रथमच स्वातंत्र्ययुद्धाच्या आघाडीवर चाललें होतें. त्यांनींहि आपल्या सैनिकांना बजावलें कीं

" दारुण कष्ट नि यातना यांनीं भरलेला मार्ग आहे: आपण स्वातंत्र्याच्या युद्धासाठीं आघाडीवर जात आहोंत. भ्याड लोकांची आपणांस जरूर नाहीं. मर्द लोक पाहिजे आहेत—जर जपानी लोक आपल्यावर पुढें मागें उलटले तर आपण त्यांच्याशींहि लढूं! कारण आपण स्वतंत्र भारताचे सैनिक आहोंत."

## अंदमानच्या तपोमंदिरांत

नेताजींनीं पुकारलेल्या या दुसऱ्या क्रांतियुद्धांत त्यांना पहिला विजय मिळाला तो म्हणजे " आझाद हिंद सरकार " च्या ताब्यांत अंदमान व निकोबार बेटें आलीं. जपानी मुख्य मंत्र्यानें अधिकृतपणें तशी घोषणा केली.

अंदमान! असंख्य शूर क्रांतिकारकांच्या रक्त—अश्रूंनीं ज्याची भूमि पवित्र झाली आहे असें अंदमान! ज्या ठिकाणीं " माझा देश! माझा हिंदुस्थान " असें म्हणून मृत्यूच्या जबड्यांत अनेक देशवीरांनीं हंसत उड्या घेतल्या तें अंदमान बेट आज त्याच भारताच्या एका क्रांतिकारकानें स्वतंत्र केलें होतें. अंदमानांत पुरलीं गेलेलीं क्रांतिकारकांचीं प्रेतें जणूं कांहीं सचेतन झालीं, स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणानें अंदमान पवित्र झालें! हिंदुस्थानचा—स्वतंत्र हिंदुस्थानचा—ध्वज अंदमानवर नेताजींनीं फडकविला. त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. क्रांतिकारकांनीं स्वतंत्रता देवीसाठीं जी तपश्चर्या केली होती तिची आठवण त्यांना झाली.

सोळा वर्षांच्या मुलांनीं अंगावर झेललेले आसुडाचे फटके, पाठीवर वॉडरच्या क्रूर काठीचे घाव बसत असतांना व भोंवळ येत असतांनासुद्धां बैलासारखा त्यांनीं ओढलेला तेलाचा घाणा, अंग तापानें फणफणत आहे अशा स्थितींत कुटलेला काथ्या–हे सारे दारुण हाल ज्या सुदिनाच्या आगमनासाठीं शेंकडों क्रांतिकारकांनीं सहन केले होते तो सुदिन आज उगवला होता!

सुभाषचंद्रांना त्या हुतात्म्यांनीं वंदना केली असेल, धन्यवाद दिले असतील! कारण स्वतंत्र हिंदुस्थानचें तीर्थक्षेत्र जें अंदमान तें नेताजींनीं स्वतंत्र केलें होतें! अंदमानांत जे वीर मरण पावले त्यांचे आत्मे तृप्त झाले असतील, कारण त्यांचीं अंदमानांत पुरलीं गेलेली शरीरें स्वतंत्रतेची किंमत म्हणून पुरलीं गेलीं होतीं.

नेताजींनीं जगाला जाहीर केलें—" अंदमान स्वतंत्र होणें या गोष्टीला राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धांतील विजयाचें प्रतीक या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे. राजकीय बंद्यांचा तुरुंग म्हणून या अंदमान बेटांचा उपयोग ब्रिटिशांनीं केला. ज्यांना

ब्रिटिश साम्राज्य उलथून पाडणाऱ्या कटासाठीं सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली, असे बहुतेक शेंकडों बंदी या बेटांतच कोंडण्यांत आले. पॅरिसमधील बॅस्टिल तुरुंग फ्रान्सच्या राज्यक्रांतींत पहिल्यानें फोडला गेला आणि त्यांतील राजबंदी स्वतंत्र करण्यांत आले. आमच्या या स्वातंत्र्ययुद्धांत देशभक्तांच्या यातनांचें ठिकाण अशी अंदमान बेटें प्रथम स्वतंत्र होत आहेत. यापुढें क्रमानें हिंदुस्थान स्वतंत्र होईल. पण पहिल्यानें जिंकलेल्या प्रदेशाचें महत्त्व केव्हांहि मोठेंच आहे. या अंदमान बेटांना आम्ही "शहीद बेटें" असें नांव हुतात्म्यांच्या स्मरणासाठीं देत आहों."

स्वतंत्र भारताची विजयघंटा वाजली! कांहीं वर्षांपूर्वीं जी घंटा राजबंद्यांना दिवसाचे तास सांगत असे तीच घंटा घणघणली नि तिनें दूरवर असलेल्या आपल्या भारताला सांगितलें—"स्वातंत्र्याच्या गगनभेदी विजयध्वनीची ही सुरुवात आहे!"

## मातृभूमीचें दर्शन

आझाद हिंद फौजेचें प्रचलन चालू होतें. ती क्रांतिकारकांची फौज होती. त्यामुळें हालअपेष्टा हीच त्यांची संपत्ति होती. अन्न, कपडा सर्वच अपुरें. रणांगण म्हणजे एक भयाण जंगल. सारा डोंगराळ प्रदेश. शस्त्रास्त्रांची टंचाई होती. विमानांचें साहाय्य नाहीं—वाहतुकीचीं साधनें नाहींत. त्यांच्याजवळ शस्त्र एक होतें तें म्हणजे त्यांची हिंदुस्थानवरील निष्ठा! तिच्या जोरावर ते साक्षात् मृत्यूलाहि मागें सारण्याच्या इच्छेनें मातृभूच्या दास्यशृंखला तोडण्यासाठीं पुढें चालले होते.

शेवटीं तो दिवस उगवला!

१८ मार्च १९४४!

हा तो दिवस कीं ज्यादिवशीं त्या स्वातंत्र्यसैनिकांनीं हिंदुस्थानच्या पवित्र भूमीवर पाऊल ठेवलें. १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर भारताच्या स्वातंत्र्यासाठीं प्रथमच हे सशस्त्र सैनिक पुकार करीत होते. "चलो दिल्ली!" ह्या आनंदानें बेहोष झालेल्या सैनिकांनीं दूरदृष्टि फेकली नि मनाशीं म्हटलें—तो आमचा प्रिय देश कीं जेथें आमचा जन्म झाला! याच आमच्या प्रिय देशाची मूर्ति आमच्या हृदयांत आम्हीं कोरली आहे. त्याच देशाला पारतंत्र्यांत ठेवणाऱ्या घातक्यांचा नाश करण्यासाठीं आम्ही लढत आहोंत—भारता— आम्हांला आशीर्वाद दे!"

ते सैनिक आनंदानें इतके बेहोष झाले होते कीं हिंदुस्थानच्या पवित्र भूमीवर पाय ठेवल्यावर लगेच त्यांनीं लोळावयासच सुरुवात केली. त्या मातीचें चुम्बन घेतलें. एकाद्या मातेनें आपल्या मुलाच्या शरीराच्या प्रत्येक अवयवाचें चुंबन घ्यावें त्याप्रमाणें त्या सैनिकांनीं त्या जागेवरील प्रत्येक फुलाचें, प्रत्येक झाडाचें, प्रत्येक दगडाचें चुंबन घेतलें. जणू कांहीं देशभक्तीच साकार होऊन त्या सैनिकांच्या रूपानें पृथ्वीवर अवतरली होती. तो भावनेचा आवेश येवढा हृदयस्पर्शी होता—

नेताजी विमानांतून आल्यावर त्या सर्व सैनिकांनीं प्रचंड रणगर्जना केली— ‘ जय हिंद ! जय नेताजी ! ’ पक्षी सुद्धां स्वातंत्र्यगीतें गात होते. सारें वातावरण उल्हसित झालें होतें. नेताजींच्या आयुष्यांतील एक सोन्याचा दिवस उगवला होता. नेताजींचें एक स्वप्न खरें ठरत होतें.

भारतीय स्वातंत्र्याचा हा महान् प्रेषित हातांत स्वतंत्र भारताचा ध्वज घेऊन उभा होता. स्वतंत्र भारताचा हा सेनापति सीमेवर उभा होता. अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा हा दिवस होता. ज्या मातृभूपासून त्यांना दूर राहावें लागलें होतें तिचें दर्शन घडत होतें.

स्वतंत्र हिंदुस्थानचे सरसेनापति राज्याधिपति म्हणून आज उभे होते ! त्यांनीं स्वातंत्र्याचें तें निशाण उंच फडकविलें. ज्या भारताच्या ध्वजापुढें सर्व जगाचें मस्तक नम्र व्हावें असा तो ध्वज डौलानें फडकूं लागला. त्या दिव्य क्षणाला हजारों सैनिकांनी गर्जना केली—

“ अंगरेज चले जॉय, है देश हमारा
अव दिल्ली चलो, दिल्ली चलो, दिल्ली चलेंगे ! ”

तें एक सामर्थ्यवान् आव्हान होतें. भगवान् सूर्यनारायणालासुद्धां त्यांनीं सांगितलें— “ भारताचा स्वातंत्र्यसूर्य पूर्वेकडे उदयाचलावर येत आहे ! ”

## रणांगणावरील पराक्रम

नेताजींचें सर्व आयुष्य ही लढाईच आहे नि त्यांत सुद्धां स्वातंत्र्ययुद्धाचे आघाडीवर ते असल्यामुळें ते सर्वच्यासर्व वेळ एकाच विचारांत असत. डॉक्टरांनीं त्यांना झोंप घेण्यास सांगावें नि त्यांनीं ती घेऊं नये. इंजेक्शन घ्यावें आणि २-२॥ तास झोंप घ्यावी असा क्रम चालू होता.

इंफाळला वेढा पडला. आझाद फौजेनें कित्येक खेडीं जिंकलीं होतीं. सर्व प्रकारची प्रतिकूल परिस्थिति असतांना चौफेर चढाई सुरू केली होती. अन्नाचा तुटवडा होता. परंतु कंदमुळें, गवत खाऊन ते लढले होते. पारतंत्र्यांतील सुरस अन्नापेक्षां स्वातंत्र्यांतील गवताची भाकरी त्यांना चांगली वाटत होती. सैन्यें पोटावर चालतात असें नेपोलिअन म्हणत असे—भारताचें हें स्वातंत्र्यसैन्य उपाशी पोटीं रणांगणांत शत्रूला मागें हटवीत पुढें चाललें होतें.

नेताजींनीं त्यांना संदेश पाठविला—

" या ऐतिहासिक लढयांत व्यक्तिशः आपणां प्रत्येकाचें कांहींहि होवो, पण अशी कोणतीहि शक्ति जगांत नाहीं कीं जी हिंदुस्थानला आतां पारतंत्र्यांत डांचू शकेल. आपण जगूं व कार्य करीत राहूं किंवा लढतां लढतां मरण पावूं, पण सर्व परिस्थितींत आपण नितांत श्रद्धा बाळगली पाहिजे. ज्या कार्यासाठीं आपण झगडत आहोंत तें यशस्वी होणारच आहे. परमेश्वर आपल्या हातानें भारतीय स्वातंत्र्याचा मार्ग दाखवीत आहे. आपणांला फक्त आपलें कर्तव्य करावयाचें आहे आणि स्वातंत्र्याची किंमत द्यावयाची आहे. जे स्वातंत्र्याच्या मार्गावरून जात आहेत त्यांच्यामागें परमेश्वर उभा असतो तो आपल्याला यश देवो!—जय हिंद "

नेताजींच्या अशा प्रकारच्या संदेशानें सैनिकांना अपूर्व उत्साह येई. नवीन चैतन्य निर्माण होई. याच्याच जोरावर सैनिकांनीं अनेक पराक्रम आघाडयांवर केले. ज्यांचीं नांवें इतिहासाला अज्ञात आहेत अशीं अनेक माणसें हिंदुस्थानच्या पराक्रमाला ललामभूत होणारीं शूर कृत्यें करीत होतीं. इंफाळच्या भोंवतालची भूमि आझाद वीरांच्या रक्तसिंचनानें पवित्र झाली आहे.

स्वतंत्र हिंदुस्थानांत या शूर वीरांचें पूजन केलें जाईल. या स्वातंत्र्यवीरांच्या अनेक रोमहर्षक कथा माता आपल्या मुलांना सांगतील नि त्यांच्यांतून शेंकडों वीर निर्माण होतील. भारतीय विजयाचा डंका ते वाजवितील!

## नेताजींच्या हत्येचे प्रयत्न

सेनापतीच्या आयुष्यांत त्याच्या खुनाचे प्रयत्न व्हावयाचेच. त्याप्रमाणें नेताजींच्यावर फेब्रुवारी १९४४ मध्यें एक प्रसंग आला होता.

नेताजी आपल्या निवासस्थानीं कांहीं सैन्याधिकाऱ्यांशीं चर्चा करीत होते. त्यांच्या राहटीभोंवतीं असणाऱ्या रक्षकांच्या मध्यें कांहीं तरी गडबड चालू झाली.

हें ऐकल्यावर ते स्वतः खालीं आले. एक मनुष्य नेताजींना ठार करण्याच्या उद्देशानें पिस्तूल वगैरे भरून त्या रक्षकांच्या रांगेंत घुसला होता. नेताजींना पाहिल्याबरोबर तो ओरडला, "तुम्ही हिंदुस्थानचे देशद्रोही आहांत म्हणून तुम्हांला मारण्यासाठीं आलों होतों. मला कांहीं तें जमलें नाहीं. पण इतर अनेक लोक याच मार्गावर आहेत हें लक्षांत ठेवा!" नेताजींना त्याच्याशीं बोलावयाचें होतें, पण अधिकाऱ्यांनीं त्यांना तसें करूं दिलें नाहीं. कारण नेताजींच्या प्राणाची किंमत त्यांना माहीत होती.

दुसरा प्रसंग नेताजी फौजेची वंदना घेत होते. आकाशांत विमानें फिरत होतीं नि मशिनगन्सचा मारा होत होता. नेताजींना अधिकाऱ्यांनीं कळवळून विनंति केली कीं त्यांनीं निवाऱ्याच्या जागीं जावें. सुभाषांपासून २० फूट उंचीवर विमानें फिरत होतीं. निवाऱ्याच्या जागीं जावयास त्यांनीं नकार दिला व म्हटलें—"जर माझ्यापुढील तीन हजार लोक न डगमगतां येथें उभे राहात आहेत, तर मीं तरी कां भ्यावें?" एका विमानानें एक बाँब टाकला, परंतु सुदैवानें नेताजी त्यांतून वांचले.

ते शूराप्रमाणें रणांगणांत उभे होते. धैर्याचें अलौकिक तेज त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होतें. नेताजींच्या आयुष्यांतील एका भयंकर प्राणघातक प्रसंगांतून ते सुरक्षित बाहेर पडले होते.

## रक्ताची मागणी

आझाद हिंद सेनेच्या लढ्यांतील निर्णायक क्षण जवळ येत होता. हिंदुस्थानच्या सीमेवर नव्हे आतां हिंदुस्थानांत आझाद फौज उभी होती. अनेक आपत्तींशीं झगडत उभी होती. नेताजींनीं आपल्या सैनिकांना पुढें येणाऱ्या आपत्तींची कल्पना देतांना म्हटलें—

"आपल्या शत्रूंनीं आसामच्या आघाडीवरच हिंदुस्थानच्या संरक्षणाचें युद्ध खेळण्याचें ठरविलें आहे. इंफाळच्या टेकड्यांजवळ नि चित्तागाँगच्या पठारावर भारताच्या स्वातंत्र्याचें भवितव्य ठरविलें जाणार आहे. मला तुमच्यापुढें मोहक चित्र रंगवावयाचें नाहीं. तुम्हांला तुम्ही जेव्हां आघाडीवर जाल तेव्हां—मृत्यूला मिठी मारावी लागेल. कारण शत्रूनें प्रतिकाराची जय्यत तयारी केली आहे. आपणहि आपलें सामर्थ्य एकवटून लढं.

आपल्या सेनेच्या ‘ चलो दिल्ली ’ या घोषणेबरोबर दुसरी घोषणा आपण यापुढें लक्षांत ठेवावी. ती म्हणजे ‘ रक्त, रक्त आणखी रक्त ’ याचा अर्थ आपण चाळीस कोटि जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं आपलें रक्त सांडलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर आपल्या शत्रूचेंहि रक्त सांडलें पाहिजे. आतां भारतीयांचें एकच ध्येयवाक्य पाहिजे—“ निछावर सब करो—बनो सब फकीर ! ”

म्हणून मी रक्ताची मागणी करतों. केवळ शत्रूच्या रक्तानेंच त्याच्या भूत-कालांतील पापकृत्यांचा सूड घेतला जाणार आहे. पण आम्ही रक्त देण्यास तयार असूं तरच आम्ही रक्त घेऊं शकूं. म्हणून आमचा भावी कार्यक्रम रक्तदान हा आहे. आमच्या देशवीरांच्या रक्तानें आमचीं जुनीं पातकें धुवून काढलीं जातील. आमच्या वीरांचें रक्त हीच आमच्या स्वातंत्र्याची किंमत असेल. आमच्या वीरांचें रक्त, त्यांचें शौर्य नि वीरत्व हेंच ब्रिटिशांनीं हिंदी लोकांवर केलेल्या जुलमाचा व अत्याचाराचा सूड घेईल ! ”

## प्रतिकूल परिस्थिति

नेताजींनीं आत्मदान करणाऱ्या वीरांची मागणी केल्याबरोबर शेंकडों वीर पुढें आले. तो ऑगस्टचा सुमार होता. इंफाळ आघाडीवरील सर्व रस्ते पाण्यांत, चिखलांत बुडून गेले होते. पावसाळ्यापूर्वी इंफाळ घेणें योग्य होतें, आवश्यकहि होतें. परंतु त्यांची हालचाल परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें उशीरां सुरू झाली होती. शत्रूची तयारी मोठी होती ! हिंदुस्थान लुटूनच त्यांनीं युद्धाची तयारी चालविली होती. आझाद फौजेला विमानांचें पाठबळ नव्हतें. वाहातुकीचीं साधनें अपुरीं व सदोष. पावसानेंहि कहर उडविलेला. अशा परिस्थितींत लष्करी हालचाली चालू ठेवणें अशक्य होतें. नेताजींनीं २१ ऑगस्ट १९४४ ला दिनसंदेश पाठवून लष्करी हालचाली बंद केल्या.

ज्या दुर्दैवानें हिंदुस्थानचा गेलीं शेंकडों वर्षें पाठलाग केला आहे तें दुर्दैव आतां आझाद फौजेच्या पाठीमागें लागलें होतें.

ॲंग्लो-अमेरिकन सैन्यें पुढें सरकत होतीं. नेताजींना सैनिकांना माघार घेण्याचा हुकूम देणें भाग होतें. सैनिकांना माघार घेणें जिवावर आलें. माघार घेणें म्हणजे एका मनोहर ध्येयाला पारखें होणें. कित्येकांनीं रणांगणावरच मृत्यु स्वीकारण्याची तयारी दर्शविली. माघार घेतां घेतां

शत्रूचा धुव्वा उडत होता. इंचाइंचाएवढ्या जागेसाठीं शौर्याची शर्थ केली जात होती. शेवटीं नेताजींनीं २४ एप्रिल १९४५ रोजीं रंगून सोडलें. व आझाद हिंद सरकार बँकॉकला नेलें.

## विरलेलें स्वप्न

ऑगस्ट महिना उजाडला होता. जपानची शरणागतीची भाषा सुरू झाली होती. मलायांतील जपानी युद्धश्रेष्ठींनीं शरणागतीचा जो हुकूमनामा काढला होता त्याला नेताजींचा तीव्र विरोध होता. नेताजींनीं जपान्यांना बजावलें होतें कीं, " तुम्ही तुम्हांला जें रुचेल तें करा. आझाद हिंद सेना लढतच राहाणार. " बंगाल व आसाममध्यें आझाद सेनेनें घुसण्याची योजना नेताजींच्या डोक्यांत होती.

नेताजींनीं रंगून सोडलें. रंगून ते मोलमीनचा प्रवास पायींच केला. नेताजींनीं आपल्या सामान्य सैनिकांबरोबर सर्व हालअपेष्टा भोगल्या. त्यांची मनःस्थिति शांत होती. स्थितप्रज्ञ पुरुषाप्रमाणें एक महान् स्वप्न भंगत असलेलें ते डोळ्यानें पाहात होते. त्यांच्या अंतःकरणांत उठणाऱ्या तुफानाचें कोण वर्णन करूं शकेल ?

जपान्यांनी शरणागति स्वीकारण्यापूर्वी ता. १२ ऑगस्टला कौलालंपूर येथें वृत्तपत्रकारांना त्यांनीं मुलाखत दिली. अगदीं शांत चित्तानें ते बोलत होते. ते म्हणाले, " आझाद सेनेला इंफाळ घेतां आलें नाहीं तेव्हांच मी उमजलों कीं जपानी सेनेला लवकरच बचावाचें धोरण स्वीकारावें लागणार. एकदां आसामांत प्रवेश करतां आला असता व बंगालमध्यें शिरून पूर्वेकडच्या हिंदुस्थानच्या भागांत पाय रोंवता आला असता कीं आपल्याला त्या भागांतील सर्व जनता संघटित करतां आली असती. आझाद सेनेचा उद्देश तोच होता. पण त्याचवेळीं जपान्यांनीं हातपाय गाळून ब्रह्मदेश सोडून देण्याचें ठरविलें.

माझा पुढील कार्यक्रम काय आहे याबाबत निश्चित व स्पष्ट कल्पना मी आतांच देऊं शकत नाहीं. पण मी येथून टैपिंग येथें जाऊन जपानच्या युद्धश्रेष्ठींशीं चर्चा करणार आहें. "

या म्हणण्याप्रमाणें नेताजी टैपिंगला गेले व तेथून सिंगापूरला गेले. सिंगापूरहून ते विमानानें बँकॉकला जाण्यास निघाले. बँकॉक सोडतांना ते आपल्या मित्रांना म्हणाले-- " कांहीं काळजी करूं नका. मी हिंदुस्थानांतून कोणाला यत्किंचित्‌हि

दाद लागूं न देतां निसटलों व अगदीं सुयोग्य संधि येईल तेव्हां, अगदीं असाच कोणाला दाद लागूं न देतां मी हिंदुस्थानांत प्रवेश करीन ! ”

नेताजींच्या अंतःकरणाची काय स्थिति झाली असेल ! अक्षरशः अहोरात्र रणांगणावर गेलीं पांच वर्षे ते होते. अनेक मुत्सद्यांच्या सहवासांत होते. भारताच्या स्वतंत्र सरकारचें त्यांचें स्वप्न खरं होत चाललें होतें.

फार मोठा धक्का त्यांना बसला असेल, हें काय सांगावयास पाहिजे. परंतु महापुरुष संकटांनीं हतबल होण्यापेक्षां जास्त प्रखर होत जातात. नेताजींची तीच स्थिति आहे. भर्तृहरीनें म्हटलें आहे—

—विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्य मानाः ।
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ।

सुभाषबाबूंचें असेंच झालें. भारतीय स्वातंत्र्यावरील त्यांची श्रद्धा अढळ होती. त्यांनीं भावनापूर्ण अंतःकरणानें आपल्या सैनिकांचा निरोप घेतला नि त्यांना संदेश दिला—“ मित्रहो,

“ या आणीबाणीच्या प्रसंगीं मी आज्ञेचा एकच शब्द तुम्हांला सांगतों. जर तुमचा पराभव झाला तर तो वीराप्रमाणें पत्करा. स्वाभिमानानें नि शिस्तीनें स्वीकारा. हिंदुस्थानच्या भावी पिढ्या आजच्यासारख्या गुलाम न राहतां तुमच्या या प्रचंड त्यागानें जेव्हां स्वतंत्र होतील तेव्हां त्या तुम्हांला धन्यवाद देतील नि मोठ्या गौरवानें जगाला सांगतील कीं, आमचे पूर्वज, मणिपूर आसाम, ब्रह्मदेशांत लढले. जरी त्यावेळीं ते पराभूत झाले तरी त्या तत्कालीन पराभवांतूनच त्यांनीं अंतिम यश व कीर्ति यांचा मार्ग आम्हांस दाखवून ठेवला होता. भारताच्या स्वातंत्र्यावरील माझा विश्वास अढळ आहे. भारताचा हा राष्ट्रध्वज, आपला राष्ट्रीय मानबिंदु नि भारतीय योद्ध्यांची परंपरा मी तुमच्या स्वाधीन करीत आहें. भारताचे तुम्ही आघाडी-वरचे स्वातंत्र्यसैनिक आपल्या प्राणांची किंमत देऊनहि राष्ट्राची इभ्रत कायम राखाल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठीं इतरत्र लढणारे तुमचे देशबांधव, तुमचें तेजस्वी स्फूर्तिप्रद उदाहरण समोर ठेवतील ! ”

## राखेंतील निखारे

नेताजी सुभाषबाबूंच्या आयुष्यांतील एका तेजस्वी, रोमांचकारी प्रकरणाचा शेवट झाला. वादळानें फुलांफळांनीं बहरलेला वृक्ष उन्मळून पडावा नि त्याचीं फळें

मातींत मिसळून जावींत तशीच सुभापबाबूंच्या आशाआकांक्षांची स्थिति झाली आहे. पण त्या मातींत मिसळलेल्या फळांत क्रांतीचें बीज आहे हें विसरतां कामा नये. आझाद सैनिकांच्या रक्तानें त्या बीजांचें पोषण झालें आहे. तें बीज निश्चित् फोंफावणार आहे. कारण देशवीरांचें रक्त कधींच फुकट जात नाहीं. त्याच्याच जोरावर राष्ट्रमंदिर उभारलें जातें.

नेताजींची भारतीय स्वातंत्र्यावर नितांत श्रद्धा होती. ती कधींच कमी झाली नाहीं. स्वातंत्र्याच्या लढयांत अपयश अनेक वेळां येतें. पण प्रत्येक अपयश ही यशाची एक पायरी असते. वॉशिंग्टनहि एकदां अयशस्वी झालाच होता. पण तो खचला नाहीं तर दुप्पट वेगानें तो पुढें गेला नि त्यानें ध्येयाचें शिखर गांठलें. नेताजींचा हा पहिला प्रयत्न फसला आहे. आतां पुन्हा जेव्हां भारताचें शेवटचें स्वातंत्र्ययुद्ध लढविलें जाईल त्यावेळीं नेताजींनीं पेटविलेले निखारे कांहीं काल अंगावर चढलेली राख झाडून पुन्हां ज्वालाग्राही बनतील आणि त्यांतून पारतंत्र्याचें भस्म करणारी ज्वाला उफाळेल. नेताजींचें जीवितकार्य त्या दिवशीं सफल झालेलें दिसेल.

“ कार्य फलद्रूप होणें हा योगायोग आहे. पण त्यासाठीं आत्मदान करणें हा मात्र निश्चित नियम आहे ! ” असें सावरकरांनीं म्हटलें आहे. नेताजींनीं आपल्या असंख्य लोकांसह स्वातंत्र्याचें शिखर गांठण्याचा प्रयत्न केला आहे. भावी इतिहासकार पारतंत्र्यानें ग्रस्त झालेल्या पिढ्यांना सांगेल—

जा, जरा पूर्वेकडे जा. तेथील प्रत्येक दगडाला विचारा नेताजींचे सैनिक कसे लढले. त्या आराकान पर्वतांच्या टेकडयांना विचारा नेताजींनीं स्वातंत्र्ययुद्ध कसें लढविलें. तेथील जमिनीला कान लावा म्हणजे एकच आक्रोश तुमच्या कानांत घुमेल “ चलो दिल्ली ! ” तेथें लढत असतांना धारातीर्थी मरण पावलेल्या सैनिकांचीं हाडें उकरून काढा आणि पाहा तीं तुम्हाला काय सांगतात तीं ! एकच भावना एकच आकांक्षा तीं बोलतील.

“ अजून दिल्ली गांठावयाची आहे ! ”

# मृत्यूचें गूढ १२

Ah, he is on the earth no more,
And we all weep and sigh,
And now upon a foreign shore,
His ashes only lie ;
But his deeds amongst us roar,
They say—" *He cannot die* ! "

महायुद्ध संपलें. सतत सहा वर्षें चाललेलें मानवी हत्याकांड थांबलें. हिंदुस्थानला महायुद्ध म्हणजे ओझेंच होतें. तें ओझें उतरल्यामुळें साहजिकच एक सुस्कारा प्रत्येकानें टाकला. हिंदुस्थानच्या दृष्टीनें आलेली एक मोठी पर्वणी आली नि गेली. गंगा समोरून वाहात होती, पण आम्ही पवित्र होऊं शकलों नाहीं. ज्यांनीं युद्धाचा फायदा घेऊन भारतीय स्वातंत्र्याचे प्रयत्न चालविले त्यांचें भवितव्य काय हा प्रश्न साऱ्या जनतेसमोर उभा राहिला.

सुभाषचंद्रांच्या " आझाद हिंद फौजे " ची विशेष माहिती हिंदी जनतेला नव्हती. परंतु सुभाषचंद्रांच्या भवितव्यासंबंधीं मात्र सर्वांच्या मनांत शंका निर्माण झाली. सुभाषचंद्रांनीं ब्रिटिशांच्या शत्रूला मिळण्याचें महत्पाप (?) केलें होतें. क्विस्लिंगसारखीं नीच विशेषणें बहाल केलीं जात होतीं. आतां पुढें काय...?

## " राष्ट्राच्या हृदयाला जखम होइल ! "

सर्व हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या या भीतियुक्त शंकेला पंडित जवाहरलाल-

जींनीं प्रथम वाचा फोडली. जणूं कांहीं सर्व हिंदुस्थानचा आवाज पंडितजींच्या मुखांतून बाहेर पडला. युद्ध संपल्यानंतर ऑगस्ट १९४५ मध्यें पंडितजींनीं प्रथमच प्रकटपणें सांगितलें—" एक गोष्ट माझ्या हृदयाला नेहमीं दुःख देते. त्या गोष्टीबद्दल मी आजपर्यंत कधींहि उघड बोललों नाहीं. याचें कारण, त्याबाबत कोणताहि उल्लेख केला असता तर गैरसमजच पसरला असता. परंतु आतां युद्ध संपलेलें आहे. आतां ती गोष्ट जाहीर करण्यास किंवा त्यावर माझा अभिप्राय व्यक्त करण्यास हरकत नाहीं. मलाया आणि ब्रह्मदेशामध्यें सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या " हिंदी स्वातंत्र्य सैन्यां " तील जवळ जवळ वीस हजार हिंदी सैनिक युद्धकैदी झालेले आहेत त्यांच्याबद्दलची ती गोष्ट आहे. एक हिंदवासी म्हणून व देशांतील सर्व पक्षांच्यातर्फे त्यांचा प्रतिनिधि म्हणून मी असें सांगतों कीं, जर या लोकांना शिक्षा देऊन जगांतून नाहींसे केले गेले तर ती अत्यंत दुःखद अशी घटना होणार आहे. त्यांच्या हातून कांहीं चुका पूर्वी झालेल्या असल्या, तरी एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं तरुण व ताज्या दमाची ती मंडळी आहेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल त्यांना निरतिशय प्रेम व तळमळ आहे.

कोणत्याहि परिस्थितींत त्यांचा छळ करणें ही चूक होईल. हा क्रांतीचा काळ आहे. या लोकांना सामान्य बंडखोर म्हणून वागविण्यांत आलें तर त्याचे दूर-गामी परिणाम होतील. ब्रिटिश सरकारची ती एक गंभीर चूक होईल. त्यांना जर शिक्षा झाली तर हिंदुस्थानला आणि अखिल हिंदवासीयांना शिक्षा झाल्यासारखें वाटेल. हिंदी जनतेच्या हृदयाला एक जखम केल्यासारखें होईल ! "

आपला मतभेद व्यक्त करून का होईना पण पंडितजींनी राष्ट्राच्या इभ्रतीचा प्रश्न म्हणून साम्राज्यशाहीला इषारा दिला. सर्व भारतीयांनीं या घोषणेला मूक संमति दर्शविली आणि अशा रितीनें "आझाद हिंद फौज" व सुभाषबाबू हे भारतीय चर्चेचे विषय झाले. सुभाषचंद्रांच्यावर हिंदी जनतेचा पूर्ण विश्वास होता. तिनें "क्विस्लिंग" वगैरे नीच आरोपांवर विश्वास न ठेवतां असा विश्वास बाळगला कीं सुभाष जें जें करतील तें तें सर्व भारतीयांच्या हितासाठींच करतील !

सुभाषचंद्रांसाठीं भारतीय जनता प्रतिकाराची ढाल घेऊन उभी राहील.

विधीनें आपला मार्ग निराळाच शोधला व एका वृत्ताने सारा भारतवर्ष हादरला !

'सुभाषचंद्रांचा विमान अपघातानें मृत्यु !' एक भेसूर स्वप्न पडत आहे कीं काय असा भास भारतीयांना झाला ! ज्या वृत्तानें सर्व देशभक्तांच्या डोळ्यांत अश्रु जमा झाले तें वृत्त असें--

"जपान सरकारशीं कांहीं बोलणीं करण्यासाठीं आझाद हिंद सरकारचे प्रमुख श्री. बोस टोकिओला जाण्यासाठीं १६ ऑगस्ट रोजीं विमानानें निघाले. ताइहोकू येथें त्यांचें विमान कोसळून त्यांना जबर दुखापती झाल्या होत्या. त्यांना शुश्रूषे-साठीं हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत आलें परंतु मध्यरात्रीं दुर्दैवानें त्यांचा अंत झाला !"

या दुर्दैवी अन् दुष्ट वार्तेनें भारतीयांना झालेलें दुःख कोण वर्णन करूं शकेल ? कसें वर्णन करून सांगतां येईल ! आपल्या घरांतील माणूस जावें असेंच प्रत्येक भारतीयाला वाटलें.

लोकमान्य गेले तेव्हां असाच अपूर्व अश्रुपात झाला होता. 'एकादे रेशमी वस्त्र जसें कांटेरी झाडावरून फरफरा ओढीत न्यावें'--तशीच भारतीय हृदयाची स्थिति झाली. ज्या ज्या अंतःकरणांत सुभाषची उज्ज्वल स्मृति तेवत होती तें तें अंतःकरण व्याकुल झालें. साश्रु नयनांनीं-साशंक नयनांनीं सारा भारतवर्ष एकाद्या स्थितप्रज्ञ ऋषीप्रमाणें हें असह्य दुःख सहन करीत होता.

त्यांच्या डोळ्यांसमोर सुभाषचंद्रांची ती भव्य मूर्ति उभी राहिली. त्यांच्या धीरगंभीर नि मधुरवाणीचा प्रतिध्वनि कानांत उमटूं लागला. त्यांचे ते भवि-ष्याचा वेध घेणारे नेत्र, त्यांचें तें लोकांना जिंकणारे सुहास्य हें सारें आठवलें आणि—

पण अद्यापि स्मृतीचे धागे
गुन्तुन मागें जिवा ओढती

अशी भारतीय हृदयाची स्थिति झाली. पण त्याहीपेक्षां हृदयांत जर कुठली खंत वाटली असेल तर ती ही कीं सुभाषचंद्र परदेशांत मरण पावले !

जिच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणाचें मोल सुभाषांनीं दिलें तिच्या पवित्र अंकावर सुभाषना मृत्यु येऊं नये ! सैबेरियांत जसे रशियन देशभक्त 'माझा रशिया' करीत मरण पावले, इटालीचे निर्वासित देशभक्त इटलीचें पुण्यस्मरण करीत जसे परदेशांत मरण पावले तसेच आमचे सुभाष परदेशांत मृत्यु पावले.

सुभाषचंद्रांच्या अंतःकरणांत केवढा कोलाहल माजला असेल? त्यांचें समाधान कुणीं केलें असेल? असें आश्वासन त्यांना कुणीं दिलें असेल—? "जा, सुखानें निघून जा! तुमचें कार्य आमचे प्राण देऊन आम्ही पूर्ण करूं!"

या साऱ्या भावना, हें सारें दुःख भारतानें प्रगट केलें. हिंदुस्थानच्या काना-कोपऱ्यांत, शोकसभा झाल्या आणि सुभाषचंद्रांच्या मावळत्या ज्योतीला प्रणाम दिला गेला. ही दुःखद वार्ता ऐकल्यावर पंडित जवाहरलालजींच्या तर डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्यांनीं आपली अश्रूंची अंजलि सुभाषचंद्रांच्या वीरस्मृतीला अर्पण केली. जवाहरलालांच्या त्या पवित्र अश्रूंत भारताचें दुःख सामावलें आहे! भारताचीच ती श्रद्धापूर्ण अंजलि आहे!

## मृत्युवार्तेची आणखी हकीकत

सुभाषचंद्रांच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर संपूर्ण विश्वास कोणाचा बसू शकला नाहीं. त्याला कारण पूर्वी एकदां अशीच वार्ता १९४२ सालीं आली होती आणि त्यावेळीं ती तशीच खोटी ठरली. देशांतील अनेक लोक म्हणूं लागले कीं सुभाष बोस अज्ञातवासांत आहेत. सुभाषचंद्रांचें आयुष्यच अद्भुत आहे तेव्हां त्यांचा मृत्युहि अद्भुत आहे. परंतु नुकतेच सुटलेले आझाद हिंद सरकारचे प्रचारमंत्री श्री. अय्यर यांनीं सुभाषचंद्र खरोखरच मृत्यु पावले हें जाहीर सभेंत सांगितलें. त्यांनीं सांगितलेलें वृत्त असें:—

"श्री. सुभाषचंद्र बोस यांच्या शेवटच्या विमानप्रवासाच्या वेळीं त्यांच्या-बरोबर असलेले आझाद हिंद फौजेंतील एक अधिकारी ले. कर्नल हबीबूर रहमान यांनींच प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलेली व त्यांनींच स्वतः मला सांगितलेली हकीकत मी निवेदन करतों.

ता. ७ ऑगस्ट १९४५ रोजीं तिसरे प्रहरीं नेताजी बोस व हबीबूर रहमान हे विमानानें सायगांवहून टोकिओकडे रवाना झाले. त्यांना निरोप देण्यास मी विमान-तळावर उपस्थित होतों. ता. ८ सप्टेंबरला मि. हबीबूर रहमान हे मला टोकिओला भेटले व त्यांनीं मला या दुःखद घटनेची साद्यंत कहाणी सांगितली.

ता. ११ ऑगस्ट रोजीं दुपारीं इंडोचायनांतील तैवाइनच्या ताईहोकु विमान-तळावर नेताजीचें विमान वर उड्डाण करून कांहीं मिनिटें होतात न होतात तोंच

एक मोठा आवाज झाला. विमानांतील उतारूंचा प्रारंभीं असा समज झाला कीं तो तोफेचा आवाज असावा, पण मागाहून असें उमगून आलें कीं विमानाचा एक पंखा मोडला आहे. तावडतोब विमान गिरक्या खाऊं लागलें, वैमानिकालाहि तोल सांवरतां येईना. त्यानंतर दोन मिनिटांत विमान खालीं जमिनीवर धाडदिशीं पडलें.

विमानांतील पेट्रोल–टाकी फुटली अन् तिनें पेट घेतला. नेताजी व विमानांतील इतर उतारू यांचेवर पेट्रोल उडले गेलें व त्यांच्या कपड्यांनींही पेट घेतला. पेटत्या कपड्यांनिशीं नेताजी कसे बसे विमानाबाहेर पडले. याचेळीं नेताजींनीं सुती पेहेराव केल्यामुळें त्यांचें कपडे अधिकच पेटले. ले. क. रहमान यांनीं लोंकरीचा पेहेराव केला होता. म्हणून त्यांच्या कपड्यांना कमी आग लागली. थोड्याच वेळांत एका अँब्युलन्स गाडीमधून नेताजी व इतर भाजलेले उतारू यांना हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. सर्वांना कमीजास्त प्रमाणांत जखमा झाल्या. शक्य तेवढे सर्व उपाय योजूनसुद्धां ता. १८ ऑगस्ट रोजीं रात्रीं नऊ वाजतां नेताजींचें प्राणोत्क्रमण झालें ! ”

सुभाषबाबूंचें शव टोकिओला नेण्यांत यावें अशी रहमान यांची विनंति होती. पण जपान्यांनीं सुभाषबाबूंसाठीं केलेली शवपेटिका सहा फूट लांब होती. ती विमानांतून नेतां येईना. त्यानंतर ता. २२ ऑगस्ट रोजीं सुभाषबाबूंच्या शवाचें ताईहोकू येथें दहन करण्यांत आलें. रहमाननें त्यांची रक्षा बरोबर घेतली. ती त्यानें टोकिओला नेली. तेथें सुनीगामी भागांतील राणकोजा देवळांत हिंदी रहिवाशांनीं त्यांचें श्राद्ध केलें !

टोकिओला गेलेले कांही युवक म्हणतात कीं ते सुभाषचंद्रांच्या दहनसंस्काराचे वेळीं उपस्थित होते.

## अमर आशा

ही सर्व हकीकत प्रसिद्ध झाली आहे तरी सुद्धां सुभाषबाबू जिवंत आहेत असेंच सर्व भारताला वाटत आहे. जपान्यांच्या शरणागतीनंतर दोस्तांच्या ताब्यांत सुभाष जाऊं नयेत म्हणूनहि ही वार्ता उठवली असेल अशी शंका घेतली जात आहे. कॅ. लक्ष्मी यांनीं नोव्हेंबर १९४५ मध्यें एका वृत्तपत्रकाराला मुलाखत दिली व त्यांत त्यांनीं सांगितलें, “ सुभाषचंद्र बोस हे अद्याप जिवंत आहेत अशी

अनुक्रम २८८७४
विभाग वां.वा.
मूल्यचे. सूत्र १०७०
दि. ३१।३।५४

मला आशा आहे." कॅप्टन शहानवाझखान आदि आझाद हिंद सेनानींनीं असें सांगितलें आहे कीं, "सुभाषबाबू जिवंत नाहींत या गोष्टीवर आमचा विश्वासच बसत नाहीं." अनेक आझाद हिंद सैनिकहि विश्वासपूर्वक सांगत आहेत कीं, "नेताजी पृथ्वीच्या पाठीवर कोठेंतरी जिवंत आहेत. ते मरणेंच शक्य नाहीं, कारण त्यांना हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहावयाचा होता."

बंगालचे एक ज्योतिषी ज्यांनीं सुभाषबाबूंची कुंडली बनविली होती त्यांनीं एक भविष्य वर्तविलें आहे कीं, "७२ वर्षे पुरी होण्याच्याआधीं सुभाष मरणेंच शक्य नाहीं. ता. २० ऑगस्ट १९४५ रोजीं ते जेथें होते तेथून ६७० मैल दूर अंतरावर एका गुप्त डोंगरी प्रदेशांत गेले आहेत. त्यांच्याबरोबर त्यांचे पांच सहकारीही आहेत."

या सर्वांपेक्षां सर्वांत महत्त्वाची कुठली गोष्ट असेल, कुठला आधार असेल तर तो म्हणजे महात्माजींनीं आपला विश्वास जाहीर रीतीनें प्रकट केला आहे कीं सुभाष बोस जिवंत असून ते कोठेंतरी गुप्त रीतीनें राहात आहेत. बरेच दिवस सुभाषबाबूंच्या संबंधीं गांधीजी बोललेच नव्हते. पण प्रथम जेव्हां बोलले त्यावेळीं त्यांनीं हा विश्वास प्रकट केला. त्यामुळें आशा पल्लवित झाली आहे यांत संशय नाहीं. गांधीजींच्या खेरीज सुभाषबाबूंचे पूर्वीचे सहकारीहि सुभाषबाबूंच्या या मृत्युवार्तेवर विश्वास ठेवीत नाहींत.

## रशियांत सुभाष

सुभाषबाबू रशियांत असावेत असा अंदाज प्रकट केला गेला होता. त्याचा रशियन वृत्तपत्रानें इन्कार केला आहे. पण त्या इन्कारांतून अनुकूल अर्थहि काढला जातो. सुभाषबाबू रशियांतच आहेत हें स्पष्ट करतांना एका वृत्तपत्रानें असें म्हटलें आहे:—

"जपानी सरकारच्या संगनमतानें सुभाषबाबूंनीं सोव्हिएट रशियाशीं सुरक्षित आश्रयस्थानासाठीं संधान बांधलें असावें. सुभाष बोस यांना दोस्तांच्या हातीं लागूं न देण्याबाबत जपान व सोव्हिएट सरकार यांच्यांत ऐकमत सहज होऊं शकतें. तेव्हां सुभाषबाबू रशियांतच असावेत.

मॉस्कोहून आजतागायत श्री. सुभाष बोस अथवा इतर कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्याविरुद्ध टीकेचा सूर निघाला नव्हता. पण ऐनवेळीं म्हणजे दि. २१ ऑगस्ट रोजीं

मॉस्कोहून ' रेडस्टार ' या खास स्टॅलिनच्या मुखपत्रानें श्री. सुभाष बोस यांच्यावर ' जपानचे हस्तक ' व ' इंडियन क्विसलिंग ' असे बेफाट आरोप करणारी टीका केली व ती जगभर एकाएकी प्रसृत करण्यांत आली. हेतू हा कीं, सो. रशिया हा जपानचा व जपानचे हस्तक बनलेले सुभाष बोस यांचा कट्टर विरोधी आहे असें सर्व जगाला भासवावें आणि श्री. बोस यांना सो. रशियांतच सुरक्षित आश्रयस्थान मिळावें."

एक गोष्ट या ठिकाणीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं सुभाषबाबूंनीं रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें नव्हतें म्हणून कदाचित् हा संभव खरा ठरेलहि.

सुभाषचंद्रांच्या अलौकिकतेचा स्पर्श त्यांच्या मृत्युवार्तेलाहि झाला आहे. त्यांच्या अद्‌भुत चरित्रांत त्यांच्या मृत्यूच्या गूढतेनें भर टाकली आहे हें निःसंशय !

## भारतीय हृदयाची हांक !

प्रभु रामचंद्र वनवासांत गेल्यानंतर भरतानें त्यांच्या पादुकांची पूजा करून त्यांची स्मृति तेवत ठेवली. सुभाषचंद्रांची उज्ज्वल स्मृति भारताच्या हृदयांत तशीच तेवत आहे. दुःखी मातेनें आपल्या वीरपुत्राचें स्मरण त्याचीं कृत्यें आठवून करावें तसाच आज सारा भारतवर्ष सुभाषचंद्रांची स्मृतिपूजा करीत आहे. दि. २३ जानेवारी १९४६ हा सुभाषचंद्रांचा ५० वा वाढदिवस सर्व हिंदुस्थानांत अभूतपूर्व उत्साहानें साजरा झाला आहे. अनेक ठिकाणीं तर सुभाषचंद्रांची पूजा रक्तसिंचनानें झाली आहे. प्रत्येक तरुण-तरुणी अत्यंत अभिमानानें, भक्तीनें आपल्या हृदयांत सुभाषचंद्रांच्या अलौकिक विभूतिमत्त्वाची पूजा करीत आहे ! एकच निनाद उंच आकाशांत घुमत आहे. " नेताजी सुभाषचंद्र की जय ! " मध्यवर्ति विधिमंडळांतहि " जयहिंद "चा जयजयकार होत आहे ! जसें बकुळीच्या फुलांचा मंदमधुर सुवास वृक्षाच्या आसपास रेंगाळत असतो तशीच सुभाषचंद्रांची स्मृति आज अनेक हृदयांना मोहवीत आहे, सुखवीत आहे. सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितींत स्वकीयांच्या अन् परकीयांच्या विरोधाला पायदळीं तुडवून सुभाषचंद्रांनीं जनतेचें हृदयसिंहासन जिंकलें आहे.

अंधाऱ्या रात्रीं प्रवास करणाऱ्या पांथस्थाला एकाद्याच ताऱ्यानें प्रकाश द्यावा तशीच आशा गांधीजींनीं प्रकट केलेल्या विश्वासानें भारतीय हृदयाला वाटत आहे. सुभाषचंद्र भारतीय स्वातंत्र्यासाठीं—पारतंत्र्याची बेडी फोडण्यासाठीं—एक शक्तीचें वज्र निर्माण

करीत आहेत असें वाटत आहे. भगीरथाची तपश्चर्या गंगा पृथ्वीवर आणल्या-नंतर संपली. स्वातंत्र्याची गंगा येईपर्यंत, त्या गंगेच्या पवित्र जलानें भारतवर्ष पुनश्च पुलकित होईपर्यंत सुभाषचंद्रांची तपश्चर्या चालूच राहणार आहे. भारतीय हृदयें अत्यंत तळमळून आपल्या निर्वासित, क्षितिजापलीकडे असलेल्या नेताजींना आवाहन करीत आहेत—" प्रिय सुभाष, आमच्या डोळ्यांत प्राण आणून तुमच्या दर्शनाची वाट पाहात आहोंत. तुमच्या शुभागमनाची वार्ता ऐकण्यासाठीं आम्ही अधीर झालों आहोंत. कारण तुमच्या नेतृत्वाचा लाभ आम्हांला व्हावा अशी अनिवार्य इच्छा आमच्या अंतःकरणांत निर्माण झाली आहे !

भारतीय क्रांतीची रक्तरंजित पहाट जवळ येत आहे. भारतीय क्रोधाची ज्वाला प्रखरतर होत आहे. तिला वळण लावण्यासाठींच तुमच्या नेतृत्वाची गरज आहे. आम्हीं यशस्वी व्हावें म्हणूनच तुम्ही या ! "

# व्यक्तिमत्त्वाचा चंद्रमा

# १३

वीरा, अमित तुझा महिमा !
अगाध किमया तुझिया हातीं
फुलविसि पाषाणांतुन ज्योती
रजःकणावर ये स्पर्शें ती
रत्नांचीच कमान ?

—कुसुमाग्रज

पूर्णिमच्या संपूर्ण चन्द्राचे दर्शन किती आल्हाददायक-आनंददायक असतें ? तें जितकें शीतल, सुखद असतें तितकेंच शीतल या भारतीय चंद्राचें—सुभाषचंद्राचें—व्यक्तिमत्त्व आहे. पण तें इतकें विविध आहे कीं कोठलीहि एक उपमा पुरेशीच पडणार नाहीं. तें सागरासारखें विशाल आहे, हिऱ्यासारखें तेजस्वी आहे, हिमालयासारखें उत्तुंग आहे; आणि चंद्रासारखें शीतलहि आहे. क्षितिज जसें त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत असतां दूरदूरच जातें तीच स्थिति त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आहे !

मॅझिनीनें म्हटलें आहे—‘ महासत्यें सिद्ध करण्यासाठी आत्मार्पण करणें ही नीतिशास्त्राची परमसीमा आहे. जेव्हां एकादा नरमणि उठतो व म्हणतो ‘ हें सत्य आहे व त्याची पूजा बांधावयास मी माझें देहपुष्प अर्पण करतों ’ तेव्हां त्याच्या त्या देहार्पणांतून—त्याच्या त्या तेजस्वी मरणांतून—एक दिव्य ज्योति निघते व ती

अखिल मनुष्यजातीमध्यें चैतन्य उत्पन्न करते. सुभाषचंद्रांच्या जीवनाचें वर्णनहि यापेक्षां निराळें नाहीं. त्यांच्या अलौकिक जीवनदानांतून एका भव्य सत्याचा साक्षात्कार भारताला झाला आहे. तें सत्य म्हणजे या महापुरुषाचें व्यक्तिमत्त्व उपेप्रमाणें विविधरंगांनीं नटलें आहे !

## स्वतंत्रतेचा कलिजा

सुभाषचंद्रांच्या आयुष्याचें ध्येय एकच होतें. भारताचें स्वातंत्र्य ! या एकाच ध्येयासाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व दिलें. स्वातंत्र्यावरील प्रीतीची सीमा क्षितिजा-पलीकडे होती. एकमात्र विराट् स्वप्न डोळ्यांसमोर होतें आणि तें खरें करण्या-साठीं अक्षरशः प्राणांची आहुति देण्याची तयारी त्यांनीं केली होती. स्वातंत्र्य हें त्यांच्या आत्म्याचें संगीत होतें. " अनादिकालापासून आम्ही मुक्तिसंदेश छेडत आहोंत. स्वातंत्र्यगीतें गात आहोंत. अगदीं बालपणापासून आमच्या नसानसांतून मुक्ति स्वैरपणानें वाहात आहे. अगदीं जन्मल्याबरोबरच आम्हांला बंधनाचें दुःख होऊन आम्ही टाहो फोडतों " असें त्यांनीं म्हटलें आहे.

या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं काय केलें नाहीं ? सर्वस्व घालविलें. तें कार्य फल-द्रूप होण्यासाठीं एक स्वतःच यज्ञ चेतवला आणि निःशंकपणें, निर्भयपणें त्यांत उडी घेतली. कारण त्यांची स्वातंत्र्यप्रीतीच तशीच तीव्र होती. ' तुजसाठीं मरण तें जनन । तुजवीण जनन तें मरण ! ' ही त्यांच्या मनाची धारणा होती आणि म्हणूनच त्यांना राहावत नसे. सतत एकच ध्यास--एकाच गोष्टीचें चिंतन.

स्वातंत्र्याच्या भावनेवर आधारलेलीं नुसतीं मोठमोठीं पोकळ भाषणें त्यांनीं कधींच केलीं नाहींत. असें स्वातंत्र्यावर प्रेम अनेकांचें असतें, पण तें कृतिशून्य. शाळामास्तर सुद्धां सत्य बोलावें हें शिकवतो, पण त्या सत्यासाठीं विषाचा पेला हंसत ओठाला लावणारा साक्रेटीस एकादाच निघतो. जी गोष्ट सत्याची तीच गोष्ट स्वातंत्र्याची आहे. सुभाषचंद्रांची स्वातंत्र्यप्रीति ही कुठल्याहि एका प्रसंगानें निर्माण झाली नाही, तर ती अभिजात, जन्मतःच आहे. गुलामीचा तिरस्कार त्यांना सदैव वाटत असे. सारें आकाश कोसळून पडलें तरी स्वातंत्र्यप्रेम कमी होणार नाहीं. उलट तें एकाद्या ज्वालेसारखें उफाळेल. सुभाषचंद्रांची स्वातंत्र्यप्रीति इतकी उज्ज्वल आणि म्हणूनच खऱ्या अर्थानें स्वतंत्रतादेवीचे ते लाडके सुपुत्र होते !

## अभिजात क्रांतिकारक

या त्यांच्या अदम्य स्वातंत्र्योर्मीतूनच त्यांची क्रांतिप्रियता निर्माण झाली आहे. क्रांतिप्रिय मनोवृत्ति हें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें आकर्षक वैशिष्ट्य होतें. ते क्रांतिकारक प्रवृत्तीचे होते. याचा अर्थ ते दहशतवादाला मान्यता देत होते असा गैरसमज सरकारनें सुद्धां करून घेतला आणि त्यांना जन्मभर छळलें. त्यांचे आणि दहशतवाद्यांचे काय संबंध होते हें अद्याप ज्ञात नाहीं. परंतु सुभाषचंद्र म्हणजे क्रांतितेजाचा समूर्त आविष्कार. त्यांच्या नसानसांतून तें रक्त वाहात होतें. त्यांनीं स्वतःच बंगाली माणसाचें वर्णन 'क्रांतिकारक किंवा गतिप्रिय' असें केलें आहे. अभिजात क्रांतिकारकाला लागणारें साहस, वीज कोसळून पडली तरीहि ती सहन करण्याची सहनशीलता, कधींहि स्वस्थ बसूं न देणारी झुंजार मनोवृत्ति, अन्यायाच्या प्रतिकारासाठीं प्राणार्पण करण्याची तयारी, अलौकिक सावधानता हे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं होते. म्हणूनच सशस्त्र क्रांतीचा विराट् प्रयत्न ते करूं शकले. आपल्या मार्गावरील त्यांची श्रद्धा अढळ होती म्हणून त्यांनीं अनेक वेळां म्हटलें कीं, सशस्त्र क्रांतीनेंच राष्ट्र स्वतंत्र होऊं शकेल !

सुभाषबाबूंचें सर्व आयुष्य पहा. त्यांत शांतता, सौख्य कोठेंच नाहीं. सदैव युद्ध. त्यांच्या आयुष्याचें वर्णन या एकाच शब्दांत करतां येईल. लहानपणीं आईशीं भांडून हिमालयांत गेले. ऐन तारुण्यांत सरकारी नोकरीची सुवर्णशृंखला तोडून त्यांनीं देशसेवेचें असिधाराव्रत स्वीकारलें. त्या कालांत बंगाली क्रांतिकारकांचे ते आदर्श होते ! जेथें जेथें अन्याय झाल्यासारखा वाटला तेथें तेथें तो त्यांनीं पायाखालीं तुडविण्याचा प्रयत्न केला. गेल्या चारपांच वर्षांत तर त्यांचें क्रांतितेज मध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें तळपत होतें !

क्रांतिकारकांचें सैन्य उभारणें हें सुभाषबाबूंच्या आयुष्यांतील पहिलें स्वप्न. तें त्यांनीं अल्पकाळ कां होईना खरें झालेलें पाहिलें. म्हणूनच हें त्यांच्या अभिजात क्रांतिकारक प्रवृत्तीचें परिणत रूप. जगाच्या सर्वश्रेष्ठ क्रांतिकारकांत सुभाषबाबूंना स्थान दिलें जाईल.

## अदम्य आत्मबल

परक्या सत्तेविरुद्ध बंड करण्यासाठीं दंड थोपटून उभें राहणाऱ्या प्रत्येक क्रांतिवीराला या गुणाची आवश्यकता असते. जेथें देशभक्ति हाच गुन्हा समजला

जातो, संगिनीच्या जोरावर राज्य केलें जातें, अन्याय हाच न्याय समजला जातो अशा देशांत तें सर्व नाहींसें करण्याचा प्रयत्न करणाऱ्या वीरांना फांसावर चढविण्यांत येतें, काळें पाणीहि पहावें लागतें आणि उघड्या छातीवर बंदुकीच्या गोळ्याहि झेलाव्या लागतात. कारण तो मार्गच तसा असतो. तेथें सहानुभूति नाहीं, क्रौर्य आहे. हें सर्व सहन करावयाचें असेल तर एकाच बलाची आवश्यकता आहे. तें म्हणजे आत्मबल. "पिचेल मनगट परी उरांतील अभंग आवेश" असें तें पाहिजे. तें नसेल तर केवढाहि मोठा क्रांतिकारक मार्गभ्रष्ट होतो.

सुभाषचंद्रांचें आत्मबल फार मोठें होतें. त्यांच्या आयुष्यांत त्यांच्या या अदम्य आत्मबलाची कसोटी अनेक वेळां लागली. मंडालेच्या कारागाराभोंवतीं मृत्यूची भीषण छाया पडली होती, मरणोन्मुख शय्येवर ते पडले होते, तरीहि त्यांनीं आपल्या बंधूंना लिहिलें--" माझी मनःस्थिति अत्यंत शांत आहे. परमेश्वर वाट्याला देईल त्या दिव्याला तोंड देण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं उत्पन्न झालें आहे. त्याचें सर्व श्रेय जगन्नियंत्याला आहे......आपले विचार, कल्पना, ध्येयें, हीं कल्पांतींहि नष्ट होणार नाहींत. पुढील पिढीला त्यांचा उपयोग झाल्याखेरीज राहणार नाहीं. याच आत्मविश्वासावर निर्धार ठेवून मी वाटेल ते क्लेश व आपत्ति सहन करूं शकेन!" तुरुंगांत क्षय झाला तरीहि त्यांची ज्योत तेवतच होती. युरोपांत पाठविनांना सुद्धां त्यांचा छळ झाला. फक्त अंगावरल्या वस्त्रानिशीं त्यांची युरोपांत रवानगी झाली. शेवटच्या कारावासांत तर प्राणांतिक उपोषणाचा त्यांनीं केलेला निर्धार त्यांच्या आत्मबलाचें उच्च उदाहरण आहे. "स्वतःच्या ध्येयवेदीवर केलेल्या शांतिमय आत्मबलिदानापेक्षां जीविनाचें साफल्य दुसरें काय असूं शकणार?" या अपूर्व समाधानानें स्वतःचे प्राण त्यांनीं धोक्यांत घातले. ही त्यांची आत्मबलिदानाची तयारी पाहिली म्हणजे शांतपणें चितेवर चढणाऱ्या पूर्वीच्या सतींची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. केवढें तरी अपूर्व व अजिंक्य आत्मबल सुभाषचंद्रांच्या ठिकाणीं होतें असेच उद्गार प्रत्येक मनुष्य काढील.

सरकारनें त्यांचा सतत छळ केला. राजसत्तेनें त्यांना डिंवचावें अन् एखादा सिंह चवताळून उठावा त्याप्रमाणें अशा प्रत्येक प्रसंगीं खवळून जाऊन सुभाषबाबूंनीं आक्रोशून सांगितलें—

" अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला !
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ! "

## साहसी वृत्ति

अभिजात क्रांतिकारकाच्या अंगीं साहसी वृत्ति ही अवश्य असावी लागते. क्रांतिकारकाचें आयुष्यच मुळीं साहसांनीं युक्त असतें. खवळलेल्या अथांग सागरांत न भितां उडी घेण्याचें मनोधैर्य जितकें मोठें तितकेंच जुलमाला न भितां, शत्रूच्या डावपेंचाला न जुमानतां दाखविलेलें मनोधैर्य मोठें असतें. सुभाषचंद्रांच्या आयुष्यांत साहसाला महत्त्वाचें स्थान आहे. साहसी वृत्ति म्हणजे क्रांतिकारकांची तीक्ष्ण तलवार; तिच्या जोरावरच तो आपल्या आयुष्यांत अनेक विजय मिळवीत असतो. सुभाषबाबूंचें सर्व आयुष्य रोमांचकारी प्रसंगांनीं भरलेलें आहे.

वयाच्या अवघ्या बाराव्या तेराव्या वर्षी राख फांसून हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांतून एकटें हिंडणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. किंवा एका अन्यायी युरोपियन प्रिन्सिपॉलच्या अंगावर धावणारे सुभाष हे साहसीच नव्हेत का ? पण या सर्व प्रसंगांपेक्षां त्यांच्या साहसी वृत्तीचा उच्चांक–उच्च बिंदु–कोठला असेल तर तो त्यांनीं केलेल्या 'पलायनांत'.

एका सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या साम्राज्यसत्तेच्या डोळ्यात धूळ फेकून जणू कांहीं अभिमानानें तिला 'जितं मया' असें म्हणत सुभाष निघून गेले ! ही साहसपूर्ण घटना अनेक नाटकांचा नि काव्यांचा विषय आहे. कारण इतकें अलौकिक साहस त्यांत आहे. सुभाषबाबूंना भीति हा पदार्थच माहीत नव्हता.

सुभाषबाबूंनीं हिंदुस्थान सोडल्यानंतर गेल्या ५।६ वर्षांत त्यांच्या आयुष्यांत कितीतरी साहसपूर्ण प्रसंग घडले असतील. पण ते आज अज्ञात आहेत.

एका वर्षापूर्वीचा प्रसंग रंगूनच्या आकाशांत असंख्य विमानें फिरत होतीं. बॉंबवर्षाव होण्याचाहि संभव होता. नेताजींना त्यांच्या सानिकांना विनंति केली की आश्रयस्थानांत जा, पण सुभाषचंद्रांची साहसी तडफ कांहीं कमी झालेली नव्हती. त्यांनीं उत्तर दिलें,

" सुभाषला मारणारा बॉंब अद्याप ब्रिटिशांना सांपडलेला नाहीं ! "

सुभाषबाबूंच्या या अलौकिक साहसी वृत्तीमुळें त्यांच्या जीवनांत रोमांचकारी

प्रसंग निर्माण झाले. त्यांच्या जीवनवृत्ताचें तें एक आकर्षक वैशिष्ट्य आहे. त्यांनीं मिळविलेल्या अलौकिक यशाचें मूळ त्यांच्या साहसी वृत्तींतच आहे.

## नेत्रदीपक पराक्रम

परतंत्र देशांत सर्वांच्या गुणांना वाव मिळत नाहीं. असे अनेक बुद्धिमान् पुरुष असतात कीं ज्यांना आपली बुद्धि परिस्थितीमुळें विकावी लागते. अनेक शंकराचार्य, राणा प्रताप समाजांत पुढें येऊं शकत नाहीत. कारण त्यांच्या विकासाला अवश्य असणारी अनुकूल परिस्थिति नसते.

सुभाषबाबूंचा पराक्रम ह्या देशांत दिसूं शकला नाहीं. साम्राज्यशाहीशीं अविरत झुंजणारा वीर म्हणूनच त्यांच्याकडे लोक पाहात. परंतु हिंदुस्थानच्या बाहेर त्यांनीं एक अलौकिक, अभूतपूर्व प्रयोग केला. अनेक लोक या प्रयोगानें चकित झाले आणि आज सारा भारतवर्ष सुभाषबाबूंचा गगनभेदी जयजयकार करीत आहे !

तो जयजयकार त्यांच्या नेत्रदीपक पराक्रमाचा आहे. 'आझाद हिंदसेना' हें त्यांच्या पौरुषाचें—पराक्रमाचें स्मारक आहे. ते इतके पराक्रमी आहेत याची प्रचीति आज भारताला येत आहे. म्हणूनच गांधीजींनीं सुद्धां असे उद्गार काढले कीं "सुभाषबाबूंचें साहस नि त्यांचा पराक्रम मला ते हिंदुस्थान सोडून गेल्या-नंतर माहीत झाला !" त्यांच्या पौरुषाचा गौरव यापेक्षां निराळा काय करणार ? हा पराक्रमच इतका मोठा आहे कीं क्वचित् परशुरामानें आपली मान त्यापुढें वांकवावी. सुभाषबाबूंच्यासारख्या अलौकिक पराक्रमी पुरुषानेंच असा विराट् प्रयत्न करावा.

## त्यागमूर्ति सुभाष

सुभाषचंद्र म्हणजे त्यागाचें पार्थिवरूप. मूर्तिमंत त्याग. त्याग हा त्यांच्या जीवनाचा आत्मा आहे. तो त्यांचा धर्म होता. त्यांचा स्वभाव होता. त्यांचें जीवन म्हणजे धगधगणारें यज्ञकुंड. त्यांत कशाची आहुति पडावयाची राहिली ? राष्ट्रासाठीं संपूर्ण आत्मसमर्पण हें त्यांच्या आयुष्याचें साध्य. हाच त्यांचा उच्च स्वार्थ. त्यासाठीं ते सर्वस्व देऊन मोकळे झाले.

सुभाषचंद्रांनीं देशाकरितां काय द्यावयाचें ठेवलें होतें ? अक्षरशः सारसर्वस्व त्यांनीं दिलें. सुभाषचंद्रांचें घरसुद्धां लिलांवासाठीं काढलें. पण सरकारची निराशा झाली. कोणीहि तें घेण्यास पुढें आलें नाहीं.

सुभाषचंद्रांचा त्याग भावनेच्या लाटेबरोबर वाहून जाऊन केलेला नव्हता. उघड्या डोळ्यांनीं शरीरांतील बिंदू अन् बिंदू जळत ठेवणें हें त्यांच्या त्यागाचें वैशिष्ट्य आहे. आपल्या हातांनीं आपलें आयुष्याचें पुष्प त्यांनीं चुरगाळलें. त्यामागें एक उदात्त तत्त्वज्ञान उभें होतें. हुतात्म्यांच्या रक्तांतून, अनेकांच्या जीवनदानांतून राष्ट्र निर्माण होतें हें त्यांचें उदात्त तत्त्वज्ञान होतें. आपल्या त्यागाविषयींच्या कल्पना १९४० सालीं बंगाल सरकारला पाठविलेल्या पत्रांत उत्कृष्ट रीतीनें त्यांनीं मांडल्या. त्यावरून सुभाषबाबूंच्या त्यागामध्यें कुठलें उदात्त तत्त्वज्ञान उभें होतें याची कल्पना येते. " ...... आत्मयज्ञ हा कधींहि निष्फळ होत नाहीं. सर्व कालीं सर्व राष्ट्रांत एकच शाश्वत नियम विजयी झालेला दिसतो. तो म्हणजे हुतात्म्यांच्या रक्तमांसानेंच स्वातंत्र्याचीं यशोमंदिरें उभारलीं जातात. पण तो प्रगट होण्याचें एकमात्र साधन एकच—आत्यंतिक कष्ट नि आत्मयज्ञ. ...आत्मयज्ञ व खडतर कष्ट यांच्या दिव्यांतून गेल्यावांचून आजपर्यंत जगांत कोणत्याहि तत्त्वप्रणालीला यशसिद्धि गांठतां आलेली नाहीं! आपल्या ध्येयासाठीं आजपर्यंत आपण जगलों आणि त्यासाठींच आपण आत्मबलिदान करीत आहोंत या भावनेपेक्षां जगांत श्रेष्ठ असें कोणतें शांतीचें स्थान असूं शकेल? आपण मरूनहि आपलें जीवित, आपलें अर्धवट राहिलेलें जीवितकार्य पुरें करण्याकरितां लक्षावधि बांधवांच्या हृदयांत चेतना निर्माण करूं शकतें या जाणीवेपेक्षां दुसरें कोणतें सर्वोच्च समाधान असणार?"

एक विशिष्ट ध्येय पुढें ठेवून त्याच्या पूर्तीसाठीं केला जाणारा त्याग कधींहि फुकट जाणार नाहीं. त्यानें ध्येयाच्या सिद्धीचा मार्ग सुकर होतो. याच अर्थानें सुभाषचंद्रांचा त्याग महनीय आहे, आदर्श आहे! हेंच एक वेड त्यांच्या डोक्यांत होतें. पण ते एक पद्धतशीर वेडे पुरुष ( Systematic mad man) होते. त्यांचे मित्र त्यांना विचारीत कीं, "तुम्ही लग्न कां करीत नाही?" त्यांनीं उत्तर द्यावें, " असल्या गोष्टी करायला सवडच नाहीं. देशभक्ताच्या कार्यांत त्यानें अडथळा येतो. " इतका ध्येयाशीं तादात्म्य पावलेला पुरुष म्हणजे त्यागमूर्तीच नव्हे का?

अनेक पिढ्यांनीं ज्याचा आदर्श पुढें ठेवावा असा हा महान् त्याग आहे. सुभाषबाबूंना आपण केलेला त्याग हा 'त्याग' कधींच वाटला नाहीं! मायभूमीच्या दास्यविमोचनार्थ पेटविलेल्या यज्ञांत आपण आपला स्वार्थ जाळून टाकला

आहे हेंच समाधान त्यांनीं मिळविलें आहे. तिच्यासाठी यौवनाची राख केली आहे. " त्यागेन एकेन अमृतत्वं आनशुः । " या तत्त्वाप्रमाणें सुभाषचंद्र अमर झाले आहेत !

## स्नेहशील सुभाष

वर्षाकालांत इंद्रधनुष्यांचें दर्शन किती आल्हाददायक असतें ? सुभाषचंद्रांच्या स्नेहशीलतेचा अनुभवहि असाच आल्हाददायक आहे. शत्रूवर कठोर प्रहार करण्यास धांवणारे सुभाष इतके प्रेमळ होते हें कदाचित् खोटेंहि वाटेल. परंतु सुभाषबाबूंच्या बाबतींत हें अक्षरशः खरें आहे. सुभाष म्हणजे प्रेमाचा सागर. ही अतिशयोक्ति नाहीं. आज भारतांत सुभाषबाबूंच्या आठवणीनें जे नेत्र ओलावत आहेत ते या विधानाची सत्यता पटवतील !

कुठल्याहि राजकीय पुढाऱ्यामध्यें सांपडणार नाहीं असा हा गुण सुभाषचंद्रांचे जवळ होता. म्हणून राजकीय कार्याच्या निमित्तानें त्यांचा ज्यांच्याशीं संबंध आला त्या सर्व कार्यकर्त्यांना त्यांनीं आपल्या रेशमासारख्या नाजुक स्नेहबंधनांनीं जोडलें. तीं बंधनें रेशमासारखीं अतूट ठरलीं. ते पुढारी होते, पण ते मित्रहि होते. खोटा पुढारीपणाचा दंभ त्यांचेजवळ नव्हता. ते सर्वांना प्रेमानें व सौजन्यानें वागवीत. ते इंग्लंडांत असोत, तुरुंगांत असोत वा राष्ट्राध्यक्षाच्या उच्च नेतृत्वपदावर विराजमान झालेले असोत त्यांनीं आपल्या मित्रांचे संबंध तोडले नाहींत. नेहमीं आपल्या मित्रांना ते पत्रें पाठवीत आणि तींसुद्धां हस्ताक्षरांत. यंत्रांची यांत्रिकताहि त्यांना सहन होत नसे. कारण त्यांत हृदयाचा ओलावा नसतो.

ही त्यांची स्नेहशीलता त्यांच्या निरहंकार वृत्तीतून निर्माण झाली होती. पुढारीपणाचा अहंकार त्यांना शिवला नाहीं. पुढारी म्हणजे हवेंतून तरंगणारा प्राणी नव्हे तर समाजाशीं समरस झालेला पुरुष अशी त्यांची कल्पना होती. ते स्वतःला एका महान् व्रताचे सेवक समजत. म्हणून त्यांच्या स्नेहशीलतेला उदात्तता प्राप्त झाली. कोणीहि त्यांच्याकडे येवो आपल्या मृदु परंतु मार्मिक शब्दांत ते आपलें म्हणणें मांडित. कोणी मुलाखत मागावयास आल्यावर " वेळ नाहीं, प्रकृति नादुरुस्त आहे " अशा थापा मारण्याची कला त्यांना साधत नसे. त्रिपुरी कॉंग्रेसच्या वेळीं ते आजारी होते. त्यावेळीं त्यांना अनेकांना भेटतां आले नाहीं याचें त्यांना किती तरी वाईट वाटलें ! त्यावेळीं ते आजारांतून बरे व्हावेत

म्हणून सर्व हिंदुस्थानांतून—परदेशांतूनहि—त्यांना औषधें ताईत वगैरे लोकांनीं पाठविलें. त्या त्या वस्तूमागें सुभाषांच्या प्रीतीनें-भक्तीनें भरलेलीं हृदयें होतीं! आज हिंदुस्थानांत असलेले त्यांचे अनेक मित्र स्वतःला धन्य समजत आहेत कारण सुभाषचंद्रांच्या 'स्नेहशीलतेचा गोड अनुभव आपल्याला मिळाला–त्यांच्या एका मित्रानें म्हटलं आहे—सुभाषबाबूंच्या महाराष्ट्रीय मित्रमंडळींच्या अंतःकरणांत अशा लहान सहान गोष्टींच्या स्नेहस्मृतींची स्निग्ध, शीतल, मंद, आल्हाददायक ज्योत चिरकाल तेवत राहील यांत संशय नाहीं.' ही त्यांच्या पूर्व जीवनांतील स्नेहशीलतेची साक्ष.

परंतु गेल्या दोन चार वर्षांत जीं हजारों हृदयें त्यांनीं जिंकलीं तीं कशाच्या जोरावर? सैनिकांच्या हृदयांत सुभाषचंद्रांची मूर्ति कोरली गेली ती त्यांच्या या स्नेहशीलतेनें. हृदयांचा व्यापार प्रेमाच्या नाण्यानें चालत असतो. त्याची खैरात सुभाषचंद्रांच्या जवळ होती. निरलस, विशुद्ध प्रेमाच्या पायावर त्यांनीं संघटना केली म्हणूनच 'माझे नेताजी' असे म्हणत मरणारे सैनिक निर्माण झाले. सुभाषचंद्र सैनिकांचे 'ईश्वर' झाले. आज मुक्त झालेल्या सैनिकांच्या डोळ्यांत नेताजींच्या स्मृतीनें उभे राहणारे अश्रु सुभाषचंद्रांच्या उदात्त नि अद्वितीय स्नेहशीतलतेची साक्ष देतील!

नुसत्या हस्तस्पर्शानें लोणी जसें विरघळावें तसें सुभाषचंद्रांचें अंतःकरण दुसऱ्याच्या दुःखानें विरघळत असे. बंगाल्यांत महापुरानें कहर उडाला असतां त्यांनीं अविरत श्रम घेतले. दोन वर्षापूर्वीची रंगूनमधील गोष्ट आहे. एका बॉंबहल्ल्यानंतर सुभाष रस्त्यानें जात होते. एका घरांत बॉंबहल्ल्यामुळें एक म्हातारा जखमी होऊन विव्हळत पडला होता. त्याच्या शेजारीं एक मूल रडत होतें. नेताजींनीं तें पाहिलें. ते जवळ गेले आणि त्या बालकाला हृदयाशीं धरलें. तें मूल शांत झालें. त्या म्हाताऱ्यानें सुभाषचंद्रांचे पाय धरले. एकच प्रसंग. पण किती भावपूर्ण आहे? आईच्या प्रेमानें भरलेलें सुभाषबाबूंचें हृदय होतें तें.

सुभाषबाबू लहानपणापासूनच अतिशय प्रेमळ होते. त्यामुळें लहानपणीं ते अनेक मित्रांना आपलेसे करूं शकले. त्यांचे एक बालपणचे मित्र श्री. दिलीपकुमार रॉय यांनीं सुभाषचंद्रांच्या आठवणी सांगतांना म्हटलें आहे—"ज्या ठिकाणीं क्षणापूर्वी खडकाळ माळरान असेल तेथं एकदम सोनेरी सूर्यप्रकाशांत चमकणारी फुलबाग दिसावी तसं त्यांचं हास्य परिणामकारी असे. एकदां का त्यांचं तें मनोरम हास्य माणसानें पाहिलें—सर्वांग गदगदून हलवीत होणारे तें हास्य

पाहिलें कीं पाहाणाऱ्याचा ग्रह बदलून गेलाच पाहिजे. सुभाषच्या परिचयांत असलेल्या सर्वांना त्यांच्या हास्याची ही किमया प्रत्ययाला आली असेल!" सुभाषचंद्रांच्या या सुहास्यानें अनेकांना जणूं कांहीं वेड लागावें. ते एकदां हंसले कीं मित्र समजत आपल्या भेटीचें सार्थक झालें.

सुभाषबाबूंच्या स्नेहशीलतेचें वर्णन किती करावें. एक गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं भारतीय पुढाऱ्यांत इतका स्नेहशील पुढारी दुसरा सांपडणें कठिण! हें सुभाषचंद्रांचें वैशिष्ट्य आहे. मोगऱ्याच्या सुंदर फुलांनीं भरगच्च भरलेला ताटवा पाहिल्यावर किती आनंद होतो? त्या फुलांची मोहकता, तो मंदमधुर सुवास, यांनीं अंतःकरणांत आनंदाचें कारंजें उडूं लागतें! सुभाषचंद्रांची स्नेहशीलता अशीच आहे!

## प्रभावी वक्तृत्व

सुभाषचंद्रांचें वक्तृत्व म्हणजे अप्रतिहतपणें वाहणारा गंगौघ. नेत्याच्या अंगी ही वक्तृत्वाची कला नसेल तर त्याच्या यशांत कमीपणा येतो. सुभाषचंद्रांचें वक्तृत्व म्हणजे नदीचा उलटा प्रवाह कापीत जाणाऱ्या नौकेसारखें आहे. कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव मांडतांना त्यांनीं केलेलें भाषण आणि त्यानंतर प्रत्येक ठिकाणीं केलेलीं भाषणें म्हणजे बुद्धीच्या निकषावर घासलेली व भावनेची झिलई दिलेली विचारसरणी. नुसतें भावनाप्रधान वक्तृत्व त्यांचें कधींच नव्हतें. मुद्रा अत्यंत शांत, आदळआपट नाहीं, निष्कारण हावभाव नाहींत. परंतु विचारांचा प्रवाह कधीं वाऱ्यासारखा वेगवान, कधीं गंगेसारखा संथ. मायक्राफोनसमोर बोलावयास एकदां उभे राहिले कीं सर्वांच्या हृदयांत एकच संवेदना उठे कीं "हा काय सांगतो!" किंचित् कललेली पांढरी टोपी, प्रसन्न हास्य, अंगावर पांघरलेली शुभ्र शाल अशी सुभाषचंद्राची मूर्ति उभी राहिली आणि त्यांची ती अग्निकण उधळीत जाणारी वाणी सुरू झाली कीं, सारा श्रोतृसमाज तल्लीन होत असे. सुभाषचंद्रांच्या आकर्षक वक्तृत्वशैलीचें सुंदर वर्णन एका आझाद हिंद सेनेंतील स्त्रीनें केलें आहे. तें त्यांच्या वक्तृत्वाची यथार्थ कल्पना देईल.

"मायक्राफोनमधून बोलतांना नेताजी मान ताठ करून सरळ उभे राहातात. हावभाव फार थोडे. निष्कारण हालचाल नाहीं. गंभीर, शांत पण निश्चयी

आवाजांत ते एकामागून एक युक्तिवाद पुढें मांडतात ( He appeals, appeals & appeals ) ऐकणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला असें वाटतें कीं जणूं सुभाषबाबू आपल्याशींच व्यक्तिशः बोलत आहेत. नाटकी अभिनय करीत नाहींत, बोलतांना पाणी पीत नाहींत, कोणी पंखाहि हलवीत नाहीं. स्मरणासाठीं हातांत बारीकसा कागददेखील नाहीं. जणूं कांहीं आपला पिता आपल्यापुढें उभा आहे, आपल्या स्वभावांतील चांगुलपणाला जागृत करीत आहे असें सुभाषबाबूंच्याकडे पाहिल्यावर वाटतें. आपल्याला असें वाटूं लागतें कीं, आपण जर यांच्याशीं सहकार्य न करूं तर, ते मागतील तें न देऊं तर, आपण एक क्षुद्र, स्वार्थी, निरानटी पशु ठरूं ! ते जादूगार आहेत, पण जादूटोणा मात्र त्यांचेजवळ नाहीं ! "

सुभाषबाबूंच्या वक्तृत्वाची मोहिनी पडलेल्या लेखणींतून हें वर्णन उतरलें आहे. त्यापेक्षां अधिक चांगलें कुठलें वर्णन असूं शकेल ?

यतींद्रनाथ दिनाच्या दिवशीं १९४३ सालीं सुभाषचंद्रांनीं केलेलें भाषण म्हणजे त्यांच्या वक्तृत्वकलेचें उच्च दर्शन आहे. अनेक शूर क्रांतिकारकांच्या कथा ऐकल्यानंतर सुभाषचंद्रांनीं आपल्या प्रगल्भ आणि तीक्ष्ण वाणीनें स्वातंत्र्यदेवतेची मागणी काय आहे हें सांगितलें. आणि शेवटीं दोनच वाक्यें उच्चारलीं आणि त्यानें असंख्य अंतःकरणें पेटलीं ! "तुम हमको खून दो, मैं तुमको आझादी दूँगा ! " या वाक्याचें सामर्थ्य एवढें प्रभावी ठरलें कीं शेंकडों लोक रक्ताच्या शाईनें प्रतिज्ञा घेण्यास तयार झाले !

इतकें सामर्थ्य त्यांच्या वक्तृत्वांत होतें. अंतःकरणाच्या अंतरंगांतून अपूर्व तळमळीनें त्यांचा येणारा प्रत्येक शब्द हृदयांत अस्वस्थता निर्माण करी. विचारांचें आंदोलन निर्माण होई !

सुभाषचंद्रांची लेखणीहि अशीच तीक्ष्ण होती. बंगालमध्यें देशबंधू दास यांनीं काढलेल्या वृत्तपत्राचे सुभाष हे प्रमुख संपादक होते. त्यांच्या लेखांनीं सरकार अस्वस्थ होत असे. मुद्देसूदपणा, मार्मिक शब्दयोजना हीं त्यांच्या लेखनशैलीचीं वैशिष्ट्यें होतीं. त्यांनीं तुरुंगांतून लिहिलेलीं अनेक पत्रें, बंगाल सरकारला लिहिलेलें पत्र, त्यांचा 'The Day of reckoning' हा लेख ही सारीं त्यांच्या उत्कृष्ट लेखनशैलीचीं स्मारकें आहेत !

## कुशल संघटक

सुभाषचंद्रांच्या अंगीं असलेल्या अनेक गुणांचा उपयोग त्यांना अनेक लोकांचें

वलय निर्माण करण्यांत झाला. सुभाषचंद्रांच्या सार्वजनिक आयुष्याच्या प्रारंभापासूनच त्यांच्या या गुणांमुळें त्यांना आपल्या विचाराचीं माणसें मिळविणें सोपें झालें. १९३५ सालीं तर सरकारनेंच त्यांच्यावर ते "संघटनकुशल" असल्याचा आरोप केला होता.

त्रिपुरी कॉंग्रेसनंतर सुभाषबाबूंनीं "पुरोगामी गट" स्थापन केला. त्यावेळीं अवघ्या एक दोन वर्षांत निर्माण केलेलें संख्याबळ त्यांच्या संघटनकौशल्याची खरी साक्ष देतें. त्यांचा स्वभाव म्हणजे "सकल लोक राजी राखावें" असा. त्याच्या जोरावर त्यांनीं अनेक माणसें मिळविलीं. प्रत्येक माणसाच्या योग्यतेप्रमाणें ते त्याला कामें देत. त्यामुळें सर्वांना कार्यप्रवण करण्याची कला त्यांना साधली होती. व्यक्तीचा अहंकार प्रथम नाहींसा व्हावा लागतो. सुभाषचंद्रांनीं अहंकाराला केव्हांच हद्दपार केलें होतें आणि म्हणूनच त्यांना एवढी उत्कृष्ट संघटना करतां आली.

आझाद हिंद फौजेची स्थापना करून सुभाषचंद्रांनीं जी संघटना केली आहे तिला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. शालिवाहनानें मातींतून सैन्य निर्माण केलें असें म्हणतात. सुभाषचंद्रांनीं "आझाद हिंद सेना" स्थापन करून थोड्या अवकाशांत हजारों लोक गोळा केले. परिस्थिति प्राप्त झाली हें खरेंच. पण त्यापेक्षां सुभाषबाबूंचें कर्तृत्व मोठें! सुभाषबाबूंनींच साऱ्या सैनिकांत तेज फुंकलें आणि त्यांतून स्वातंत्र्याच्या प्रीतीनें भारावलेले असंख्य लोक निर्माण केले. संघटनेच्या दृष्टीनें सुभाषचंद्रांचा हा अलौकिक विजय आहे. एका अग्निकणांतून भयंकर दावाग्नि उठवतां येतो हें सुभाषचंद्रांच्या कर्तृत्वानें सिद्ध झालें.

## आदर्श नेताजी

अनेक प्रकाशकिरणांचा जसा एक तेजःपुंज तारा बनावा, अनेक अग्निगोलकांचा जसा एक अग्नीचा गोळा बनावा तसें सुभाषचंद्रांच्या अनेक अलौकिक गुणांमुळें ते आदर्श नेताजींच्या महत्पदाला पोहोंचले आहेत. नेत्यापेक्षांहि एक महान् विभूति म्हणून सर्व भारत आज त्यांना वंदना देत आहे. त्यांचें व्यक्तिमत्त्व स्वयंवेगवान् (Dynamic personality) होतें म्हणून ते आदर्श नेताजी होऊं शकले.

भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें झालें.

> एकेनापि हि शूरेण पादाक्रान्तं महीतलम्
> क्रियते भास्करेणेव स्फारस्फुरित तेजसा ।

(शूर पुरुष एकटा असतांहि सूर्याप्रमाणें आपल्या अप्रतिम तेजानें सर्व भूमंडळ पादाक्रांत करून टाकतो.) सुभाषचंद्रांच्या या तेजाचें दर्शन झाल्याबरोबर गांधीजींनासुद्धां असे उद्गार काढावे लागले कीं, "सुभाषचंद्रांच्या संघटनकौशल्याची नि धैर्याची कल्पना ते हिंदुस्थानांतून गेल्यावर आली."

सुभाषचंद्रांच्या आदर्श नेतृत्वाचे अनेक गुण आहेत. ते सर्व होते म्हणून त्यांना असंख्य सैनिकांचें " प्राणप्रिय नेताजी " होतां आलें.

सूर्योदय झाल्यानंतर जसा अंधार नाहींसा होतो तसें सुभाषचंद्रां आझादनीं सेनेचें नेतृत्व स्वीकारल्याबरोबर घडलें. ज्यांनीं जन्मांत कधीं बंदूक हातांत धरली नाहीं असे कारकून, हमाल सैनिक झाले. स्त्रियांनींसुद्धां हातांत बंदुका घेतल्या. ज्यांनीं आपल्या आईच्या कुशींत झोंप घ्यावी अशीं लहान बालकें देशाच्या स्वातंत्र्यासाठीं स्वतःचे प्राण देण्यास तयार झालीं. सुभाषबाबूंचें कर्तृत्व, त्यांच्या नेतृत्वाची उच्चता यांत आहे. त्यांनीं आपल्या तेजस्वी वाणीनें सैनिकांना सांगितलें,— " पारतंत्र्यानें जखडलेली तुमची ही मातृभूमि तुम्हांला पाहवते का ? तिचा नाश करण्यासाठीं टपलेल्या घातक्यांचा नाश करण्याची ही वेळ आहे ! " या आवाहनानें सैनिकांचा अंतरात्मा जागृत झाला. ते अस्वस्थ झाले. कॅ. शहानवाझखान यांनीं आपल्या कोर्टापुढील जबानींत सांगितलें—" मलायांत त्यांचीं भाषणें मीं ऐकलीं. त्यांचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वानें व भाषणांनीं मी मुग्ध होऊन गेलों होतों व भारून गेलों होतों असें म्हटलें तर चुकीचें होणार नाहीं. नेताजींनीं हिंदुस्थानचें खरेखुरे चित्र आमच्यापुढें मांडलें. आमच्या कर्तव्याची स्पष्ट जाणीव आम्हांला करून दिली. नेताजींत मला पुढारी आढळला नि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याचें मीं ठरविलें ! " या चारच ओळी सुभाषबाबूंच्या अलौकिक नेतृत्वाच्या उच्चतेची साक्ष पटवितील.

त्यांनीं सैनिकांवर पुत्रवत् प्रेम केलें, आपल्या अंतःकरणांतील प्रेम दिलें, सहानुभूति दिली नि स्वातंत्र्यप्रीतिहि दिली ! ते सैनिकांबरोबर जेवत, त्यांना त्यांनीं आश्वासन दिलें होतें कीं—" निबिड अंधःकार असो, अथवा प्रकाश असो, दुःख असो वा सुख असो, यातना असोत कीं विजय असो, मी तुमच्याबरोबर राहीन

अशी तुम्हांला खात्री देतों! " या आश्वासनाप्रमाणें ते वागत. ते अन्न खात तें साध्या सैनिकाचें! त्यांना फळांच्या करंड्या मिळाल्या नसत्या असें नाहीं! पण ते इतके समरस झालेले. एकाच त्यांच्या आठवणीवरून त्यांच्या हृदयांतील तळमळीची जाणीव होऊं शकेल.

" बरसातीचे दिवस होते. ब्रह्मदेशच्या जंगलांत चिखलच चिखल झाला होता. तीर सुटावा त्याप्रमाणें थंड वारा वाहात होता. आमची फौज लढाईवर होती. फौजेची पहाणी करण्यासाठीं त्या तशा पावसांत नि चिखलांतहि नेताजी मोटारींतून येत होते. एकाएकीं मोटार बिघडली. नेताजी हातपाय गाळणारे नव्हते. ते तसेंच मोटारींतून उतरले व चालूं लागले. बरोबरचे लोक म्हणाले, ' नेताजी, आपण असे पायीं जाऊं नका. दुसऱ्या मोटारीची व्यवस्था होईल. ' पण नेताजी तर सैनिकांस पहाण्यास अधीर झालेले, ' नहीं, नहीं हम यूंही चलेंगे. ' माझे लाखों बच्चे रणांगणावर या पावसांत आणि चिखलांत लढत आहेत, संकटांना तोंड देत आहेत. चलो. ठहरनेका वक्त नहीं. आपण खुद्द त्यांच्याकडे जाऊं. त्यांच्या अडचणी पाहूं, त्या दूर करण्यासाठीं झटूं! " हा एकच प्रसंग बोलका आहे. ते भाडोत्री सैनिकांचे सेनापति नव्हते, तर ज्यांनीं आपलें रक्त मातृभूसाठीं दिलें अशांचे ते नेताजी होते.

सैनिकांच्या जखमा पाहून त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहात नि ते सैनिकांच्या जखमा बांधत. अशा अलौकिक नेत्यानें पाषाणांतून ज्योति फुलविल्या नाहींत तरच आश्चर्य!

त्यांचें अंतःकरण ' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि! ' असें होतें. त्यांत उदात्त रस तरच होता, पण क्रांतिप्रियतेचा धगधगता अग्नि होता. त्यांतून " नेताजी, माझे नेताजी! " असा रामनामाप्रमाणें ध्यास घेत मरणारे सैनिक त्यांनीं मिळविले. शत्रूच्या रक्ताचा घोट घेणारे वीर मिळविले. त्यांनीं व्यक्तित्वाच्या व्यक्तिनिष्ठेला हद्दपार करून ऊर्जस्वल स्वातंत्र्यप्रीति अजरामर केली. आपल्या शत्रूचे डावपेंच बरोबर ओळखून त्याच्यावर कुरघोडी करावयास लागणारी बुद्धिमत्ता त्यांचेजवळ होती. भविष्याचा वेध घेऊन आपले फांसे टाकण्यास लागणारा धूर्तपणा त्यांचेजवळ होता. ' आकाश कोसळून माझ्यावर पडलें तरी मी त्याच्यावर चढून उभा राहीन ' हा लोकमान्यांचे अंगीं असणारा दुर्दम्य आत्मविश्वास सुभाषबाबूंच्यांत होता. कितीहि कोलाहल केला, अतोनात छळ केला तरीहि

स्वतःच्या मार्गावरील नितांत निष्ठा अणुमात्रहि कमी होऊं द्यायची नाहीं असा त्यांचा बाणा होता. त्यांच्या ध्येयनिष्ठेची ज्योत प्रखर होती. ध्येयसिद्धीसाठीं आत्मार्पण करण्याची त्यांची सदैव सिद्धता होती. शुद्ध चारित्र्य हा त्यांचा अतिशय महत्त्वाचा, अत्यंत मौल्यवान् पैलू होता. चारित्र्य इतकें शुद्ध कीं साऱ्या जगानें त्यापुढें नम्र व्हावें. एतदर्थ, पुढें येणाऱ्या नेत्यांनीं--भारतीय क्रांतीच्या भावी नेत्यांनीं या महान् विभूतीपासून स्फूर्ति घ्यावी.

## अनंत पिढ्यांचें स्फूर्तिस्थान

ज्यांना राष्ट्रासाठीं डोळ्यांत एकहि अश्रु न आणतां स्वार्थ जाळावयाचा असेल त्यांनीं सुभाषचंद्रांच्या जीवन-यज्ञाकडे पाहावें. कोणी विचारलें कीं, क्रांतितेज कोठें आहे तर त्यानें सुभाषचंद्रांच्याकडे अंगुलिनिर्देश करावा आणि सांगावें हा तेजोनिधि येथें आहे! ज्यांना स्वातंत्र्यज्योत पेटवावयाची असेल त्यांनीं सुभाषचंद्रांच्या प्रखर तेवत्या ज्योतीवर पेटवून घ्यावी. ज्यांना उदात्तता पाहिजे असेल, त्यागाचें मूर्त स्वरूप पाहावयाचें असेल, ज्यांना पौरुषाचें, साहसाचें दर्शन घ्यावयाचें असेल त्या साऱ्यांनीं सुभाषचंद्रांच्या भव्य मूर्तीकडे पाहावें! ज्यांना पावित्र्य नि स्नेहशीलता साकार झालेली पहावयाची असेल त्यांनीं या महापुरुषाकडे पाहावें. ज्यांना सशस्त्र क्रांतिवादाचा पुरस्कार करावयाचा असेल, शेंकडों लोकांना कार्यप्रवृत्त करून त्यांना ज्वलन्त देशभक्त करावयाचें असेल त्यांना इतिहास सांगेल कीं, त्या महान् क्रांतिवीराला-त्या कुशल संघटकाला-सुभाषला विचारा!

सुभाषचंद्रांचें शुक्रताऱ्यासारखें तेजस्वी व्यक्तिमत्त्व स्वातंत्र्यपथावरील असंख्य वाटसरूंना मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहीं! युगानुयुगे या महापुरुषाचा आदर्श पुढे ठेवला जाईल, सुभाषचंद्रांच्या जयजयकारानें असंख्य जुलमी सिंहासनें डळमळूं लागतील. कारण सुभाषचंद्रांचा जयजयकार हा स्वातंत्र्यलक्ष्मीचा जयजयकार आहे! इतिहासाच्या दरबारांत भारताच्या सर्वश्रेष्ठ क्रांतिवीराला मानाचा मुजरा केला जाईल आणि स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणांत सारे जगत् उद्गारेल म्हणेल—

—"हा तो स्वतंत्र भारताचा आद्य निर्माता!" निसर्गहि जगताला साथ दिल्यावांचून राहणार नाहीं!

# जीवन कार्य

# १४

बलाढ्य बनतिल अपंग दुर्बल
मृत सामर्थ्यें सजीव होतिल
उठतिल हो क्रोधानें गर्जत शतकांचे नाद्‌ान् !
घेउनियां ही घोर कहाणी
अमित काळच्या जलधीवरुनी
जातिल या रक्ताच्या लाटा आक्रोशत रणगान्
हें व्यर्थ न हो बलिदान !

—कुसुमाग्रज

देशगौरव सुभाषचंद्रांच्या जीवितकार्याचें मूल्यमापन करणें हें अवघड आहे. कारण कमळाची जशी एक एक पाकळी उमलते नि संपूर्ण कमळ उन्मीलित झाल्यानंतर त्याची शोभा अपूर्व दिसते, त्याचा सुगंध दरवळतो, तसें सुभाषचंद्रांचें जीवनकार्य अद्याप अपूर्णावस्थेंत आहे. एखादा कलावंत सुंदर चित्र काढीत असतांना, तें चित्र सुंदर रूप धारण करीत असतांनाच एक झंझावात निर्माण व्हावा तशीच सुभाषचंद्रांच्या जीवितकार्याची आज स्थिति झाली आहे. रक्ताचें पाणी करून, आपलें जीवित धोक्यांत घालून एक अति भव्य प्रासाद त्यांनीं उभारला आणि भारताच्या दुर्दैवानें तो परिस्थितीच्या वादळानें उध्वस्त झाला—! तो प्रासाद भंगला असला तरी ज्या पायावर त्याची उभारणी झाली होती तो पाया अद्याप उध्वस्त झालेला नाहीं. तो पाया नसाच शाबूत आहे.

आशा आहे कीं भावी कर्तृत्ववान् युवकांनीं जर आपलीं जीवनें दिलीं तर त्याच पायावर चिरकाल टिकण्यासाठीं भारताचें स्वातंत्र्यमंदिर पुनश्च उभारलें जाईल. सुभाषचंद्रांचा जीवन–हेतु सफल झाला आहे तो याच अर्थानें!

## शिवरायांचा आदर्श

सुभाषबाबूंच्या आयुष्याला एकच ध्येय होतें. त्यासाठीं त्यांनीं स्वतःचें आयुष्य बलिवेदीवर वाहिलें. त्यांना लोकांनीं स्वप्नद्रष्टे म्हटलें—स्वप्नाळू म्हटलें तेव्हां त्यावर त्यांनीं दिलेलें उत्तरच त्यांच्या जीवनकार्याचें वर्णन करणारें आहे—" मी हें मान्य करतों कीं मी स्वप्नाळूच आहें. मी लहानपणापासून तसाच आहे. परंतु माझ्या सर्व स्वप्नांपेक्षां श्रेष्ठ, अत्यंत प्रिय असें माझें स्वप्न स्वतंत्र भारत हें आहे ! "

सुभाषचंद्रांचें जीवन पाहिल्यानंतर त्यांची नि शिवाजी महाराजांची तुलना करण्याचा मोह अनेकांना होतो. सहा वर्षांपूर्वी हें कोणाच्याहि मनांत आलें नसतें, पण स्वतंत्रभारताचें दर्शन सुभाषचंद्रांनीं जगाला घडविल्यामुळें सुभाषचंद्र म्हणजे छत्रपति शिवरायांच्या पाउलावर पाऊल टाकणारा महान् नेता आहे हें निःसंशय सिद्ध झालें आहे.

श्रीशिवराय म्हणजे भारताच्या–नव्हे जगाच्या इतिहासांत अद्वितीय ठरलेला पुरुष. स्वातंत्र्याचा संस्थापक म्हणून, परकीय सत्तेशीं सामना देऊन तिला नमविणारा रणझुंजार योद्धा म्हणून आणि अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा, चारित्र्याचा पुरुष म्हणून त्यांचा आदर्श सर्व जगानें ठेवावा. समर्थांनीं सुद्धां ' शिवरायास आठवावें, जीवित्व तृणवत् मानावें ! ' असें म्हटलें. सुभाषचंद्रांनीं आपला आदर्श पुरुष म्हणून श्रीशिवरायांना ठेवलें होतें याचें अनेकांना आश्चर्य वाटेल. १९३७ सालीं दिलेल्या एका मुलाखतींत सुभाषचंद्रांनीं हें प्रकट केलें आहे. ते म्हणतात,—" हिंदुस्थानच्या इतिहासांत फक्त शिवाजी राजांचें तेजस्वी चरित्र माझ्या अंतःकरणांत मध्यान्हींच्या तळपत्या सूर्याप्रमाणें प्रकाशमान् होऊन राहिलें आहे. शिवाजी इतकें उज्ज्वळ चारित्र्य दुसऱ्या कुणाचेंच दिसत नाहीं. विविध स्वरूपांत शिवाजी राजांचा आदर्श सगळ्या हिंदुस्थानसमोर ठेवला गेला पाहिजे. सद्यःस्थितींत त्या महापुरुषाच्या वीर चरित्राचा आदर्शच आम्हांला मार्गदर्शक होणार आहे. माझी खात्री आहे कीं शिवाजी महाराजांच्या आदर्शाला सर्वस्वीं शरण

गेल्याखेरीज-तो आदर्श आपलासा केल्याखेरीज आपणांला स्वातंत्र्य मिळणें कठिण आहे !

भारताचा कधीं काळीं उद्धार होणारच असेल तर तो शिवाजीसारख्या नेत्याच्याच हातून होणार आहे ! माझे हे शब्द नीट ध्यानांत ठेवा."

सुभाषचंद्रांच्या जीवनकार्याची रूपरेषा व शिवाजी राजांच्या जीवनकार्याची रूपरेषा या दोहोंत साम्य आहे. त्याला कारण शिवराय हे सुभाषचंद्रांचे आदर्श राष्ट्रपुरुष होते !

## स्वतंत्र भारताचे आद्य निर्माते

" आझाद हिंद सरकार " हें सुभाषचंद्रांच्या सर्व जीवनकार्याचें परिणत रूप आहे. अनेक वर्षे पाणी घालून नंतर एखादे वर्षी आम्रवृक्ष मोहरावा, त्याला सुंदरसें फळ यावें तसेंच सुभाषचंद्रांचें "आझाद हिंद सरकार" हें त्यांच्या आजवरच्या तपश्चर्येचें-प्रयत्नांचें परिणत रूप होतें. परिस्थितीच्या दाहानें तो मोहर जळून गेला असला तरी सुभाषचंद्रांनीं लाविलेला वृक्ष उभा आहे. पुन्हां जेव्हां राष्ट्राच्या इतिहासांतील वसंतऋतु-सुद्धकाल-प्राप्त होईल तेव्हां हा सर्व वृक्ष जगाला फळांनीं बहरलेला दिसेल. तोंपर्यंत तो वृक्ष जिवंत ठेवणें हें आमचें कार्य आहे.

आझाद हिंद सरकार हें जगांतील नऊ स्वतंत्र राष्ट्रांनीं मान्यता दिलेलें सरकार होतें. तें संघटित आणि स्वयंपूर्ण होतें. त्याला कायदा होता, घटना होती. फौज होती, आर्थिक धोरण होतें, परराष्ट्रीय धोरण होतें. या सरकारचीं अनेक खातीं होतीं, त्या खात्यांची व्यवस्था सुरळीत चालू होती, मंत्रिमंडळ होतें म्हणजे अद्ययावत् साधनांनीं युक्त असें हें स्वतंत्र सरकार होतें. सुभाषचंद्रांची चतुरस्त्र बुद्धिमत्ता, त्यांची कारभार पाहाण्याची हातोटी, त्यांची रणनीति या सर्व गुणांच्या प्रकर्षानें " आझाद हिंद सरकार " हें जगन्मान्य झालें. पंडित जवाहरलालनीं सुभाषचंद्रांच्या या कार्याची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. ते म्हणाले—

" आझाद हिंद फौजेच्या नेत्यांनीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचें स्वप्न पाहिलें. इतकेंच नव्हे तर तें स्वतंत्र भारताचें दिव्य स्वप्न, त्यांनीं मूर्तावस्थेला आणून खरेंहि करून दाखविलें ! तें स्वातंत्र्याचें स्वप्न, तें स्वतंत्र हिंदी लोकराज्य, ते आझाद हिंद सरकार हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालें आहे हें खरे व अगदीं थोडा वेळ टिकलें हेंहि खरे, पण ही जी अद्वितीय बहादुरी त्यांनीं करून दाखविली ती हिंदुस्थानच्या

इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिली जाईल आणि त्या बहादुरीच्या स्फूर्तीनें भावी पिढ्या स्वातंत्र्यसंग्रामांत ईर्षेनें भाग घेतील. स्वतंत्र हिंदी लोकराज्याचे पहिले निर्माते या एकाच कसोटीवर हिंदुस्थान त्यांना वंद्य मानील !

त्यांनीं प्रथम एकच गोष्ट केली ती म्हणजे 'आझाद हिंद सरकार'ची स्थापना. ज्या स्वातंत्र्याच्या फळाचा आस्वाद घेण्याची आजहि आपल्याला मनाई आहे, आजहि आस्वाद घेण्याची आपली तयारी नाहीं तें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें फळ त्यांनीं प्रथम चाखलें ! स्वातंत्र्य ही काय स्वर्गीय ईश्वरी चीज आहे, याचा दिव्य आनंद प्रथम त्यांनीं लुटला !"

गेल्या दीडशें वर्षांत अगदीं प्रथम झालेला हा प्रयोग होता. जें दीडशें वर्षांच्या अवधींत घडूं शकलें नाहीं तें नेताजींनीं दोन तीन वर्षांत घडवून दाखविलें. तें अल्पकाळ टिकलें असलें तरी इतिहासपुरुष शिवरायाप्रमाणेंच सुभाषचंद्रांना 'स्वतंत्र भारताचा आद्य प्रवर्तक' म्हणून प्रणाम केल्याखेरीज राहणार नाहीं !

## स्वातंत्र्य सेना

आझाद हिंद फौज हें सुभाषबाबूंच्या आयुष्यांतील दुसरें स्वप्न ! सार्वजनिक जीवनांत पडल्यापासून आणि विशेषतः इटली व जर्मनीमधील युवक संघटना पाहिल्यानंतर सुभाषचंद्रांच्या मनांत सदैव हे विचार घोळत असत कीं हिंदुस्थानांत अशी एक युवकांची संघटना पाहिजे. तरुणांच्या स्फोटक सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर त्यांना हें कार्य करतां आलें नाही. मात्र परदेशांत त्यांचें हें स्वप्न सिद्ध झालें.

कोठल्याहि देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या इतिहासांत एक गोष्ट निश्चितपणें आढळून येईल कीं स्वातंत्र्याकरतां प्राणार्पण करण्याची तयारी असलेल्या युवकांची संघटना असल्याखेरीज राष्ट्र स्वतंत्र होऊं शकत नाहीं. क्रांतिशास्त्राचा हा ठाम सिद्धांत आहे. गॅरीबाल्डीनें इटली स्वतंत्र केला, तो सभा मिरवणुकांनीं नव्हे तर स्वतंत्र सैन्य उभारून ! वॉशिंग्टन, डी व्हॅलेरा यांनीं आपले देश स्वतंत्र केले ते एका पोलादी संघटनेच्या जोरावरच. सुभाषचंद्रांनीं या सत्याकडे दुर्लक्ष केलें नाहीं. अनेक राष्ट्रांचा इतिहास त्यांनीं वाचला. तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं,—

"माझ्या सार्वजनिक जीवनांत मला असें नेहमीं वाटतें कीं जरी आज हिंदुस्थान इतर सर्व दृष्टींनीं स्वातंत्र्याला पात्र असला तरी एका गोष्टीची आज कमतरता आहे. ती म्हणजे स्वातंत्र्य सैन्य !"

परतंत्र देशांत अल्पावधींत स्वातंत्र्यसेना कशी निर्माण करणार ? सशस्त्र सैन्य हें केवळ अशक्यच. अनेक देशांनीं आपलें राष्ट्रस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं शेवटीं सैन्याला आवाहन केलें होतें. इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धांत मॅझिनीनें सैन्यांतील अनेक अधिकाऱ्यांना आपल्या बाजूस वळविलें. रशियाची क्रांति शेवटीं सैनिकां-पर्यंत जाऊन पोहोंचली. भारताचें पहिलें स्वातंत्र्ययुद्ध लढविलें तेंहि सैनिकांनींच. सुभाषचंद्रांनीं या सर्व इतिहासांच्या अभ्यासांतून एक निष्कर्ष काढला. एका मंगल पांडेनें उठावें, एकादी गोळी झाडावी नि सारा देश पेटावा हें कां घडतें याचें उत्तर सुभाषबाबूंना मिळालें. तें उत्तर—' वन्हि तो चेतवावा रे। चेतवितांचि चेततो ॥ ' असें होतें.

ज्यांच्या हातांत शस्त्रें असतात, त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची आस्था निर्माण करावी लागते हें सुभाषनीं जाणलें. आपला खरा शत्रु कोण याची जाणीव सुभाषबाबूंनीं करून दिली. त्याचें प्रत्यंतर कॅ. सैगल यांनीं दिलेल्या कोर्टा-पुढील निवेदनांतील पुढील भागावरून दिसून येईल. "...ब्रिटिश साम्राज्यवादानें आम्हांला आणि आमच्या देशाला कायमचें गुलामगिरींतच ठेवण्याचा निश्चय केला आहे याची आम्हांस जाणीव झाली. ब्रिटिश साम्राज्यावद्दल आम्हांला कमालीचा तिटकारा वाटूं लागला ! " आज शत्रूंनीं दुसऱ्यासाठीं लढूं शकतात ते स्वतःच्या देशासाठीं कां लढणार नाहींत ? म्हणून सुभाषचंद्रांनीं सैनिकांना एवढेंच सांगितलें कीं ' आपली सर्वांची मातृभूमि स्वातंत्र्यासाठीं टाहो फोडीत आहे. यापुढें स्वातंत्र्या-विना तिला जगणेंच शक्य नाहीं. ' असंख्य सैनिकांच्या हृदयास हें भिडलें नि लक्षावधि सैनिक देशासाठीं प्राण देण्याच्या तयारीनें पुढें आले.

ज्यांना लोकांनीं भाडोत्री म्हटलें, पोटभरू शिपाई ( Rice soldiers ) म्हटलें तेच सैनिक हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्यास तयार झाले. कोणाहि सुशिक्षित माणसाइतकीच किंबहुना जास्त स्वातंत्र्यभावना त्या भाडोत्री, निरक्षर सैनिकांत निर्माण झाली ! स्वातंत्र्यभावना हृदयांत असते, बुद्धींत नव्हे हें आझाद सैनिकांनीं सिद्ध केलें.

पुन्हां एकदां सैनिकी क्रांतीचें तत्त्व सिद्ध झालें. ज्याला राष्ट्र विसरूं पाहात होतें, ज्यावरचा राष्ट्राचा विश्वास उडत चालला होता इतकेंच नव्हे तर अनेक तऱ्हेनें ज्या मार्गाची निंदाहि केली जात होती तोच मार्ग सुभाषबाबूंनीं अनुसरला. १८५७ च्या क्रांतियुद्धाचा इतिहास राष्ट्र विसरलेलें नाहीं, तो अंगार विझलेला नाहीं हें

सुभाषचंद्रांनीं सिद्ध केलें, हें त्यांचें महान् कार्य आहे. सुभाषचंद्रांनीं एक मोठा अॅटम बॉंब भावी पिढीच्या ताब्यांत दिला आहे. त्याबद्दल राष्ट्र त्यांचें सदैव ऋणी राहील. सैनिकांतील क्रांतीचा मार्ग पुन्हां भारतीयांच्या समोर ठेवला गेला आहे; तो उठल्यासुटल्या अनुसरण्यासाठीं नाहीं. कोणीहि अनुसरावा असाहि नाहीं; तें सुदर्शन चक्र आहे नि तें चालविण्याला तशाच भगवान् श्रीकृष्णाची आवश्यकता आहे ! दुसऱ्या कोणत्याहि महात्म्याला तें जमणार नाहीं !

## युद्धविषयक धोरणाचें मार्गदर्शन

सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद फौजेची उभारणी त्यांच्या परराष्ट्रीय राजकारणावर झालेली आहे. १९३० सालापासून ते युरोपांत असतांनाच त्यांच्या मनांत त्यांनीं अनेक बेत रचले होते. त्यांच्या परराष्ट्रीय राजकारणाची कल्पना ठरलेली होती. ती राष्ट्रीय दृष्टिकोनांतून ठरविलेली होती. " In these days of internationalism, we should not forget either that internationalism always presupposes nationalism." ही त्यांची दृष्टि होती. सर्व जग स्वार्थी आहे तेव्हां आपणहि स्वार्थी बनलें पाहिजे. परतंत्र राष्ट्राचा सर्वांत मोठा स्वार्थ स्वातंत्र्य हाच असला पाहिजे आणि त्याच्या सिद्धीसाठीं जेथून सहाय्य मिळेल तें स्वीकारण्यास हरकत नाहीं असें ते म्हणत.

१९३८ सालीं हरिपुरा कॉंग्रेसमध्येंहि आगामी युद्धासंबंधींची भूमिका त्यांनीं मांडली होती. आगामी युद्ध ही एक अलभ्य पर्वणी आहे नि तिचा फायदा आपण घेतला पाहिजे असा सतत प्रचार त्यांनीं केला. १९३९ सालीं त्रिपुरीला सहा महिन्यांची नोटीस सरकारला देण्याचा ठराव आला होता. त्याच वेळीं असा इशारा त्यांनीं दिला होता—"......आणि जेव्हां १९३९ च्या सप्टेंबरमध्यें युद्धाला खरोखरच तोंड लागलें, तेव्हां मी मार्चमध्यें म्हणालों होतों तें कसें बिनचूक होतें याचा चांगलाच प्रत्यय आला. त्यावेळीं आमची सर्व शक्ति एकवटून आमचें म्हणणें ऐकण्याची ब्रिटिश सरकारला सक्ती करणें व तें जुमानीत नसल्यास युद्धाला सिद्ध होणें हें आमचें पवित्र कर्तव्य होतें. पण आमचे पुढारी निराळ्याच प्रकारें आचार व विचार करीत होते. त्यांची कल्पना अशी होती कीं, युद्धांत सांपडणारा ब्रिटन दुर्बळ बनेल आणि हिंदुस्थानच्या मदतीची गरज भासली म्हणजे मग त्यांना राष्ट्रीय सभेशीं सलोखा करण्यावांचून गत्यंतर राहाणार नाहीं. या कल्पनें-

तला मूर्खपणा स्पष्ट करण्याचा मीं प्रयत्न केला. मी त्यांना म्हणालों कीं, ब्रिटन युद्धांत जरी कितीहि खचलें, नामोहरम झालें तरी तें आपली हिंदुस्थानवरील पकड सैल करण्याला कधीहि तयार होणार नाहीं. जितकें जितकें तें दुर्बल होऊं लागेल तितकें तितकें तें आपली हिंदुस्थानवरील पकड अधिकच दृढ करण्याचा प्रयत्न करील. हिंदुस्थानवांचून युद्ध पुढें चालविणें त्याला शक्यच होणार नाहीं. अशा कमकुवत स्थितीतच तें आपली पिळवणूक वाढवील नि आमच्या देशांतील सर्व साधनांची लूट चालवील."

सुभाषबाबूंनीं वर प्रकट केलेले अंदाज अक्षरशः खरे ठरले आहेत. बंगालची भुकेनें मेलेलीं तीस लाख माणसें हें ब्रिटिशांनीं युद्धकालांत केलेल्या छळाचें मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांचा आग्रह एकच होता कीं युद्धहेतु विचारीत न बसतां तडजोडीची भाषाच सोडून देऊन लढा सुरू केला पाहिजे. जें १९४२ मध्यें केलें तें १९३९ मध्यें व्हावयास पाहिजे होतें असें त्यांचें म्हणणें. कॉंग्रेसला युद्धोन्मुख करण्याची त्यांनीं शिकस्त केली. आणि शेवटीं आपला मार्ग स्वीकारला. त्यांनीं असा निर्णय घेतला कीं,—" केवळ मर्यादित प्रयत्नांनीं आमचें कार्य शेवटास जाणें शक्य नाहीं. आम्हांला बाहेरची मदत मिळाली तरच आम्ही कांहीं करूं शकूं. अमेरिकेंतल्या संयुक्त राष्ट्रांनीं फ्रान्सची मदत मिळविली म्हणूनच त्यांचा हेतू साध्य झाला. अशी मदतीची याचना करणें ही आजवरच्या इतिहासांत नवी गोष्ट नव्हती. अनेक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रांनीं आजवर तिचा अवलंब केला आहे."

आपले प्राण धोक्यांत घालून त्यांनीं देशाकरितां हें दिव्य करण्याचें ठरविलें होतें. कारण त्यांना ही संधिच अपूर्व वाटत होती. एका माणसाला जेवढें करतां येणें शक्य आहे तेवढें सुभाषनीं केलें. त्यांना संपूर्ण यश मिळालें नाहीं हें क्रूर सत्य मान्य केलेंच पाहिजे. पण सुभाषबाबूंनींच अत्यंत दूरदर्शीनें या महायुद्धाचा फायदा घेतला हें आतां निर्विवाद आहे. भारताच्या आयुष्यांतील एक अमोल संधि वायां घालविली गेली याचा शोक करण्यांत अर्थ नाहीं. सुभाषबाबूंनीं आपल्या आयुष्याचीं बहुमोल ५-७ वर्षें खर्च करून हें सत्य पटवून दिलें आहे कीं आंतरराष्ट्रीय संघर्षाचा फायदा घेऊन गुलाम राष्ट्रानें आपला लढा चालविला पाहिजे. हें त्यांचें महत्त्वाचें जीवितकार्य आहे. आतां एकच गोष्ट करावयाची आहे. आपण आपलीं मस्तकें ताठ ठेवली पाहिजेत. पुन्हां एकदां तो शुभ दिवस येणार आहे कीं ज्या दिवशीं आम्हांला आमचें स्वातंत्र्ययुद्ध सुरू करण्याची संधि प्राप्त

होईल ! त्या दिवसाची वाट पाहात राहावयाची ! " तो क्षण येईपर्यंत शक्तिसंचय हेंच कार्य !

## सशस्त्र क्रांतीचा जयजयकार

" स्वातंत्र्याच्या मीमांसेंत सशस्त्र प्रतिकाराचा विचार अपरिहार्य आहे. जनतेची मागणी सत्य व न्याय्य आहे हें तर्कशास्त्राच्या आधारानें सिद्ध करून दाखविण्याचाच अवकाश की लगेच त्या मागणीला सत्ताधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळावयाची अशी व्यवस्था असती तर जगांत जुलूम जबरदस्ती अस्तित्वांत आली नसती...राष्ट्रीय जीवनाला अत्यावश्यक असलेला गूढ तेजाचा स्फुलिंग तर्कशास्त्राच्या प्रमेयांत नाहीं..." असें मॅक्स्विनीनें म्हटलें आहे. सशस्त्र प्रतिकार वा क्रांति हें इतिहासांतलें अमर तत्त्व आहे. तर्कशास्त्राच्या, व्यवहाराच्या आधारानें असें पटवून देण्याचा प्रयत्न केला जातो कीं सशस्त्र क्रांति हें अव्यवहार्य तत्त्व आहे. सुभाषचंद्रांनीं आपल्या उदाहरणावरून सिद्ध केलें आहे कीं, सशस्त्र क्रांतिवाद हा आजहि आचरण्या-सारखा मार्ग आहे. सशस्त्र क्रांति हें स्वप्न नव्हे; तर परतंत्र राष्ट्रानें योग्य वेळीं जपण्यासारखा तो एक संजीवनी मंत्र आहे !

१९४२ च्या आंदोलनानंतर भारतीय जनतेवर पडलेली क्रांतिवादाची छाप सुभाषचंद्रांनीं आपल्या कार्यानें दृढ केली आहे. परतंत्र राष्ट्रांत शस्त्रधारणाची बुद्धि—इच्छा हेंच एक मोठें शस्त्र असतें. ती बुद्धि असेल तर सारें कांहीं होईल. एका कवीनें म्हटल्याप्रमाणें—" फत्तर सारे बंब ( बॉंब ) बनेंगे " असें सुद्धां होईल. इटलीच्या शेवटच्या स्वातंत्र्ययुद्धांत कारखान्यांतील खिळ्यांपासून सर्व गोष्टींचा शस्त्र म्हणून उपयोग केला गेला नि त्याच्याच जोरावर ऑस्ट्रियनांना हाकलतां आलें.

ही शस्त्रधारणेची बुद्धि निर्माण होण्यासाठीं तो मार्ग स्वातंत्र्यासाठीं अवश्य आहे हें मनाला पटावें लागतें. हिंदुस्थानांत तरी त्याची फार जरुरी होती. सुभाषबाबूंनीं हेंच फार मोठें कार्य केलें आहे. आज हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत होणारा आझाद सेनेचा जयनाद भारतीय हृदयांत कुठली विचारसरणी अंकुरित होत आहे हें सिद्ध करीत आहे. अनेक विरोधी विचारांना तुडवून या सशस्त्र क्रांति-वादानें पुन्हां एकदां उसळी वर मारली आहे नि ती चिरकाल टिकविली जाईल ! कारण त्या क्रांतीचे पाईक जे आझाद सैनिक ते साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेले आहेत. १८५७ सालीं जरी सशस्त्र क्रांति झाली तरी जनतेचा पाठिंबा तिला

नव्हता. आज सुभाषबाबूंच्या प्रयत्नाला त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळें फार मोठें यश मिळत आहे! ही निश्चित प्रगति आहे.

अनेक स्वातंत्र्यनिष्ठांना हें मान्य करावें लागत आहे कीं, स्वातंत्र्याचा क्रांति हाहि एक मार्ग आहे. राजेंद्रबाबूंनीं सुभाषदिनाच्या सभेंत बोलतांना काढलेले उद्गार सूचक आहेत—" काँग्रेसचा जरी अहिंसेवर विश्वास असला तरी इतर कांहीं मार्ग आहेत हें तिला मान्य आहे. काँग्रेसपेक्षां भिन्न मार्गानें स्वातंत्र्याचा प्रयत्न करणाऱ्यास काँग्रेस फितूर म्हणूं शकत नाहीं. "

ज्या मार्गावर अनेक वर्षांत पाऊल ठेवलें गेलें नव्हतें, त्या मार्गावर सुभाषबाबूंनीं पाऊल ठेवलें. तो मार्ग त्यागाचा—आत्मयज्ञाचा आहे पण तो अपरिहार्य आहे! आझाद सैनिकांच्या बलिदानानें हें पुनश्च सिद्ध झालें आहे कीं स्वातंत्र्याचा मार्ग रणमैदानांतून जातो, असेंब्लींतून नाहीं. आजवरच्या शस्त्राचारी क्रांतिवीरांनीं सुभाषचंद्रांना धन्यवाद दिले असतील—" वीरा, तुझें बलिदान व्यर्थ ठरणार नाहीं! आजपर्यंत ज्या मार्गानें अनेक राष्ट्रें स्वतंत्र झालीं तोच मार्ग पुन्हां तूं राष्ट्राला दिला आहेस! त्याच मार्गानें चिकाटीनें, दुर्दम्य उत्साहानें थोडें पुढें जा म्हणजे स्वतंत्रतेचें पवित्र दर्शन होईल! "

## स्वातंत्र्ययुद्धाची दुसरी आघाडी

सुभाषबाबूंनीं ज्या एका उद्देशासाठीं हिंदुस्थानांतून गमन केलें तो उद्देश म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याला बाहेरून मदत मिळविणें. त्याचें स्पष्टीकरण करतांना सुभाष म्हणतात—" थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे स्वदेशांत चालू असलेल्या स्वातंत्र्यलढ्याला बाहेरून पुरवणी मिळेल असा प्रयत्न करणें हा हिंदुस्थान सोडण्यांत माझा हेतु होता. देशांत चालू असलेल्या राष्ट्रीय लढ्याला बाहेरून ही पुरवणी मदत मिळणें अत्यंत अवश्यक आहे. ती खरोखर फार थोड्या प्रमाणांत आम्ही देऊं शकतों. आमच्या स्वदेशांतील देशबांधवांना जी मदत हवी होती आणि अजूनहि हवी आहे ती दोन प्रकारची आहे. नैतिक बलाची आणि साधनसामुग्रीची. पहिल्यानें तुम्हांला विजय मिळेल अशी त्यांची खात्री पटविली पाहिजे. दुसरे म्हणजे बाहेरून लष्करी मदत मिळविली पाहिजे.

... (म्हणून) हिंदुस्थानबाहेरील हिंदी लोक विशेषतः पूर्व आशियांतील लोक लढाऊ फौज निर्माण करणार आहेत. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्यावर हल्ला करूं

शकेल इतकी ती सामर्थ्यवान असेल. आम्हीं ही गोष्ट घडवून आणली म्हणजे हिंदुस्थानांत क्रांति होईल. ती फक्त नागरिकांतच होणार नसून आज ब्रिटिश निशाणाखालीं असलेल्या हिंदी सैन्यांतहि होईल. ब्रिटिश सरकारवर हिंदुस्थानांतून व हिंदुस्थानबाहेरून असा दुहेरी हल्ला झाला म्हणजे ब्रिटिश सरकार कोलमडून पडेल व त्यावेळीं हिंदी जनता पुन्हां स्वतंत्र होईल ! "

सुभाषचंद्रांची अशी ही सर्व योजना होती. त्याप्रमाणें त्यांनीं अनेक मैलांचा देश स्वतंत्र केलाहि होता नि तेथें स्वातंत्र्याचें निशाण फडकविलें होतें. हिंदुस्थानच्या भूमीवर पाऊल ठेवल्यानंतर त्यांच्या योजनेस अपयश आलें. सुभाषचंद्रांची अशी खात्री होती कीं आधींच तप्त झालेला हिंदुस्थान एका क्रांतिकारक उठावणीनें उठेल, एक प्रचंड ज्वाला उफाळेल नि त्यांत पारतंत्र्याची बेडी वितळून जाईल ! पण हें झालें नाहीं.

सुभाषचंद्रांची अलौकिकता या मार्गाच्या संशोधनांत आहे. सुभाषचंद्रांनीं भारतीय स्वातंत्र्ययुद्धाला एक नवीन वळण लावलें. भारतीय स्वातंत्र्याचा प्रयत्न परदेशांतील हिंदी लोकांच्यातर्फे करतां येणें शक्य आहे हें सिद्ध झालें आहे. सुभाषबाबूंनीं आपल्या कर्तृत्वानें स्वातंत्र्याची दुसरी आघाडी सुरू केली आहे. पोलंडनें पूर्वीं हेंच केलें होतें. या महायुद्धांत डी गॉलनें फ्रान्स स्वतंत्र केला तो याच मार्गानें. झेक राष्ट्र पूर्वीं स्वतंत्र झालें तें याच मार्गानें.

भारतीय राजकारणांत या मार्गाचा प्रवेश सुभाषचंद्रांनीं केला आहे हें त्यांचें फार मोठें कार्य आहे. याबद्दल भारतवर्ष त्यांचा ऋणी राहील. परतंत्र राष्ट्राचा लढा दुहेरी झाला पाहिजे. अंतर्गत उठावणी व बाहेरून हल्ला हें तत्त्व सुभाषनीं प्रस्थापित केलें आहे. या नवीन दृष्टिकोनांतून भारतीय जनता पुढील पावलें टाकील तर सुभाषचंद्रांचें हें कार्य सार्थ झालें असें होईल !

## पूर्व आशियांतील " असंतोषाचे जनक "

सूर्याचा उदय झाल्यानंतर फुलें फुलतात त्याप्रमाणें सुभाषबाबू पूर्व आशियांत गेल्यानंतर चैतन्याची व उत्साहाची एक लाट उसळली. गुलाम झालेलीं, ज्यांना देशभक्ति म्हणजे काय हें माहीतहि नव्हतें अशीं कोट्यवधि माणसें मलाया, ब्रह्मदेशांत होतीं. सुभाषचंद्र जाण्यापूर्वीं रासबिहारी बोस यांनीं 'हिंदुस्थान स्वातंत्र्य-संघा'ची स्थापना करून जागृतीचे प्रयत्न चालविले होते; एखाद्या वादळानें वा

महापुरानें कहर उडावा नि नंतर मानवी जीवन विस्कळित व्हावें तशीच स्थिति पूर्व आशियांतील हिंदी लोकांची झालेली होती. स्वतःच्या मनांत आकांक्षा नाहींत, डोक्यांत विचार नाहींत, कोणीहि मार्गदर्शन करणारा नेता नाही अशा स्थितींत तेथील हिंदी लोक होते. आपली उच्च संस्कृति तुडविली जात आहे, जपानच्या आक्रमणानंतर त्याच्या मागून येणाऱ्या छळाची, व हालांची स्मृति भीतीचा गोळा निर्माण करीत आहे अशी पूर्व आशियांत स्थिति होती. पण—

सुभाषचंद्र आल्यानंतर सर्वच्या सर्व स्थिति पूर्णपणें पालटली. पोटासाठीं धंदा करण्यास आलेल्या हिंदी लोकांना हिंदुस्थानचें स्वातंत्र्य म्हणजे काय हें कळूं लागलें. सुभाषचंद्रांच्या अलौकिक नि दीप्तिमान् व्यक्तित्वानें त्या सर्व मृतवत् हिंदी लोकांत चैतन्य निर्माण झालें. ते म्हणूं लागले—"कारकून आणि हमाल यांचें राष्ट्र अशा दर्जाला आम्ही गेलों होतों. पण आमच्या अंतःकरणांतील अग्नि अजूनहि प्रज्वलित आहे. पुन्हां एकदां इतिहासानें अग्निदिव्यासाठीं आम्हांला हांक दिली आहे नि साम्राज्यशाहीचा हा दुष्ट तुरुंग पेटविण्यासाठीं आमच्या देहाच्या जिवंत मशाली करण्यास आम्ही सज्ज झालों आहों!"

इतका आमूलाग्र फरक सुभाषचंद्रांनीं हिंदी जनतेंत घडवून आणला. त्यांनीं सारें वातावरण विद्युत्मय केलें. सुभाषचंद्रांनीं मलाया, ब्रह्मदेशांत काय केलें याचें वर्णन मलायांतील एका हिंदी माणसानें सुंदर रीतीनें केलें आहे. तो म्हणतो, —"हजारों लोकांनीं आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदु शिल्लक राहीपर्यंत देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची प्रतिज्ञा केली. आमच्या देशबांधवांच्या उच्च भावनेला असीम त्यागासाठीं आवाहन करून असें शक्तिशाली नि स्फूर्तिमय वातावरण निर्माण केलें कीं भारतीयांना त्याच्या सामर्थ्याची (Voltage) कल्पनाहि येणार नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं जे केवळ पोटासाठीं भारताच्या सीमा ओलांडून बाहेर पडले होते त्यांनीं गौरवपूर्ण कृत्यें केलीं. मलायांतील हजारों नागरिक 'आझाद हिंद फौजेंत' सामील झाले. सुभाषचंद्रांनीं निर्माण केलेल्या आध्यात्मिक भावनेंतून शेंकडों वीरपुरुष उत्पन्न होत होते. आझाद सेनेंत सर्व स्वेच्छेनें गेलेले सैनिक होते. नेताजींचा कटाक्ष स्वयंप्रेरणेवर नि त्यागबुद्धीवर होता. म्हणूनच पैसा आपण होऊन त्यांच्याकडे चालत आला आणि गरिबांच्याकडूनसुद्धां तो मिळाला. अशिक्षित लोकांच्याकडून केला गेलेला त्याग हें नेताजींच्या आत्मानुभूतीचें नि प्रेरणेचें फल होतें!"

सुभाषचंद्रांनीं पूर्व आशियांतील हिंदी जनतेला एका घोर आपत्तीपासून बचावलें, म्हणून ती जनता ऋणी राहिली. संकटकाली धांवून येणारा तो ईश्वर या समजुतीनें आज सुभाषचंद्र हे कोट्यवधि माणसांचे ' ईश्वर ' झाले आहेत. घरांघरांतून सुभाषचंद्रांच्या प्रतिमांचे पूजन तेथें केलें जात आहे. आपल्या पूज्य नेत्याच्या स्मरणानेंसुद्धां त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहात आहेत ही एकच गोष्ट सुभाषबाबूंनीं केवढें कार्य पूर्व आशियांत केलें आहे हें पटवून देण्यास पुरेशी आहे. सुभाषचंद्रांना व्यक्तिपूजेचा तिटकारा असे म्हणून ते ती करून घेण्यास नाकारीत. तेव्हां त्या लोकांनीं सुभाषचंद्रांना सांगावें—" नेताजी, तुम्हीं चळवळींत नवीन जीव घातला. जनतेच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्याकांक्षेचें तुम्हीं उत्तम प्रतीक आहां. म्हणून जनता उत्साहानें तुमचें स्वागत करण्याला पुढें येते. "

आजहि पूर्व आशियांत वातावरण अस्थिर आहे—सुभाषचंद्रांनीं पेटविलेला अग्नि अद्याप विझलेला नाहीं. इंडोनेशियांतील स्वातंत्र्ययुद्ध जोरांत चालू आहे नि तो सुभाषबाबूंच्या ' जय हिंद ' चळवळीचाच एक भाग आहे असें डॉ. शिवकर्ण यांनीं एका लेखांत म्हटलें आहे. डॉ. शिवकर्णांनीं हिंदुस्थानकडे केलेली मदतीची याचना ही सुभाषचंद्रांनीं निर्माण केलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधाचें प्रतीक आहे. पुन्हां एकदां भारताकडे जगाचें नेतृत्व येईल याची ती ग्वाही आहे !

एतदर्थ, सुभाषचंद्रांच्या जीवनकार्यामध्यें या आशियांतील कामगिरीला महत्त्वाचें स्थान आहे. सुभाषबाबूंनीं जोडलेले संबंध हे भावीकालांतील लढ्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. त्यांच्याच जोरावर स्वतंत्र भारताचें दर्शन जगाला घडवितां येईल !

" सुभाषचंद्र हे पूर्व आशियांतील असंतोषाचे जनक आहेत. सुभाषचंद्रांच्या मृत्युवार्तेनंतर मलायांतील ' मलाया सिंपो ' नांवाच्या वृत्तपत्रानें सुभाषचंद्रांवरच्या मृत्युलेखांत म्हटलें आहे—

सुभाषचंद्र बोस की करुण मृत्यु के समाचार से सारी दुनिया व्यथित होगी। हम पूर्व एशियाके करोडों गुलामों के दिल दुःख से फटे जा रहे है क्यों की पिछले साडेतीन साल से वे हम गुलामों और गरीबों के बीचमें मसीहा बनकर काम कर रहे थे !

जो स्वातंत्र्य आंदोलन में दिलचस्पी लेते थे वे गांधी और नेहरू के बाद सुभाष

के नाम से परिचित थे, किंतु इस पूर्व एशिया के स्वतंत्रता-आंदोलन के बाद मे सुभाष सब सीमाएं तोड़कर अंतरराष्ट्रीय राजनीतीके प्रमुख व्यक्ति हो गये हे।

पूर्व एशियावालों में, तो वे इतने जनप्रिय थे कि उनके विषयमें क्या बताया जाय यह समज नहीं आता।

सुभाष बोस अब नहीं रहे किन्तु इतिहासमें उनका नाम अमर रहेगा। इस बलिदान से हम मलाया वासियों को भी आझादी की लडाई की अमर प्रेरणा मिली है।"

## स्वातंत्र्यपथावरील शोधज्योति

सुभाषबाबूंचें जीवनकार्य पुरे झालें आहे कीं नाहीं हें भवितव्यता ठरवणार आहे. परंतु एका माणसाला जेवढें करतां येईल तेवढें सर्व नव्हे त्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त कार्य सुभाषचंद्रांनीं केलें आहे.

स्वतंत्र भारताचा आद्य निर्माता म्हणून सुभाषचंद्रांचें नांव इतिहास मोठ्या गौरवानें लिहील. लोकमान्यांनीं स्वातंत्र्यलक्ष्मीचा जयजयकार केला, त्यानंतर असंख्य क्रांतिवीरांनीं स्वातंत्र्यलक्ष्मीच्या चरणांवर आपलीं अमोल प्राणपुष्पें उधळून भारताची अपूर्व, अमोल सेवा केली—आणि देशभक्तीचा प्रकाश, भारताच्या सर्व भागांत फेंकला! गांधीजींनीं भारतीय जनता कृतिशील करण्यासाठीं जीवन दिलें आणि—

सुभाषचंद्रांनीं स्वातंत्र्याच्या भव्य प्रासादाची कोनशिला आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर बसविली आहे! हें सुभाषचंद्रांचे जीवनकार्य आहे! निराशेची आशा बनवीत त्यांनीं भयाण अंधःकार पसरला असतांना क्रांतीचा प्रकाश टाकला आहे! स्वातंत्र्याच्या युद्धासाठीं भव्य सेना उभारून पुन्हां एकदां सिद्ध केलें कीं-" लष्करी उठावणीमुळें बहुजन समाजाचें रक्त नि भावना उसळून येतात. हिंदी स्वातंत्र्य-लढ्याच्या अंतिम विजयासाठीं लष्करी उठावणी हीच अवश्य आहे." आज जागोजाग रक्तानें घेतल्या जाणाऱ्या प्रतिज्ञाच हिंदी जनतेच्या भावना बोलूं शकतील. सशस्त्र क्रांतीचा पुन्हां एकदां जयनाद सुभाषचंद्रांनीं घुमविला आहे. पारतंत्र्याची बेडी तोडावयाची असेल तर बाहेरूनहि आघात केला पाहिजे हें तत्त्व त्यांनीं मांडलें आहे आणि तें सुद्धां शेंकडों परदेशीय हिंदी लोकांची प्रचंड संघटना उभारून! संदेश पाठवून नव्हे!

सुभाषबाबूंच्या जीवनकार्यापासून अनेक स्वातंत्र्येच्छु राष्ट्रांना स्फूर्ति मिळेल. जशी मॅझिनीपासून मिळाली, वॉशिंग्टनपासून मिळाली. सुभाष आज कदाचित् जगाच्या दृष्टीनें, व्यवहाराच्या दृष्टीनें अपयशी झाले असतील! विशाल वटवृक्षाचें बीं जमिनींत पडून नाहींसें झालें आहे. आतां त्यावर कृतीचा पाऊस पडला पाहिजे; त्यांतून तें फोंफावेल नि तो वाढल्यावर जग म्हणेल या महापुरुषानें हा वृक्ष वाढावा म्हणून आत्मार्पण केलें.

म्हणून अंतःकरणाच्या तळमळीनें सुभाषचंद्रांनीं दिलेला संदेश भारताच्या सुपुत्रांनीं पाळला पाहिजे—" माझ्या क्रांतिवादी बंधूंनो—

हें लक्षांत ठेवा कीं खरा क्रांतिकारक तो कीं ज्याचा सत्यावर विश्वास आहे. शेवटीं सत्याचा विजय होणार याच्यावर माझा विश्वास आहे. जो क्षणिक अपयशानें निराश होतो तो क्रांतिकारक नव्हेच. डोळ्यांत आशेचें स्वप्न, हातांत मृत्यूचें फूल नि अंतःकरणांत स्वातंत्र्याचें वादळ हा खऱ्या क्रांतिकारकाचा बाणा असतो!

दहा वर्षांच्या आंत तिसरें महायुद्ध सुरू होणार आहे यांत मला कुठलीच शंका वाटत नाहीं. हिंदुस्थान स्वतंत्र होणार हें निश्चित—कारण माझा तसा ठाम विश्वास आहे. अजून कांहीं दिवस त्यासाठीं लागतील. म्हणून त्यांत निराश होण्याचें काय कारण आहे! म्हणून माझ्या क्रांतिवीरांनो—जोंपर्यंत आपण व्हाईसरॉयच्या भवनावर वा लालकिल्ल्यावर आपला ध्वज फडकविला नाहीं तोंपर्यंत तो तसाच तुम्ही उंच धरून ठेवा! जय हिंद!"

# विचारधारा*



महापुरुषांच्या आयुष्याला एक विशिष्ट तत्त्वज्ञान असतें. त्या तत्त्वज्ञानासाठीं तो जगतो, तें सिद्ध करण्यासाठीं सर्व आयुष्यभर झगडतो नि वेळ आल्यास प्राणहि देतो. श्रीशंकराचार्यांपासून लोकमान्यांपर्यंत जे अनेक तत्त्वज्ञ महापुरुष होऊन गेले त्यांनीं आपल्या आयुष्याचें मोल देऊन एक एक तत्त्व अमर केलें. अद्वैतवादाचा पुरस्कार सर्व आयुष्यभर शंकराचार्यांनीं केला. भगवान् बुद्धानेंहि अहिंसेवर आधारलेलें धर्माचें तत्त्वज्ञान निर्माण केलें. लोकमान्यांच्या जीवनाचें तत्त्वज्ञान 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हें होतें. सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान नि मार्ग गांधीजी गेलीं पंचवीस वर्षें पुरस्कारीत आहेत. नेताजी सुभाषचंद्रांच्या विचारांची पार्श्वभूमि एकच होती. ती म्हणजे हिंदुस्थानचें स्वातंत्र्य. ते कट्टे राष्ट्रवादी ( extreme nationalist ) होते. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा त्यांचा राष्ट्रवाद हा आहे हें ज्यांना कळत नाहीं त्यांनीं सुभाषबाबूंविषयीं अनेक गैरसमज करून घेतले.

## निश्चित मतांचा पुढारी

राजकीय पुढारी हा भविष्यकालचा वेध घेणारा पुरुष असतो. नेताजींच्या विचारांवरून ही गोष्ट सिद्ध होते कीं त्यांचीं मतें प्रत्येक गोष्टीविषयीं ठाम होतीं. तीं कोठल्याहि परिस्थितींत बदललीं नाहींत. याचा अर्थ ते प्रतिगामी, बुरसटलेल्या विचारसरणीचे होते असा नव्हे. याचा अर्थ असा कीं लोकापवादासाठीं, लोकांना

---

*सुभाषबाबूंच्या निरनिराळ्या लेखांच्या व भाषणांच्या आधारें.

एकादें मत आवडतें म्हणून त्याचा अवलंब त्यांनीं कधींच केला नाहीं. लोकप्रियतेच्या लाटेवर तरंगणारे ते पुढारी नव्हते. तर एक निश्चित ध्येयवाद त्यांच्यापुढें होता. तो त्यांनीं समाजापुढें मांडला. त्यासाठीं त्यांना अनेक लोकनिंदेचे प्रहार सहन करावे लागले, स्वकीयांचा तिरस्कार पत्करावा लागला. "जें पटेल तें बोलणार" असा त्यांचा बाणा होता. त्रिपुरी काँग्रेसच्या वेळेला केवढें तरी मोठें काहूर उठलें तरी त्या सर्व उठविलेल्या काहुराला त्यांनीं तोंड दिलें. पुरोगामी गट स्थापन केल्यानंतर तर त्यांना फारच विरोध सहन करावा लागला. पण प्रचंड झंझावात उठला तरी त्यामुळें पर्वत हलत नाहीं. बेळगांवला दौऱ्यावर असतांना त्यांनीं दारुबंदीच्या काढलेल्या पत्रकामुळें खूप मोठें काहूर उठलें होतें. त्यांच्या एका जवळच्या मित्रानें त्यांना तार करून तें वृत्त कळविलें. सुभाषबाबूंनीं ती तार घेतली नि हंसत हंसत फाडून टाकली नि ते म्हणाले--"असल्या अकांडतांडवाला घाबरणारा मी नव्हे," इतका त्यांचा स्वमतांवर विश्वास होता. स्वतःच्या बुद्धीला पटेल तें तत्त्वज्ञान त्यांनीं आचरलें. जनतेपुढें मांडलें. त्यांत खोटेपणा, दंभ मुळींच नव्हता. इतकें असूनसुद्धां परमतसहिष्णुता त्यांचे ठिकाणीं होती. अत्यंत शांतपणानें दुसऱ्याचें म्हणणें ऐकून नंतर अत्यंत थोड्या शब्दांत ते आपले विचार मांडीत.

सुसंबद्धता हा त्यांच्या विचारांचा प्रमुख गुण होता. १९३० सालीं त्यांना क्रांतीच्या कल्पनेसंबंधीं एका प्रमुख कार्यकर्त्यानें विचारलें असतां त्यांनीं सांगितलें होतें कीं, राजसत्तेचा लष्करी पराभव जेव्हां होतो तेव्हां क्रांति पूर्ण होते. हें मत १९४५ सालींहि कायम होतें, इतकेंच नव्हे तर तसा एक प्रयत्नहि त्यांनीं केला होता. कांहीं पुढाऱ्यांच्या भाषणांत असंबद्धतेमुळें नाविन्य वाटतें, तसें सुभाषबाबूंच्या विचारप्रणालींत कधींच वाटलें नाहीं. म्हणून कित्येक लोकांच्या दृष्टीनें ते खरे "आधुनिक" पुढारी नव्हते! परंतु त्या लोकांच्या दुर्दैवानें असें सिद्ध करून दिलें कीं, अद्यावत् आधुनिक राजकारणाचा अभ्यास करून त्याचा फायदा नेताजींच्याइतका कोठल्याच पुढाऱ्यानें घेतला नाहीं.

## महात्माजी व सुभाष

महात्माजी नि सुभाष यांचे संबंध हें एक कोडें आहे. महात्माजी म्हणजे अहिंसावाद आणि सुभाष म्हणजे शस्त्रवाद. गांधीजींची भूमिका ही दूरवर आकाशांत लकाकणाऱ्या तेजस्वी ताऱ्याची तर सुभाषचंद्रांची भूमिका एका हातांत मशाल

घेऊन जाणाऱ्या पथप्रदर्शकाची. सुभाषबाबू हे गांधीजींचे अनुयायी कधींच होऊं शकले नाहींत याचेंहि कारण हेंच. अगदीं दोन टोकें कधींच एक होऊं शकणार नाहींत. गांधीजींचे मार्ग अपुरे आहेत अशी सुभाषबाबूंची कल्पना १९३३ सालींच झालेली. परंतु इतकें असूनसुद्धां त्यांनीं गांधीजींशीं आपले संबंध सलोख्याचे, स्नेहाचे ठेवले.

## गांधीजींचें मत

गांधीजींना सुभाषबाबूंचे मार्ग कधींच पसंत नव्हते. या मार्गाच्या विभिन्नतेंतून फार मोठा विरोध सुभाषबाबूंनीं गांधीजींना केला. त्रिपुरी कॉंग्रेसच्या वेळेस तर आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर सुभाषबाबूंनीं गांधीजींचा पराभव केला. सुभाषबाबूंच्या कर्तृत्वाची जाणीव गांधीजींना झाली आणि त्यांनीं 'पट्टाभींचा पराभव हा माझा पराभव आहे' असें जाहीरहि केलें.

गांधीजींना नेताजींनीं ते येथून गेल्यानंतर पत्करलेला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा मार्ग पसंत नव्हता. ते जर्मनीला जाऊन मिळाले होते. लुई फिशर या अमेरिकन वृत्तपत्रप्रतिनिधीनें गांधीजींना सुभाषांसंबंधीं प्रश्न विचारला होता. त्यावेळीं गांधीजींनीं सांगितलें—" मी बोसना साऱ्या राष्ट्रवीरांचा राष्ट्रवीर (Patriot of Patriots) समजतों. त्यांचा मार्ग चुकला असेल. त्यांचा मार्ग चुकला अशी माझी खात्री आहे. मीं कितीतरी वेळां त्यांना विरोध केला. दोन वेळां त्यांना मीं कॉंग्रेसचे अध्यक्ष होऊं दिलें नाहीं. तरी ते अध्यक्ष झालेच. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं मला कोणाच्याहि मदतीची अपेक्षा नाहीं. हिंदुस्थाननें आत्मसंरक्षण करावें हें मला हवें आहे."

गांधीजींचा हा मतभेद नेताजींशीं होता. त्यामुळेंच कॉंग्रेसमध्यें गांधीजींनीं सुभाषबाबूंना विरोध केला. सुभाषबाबूंचा कॉंग्रेसमध्यें जाण्याचा उद्देश एकच होता. कॉंग्रेसला क्रांतिकारक वळण देणें.

परंतु सुभाषबाबूंना तें जमलें नाहीं उलट त्यांनाच बाहेर पडावें लागलें. परंतु त्यांनीं देशाबाहेर जाऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठीं एक विराट् प्रयत्न केला नि त्यामुळें त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव जगाला झाली. गांधीजींनींसुद्धां नेताजींच्या या अलौकिक कर्तृत्वाचा गौरव केला. ते म्हणाले—" सुभाष बोस यांच्याशीं माझे संबंध अत्यंत शुद्ध व उत्तम होते. त्यांच्या त्यागी वृत्तीची मला पूर्ण माहिती

होती. परंतु त्यांच्या कल्पकतेची, लष्करी गुणांची व संघटनाचातुर्याची जाणीव मला त्यांच्या विदेश-गमनानंतरच झाली. ”

गांधीजीचेहि एवढ्या मोठ्या पराक्रमानें डोळे दिपले. गांधीजींची सुभाषबाबूं-विषयीं आदरभावना वाढली आहे. परंतु तलवारीच्या जोरावर स्वराज्य मिळणार नाहीं हा त्यांचा विश्वास कायम आहे.

त्रिपुरी कॉंग्रेसचा प्रसंग हा अत्यंत वाईट होता. परंतु त्यांच्याशीं झालेल्या या झगड्यामुळें गांधीजींनीं सुभाषचंद्रांचा द्वेष केला नाहीं. गांधीजींनीं सुभाषचंद्रांना ‘ जन्मजात नेता ’ असें विशेषण दिलें आहे. गांधीजींनीं एका संदेशांत नेताजींच्या-विषयीं पुढील उद्गार काढले होते—

“ क्या इसमें कोई शक है कि श्री. सुभाषबाबू बडे वीर पुरुष थे, जो अपने प्राणधन और सुख की परवा न करके अपने ध्येयसे वफादार रहे ? क्या उनके काम इतने जाहिर नहीं हो चुके हैं कि मैं लिखूं तो ही वैसा माना जायगा ? ”

या संदेशांत खोल अर्थ भरलेला आहे.

## सुभाषचंद्रांचें मत

सुभाषचंद्रांचे मार्ग हे गांधीवादाला अमान्य असणारे आहेत हें विदितच आहे. सुभाष प्रथम विलायतेहून हिंदुस्थानांत आले तेव्हांच त्यांनीं गांधीजींशीं झालेल्या पहिल्या मुलाखतीनंतर गांधीजीविषयीं निराळें मत बोलून दाखविलें. सुभाष म्हणजे प्रलयज्वाला. बंगाली माणसचा तो प्रमुख गुण आहे. तेथें तडजोडीला वाव नाहीं, ‘ Forget not that grossest crime is to compromise with injustice & wrong ’ अन्याय नि असत्य यांच्याशीं तडजोड करणें हा भयंकर गुन्हा आहे हें सुभाषचंद्रांच्या राजकीय विचारसरणीचें सूत्र. साम्राज्य-शाहीशीं तडजोड हे शब्दच त्यांना सहन होत नसत आणि याच्या उलट गांधीजींचें आहे. त्यांच्या सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानांत प्रथम तडजोडीचा प्रयत्न नि नंतर सत्याग्रह. सुभाषचंद्रांचे राजकीय विचार यामुळेंच गांधीजींच्या विरुद्ध होते.

सुभाष गांधीविरोधी होते, तरी ते गांधीद्वेषी नव्हते. गांधींना सर्वांत मोठा विरोध सुभाषबाबूंनीं केला. पण त्यांचें गांधीजी या व्यक्तीबद्दल मत आदरपूर्ण होतें. गांधीजींच्या मार्गाविरुद्ध अत्यंत तीव्र शब्दांत आपलें मत अनेक वेळां मांडलें होतें. १९३३ सालीं व्हिएन्नाहून काढलेल्या पत्रकांत तर त्यांनी “ महात्मा गांधी राजकीय

पुढारी या दृष्टीनें अयशस्वी ठरले आहेत." असें आपलें मत प्रकट केलें. त्यानंतर अनेक वेळां त्यांचे नि गांधीजींचे मतभेद झाले. त्रिपुरी कॉंग्रेसनंतर गांधीजींशीं त्यांनीं पत्रव्यवहार केला त्यावेळीं ते जास्तच स्पष्ट होत गेले. कॉंग्रेसनें समेटविरोधी विचारसरणीचा अंगिकार करावा असें त्यांचें मत असे आणि तें मांडण्याचा कॉंग्रेसमध्यें राहून त्यांनीं प्रयत्न केला. गांधीजींच्या राजकारणाचें विवेचन त्यांनीं "इंडियन स्ट्रगल" या त्यांच्या पुस्तकांत केलें आहे—"पुढाऱ्याचें सामर्थ्य हें अनुयायांच्या संख्येवरच नुसतें अवलंबून नसून तें अनुयायांच्या वृत्तीवर अवलंबून असतें; आणि यांतच गांधींच्या अपयशाची मीमांसा सांपडेल. याहीपेक्षां अल्पगणसंख्या हाताशीं असतांहि इतर कांहीं पुढारी आपल्या देशाला दास्यांतून मुक्त करण्यास समर्थ झाल्याचें आढळून येतें. परंतु महात्माजींना तें शक्य झालें नाहीं. स्वतःच्या लोकांची मनोभूमिका महात्माजींनीं यथार्थपणें समजावून घेतलेली आहे. परंतु विरोधकाची भूमिका मात्र त्यांना समजून घेतां आली नाहीं; आणि हेंच त्यांच्या अपयशाचें कारण. महात्माजींची विशिष्ट तर्कपद्धति ही जॉनबुलच्या इंग्रजी मनोवृत्तीच्या बाबतींत परिणामकारक ठरण्यासारखी नाही. सर्वच गोष्टी अगदीं उघड व सरळपणानें करण्याचें त्यांचें धोरण हेंच त्यांच्या अपयशाला कारणीभूत आहे. प्रत्येक गोष्टीला आवश्यक तितकेंच महत्त्व देणें योग्य आहे. आणि राजनैतिक झटापटींत मुत्सद्दीपणाच्या कुशल कलेपासून दूर राहून केव्हांच भागणार नाहीं."

राजकारणाचें जें प्रमुख सूत्र 'सावधपण सर्वविषयीं' तें सुभाषचंद्रांच्या राजकारणांत होतें. सुभाषचंद्रांच्या राजकारणांत गुप्ततेला प्राधान्य आढळतें, तर गांधीजीच्या राजकारणांत गुप्ततेचा तिरस्कार दिसून येतो.

## सत्याग्रहासंबंधीं

सत्याग्रहाच्या उपयुक्ततेसंबंधीं सुभाषबाबूंचें मत निराळें होतें. १९२०–१९३२ सालीं त्यांनीं लढ्यांत भाग घेतला. परंतु सत्याग्रहावर सुभाषबाबूंनीं स्वातंत्र्याचें अंतिम साधन म्हणून कधीच श्रद्धा ठेवली नाहीं. ते म्हणतात—"... पण त्यावेळींदेखील सत्याग्रहामुळें देशाला संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होऊं शकणार नाहीं याची आम्हांला पक्की जाणीव होती. मात्र या चळवळीमुळें जनतेंत राष्ट्रीय जागृति भरपूर होईल, लोकांत आत्मविश्वास वाढेल आणि सशस्त्र लढा करण्यासाठीं आवश्यक असलेलें सामर्थ्य अंगीं येईल हें स्पष्ट होतें.

सत्याग्रहामुळें संपूर्ण स्वातंत्र्य मिळूं शकणार नाहीं हें माझें एकटयाचें मन नव्हतें, तर महात्माजींच्या प्रभावामुळें असहकारितेच्या चळवळींत जे असंख्य तरुण पडले, त्यांनाहि असेंच वाटत होतें. अर्थातच असे कांहीं तरुण होतेच कीं, ज्यांची अहिंसेवर पूर्ण श्रद्धा होती. पण बहुसंख्य तरुण शस्त्रवादाचे पुरस्कर्ते होते."

कायदेभंग हे स्वातंत्र्याचें अंतिम साधन नव्हे तर असंतोषाचा वणवा पेटविण्यास उपयोगी पडणारी ज्वाला आहे. या दृष्टिकोनांतून नेताजी गांधींच्या जीवनकार्याकडे पहात असत.

## गांधीजींच्या कार्याचें मूल्यमापन

२ आक्टोबर १९४३ या दिवशीं गांधीजींच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या भाषणांत ते म्हणाले—

"१९१९ च्या दुर्दैवी घटनांनंतर हिंदी लोक स्तिमित झाले. पुढें काय करावें हेंच त्यांना कळेना...भावनेच्या खळबळीच्या या प्रसंगीं गांधीजी क्षितिजावर आले नि त्यांनीं असहकारिता म्हणजे सत्याग्रह म्हणजे सविनय कायदेभंग ही आपली नवी पद्धति भारतीय जनतेपुढें मांडली. जणूं ईश्वरानें स्वातंत्र्याचा मार्ग दाखविण्यासाठीं हा देवदूतच पाठविला आहे असें तेव्हां वाटलें. तात्काळ स्वयंस्फूर्तीनें सारें राष्ट्र त्यांच्या निशाणाभोंवतीं जमा झालें. हिंदुस्थानचा बचाव झाला. आशा नि आत्मविश्वास यांनीं प्रत्येक भारतीयाचें तोंड सतेज झालें. आपण अखेरीस विजयी होऊंच होऊं अशी पुन्हां एकदां खात्री वाटूं लागली...... हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य कार्यांतील त्यांची कामगिरी खास अद्वितीय स्वरूपाची आहे!"

गांधीजींचें हें ऋण त्यांनीं मान्य केलें होतें. म्हणूनच त्यांचा गांधीविरोध हा द्वेषावर आधारलेला नव्हता. त्यांनीं भारतीय स्वातंत्र्यासाठीं शस्त्रवादच उपयोगी पडेल हें शेवटीं लोकांच्यापुढें मांडलें. आज सुभाषबाबूंचा होणारा जयजयकार हा शस्त्रवादाचा जयजयकार आहे.

## अहिंसेसंबंधीं

गांधीजींच्यासंबंधीं बोलतांना नेताजींनीं त्यांच्या अहिंसेसंबंधीं पुढील उद्गार काढले होते.—

" गांधीजी हे एक आधुनिक ऋषि आहेत. त्यांची अहिंसा ही मानवतेची एकमात्र आशा आहे. पण गुलाम देशाची अहिंसा ही अहिंसा नसते. तो दुबळेपणा असतो. म्हणून आधीं आपण आपला देश स्वतंत्र करूं व नंतर गांधीजींना सांगूं—आतां जगाचें नेतृत्व आपण हातीं घ्या. आतां आपल्या अहिंसेची आम्हांला जरूर आहे ! "

सुभाषबाबूंची गांधीजीसंबंधीं ही भूमिका आहे.

## जवाहर–सुभाष

जवाहरलाल नि सुभाष यांत साम्य थोडेंच आहे. किंबहुना या दोघांची तुलना करणें कठिण आहे. " जनतेचे जवाहिर " म्हणून पंडितजींचें वर्णन केलें जातें, तर " भारताचा चंद्र " म्हणून नेताजींचें वर्णन केलें आहे. अंधःकाराचा नाश करून स्वतःच्या प्रकाशानें मार्गदर्शन करण्याचें सामर्थ्य नेताजींच्यांत आहे हें आतां कालानेंहि सिद्ध केलें आहे. जवाहरलाल स्वतंत्रपणें नेतृत्व यशस्वी करूं शकतील कीं नाहीं हें अजून सिद्ध व्हावयाचें आहे. परंतु हें निर्विवाद आहे कीं नेताजींच्यासारखा महान् संघटनकुशल, दूरदर्शी नेता आज भारतांत दुर्मिळ आहे. जवाहरलाल लोकप्रिय झाले त्याचें एक कारण ते जनतेच्या भावना बोलून दाखवितात हें आहे.

रशियानें पुरस्कारलेला साम्यवाद जशाच्या तसा स्वीकारण्याची पंडितजींची तयारी तर सुभाषबाबूंचा साम्यवाद भारताच्या संस्कृतीवर अधिष्ठित झालेला. पंडितजी मनोधर्मानें आध्यात्मिक वाटत नाहींत. परंतु विवेकानंदांचा अध्यात्म हा सुभाषचंद्रांचा आदर्श. जवाहरलाल आंतरराष्ट्रीय वादाचे पुरस्कर्ते तर सुभाष कट्टे राष्ट्रवादी. सारांश, जवाहर व सुभाष यांच्यांत भेदच जास्त आहेत.

गेलें दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर जवाहरलालांचे मतभेद स्पष्ट होत गेले. सुभाषचंद्रांनीं आपल्या राष्ट्रीय व अचूक दृष्टिकोनांतून आपलें युद्धविषयक धोरण आंखलें व तें संपूर्णतया बरोबरहि ठरविलें. जवाहरलालना साम्राज्यशाहीशीं समेट होईल ही आशा क्रिप्स भेटीनंतरहि होती. सुभाषबाबूंनीं तशी कधींच अपेक्षा केली नाहीं. उलट सरकार हिंदुस्थानला पिळून काढील आणि युद्धकार्य चालवील हा त्यांचा अंदाज होता तो तंतोतंत बरोबर ठरला.

## आझाद फौजेविषयीं

जवाहरलालांचें आझाद फौजेविषयींचें आजचें मत हें बदललेलें मत आहे. सुभाष हिंदुस्थान सोडून गेले व ते गट्टी राष्ट्रांना मिळाले असें सरकारनें जाहीर केल्याबरोबर १२ एप्रिल १९४२ या दिवशीं पत्रकारांना मुलाखत देतांना जवाहरलाल म्हणाले होते—" मी सुभाष बोसना विरोध करीन व मरेपर्यंत त्यांच्याशीं लढेन ! " पण त्यांच्या सुदैवानें हें घडलेंच नाही. जवाहरलालनीं हें आपलें मत माहितीच्या अभावीं देण्याची चूक केली हें त्यांच्या निदर्शनास आलें आहे. इतकेंच नव्हे तर त्यांनीं तें मान्यहि केलें आहे. याहीपुढें जाऊन " मी त्या परिस्थितींत असतों तर सुभाषबाबूंच्यासारखें केलें असतें " असे उद्गार त्यांनीं काढले आहेत. सुभाषबाबूंचा हा मोठा नैतिक विजय आहे.

पंडित जवाहरलालनीं आपली भूमिका मांडतांना म्हटलें आहे—" पडद्याआड झालेल्या गोष्टींबद्दल चुकीचा समज होणें शक्य असतें म्हणून मी आझाद हिंद फौजेच्या मार्गाविरुद्ध पूर्वीं बोललों होतों. आज ज्या घटना प्रकाशांत आल्या आहेत त्यांची त्यावेळीं मला कांहींच कल्पना नव्हती !...... "

"... नेताजी सुभाषचंद्र बोस यांना हिंदुस्थानांत होते तेव्हां मीं विरोध केला. मग आतांच मी त्यांची स्तुति कां करीत आहें ? हा प्रश्न कांहींजण मला विचारतात. गेलीं पंचवीस वर्षे स्वातंत्र्य युद्धांत सुभाषबाबू व मी सहकारी होतों. ते माझ्यापेक्षां तीनचार वर्षांनीं किंवा त्याहूनहि जास्त लहान होते. आम्हां उभयतांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे व स्नेहभावाचे होते. भावाप्रमाणें मी त्यांच्याशीं वागलों. राजकीय प्रश्नांबाबत कधीं कधीं आमच्यांत मतभेद उद्भवत. पण भारताच्या स्वातंत्र्ययुद्धांतील सुभाष हे एक शूर सैनिक होते याचा विसर मला कधीं क्षणभरहि पडलेला नाहीं.

आझाद हिंद फौजेच्या कार्याला पाठिंबा देतांना भावनेच्या भरांत मी वाहून गेलेलों नाहीं. आझाद हिंद आंदोलनाचें संपूर्ण चित्र माझ्या नजरेसमोर उभें राहिलें. तेव्हांच त्याबाबतचें माझें मत मीं ठरविलें. ज्या अभूतपूर्व संकटकालांत आझाद हिंद फौज स्थापन झाली व तिनें कार्य केलें त्या परिस्थितींत मी स्वतः काय केलें असतें हें आज देखील मला माहीत नाहीं. म्हणून त्या काळांतील इतर कोणाच्याहि वर्तनाविषयींचा निर्णय मला देतां यावयाचा नाहीं. आपले जे

देशबांधव शौर्यानें लढले व लढतात त्यांच्याबद्दल कौतुक व आदर वाटल्याखेरीज कसा राहील ? नेताजींनीं संकटप्रसंगाला ज्या पद्धतीनें तोंड दिलें त्याबद्दल निरतिशय आदर वाटतो. ते ज्या परिस्थितींत होते त्या परिस्थितींत मी असतों तर मीं देखील त्यांनी जें केलें तेंच कदाचित् केलें असतें ! जपान्यांनीं आझाद हिंद सरकारवर व आझाद हिंद फौजेवर वर्चस्व गाजविण्याचे जे प्रयत्न केले त्या सर्वांचा प्रतिकार नेताजी सुभाष बोस यांनीं खंबीरपणें केला ही गोष्ट आतां जगजाहीर झालेली आहे ! ”

सुभाषबाबूंच्या विराट् प्रयत्नाला जवाहरलालना आज प्रणाम करावा लागत आहे नि जवाहरलालनीं आपले सर्व मतभेद विसरून सुभाषचंद्रांच्या मार्गाचा निःसंदिग्ध पुरस्कार केला आहे. सुभाषबाबूंच्या राजकीय विचारसरणीचा हा विजय आहे. नुकत्याच एका भाषणांत जवाहरलालनीं सांगितलें कीं, “ आतां आपण लष्करांतील लोकांचीं मनें वळविलीं पाहिजेत. ” पंडितजींचा विचारप्रवाह कुठल्या दिशेनें वाहूं लागला आहे हें यावरून सिद्ध होत आहे. सुभाषचंद्र हे भारतीय क्रांतीचे अग्रदूत ठरावेत असाहि भविष्यकालाचा निर्णय असेल !

## वीर सावरकर–सुभाष

सावरकर नि सुभाष म्हणजे क्रांतिवीर, क्रांतीचे दूत. भारताच्या इतिहासाचीं विसाव्या शतकाचीं पहिलीं दहा वर्षें सावरकरांनीं “ अभिनव भारता”च्या संस्थापनेनें गाजविलीं. याहीपेक्षां लाला हरदयाळ यांच्या नेतृत्वाखालीं जें “गदर” प्रकरण गाजलें त्या चळवळीचा एक भाग–एम्डन जहाजाकडून अंदमानांतील त्यावेळेस असलेल्या राजबंद्यांची ( वीर सावरकर आदि क्रांतिकारकांची ) सुटका करून ब्रह्मदेशांत भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धाची सुरुवात करावी हा होता. सरकारनें प्रसिद्ध केलेल्या सेडिशन रिपोर्टांत अशा अर्थाचा उल्लेखहि आहे.

सुभाषचंद्रांनीं १९१४ सालीं झालेल्या या अयशस्वी प्रयत्नाला अत्यंत विराट् व यशस्वी स्वरूप प्राप्त करून दिलें. सुभाषचंद्रांनीं या सर्व क्रांतिप्रयत्नांचा अभ्यास केला असला पाहिजे व त्यांत झालेल्या चुका शोधल्या असल्या पाहिजेत तेव्हांच त्यांना एवढें मोठें यश मिळूं शकलें.

वीर सावरकरांनीं युद्धाच्या सुरुवातीपासून सैनिकीकरणाचा आदेश दिला होता. सावरकरांनीं त्यावेळेस सैन्याचा उपयोग इतर राष्ट्रांनीं आपलें स्वातंत्र्य हस्तगत

करून घेण्यासाठीं केला हें प्रतिपादन करून ही योजना जनतेपुढें मांडली. आज इंग्रजांच्या वतीनें लढणारे सैनिक उद्यां स्वतःच्या देशासाठीं लढतील ही कल्पना करून दिली. राजसत्तेचा लष्करी पराभव त्या मार्गानेंच घडवितां येईल असें इतिहास सांगत होता.

सुभाषबाबूंचीसुद्धां फार पूर्वींपासून सैनिकांत क्रांति घडवून आणण्याची कल्पना होती. सुभाष व सावरकर यांची भेट १९४० च्या जूनमध्यें झाली होती. हिंदुत्वाच्या बाबतींत दोघांचे मतभेद असले तरी स्वातंत्र्याच्या मार्गाबद्दल दोघांचें मत सारखेंच असावें.

नेताजी सुभाषचंद्रांनीं सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या धोरणासंबंधीं पुढील सूचक उद्गार काढले होते—" कॉंग्रेसचे बहुतेक सर्व पुढारी हिंदी सैन्यांतील सैनिकांना भाडोत्री म्हणत असले तरी स्वातंत्र्यवीर सावरकर निर्भयतेनें तरुणांना लष्करांत शिरण्याचा उपदेश करीत आहेत ही गोष्ट अत्यंत आशादायक आहे. या बाबतीत कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या ठिकाणीं दूरदर्शीपणाचा अभाव व लहरी राजकारण या गोष्टी दिसून येतात. सैन्यांत दाखल होणाऱ्या या तरुणांतूनच ' आझाद हिंद फौजे 'ला माणसांचा पुरवठा होत आहे. सैनिकीकरणाचें हें पूर्वनियोजित धोरण निर्णायक क्षण येतांच भारतास स्वतंत्र करणाऱ्या माझ्या सैन्यास किती उपयोगीं पडेल हें सहज कळण्यासारखें आहे !— " आझाद हिंद सरकारच्या एका सदस्यानें हें वृत्त सांगितलें आहे.

नेताजींनीं स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं लिहिलेल्या सन १८५७ च्या प्रति छापून त्यांचा सैन्यांत प्रसार केला होता. त्यांतील Volcano आदि प्रकरणें वृत्तपत्रांतून उद्धृत केलीं जात असत. कारण त्यांत ज्वालामुखीचा स्फोट करण्याचें सामर्थ्य आहे.

एक गोष्ट निश्चित आहे कीं सावरकरांनीं लोकांचे शिव्याशाप खाऊन प्रतिपादिलेल्या सैनिकी क्रांतीच्या तत्त्वाचा जयजयकार सुभाषबाबूंनीं केला. सैनिकांत आज जयहिंदचा शिरकाव झाला आहे. तो शिरकाव पुढें मागें महान् कार्य केल्याशिवाय राहाणार नाहीं.

## समाजवाद

सुभाषबाबूंना समाजवाद मान्य होता. त्याचीं मूलतत्त्वें मान्य होतीं. परंतु रशियाच्या आदेशाप्रमाणें त्याच्या पावलावर पाऊल टाकून हिंदुस्थाननें चालावें हें

मात्र त्यांना पसंत नव्हतें. त्यांनीं समाजवादासंबंधीं स्वतःचीं मतें मांडलीं होतीं तीं अशीं—

" हिंदुस्थानचा उद्धार जर व्हावयाचा असेल तर तो समाजवादानेंच होईल अशी माझी दृढ श्रद्धा आहे. हिंदी राष्ट्रानें परकीयांच्या इतिहासावरून व त्यांनीं केलेल्या प्रयोगावरून आपल्या परिस्थितीचा व गरजांचा विचार केला पाहिजे. व आपल्याला उपयोगी पडतील असे मार्ग व साधनें शोधून काढलीं पाहिजेत. कोणत्याहि तत्त्वाची प्रत्यक्ष व्यवहारांत अंमलबजावणी करतांना इतिहास व भूगोल यांना पायाखालीं तुडवून चालणार नाहीं. मला असें वाटतें कीं हिंदुस्थाननें आपल्या परंपरेला, समाजस्थितीला व गरजांना उपयुक्त ठरेल अशा प्रकारचें नवें स्वरूप समाजवादाला द्यावें. पाश्चात्य समाजवाद हा जशाचा तसा आपल्याला लागू पडणार नाहीं. आज जर सर्व जगभर समाजवादाचे प्रयोग सुरू आहेत तर आपणहि आपल्या दृष्टीनें तसेच प्रयोग करून कां पाहूं नयेत ? कदाचित् त्यामुळें असाहि फायदा होईल कीं हिंदुस्थाननें स्वतःसाठीं तयार केलेलें समाजवादाचें तत्त्वज्ञान जगाच्याहि उपयोगी पडेल. "

समाजवाद हा आपणांपुढील तांतडीचा प्रश्न नव्हे. जेव्हां राजकीय स्वातंत्र्य मिळालेले असतें तेव्हां समाजवादाचा प्रचार अवश्य असतो.

## भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व

सुभाषबाबूंच्या नसानसांत भारतीय संस्कृतीचा अभिमान भरलेला होता. " जुनें तेवढें टाकाऊ " हा एक अजब सिद्धांत त्यांना मान्यच नव्हता. भारतीय संस्कृति ही सर्व जगांत श्रेष्ठ अशी संस्कृति आहे असें त्यांचें ठाम मत होतें. संस्कृति हा राष्ट्रमंदिराचा पाया आहे आणि याच दृष्टिकोनांतून आज जगांत प्रचलित असलेल्या विचारप्रवाहाचा ते विचार करीत. आपल्या सर्व गोष्टी टाकाऊ नि दुसऱ्याचें जें जें तें सर्व अनुकरणीय या विचारसरणीचा धिक्कार त्यांनी अनेक वेळां केला. भारतानेंहि प्राचीन कालीं मानवी जीवनमूल्यांचा अभ्यास केलेला आहे. त्याचें वर्णन सुभाषबाबूंनीं एका व्याख्यानांत पुढील सुंदर शब्दांत केलें आहे.

" या क्षितिजापलीकडे, या अरण्यापलीकडे आमची सुवर्णभूमि—आमच्या स्वप्नांचा देश आहे. तो देश जगांतील सर्वांत सुंदर देश आहे. त्याच्या आकाशांत चंद्रप्रकाश

दिव्य असतो, त्या देशांतील पक्ष्यांचे बोल दिव्य असतात. त्या वृक्षतळीं वसून प्राचीन काळीं ऋषींनीं आम्हांला दिव्य जीवनरहस्यें सांगितलीं आहेत !"

भारताजवळ एक उदात्त असें तत्त्वज्ञान आहे, त्यांत ब्राह्म, क्षात्र तेजांचा सुंदर संगम झालेला आहे हें सुभाषबाबूंनीं आपलें मत अनेक वेळां मांडलें आहे. पुण्याला झालेल्या प्रांतिक परिषदेंत त्यांनीं मांडलेले विचार त्यांच्या भारतीय संस्कृतीच्या अभिमानाची साक्ष देतील.

"राजकीय गुलामगिरी किंवा आर्थिक दास्य झुगारून देण्याच्या उद्देशानेंच हिंदुस्थानची चळवळ चाललेली आहे असें नव्हे तर सर्व पाश्चिमात्य संस्कृतीच्या जुलमी आधिपत्याच्याविरुद्ध हिंदुस्थानची ही मोहीम आहे. असेंहि म्हटलें असतां चालेल कीं ब्रिटिश सत्तेच्याविरुद्ध आमचा मोठ्यांत मोठा दोषारोप म्हटला म्हणजे ब्रिटिशांनीं अलेक्झांडर काय किंवा चेंगीझखान काय यांनीं न केलेली गोष्ट करून आपल्या जबरदस्त पंजाचीं तीक्ष्ण नखें आमचें सारें राष्ट्रीयत्व समूळ नष्ट करण्याच्या निष्फळ हेतूनें कां होईना आमच्या सामाजिक व सांस्कृतिक चारित्र्याच्या पोटांत खुपसलीं हाच होय.

हिंदुस्थान देश पुरातन व जुनाट असला, तरी तरुण आणि टवटवीत असाच जगाच्या दृष्टीस पडतो. हिंदुस्थान देश भरभक्कम अशा आपल्या पूर्व संस्कृतीच्या पायावर उभा राहून नवनवीन कल्पनांचे रंगीबेरंगी पतंग मनाच्या आकाशामध्यें उडवीत आहे. नवीन सत्यतत्त्वांचीं रत्नें शोधून काढीत आहे. नवीन पद्धति निर्माण करीत आहे आणि नवीन नवीन संस्था उभारीत आहे, असा देखावा सर्वत्र आपल्या डोळ्यांना दिसतो. सामाजिक आचारविचार बदलण्यांत, नैतिक दृष्टींत फेरफार करण्यांत, नवीन कायदेकानू करण्यांत, बाह्य परिस्थितीचा आपल्या शक्तिसंवर्धनाकडे उपयोग करण्यांत नि साधारणपणें आपल्या राष्ट्रीय संस्थांची पुनर्घटना करण्यांत पूर्वीं हिंदुस्थाननें जें केलें तेंच तो आज पुन्हां करीत आहे. जरी ब्रिटिश लोकांचा आणि भारताचा संपर्क घडला नसता, तरी देखील बदललेल्या काळाच्या कलाटणीनें उत्पन्न केलेल्या आत्मस्फूर्तीनें हिंदुस्थाननें तीच गोष्ट केली असती, नाहीं असें नाहीं."

## खरें आंतरराष्ट्रीयत्व

"राष्ट्रीयत्वाच्या भावनेवर निरनिराळ्या दिशांनीं जे हल्ले चढविले जातात

त्यासंबंधीं माझ्या देशबांधवांना आणि विशेषतः माझ्या समवयस्क मित्रांना या ठिकाणीं एक इशारा देणें अगत्याचें आहे, असें मला वाटतें. सांस्कृतिक आंतरराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें राष्ट्रीयत्व हें संकुचित, स्वार्थी आणि कलहप्रवर्तक आहे असें कधीं कधीं म्हटलें जातें. संस्कृतीच्या क्षेत्रांत, आंतरराष्ट्रीयत्वाच्या पोषणास राष्ट्रीयत्व विघातक आहे असेंहि म्हटलें जातें. याला प्रत्युत्तर म्हणून मी असें म्हणेन कीं भारताची राष्ट्रीयत्वाची भावना आकुंचित नाहीं, अप्पलपोटेपणाची नाहीं किंवा चढाईच्या स्वरूपाचीहि नाहीं. मानवजातीच्या उदात्त अशा ध्येयांच्या उच्चतम शिखरांवर आरूढ झालेलीं अशीं जीं सत्यं, शिवं, सुंदरं हीं तीन तेजस्वी तत्त्वें आहेत तीं भारतीय राष्ट्रीयत्वाच्या भावनेंत अनुस्यूत झालेलीं आहेत. त्यामुळेंच भारतीय जनतेंत सत्यप्रियता, प्रामाणिकपणा, शौर्य, स्वार्थत्याग आणि देशसेवा इत्यादि गुणांचें बीजारोपण झालेलें आहे.

राष्ट्रीयत्वाची भावना आंतरराष्ट्रीयत्वाच्याविरुद्ध नाहीं. एवढेंच नव्हे तर राष्ट्रीयत्वाच्या पायावरच आंतरराष्ट्रीयत्वाची इमारत बांधावयाची असते असें म्हटलें तरी चालेल. आंतरराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेवर कट्या आंतरराष्ट्रीयवाद्यां-इतकाच माझाहि दृढ विश्वास आहे. परंतु त्याबरोबर माझी अशीहि खात्री झाली आहे कीं, आंतरराष्ट्रीयत्वाच्या मंदिरांत करावयाचा प्रवेश राष्ट्रीयत्वाच्या महाद्वारांतूनच झाला पाहिजे !"

## नवभारताचें कल्पनाचित्र

" भारतीय क्रांति ही केवळ राजकीय क्रांति असूंच शकत नाहीं. भारतीयांची मूळवृत्ति ही आध्यात्मिक आहे. अध्यात्माचा अग्नि हा जनतेंत सुप्त रूपानें आजहि वास करीत आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या भयंकर व दूरगामी अशा आघातांनीहि जनतेची अध्यात्मशक्ति संपूर्णपणें नाहींशी होऊं शकली नाहीं. जनतेची ही सुप्त अध्यात्मशक्ति संपूर्ण जागृत करावयाची असेल तर भारतीय जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश करणारी साधी, सरळ अशी नवी विचारप्रणालि निर्माण केली पाहिजे. गांधीवादी तत्त्वप्रणालि या दृष्टीनें अपुरी असल्यामुळें सर्वांगीण क्रांति घडवून आणणें हें तिला शक्य नाहीं. राजकीय तत्त्वप्रणालीनें जनतेंतील थोडासाच भाग आकृष्ट होऊं शकतो. म्हणून सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याचें हें कार्य, जुन्या आध्यात्मिक शक्तीची नव्या विज्ञानाचे दृष्टीनें संगति

साधणारी अशी नवी तत्त्वप्रणालि निर्माण करणारे, नवे पुढारीच निर्माण करूं शकतील. स्वतंत्र भारतापुढें अध्यात्मदृष्ट्या फार मोठें असें भवितव्य आहे. स्वतंत्र भारताची अध्यात्मशक्ति संपूर्ण जागृत झाल्यावर मानव जातीचें भवितव्य प्रगतिमार्गानें घडविण्याचें कार्य भारताकडेच येणार आहे!"

## जपानचे हस्तक (?)

सुभाषबाबू जपान–जर्मनीला मिळाल्यानंतर हिंदुस्थानांतील अनेक मोठमोठ्या लोकांनीं त्यांना 'जपानचे हस्तक' म्हटलें. देशद्रोह्यांनीं सुभाषबाबूंना 'क्विस्लिंग' म्हणण्यासहि मागेंपुढें पाहिलें नाहीं. ज्यांच्या अकलेचीं पार्सलें रशियांतून येतात अशा जयचंदी (कम्युनिस्ट) लोकांनीं सुभाषबाबूंना हा फॅसिस्ट आहे असें म्हणावें याबद्दल काय आश्चर्य? त्या देशद्रोह्यांना सुभाषचंद्रांची थोरवी पटवून देण्याची गरज नाहीं, कारण त्यांना ती कळणार नाहीं. त्यांची निष्ठा एका परक्या राष्ट्राच्या सूत्रानें हलते. नेताजींनीं दि. २६ जून १९४४ या दिवशीं भारतीय क्रांतिकारकांना उद्देशून एक भाषण केलें होतें. त्यांत परकीयांच्या सहाय्याविषयींची आपली भूमिका मांडली होती. ते म्हणाले, " मी असें ऐकतों कीं माझ्यावर असा आरोप केला जात आहे कीं मी जपान्यांचें सहाय्य घेत आहें. मला असें स्पष्ट सांगावयाचें आहे कीं मी जपानची मदत घेतों. यांत मला कांहीं शरमिंदेपणा वाटत नाहीं. जपाननें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य केलें आहे, तात्पुरत्या आझाद हिंद सरकारला मान्यता दिली आहे आणि याच आधारावर मीं तडजोड केली आहे. आणि तुम्हीं? जें सरकार आपलें रक्त शोषतें आहे अशा सरकारशीं तुम्ही तडजोड करीत आहांत....

...हें बरोबर आहे कीं जपाननें आम्हांस लढाईसाठीं शस्त्रें पुरविलीं आहेत. परंतु जपाननें ती एक स्वतंत्र राष्ट्राला केलेली मदत आहे. आमची सेना सर्वस्वीं आमची सेना आहे. हिंदी लोकांचेकडून हिंदीमध्यें शिक्षण दिलें जातें. आमच्या सैनिकी शाळेंत हिंदी शिक्षकच शिक्षण देतात. या सेनेचा झेंडा राष्ट्रीय झेंडा आहे. लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्व सैनिकांना स्वातंत्र्याच्या ध्येयाचें वेड लागलें आहे. असें असतांना आमच्या सेनेला जपान्यांच्या हातांतलीं बाहुलीं कोण म्हणेल? ब्रिटिश सरकारची सेना ही खरी भाडोत्री सेना आहे कारण ती साम्राज्यशाहीचें युद्ध पैशासाठीं खेळत आहे.

भाई हो! मीं तुम्हांला सांगितलेंच आहे जपानची मदत घेणें मला चुकीचें वाटत

नाहीं. कारण आज स्वतःला सर्व शक्तिमान् समजणारी गोरी साम्राज्यशाही हातांत झोळी घेऊन दारोदार ठोकरी वसत असतांनासुद्धां अमेरिकेकडे अगदीं गुडघे टेकून भीक मागत आहे. आणि आम्ही तर पददलित गुलाम आहोंत. मग आम्हीं कोणत्याहि मित्राचें सहाय्य घेणें हा काय गुन्हा आहे ? आज आम्ही जपानची मदत घेत आहोंत, उद्या आम्हांला दुसऱ्या लोकांची मदत घ्यावी लागेल ! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं कोणापासूनहि सहाय्य घ्यावयास आम्ही कचरणार नाहीं.

जर परकीयांच्या सहाय्याविना हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर माझ्याइतका आनंद कोणालाच होणार नाहीं. आजपर्यंतच्या इतिहासांत बाहेरच्या मदतीखेरीज स्वातंत्र्य मिळाल्याचें एकहि उदाहरण सांपडत नाहीं.

आमची सर्वांत मोठी अडचण ही आहे कीं आम्हांला आमच्या नेत्यांनीं आमच्या शत्रूचा द्वेष करण्यास शिकविलें नाहीं. दुसऱ्या देशाच्या शत्रूविषयीं तिरस्कार बाळगण्यास मात्र आमचे कांहीं नेते शिकवीत आहेत ! दुर्दैव हें कीं बाहेरील फॅसिझमला विरोध करण्यास आमचे नेते आम्हांस शिकवीत आहेत, परंतु आपल्याच राज्यकर्त्यांच्या फॅसिझमशीं समझोता करण्यास ते तयार झाले आहेत !"

## गुलामी

गुलामगिरीचा व ती गुलामगिरी लादणाऱ्यांचा तीव्रतर द्वेष हें सुभाषचंद्रांच्या विचारसरणीचें एक प्रमुख अंग आहे. बंगालच्या गव्हर्नरला पाठविलेल्या पत्रांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, " गुलाम राहणें याइतकें दुसरें पाप नाहीं." १८५७ च्या क्रांति-युद्धावर बहादुरशहाच्या थडग्यासमोर बोलत असतांना त्यांनीं गुलामीचा धिक्कार करणारे पुढील विचार मांडले होते.—" १८५७ मधील घटनांचा अभ्यास करीत असतांना आणि त्यानंतर ब्रिटिशांनीं केलेले अत्याचार वाचून माझ्या रक्ताच्या नाड्या धाडधाड उडूं लागतात. आम्ही जर पुरुष असूं तर १८५७ सालीं आणि नंतर ज्यांना ब्रिटिशांच्या दहशतवादामुळें व पाशवी वृत्तीमुळें भयंकर यातना सोसाव्या लागल्या त्यांच्याबद्दल आम्हीं योग्य सूड घेतला पाहिजे. सूड ! सूड ! हीच हिंदुस्थानची मागणी आहे. हिंदुस्थानांतील निरपराधी लोकांचें रक्त ज्यांनीं केवळ त्या युद्धांतच नव्हे तर तदनंतरहि सांडलें, अमानुष प्रकारें लोकांचा छळ केला त्या ब्रिटिशांनीं आपल्या गुन्ह्याचें प्रायश्चित्त भोगलेंच पाहिजे. आम्ही भारतीय लोक शत्रूचा पुरेसा द्वेष करीत नाहीं. अतिमानुष असें धैर्य व शौर्य आपल्या देश-

बांधवांनीं गाजवावें असें जर तुम्हांस वाटत असेल तर तुम्हीं त्यांना केवळ स्वदेशावर प्रेम करण्यासच शिकवून भागणार नाहीं, तर शत्रूचा द्वेषहि करण्यास शिकविलें पाहिजे!"

## तरुणांचा धर्म

सुभाषबाबूंनीं तरुणांना उद्देशून लिहिलेले विचार मार्गदर्शक आहेत.

"आमचा स्वतःचा असा एकच धर्म आहे. त्याचेच आम्ही अनुयायी. तो नवीन आहे, सरस आहे. त्याचा आस्वाद इतर जगानें आजपर्यंत कधींच चाखलेला नाहीं. त्याचेच आम्ही उपासक. आम्ही म्हणजे पुरातनाच्या पर्णराजीतील उमलणारीं फुलें—बंधनांच्या करकचऱ्यांतील तेजस्वी माणकें! इतिहासानें सिद्ध केलेल्या प्रमेयांच्या ओंजळीनें आम्ही कधींच पाणी पीत नसतों. अनंतपथाचे आम्ही यात्रेकरू. या अनंतपथावरच आमचें जिवापाड प्रेम. आमची मागणी—"चुका करण्याचा हक्क!" म्हणूनच आमच्याबद्दल लोकांना कधीं सहानुभूति वाटत नाहीं. बहुतेक लोक आम्हांला मार्गहीन वेडेपीर समजतात ते यामुळेंच!

## तरुणांचें कार्य

—प्रत्येक देशाच्या इतिहासांत स्वातंत्र्याचा मनोहर मनोरा कुणीं बांधला? आम्हींच ना! शांतीचें शीतल पाणी शिंपडण्याचें आमचें मुळीं जीवनकार्यच. नव्हे युद्ध करून, विवाद करून भावी प्रलयाची सूचना देणें आमची कामगिरी आहे. आमचें एकच कार्य आहे, तें म्हणजे मुक्तिपंथांतील काटे दूर करण्याचें. कारण मुक्तीच्या मार्गावर मुक्तिसेना सारखी दौडत आहे.

अनादिकालापासून आम्ही मुक्तिसंदेश छेडत आहोंत. स्वातंत्र्यगीतें गात आहोंत. अगदीं बालपणापासूनच आमच्या नसानसांतून मुक्ति स्वैरपणें वाहात आहे. अगदीं जन्मल्याबरोबरच आम्हांला बंधनांचें दुःख होऊन आम्ही टाहो फोडतों! त्यावेळचें आमचें तें रुदन हें पार्थिव बंधनाविरुद्ध उघड बंडच असतें!—

## तरुणांनो, जागे व्हा!

— शक्तिवृद्धीच्या जोरावर आम्ही काय करूं शकलों नाहीं? कोणत्याहि देशाच्या इतिहासाचा जाब घ्या. त्याच्या प्रत्येक पानावर आमचीच छाप पडलेली दिसेल. आमच्या मदतीवरच शेंकडों सम्राट् सिंहासनस्थ झाले नि आमच्या संकेतानेंच त्यांना

सिंहासन सोडून वनवासी बनावें लागलें ! कुठें आम्हीं आमच्या प्रेमाश्रूंनीं ताजमहाल निर्माण केले आहेत, तर कोठें आमच्या हृदयांतील रक्तबिंदूंनीं पृथ्वीवर शाश्वत वेलबुट्टी काढली आहे ! आणि आमच्याच या प्रेम नि त्यागाचा संयुक्त शक्तीनीं समाज, राष्ट्र, साहित्य, कला नि विज्ञान यांची निर्मिति झाली आहे ! जेव्हां जेव्हां आम्हीं करालरूपानें तांडवनृत्य आरंभिलें तेव्हां तेव्हां तर एकच पाऊल टाकल्यावर कितीतरी समाजांनीं नि साम्राज्यांनीं आमच्या पायदळींच्या धुळीचीं चुंबनें घेतलीं आहेत !

इतक्या दिवसांनंतर आज आम्हीं आमची शक्ति ओळखली आहे. आमच्या धर्माची जाणीव आम्हांला झाली आहे. पाहूं, आतां आमच्यावर कोण हुकमत चालवूं शकतो तें ! पाहूं या, आतां कोण आमचें रक्तशोषण करावयास धजतो तें ! ”

अनुक्रम २८८०१
दि. ता. ०१.०१.
क्रमांक १०४३
नों. दि. ३१/३/६१

# जीवनसंदेश



एकाच महान् ध्येयाच्या पूर्तीसाठीं हा पुण्यपुरुष भारतांत अवतीर्ण झाला. मायभू जुलमाच्या दाहानें जळत असतांनासुद्धां सुप्त राहाणाऱ्या देशबांधवांना उत्थानाचा संदेश हेंच त्याच्या जीवनकार्याचें रूप ! भीरुतेला तत्त्वज्ञान बनवून त्याच्यामागें धांवणाऱ्या देशबांधवांना क्रांतिपथाचें दर्शन घडविणें हाच त्यांचा जीवन हेतु ! मायभूचें रक्तशोषण करणाऱ्या पाशवी सत्तेचा नायनाट करणें हें त्याच्या आयुष्यांतील महान् स्वप्न ! देशाच्या स्वातंत्र्यासाठीं, राष्ट्राच्या उत्थानासाठीं संपूर्ण आत्मसमर्पण हाच त्या महापुरुषाचा ध्येयबिंदु ! आणि—

त्या महान् ध्येयाच्या, स्वप्नाच्या, जीवनहेतूच्या सिद्धीसाठीं आपल्या सर्वस्वाला त्यांनीं चूड लावली. स्वार्थाचा होम करून निस्पृहतेचीं, वैराग्याचीं वस्त्रें चढविलीं.

विलासाच्या मृदु पुष्पांनीं भरलेल्या मार्गानें देशभक्ति न करतां ज्या मार्गावर अंगार पसरलेले होते त्या मार्गावर त्यानें पाऊल ठेवलें. अविरतपणें, अविश्रांतपणें ध्येयाच्या प्राप्तीची साधना सुरू केली. सतत कारावास नि अखंड परिश्रम चालू ठेवले. दुष्ट लोकांच्या कृष्णकृत्यांना तुडवून स्वकीयांच्या निंदेचे प्रहार सहन करीत शत्रूच्या पाशवी प्रहारांना चुकवीत वेगानें ध्येयसिद्धीची उषा पाहण्यासाठीं तो दौडत होता. लोक म्हणाले—

" हा वाट चुकलेला देशभक्त आहे ! "

पण या महापुरुषानें उत्तर दिलें—" जगरहाटीपासून दूर राहण्यांतच आम्हांला गर्व वाटतो. यौवन नेहमींच लक्ष्मीपासून नि जगाच्या कोलाहलापासून दूर राहण्यांत प्रयत्नशील असतें. अतृप्त आकांक्षांच्या कैफांत आम्ही सारखे पुढें दौडत

आहांत. समजुतीचे पोक्त बोल ऐकण्यास आमचे कान नि मन रिकामें नाहीं. चुका होतील. होऊं देत. संभ्रमांत सांपडूं. पर्वा कुणाला ? कधीं पड खावी लागेल. हरकत नाहीं. पुन्हां उठूं ! पण आमचें पाऊल मागें कधींचे पडणार नाहीं. आमच्या तांडव-लीलेला अंत नाहीं. आमची गति अमर आहे आणि ती कधींहि थांबावयाची नाहीं.

त्या महापुरुषाच्या आयुष्यांतला कर्तृत्वाचा काळ जवळ येत होता. या मंत्रद्रष्टयानें भारतीयांना अंतरंगाच्या उसळीनें सांगितलें—

"तुमच्या मुक्तीचा काल जवळ येत आहे. तुमच्या उज्ज्वल भविष्यकालाच्या येत्या पावलांची चाहूल मला ऐकूं येत आहे. म्हणून बंधनें तोडण्याच्या निश्चयानें गर्जना करीत उठा !" पण–

दुर्दैवानें–राष्ट्राच्या दुर्दैवानें–या मंत्रद्रष्ट्यालाच लोक म्हणाले–"हा उतावीळ झाला आहे !" हें ऐकल्याबरोबर––

अनिवार्य त्वेषानें, दुर्दमनीय निश्चयानें स्वतःचें उज्ज्वल भवितव्य नियतीच्या स्वाधीन करून देशाच्या दुःस्थितीनें बेचैन होऊन हा वीर पुरुष निघाला......

आणि काय चमत्कार ?

जणूं कांहीं दैवी शक्तीचा संचार झाला नि भारताच्या सीमेबाहेर जाऊन तेज फुंकलें. त्या तेजानें शेंकडों हजारों भारतीयांचें जीवन तेजाळलें. स्वातंत्र्याच्या दिव्य-ज्योतीची प्रस्थापना हजारों हृदयांत झाली. मातृभूच्या चरणावर आपली प्राणपुष्पें उधळण्यास आतुर झालेले शेंकडों वीर उठले नि रक्ताच्या कणाकणांतून निनादलेली गर्जना झाली—"चलो दिल्ली !" तो रणावेश पाहून स्वर्गीय स्वातंत्र्यवीरांना अपूर्व आनंद झाला. या महापुरुषानें "स्वतंत्र भारताची" स्थापना केली—स्वातंत्र्याच्या अमृताचें सेवन केलें पण दुर्दैव—

तें खरें होत चाललेलें स्वप्न विरलें नि हा वीर नेता अदृश्य झाला—

या वीराच्या शूर कृत्यांची वार्ता जेव्हां भारतीयांना कळली तेव्हां सर्व भारती-यांनीं अपूर्व उत्साहानें जयघोष केला "नेताजी सुभाषचंद्र की जय !" नेताजींच्या कर्तृत्वाचा नगाधिराज हिमालय पाहिल्यावर सर्वांनीं उद्गार काढले—"एवढा हा महापुरुष कर्तृत्ववान् होता" आणि आज—

भारतवर्ष डोळ्यांत अश्रू आणून या वीराच्या आगमनाची वाट पाहात आहे ! भारतीय युवका—

अशी ही सुभाषचंद्रांची तेजस्वी जीवनकथा आहे !

तिच्या तेजानें तुझे डोळे दिपून जातील. त्यांच्या शौर्यानें तुझे बाहु स्फुरण पाव-तील. त्यांच्या स्नेहशीलतेची माधुरी तुला मोहित करील. त्यांच्या कुशाग्र नि तैल

बुद्धीचेंहि तूं कौतुक करशील. भारताच्या स्वातंत्र्यासाठी केलेला सर्वस्वाचा यज्ञ पाहून तूं आपलें मस्तक नमविशील. त्या नेताजींच्या तेजोमूर्तीची पूजाहि श्रद्धेनें बांधशील. आणि भावनाविवश होऊन आपल्या भक्तियुक्त अश्रूंची अंजलीहि तूं वाहाशील ! पण—

या सर्वांचा कांहीं उपयोग नाहीं. जर तूं निष्क्रिय राहशील तर नुसते अश्रू निरर्थक आहेत. कारण सुभाषचंद्रांचें समाधान नुसत्या अश्रूंनीं वा पुष्पहारांनीं होणार नाहीं. ज्वलंत अंतःकरणाची आकांक्षा कृतीनें पूर्ण होते, हारांनीं नाहीं, म्हणूनच—

तूं ऊठ !

तुझ्या हृदयांतली देशभक्तीची, स्वातंत्र्यप्रीतीची ज्योत सुभाषचंद्रांच्या अंतःकरणां-तल्या ज्योतीवर पेटव. तेवढें करूनहि स्वस्थ वसूं नकोस.

आज निष्क्रिय असलेले लक्षावधि भारतीय युवक आहेत त्यांच्याहि अंतः-करणांत ती ज्योत पेटव. त्यांना कळवळून सांग— "तुमची देशजननी दुःस्थितींत आहे याची जाणीव तुम्हांला नाहीं का ? तिच्या मुक्तीसाठीं सुभाषचंद्रांनीं आपलें अमोल आयुष्य दिलें आहे. असें असतांना तुम्ही स्वस्थ वसतां, तुम्ही विलास करतां, वैयक्तिक सुखांत रममाण होतां ! तुम्ही नादान आहांत, कृतघ्न ठराल जर स्वस्थ वसाल तर ! असें कुत्र्याच्या मोलाचें जिणें न जगतां मातृभूच्या उद्धारार्थ उठा ! ज्यांनीं आजपर्यंत तिच्या मुक्तीसाठीं आयुष्यांचें हवन केलें त्या सर्व हुतात्म्यांचें पुण्यस्मरण करा. गुलामीचा धिक्कार करीत स्वातंत्र्याच्या दिव्य प्रेर-णेनें भारताचा जयजयकार करीत उठा ! आजपर्यंत झालेल्या अपमानांची आठवण ठेवून सिंहबलानें गर्जना करीत उठा—"जय हिंद ! "

आणि असे आपल्या सर्वस्वाला हंसतमुखानें तिलांजलि देण्यास सिद्ध होऊन व मातृभूचा विजयध्वज हातांत घेऊन दिग्विजयासाठीं बाहेर पडलांत कीं—

अशी कोणती शक्ति जगांत आहे कीं जी तुमच्या वाढत्या आकांक्षांना प्रतिरोध करील ? तें धाडस कोणीं केलेंच तर मग तो क्रांतीचा तृतीय नेत्र उघडा म्हणजे त्यांतून निघालेल्या क्रोधज्वालेनें ती मदांध शक्ति भस्मसात् होईल !

तो दिवस निःसंशय धन्यतेचा, स्वर्गीय आनंदाचा असेल. त्या दिवशीं शेंकडों हुतात्म्यांच्या समाधींतून विजयध्वनि बाहेर पडेल. सुभाषचंद्रांचा स्वातंत्र्या-साठीं तळमळणारा आत्मा समाधानें पावेल !

तो चिरवांछित दिवस येईपर्यंत

हे भारतीय तरुणांनो, सुभाषचंद्रांनी तळमळून केलेलें आवाहन लक्षांत ठेवा.

'हे तरुण हृदया, ऊठ ! पहा, स्वातंत्र्याच्या उषेचे किरण तुला बोलावीत आहेत !"

क्रमांक 90803
नों. दि. 3/13/59